म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू.-प्रवास
सं. क्र. : ७७३

# प्रवास

## तंत्र आणि मंत्र



REFBK-0027714

ता यशास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवासी ७७३
क्र. २०७९४
१५/१२/८२
... शाखा (...)

संदर्भ
भू-प्रवासी
७७३
२०७९४
१५/१२/८२

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 JAN 1995
18 FEB 1995
1 MAR 1995
18 MAR 1995
22 APR 1995
10 MAY 1995
24 MAY 1995
24 JUN 1995
8 JUL 1995
19 JUL 1995
9 SEP 1995
23 SEP 1995
7 OCT 1995
18 OCT 1995
9 DEC 1995
3 JAN 1996
24 JAN 1996
9 MAR 1996
27 MAR 1996

(क्र.मा.पहा)

१०००-११-८९

# प्रवास   तत्र आणि मत्र

# प्रवास : तंत्र आणि मंत्र

वासंती घैसास

REFBK-0027714

राजहस प्रकाशन / पुणे

प्रवास : तंत्र आणि मत्र

वासती घैसास

**प्रकाशक**

दिलीप माजगावकर

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पार, पुणे ३०

**अक्षरजुळणी**

निर्मिती कॉम्प्युटर सर्व्हिसेस

३१, रजनीगंधा, पर्वती, पुणे ९

**मुद्रक**

साप्ताहिक मुद्रण

१०२५, सदाशिव पेठ, पुणे ३०

© लेखकाधीन

**मुखपृष्ठ**

सतीश देशपांडे

**आतील नकाशे**

भरत केतकर

**प्रथमावृत्ती**

२६ जानेवारी ९४

**किंमत**

रु ७०/-

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्थान | १ |
| सहलीतील साथ सगत | ३ |
| प्रवास मार्ग कसा निवडाल ? बस, रेल्वे, विमान | ५ |
| प्रवास आराखडा कसा असावा ? | ८ |
| काय बघाव ? कस ठरवाव ? | ११ |
| कुठ उतराल ? | १४ |
| प्रवासाची तयारी | २० |
| पूर्वतयारी - आणखी काही | २४ |
| प्रवासात पैसे कसे न्यावेत ? | २७ |
| प्रवासातील खाद्यपदार्थ | ३० |
| कॅमेरा, फोटो | ३३ |
| प्रवासी साहित्य | ३७ |
| बॅग कशी भराल ? | ४० |
| घर बद करताना | ४३ |
| घरातून निघता निघता | ४६ |
| प्रेक्षणीय स्थलदर्शनात गाईडच महत्त्व | ४९ |
| खरेदी | ५४ |
| धार्मिक पर्यटन - काही विचार | ५८ |
| उन्हाळ्यात सहल आखताना | ६१ |
| दरवर्षी महाबळेश्वर कशाला ? | ६५ |
| पाहाव अस विशेष काही | ६८ |
| रेल्वे देत असलेल्या सोयी | ७० |
| **काही सहली काही आराखडे** | |
| बगलोर, म्हैसूर, ऊटी | ७९ |
| अठरा दिवसात दक्षिण सफर | ८२ |
| हैद्राबादसह भुवनेश्वर, कोनार्क, पुरी | ८५ |
| कलकत्ता, दार्जिलिग, सिक्कीम, नेपाळसह | ८७ |
| कुमाऊँ प्रदेशाची सफर | ८९ |
| उत्तराखडातील निसर्गयात्रा | ९३ |
| बद्रीकेदार, गगोत्री, यम्नोत्री | ९६ |
| हिमाचल प्रदेश | ९८ |
| लडाख | १०१ |
| राजस्थानची सहल | १०६ |
| मध्यप्रदेश | १०९ |
| गुजरात | ११२ |
| आध्र प्रदेश | ११५ |
| कर्नाटक | ११७ |
| कूर्ग | १२० |
| गोवा | १२२ |
| लक्षद्वीप | १२४ |
| केरळ | १२६ |
| ओणम् आणि बोट रेसेस् | १२९ |
| ऊटी | १३२ |
| दक्षिणटोक कन्याकुमारी | १३४ |
| अदमान-निकोबार | १३८ |
| अत्युत्कृष्ट शिल्पकलाविष्कार - ओरिसा | १४२ |
| विलोभनीय दार्जिलिग, कॅलिपाँग | १४५ |
| प्रफुल्लित गगटोक | १४९ |
| ईशान्येकडील सप्तभगिनी ( आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, नागालॅण्ड, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा ) | १५१ |
| वैभवशाली स्मृतिस्थळाच बिहार | १५६ |
| औरगाबाद, अजठा, वेरूळ | १५८ |
| अलिबाग, मुरूड, जजिरा | १६२ |
| निसर्गरम्य हरिहरेश्वर | १६४ |

# प्रस्तावना

दैनदिन जीवनक्रमात बदल घडवणारा 'प्रवास' हवा-हवासा वाटणारा; परतु सुयोग्य माहितीअभावी कित्येकदा घराबाहेर पडताना अडखळायला लावणारा सचेवद आयुष्यात 'तोच-तो' पणा आल्यावर कटाळवाण होत थोड वेगळ्या वाटेन जावस वाटत खर, पण जमेल का हे सार ? ही धाकधुक असते अशा प्रवास उत्सुक आणि इच्छुकाना देशभरातील भ्रमतीत जमा होत गेलेल्या माहितीचा लाभ व्हावा, आणि ते पर्यटनास उद्युक्त व्हावेत यासाठी पुस्तक प्रपच माडला रजकतेपेक्षा उपयुक्तता हा यामागील मुख्य हेतू प्रवासविषयक नुसती मार्गदर्शनपर माहिती द्यायची तर ती रटाळ होण्याचा सभव; म्हणून तिला प्रवासानुभवाची साजेशी किनार लावली

प्रवासाच्या विविधअगासबधीत माहितीपर लेखाबरोबर काही महत्त्वाच्या सहलींचे आणि पर्यटनदृष्ट्या आकर्षक राज्याचे सहल आराखडे या पुस्तकात दिलेले आहेत त्याचा साचा मुद्दामच एकसारखा ठेवलेला नाही क्वचित् माहितीची पुनरावृत्तीही केलेली आहे व्यक्ती तितक्या प्रकृती तसच प्रत्येकाची आवड-निवड वेगळी ज्याने-त्याने आपली वृत्ती-प्रवृत्ती, उपलब्ध वेळ, पैसा यानुसार स्वत ला मानवेल आणि भावेल असा प्रवास मार्ग आखावा अशी अपेक्षा आहे.

प्रवास तत्र आणि मत्र मधील प्रवासमार्ग, आराखडे हे काही अतिम नव्हेत एखाद्या प्रवासात आलेला चागला-वाईट अनुभव परत तसाच येईल अस नाही कदाचित् सर्वस्वी नवीनच परिस्थितीला सामोर जाव लागेल कुठल्याही भल्या-बुऱ्या अनुभवाची मजा घ्यायची, त्यातून काहीतरी शिकायची वृत्ती ठेवली तर लहान-मोठ्या प्रवासाचा जास्त आनदी विरगुळा मिळवता येईल

प्रवासाचा बेत आखतानाच घ्यावा लागतो खर्चाचा अदाज हासुद्धा ज्याचा त्यानेच घ्यायचा कुठल्याही प्रवासाला किती खर्च येईल ते कितीजण, कोणत्या मार्गाने, वर्गाने जाणार, वाटेत किती ठिकाणी, किती काळ, कोणत्या प्रतीच्या हॉटेलमध्ये मुक्काम करणार, काय प्रकारच खाणार-पिणार, यावरच मुख्यत्वे अवलबून असत या खर्चाच्या अदाजात सतत बदल होत असल्याने

प्रवासाला निघण्याआधी मिळालेल्या माहितीची खातरजमा करून घ्यायला हवी

माझी प्रवासानुभवाची शिदोरी सपन्न करण्यात सिहाचा वाटा आहे जीवनसाथीदार डॉ विजय घैसास याचा आपल्या कार्यरत वैद्यकीय व्यवसायात अत्यत व्यग्र असूनही वर्षकाठी प्रवासासाठी काही वेळ ते काढतातच। प्रवासातून अनेक नवीन स्नेहबध जुळत असतात, दृढ होत असतात ही प्रवास शिदोरी समृद्ध होण्यात अशा कितीतरी पर्यटक मित्राचा आत्मियतेने हातभार लागलेला आहे यात विशेष उल्लेख करावासा वाटतो डॉ अनिल लचके याचा ऑस्ट्रेलियातील त्याच्या एका वर्षाच्या वास्तव्यामुळे प्रवास लेखनाकडे पाहण्याचा आणखी वेगळा दृष्टीकोन मिळाला

प्रवास तत्र आणि मत्रमधील भ्रमण टप्पे पुण्याच्या साप्ताहिक सकाळ मधील ‘ प्रवास ’ सदरातून कदाचित् याआधी नजरेखालून गेले असतील साप्ताहिक सकाळचे सपादक श्री सदा डुबरे याच्या आग्रही प्रोत्साहनामुळे ही ‘ प्रवास ’ मालिका दोन वर्षांचे वर लिहिली गेली या लिखाणावर आवश्यक सस्करण करून ते पुस्तकरूपाने पर्यटनप्रेमी वाचकापर्यंत नेण्याच श्रेय आहे राजहस प्रकाशनाचे श्री दिलीप माजगावकर याच।

नानाविध निसर्ग, लोकजीवन सस्कृतींनी नटलेल्या आपल्या भारतवर्षाच अधिकाधिक चागल दर्शन घडाव, मर्यादित पैशात आपला प्रवास जास्तीत जास्त सुविहित, सुकर, सुखावह व्हावा हा या प्रवास तत्र आणि मत्र पुस्तकाचा प्रमुख उद्देश या पुस्तकाच्या वाचनाने घराबाहेर पडावस वाटल तर प्रवास मत्र लागू पडल्याच खर समाधान लाभणार आहे एकदा ‘ मत्र ’ मिळाला की ‘ तत्र ’ हे अनुभवाने जमतेच।

२६ जानेवारी ९४

**वासती घैसास**

६४/२०, एरडवणा
पुणे ४११ ००४

# प्रस्तावना

दैनदिन जीवनक्रमात बदल घडवणारा 'प्रवास' हवा-हवासा वाटणारा, परतु सुयोग्य माहितीअभावी कित्येकदा घराबाहेर पडताना अडखळायला लावणारा साचेबद आयुष्यात 'तोच-तो' पणा आल्यावर कटाळवाण होत थोड वेगळ्या वाटेन जावस वाटत खर, पण जमेल का हे सार ? ही धाकधुक असते अशा प्रवास उत्सुक आणि इच्छुकाना देशभरातील भ्रमतीत जमा होत गेलेल्या माहितीचा लाभ व्हावा, आणि ते पर्यटनास उद्युक्त व्हावेत यासाठी पुस्तक प्रपच माडला रजकतेपेक्षा उपयुक्तता हा यामागील मुख्य हेतू प्रवासविषयक नुसती मार्गदर्शनपर माहिती द्यायची तर ती रटाळ होण्याचा सभव, म्हणून तिला प्रवासानुभवाची साजेशी किनार लावली

प्रवासाच्या विविधअगासबधीत माहितीपर लेखाबरोबर काही महत्त्वाच्या सहलींचे आणि पर्यटनदृष्ट्या आकर्षक राज्याचे सहल आराखडे या पुस्तकात दिलेले आहेत त्याचा साचा मुद्दामच एकसारखा ठेवलेला नाही क्वचित् माहितीची पुनरावृत्तीही केलेली आहे व्यक्ती तितक्या प्रकृती तसच प्रत्येकाची आवड-निवड वेगळी ज्याने-त्याने आपली वृत्ती-प्रवृत्ती, उपलब्ध वेळ, पैसा यानुसार स्वत ला मानवेल आणि भावेल असा प्रवास मार्ग आखावा अशी अपेक्षा आहे

प्रवास तत्र आणि मत्र मधील प्रवासमार्ग, आराखडे हे काही अतिम नव्हेत एखाद्या प्रवासात आलेला चागला-वाईट अनुभव परत तसाच येईल अस नाही कदाचित् सर्वस्वी नवीनच परिस्थितीला सामोर जाव लागेल कुठल्याही भल्या-बुऱ्या अनुभवाची मजा घ्यायची, त्यातून काहीतरी शिकायची वृत्ती ठेवली तर लहान-मोठ्या प्रवासाचा जास्त आनदी विरगुळा मिळवता येईल

प्रवासाचा बेत आखतानाच घ्यावा लागतो खर्चाचा अदाज हासुद्धा ज्याचा त्यानेच घ्यायचा कुठल्याही प्रवासाला किती खर्च येईल ते कितीजण, कोणत्या मार्गाने, वर्गाने जाणार, वाटेत किती ठिकाणी, किती काळ, कोणत्या प्रतीच्या हॉटेलमध्ये मुक्काम करणार, काय प्रकारच खाणार-पिणार, यावरच मुख्यत्वे अवलबून असत या खर्चाच्या अदाजात सतत बदल होत असल्याने

प्रवासाला निघण्याआधी मिळालेल्या माहितीची खातरजमा करून घ्यायला हवी

माझी प्रवासानुभवाची शिदोरी सपन्न करण्यात सिहाचा वाटा आहे जीवनसाथीदार डॉ विजय घैसास याचा आपल्या कार्यरत वैद्यकीय व्यवसायात अत्यत व्यग्र असूनही वर्षाकाठी प्रवासासाठी काही वेळ ते काढतातच ! प्रवासातून अनेक नवीन स्नेहबध जुळत असतात, दृढ होत असतात ही प्रवास शिदोरी समृद्ध होण्यात अशा कितीतरी पर्यटक मित्राचा आत्मियतेने हातभार लागलेला आहे. यात विशेष उल्लेख करावासा वाटतो डॉ अनिल लचके याचा ऑस्ट्रेलियातील त्याच्या एका वर्षाच्या वास्तव्यामुळे प्रवास लेखनाकडे पाहण्याचा आणखी वेगळा दृष्टीकोन मिळाला

प्रवास  तत्र आणि मत्रमधील भ्रमण टप्पे पुण्याच्या साप्ताहिक सकाळ मधील 'प्रवास' सदरातून कदाचित् याआधी नजरेखालून गेले असतील साप्ताहिक सकाळचे सपादक श्री सदा डुबरे याच्या आग्रही प्रोत्साहनामुळे ही 'प्रवास' मालिका दोन वर्षाचे वर लिहिली गेली या लिखाणावर आवश्यक सस्करण करून ते पुस्तकरूपाने पर्यटनप्रेमी वाचकापर्यंत नेण्याच श्रेय आहे राजहस प्रकाशनाचे श्री दिलीप माजगावकर याच !

नानाविध निसर्ग, लोकजीवन सस्कृतींनी नटलेल्या आपल्या भारतवर्षाच अधिकाधिक चागल दर्शन घडाव, मर्यादित पैशात आपला प्रवास जास्तीत जास्त सुविहित, सुकर, सुखावह व्हावा हा या प्रवास तत्र आणि मत्र पुस्तकाचा प्रमुख उद्देश या पुस्तकाच्या वाचनाने घराबाहेर पडावस वाटल तर प्रवास मत्र लागू पडल्याच खर समाधान लाभणार आहे एकदा 'मत्र' मिळाला की 'तत्र' हे अनुभवाने जमतेच !

२६ जानेवारी ९४

**वासंती घैसास**
६४/२०, एरडवणा
पुणे ४११ ००४


काश्मीर
श्रीनगर
लेह
हिमाचल प्रदेश
चदीगड
पजाब
नैनिताल
हरियाणा
नेपाळ
दिल्ली
जयपूर
उत्तर
प्रदेश
अयोध्या
राजस्थान
आग्रा
राणकपूर
लखनौ
उदयपूर
खजुराहो
गुजराथ
अहमदाबाद
द्वारका
भोपाळ
मध्यप्रदेश
सिक्किम
दार्जिलिंग
पाटणा
नालंदा
बिहार
प
बंगाल
अरुणाचल प्रदेश
इटानगर
आसाम
नागालँड
मेघालय
मणिपूर
त्रिपुरा
मिझोराम
ओरिसा
अजंठा
महाराष्ट्र
वेरुळ
मुंबई
कोनार्क
पुणे
गणपती पुळे
हैद्राबाद
विशाखापट्टणम्
विजापूर
श्रीशैलम्
गोवा
कर्नाटक
आंध्र
प्रदेश
तिरुपती
म्हैसूर
पाँडिचेरी
तामिळनाडू
केरळ
कोचिन
मदुराई
त्रिवेंद्रम
कन्याकुमारी
लक्षद्वीप
अंदमान निकोबार
पोर्ट ब्लेअर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

# प्रस्थान

दैनंदिन धकाधकीच्या चाकोरीबद्ध जीवनात काही बदल, थोडा विरंगुळा हवा असेल तर लाब कुठेतरी वेगळ्या वातावरणात जायला हव असा बदल मिळविण्यासाठी सुट्ट्या जवळ येऊ लागल्या की अनेकाचे प्रवासाचे बेत सुरू होतात परतु नानाविध भाषा, लोक सस्कृती, निसर्गाविष्कार यानी समृद्ध असलेल्या खडप्राय अशा आपल्या भारत देशात कुठे जाव आणि काय काय पहावं अस होऊन जात विशेषकरून सहलीसाठी नव्यानेच घराबाहेर पडू इच्छिणाऱ्याना तर अनेक ठिकाण वेधक वाटल्याने फारच गोंधळून जायला होत मग कधी, केव्हा, कुठे जाव ?

प्रत्येक भागाचा, काही विशिष्ट स्थळांचा स्वत चा असा खास मोसम असला तरी हिमालयातील अती उचीवरील ठिकाणे वगळता नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा काळ भारतात कुठेही प्रवासासाठी सर्वोत्तम म्हणावा असा शैक्षणिक सुट्ट्याचा विचार करता दिवाळीची सुट्टी सर्वांत चागली तीव्र उन्हा-पावसाचा ताप सरत आलेला आणि थडीच्या कडाक्याला सुरुवात व्हायची असल्याने मुलामोठ्यानाही प्रवास बाधायची शक्यता कमी शिवाय बायकानाही दिवाळी केवळ फराळाचे पदार्थ, खाण-पिण करत स्वयपाकघरात घालविण्यापासून थोडी सुटका पैशाच्या दृष्टीने विचार केला तरीही दिवाळीच्या त्याच त्या हौसे-मौजेवर दरवर्षी घरबसल्या खर्च करण्यापेक्षा त्याच पैशात कुठेतरी वेगळ्या ठिकाणी सहलीला जाऊन दिवाळी साजरी करण सहज शक्य होऊ शकेल

हिमालयाच्या भागात जाण्यासाठी मात्र जाताना कितीही तापदायक वाटल तरी उन्हाळ्याची सुट्टीच चागली काश्मीर, सिमला, मनाली सारख्या ठिकाणी बर्फात खेळायची मजा उन्हाळ्यातच लुटता येते जस जस उशिरा जाऊ तस तस बर्फ वर वर सरकायला लागून तेथपर्यंत पोचण्यासाठी जास्त पायपीट करावी लागते किंवा घोडेवाल्याना अधिक पैसे द्यावे लागतात आणि नतर तर फळा-फुलाच्या मोसमात डोंगरमाथ्यावरील बर्फ दुरून बघण्यावर समाधान मानाव लागत हिमालयातील पदभ्रमणही आल्हाददायक वातावरणामुळे उन्हाळ्यातच जास्त आनंददायी ठरत हिमालयाच्या ठिसूळ खडकामुळे पावसाळ्यात अनेकदा

दरडी कोसळून रस्ता बंद होऊन अडकून पडायचा धोका असतो

आपल्या अमाप लोकसंख्येमुळे सीझनमध्ये कुठेही गेलं तरी थोड्या फार फरकाने गर्दीचा गदारोळ असतोच सीझनमध्ये हॉटेल्सचे राहण्या, खाण्या-पिण्याचे दर जास्त असतात ऑफ-सीझनला हेच दर खूप कमी असल्याने सहल तशी थोडी स्वस्तात होऊ शकते

हिवाळ्यात एकवेळ थंड हवेच्या ठिकाणी गेलं तर विशेष बिघडणार नाही परंतु शरीर भाजून काढणाऱ्या राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशातील तीव्र उन्हाळी भागात ऐन उन्हाळ्यात लांबच्या सहलीला जाण्यासारखा वेडेपणा नाही प्रेक्षणीय स्थळ दर्शनासाठी सतत कडक उन्हात भटकायचं, तहान-तहान झाल्याने मिळेल ते पाणी स्वच्छ, अस्वच्छतेची तमा न बाळगता प्यायचं, वेळी-अवेळी उन्हा-तान्हात उदरभरण करायचं, यामुळे उन्हाळ्यातील जास्त दिवसाचा सलग लांबचा प्रवास कधीही सुखकारक होत नाही

अनेकांची अशी समजूत असते की संयोजकांनी सहल आयोजित केलीय ती त्या भागातील योग्य हवामान पाहूनच परंतु सहल आखताना कित्येकदा सुयोग्य मोसमापेक्षा सोय, निजी लाभालाच अधिक प्राधान्य दिलं जातं त्यामुळे जाहिरातबाजीला भुलून अमूल्य वेळ व पैसा खर्च करून विकतचा मनस्ताप घ्यायची पाळी कधी कधी येते

हिवाळ्यात तुफानी बर्फवृष्टीमुळे हिमालयात अनेक ठिकाणी जाण्याचे मार्ग बंद होतात. बद्रीकेदार, गंगोत्री, यम्नोत्री मंदिरे सर्वसाधारणपणे मे मध्य ते ऑक्टोबरपर्यंत यात्रेकरूसाठी उघडी असतात मनाली किंवा काश्मीर कारगिलवरून जाणारा लेह-लडाखचा रस्ता जून अखेरीस खुला होतो काश्मीरमधील अमरनाथची यात्राही फक्त जुलै-ऑगस्टमधेच ( सोनमर्गहून एक दिवस, पहेलगामहून चार ते पाच दिवस ) करता येते

पावसाळ्यात सहसा लांबच्या सहलींना घराबाहेर पडणं होत नाही ( बद्रिकेदार, फुलोंकी घाटी सारख्या सहलींचे अपवाद वगळता ) या काळात अंदमान, लक्षद्वीप किंवा आसाम-मेघालयसारख्या धो धो पावसाच्या ईशान्य भारताच्या सहलींना जाण्यात काहीच हशील नाही एकशिंगी गेंड्यासाठी जगप्रसिद्ध असलेलं आसाममधील काझिरंगा अभयारण्य पावसाळ्यात ब्रह्मपुत्रेच्या पुरामुळे कित्येकदा पाण्यातच असतं. केवळ काझिरंगाच नव्हे तर पावसाळी प्रदेशातील इतरत्र बरीच अभयारण्येही या काळात पाय टाकायलाही अयोग्य असतात

दिवाळीनंतर नोव्हेंबरपासून अभयारण्याचा सीझन सुरू होत असला तरी यावेळी गवत खूप वाढलेले असल्याने वन्यचर चटकन दृष्टीस पडत नाहीत उन्हाळा हा अभयारण्यांना भेट देण्याचा सर्वांत चांगला मोसम म्हणावा लागेल कारण या काळात जंगली श्वापदं पाण्याच्या शोधार्थ जंगलाबाहेर पडत असल्याने पाणवठ्याच्या जागी त्यांचं जास्त चांगलं दर्शन घडू शकतं अर्थात् अभयारण्याच्या एखाद्या दिवसाच्या धावत्या भेटीत वाघ- सिंह-

हत्तींसारखे मोठे प्राणी दिसण म्हणजे नशीब फारच बलवत्तर हव

वर्षभरात कधीही गेल तरी आपल्या रूपाचे विविध मोहक दर्शन घडवणारा भारतातील एकमेव प्रदेश म्हणजे भूनदनवन काश्मीर. आणि आता काही प्रमाणात मनाली केव्हाही गेल तरी आपल्या मनोवेधक सृष्टि-सौंदर्याचे नानाविध लाजबाब आविष्कार दाखवत काश्मीरचा सदाबहार निसर्ग स्वागताला सज्ज असतो तरीसुद्धा फक्त एकदाच काश्मीरला जाऊ शकणाऱ्यानी मे-जूनमध्ये जाव कारण आपल्याकडे कधीही चाखायला न मिळणारी मऊ बर्फात मनसोक्त खेळायची, घसरायची मजा फक्त याच सीझनमध्ये लुटता येते खालचा बर्फ हळूहळू वितळायला लागून वर वर जायला लागून ऑक्टोबरमधे फक्त डोंगरमाथ्यावर टोपीसारखा बर्फ राहतो बर्फ वितळण्याच प्रमाण कमी झाल्याने नद्याच पाणी आटत, त्यामुळे वीजकपात असते, मोगल बागातील कारंजी पाण्याअभावी कोरडी ठणठणीत पडतात. सफरचदानी लगडलेली झाडे आणि पाम्पुर भागात अगदी थोडा काळ बहरलेले केशराच्या जाभळ्या फुलाचे मळे यावेळी पाहायला मिळतात पण मऊ बर्फात हुदडायची मजा काही औरच

एकदा कुठेतरी जायच ठरल की कोणाच्या सोबतीने हा पुढचा प्रश्न एकट, दुकट, मुलासमवेत, फक्त आपलच कुटुब का इतर मित्रमडळींसमवेत मोठा ग्रुप करून ते ठरवाव लागतं

* *



# सहलीतील साथ संगत

'व्यक्ती तितक्या प्रकृती' या असायच्याच म्हणूनच सहलीसाठी ग्रुप तयार करायचा झाल्यास सगळ्यांत काळजी घ्यायला हवी ती समान उत्पन्न वर्गातील समआवडीचे साथीदार निवडायची सहलीचा गट जर एकसध नसेल तर बारीक-सारीक गोष्टींत मतभेदाचे खटके उडून सहलीची सगळी मजाच निघून जाईल आणि काही बदल घडावा म्हणून सहलीला जाण्याचा सगळा उद्देशच नष्ट होऊन उत्साहाऐवजी मनस्ताप विकत घेऊन परत यायची पाळी येऊ शकेल

सहलीतील मौजमजेच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असतात कोणाला एकाच ठिकाणी जाऊन नुसता खाली-पिली लोळत किंवा पत्ते कुटत आराम करावासा वाटेल, तर कोणाला आक्षमतातील जास्तीत जास्त पर्यटन स्थळ बघावीशी वाटतील किंतीही वेळ ताटकळत रागेत उभ रहाव लागल तरी मूर्तरूप देवदर्शनात काहींना धन्यता वाटेल, तर काहींना त्या देवालयावरील कला कारागिरी पाहण्यात, इतिहास जाणून घेण्यास समाधान लाभेल काहींना आधुनिक प्रकल्प बघण्याची उत्सुकता असेल, तर कोणाला फक्त भरमसाट खरेदीतच रस असेल काही थोडे तद्देशीय लोकजीवनात भान हरपून रममाण होण पसंत करतील कोणाला हिंडताना सतत चाकाचा आधार लागेल तर कोणाला आडवाटेने पदभ्रमण करत निसर्गाशी जवळीक साधायची ओढ असेल

लाबच्या प्रवासात होऊ शकणाऱ्या काही मतभेदाबद्दल बोलायच झाल तर. वाड्यात, लहान जागात राहणाऱ्याना धर्मशाळेतील एकाच हॉलमध्ये एकत्रित रहायला विशेष त्रासदायक वाटणार नाही परतु नेहमी स्वतत्र खोलीत निवात झोपायची सवय असणाऱ्याना लोकाच्या अशा गलक्यात राहण, तेथेच कपडे बदलण विशेष करून स्त्रियाना फार सकोचकारक अन् अवघड होऊ शकेल प्रातर्विधीसाठी रागेत उभ राहण, (क्वचित टमरेल घेऊनही), समाईक स्नानगृहात प्रसगी उघड्यावरही आघोळ, तेथेच कपडे बदलण, धुण हे प्रकार ज्याना उभ्या आयुष्यात कधी करावे लागले नाहीत त्याना एकदम सहलीत यासाठी जमवून घेण कठीण, जाचकारक वाटणारच सहलीत खाण्यापिण्याचा सर्वांचा एकत्रित खर्च हे आपापसांतील मतभेदाच आणखी एक कारण "काय मेलं तोबरा बाधल्यासारख सारख दिसेल ते आबर-चबर खाण", "चार दिवस नॉन-व्हेज खाल्ल नसत तर काही बिघडल असत का?", "मुलाना काही शिस्त? काही आवर? सारखी कोल्ड ड्रिंक्स घेत होती!" यासारख्या टोमण्यातून येणारी कटुता टाळायची असेल तर स्नेही कुटुबियानी एकत्रित सहलीला जाताना एक पथ्य पाळायला हव आणि ते म्हणजे खाण्या-पिण्याचा खर्च ज्याचा त्याने करायचा

आपल्या आचार-विचाराशी साधा जुळणारा सहप्रवाशाचा गट हवा. ग्रुप जेवढा मोठा तेवढी आवडी-निवडीच्या वादावादीची शक्यता अधिक. जास्त लोकांसाठी एकाच ठिकाणी जागा शोधण आणि मिळणही थोड अवघडच एका टॅक्सीतून सहजतेने हिंडता येऊ शकेल असा ४-६ जणाचा ग्रुप लाबच्या सहलीसाठी आदर्शवत् म्हणावा असा आर्थिकदृष्ट्याही तो फायदेशीर पडतो आणि एकसधही राहतो कमीत कमी दोघ असलेली चागली एकमेकाशी बोलायला सामानाकडे लक्ष द्यायला बर पडत परतु कैलास-मानस सरोवर यात्रेला ठरवूनही किमान दोघानासुद्धा एका वेळी जाता येईल याची खात्री नाही कारण या यात्रेसाठी निवड होण, न होण हे सर्वस्वी वैद्यकीय तपासणीवर अवलबून असत योग्य शारीरिक क्षमता

नसेल तर अर्ध्या वाटेतूनही परत पाठविल्याची उदाहरणे आहेत

खूप इच्छा असली तरी बरोबर यायला कोणी नसेलच तर मनात असूनही सहलीला न जाता नुसतच खंत करत बसायचं का ? सुयोग्य सोबत नसण हा आपल्याकडे प्रवासासाठी घराबाहेर पडण्यासाठीचा मोठा अडथळा, विशेषत- स्त्री वर्गाला

अनेक पुरुष, परदेशी स्त्रिया बेधडकपणे एकेकट्या भटकताना दिसतात मग आम्हा भारतीय नारींनाच दरवेळी सोबतीची गरज का लागावी ? अस म्हटल तरी आपल्याकडे एकट्या स्त्री पर्यटकाना मुख्य अडचण भेडसावते ती रात्रीचा सुरक्षित निवारा मिळण्याची अनोळखी ठिकाणी हॉटेलमधील स्वतत्र खोलीत एकटीने राहण्यापेक्षा स्वस्त धर्मशाळेत चार-चौघात सुरक्षित राहावं म्हटल तर बऱ्याच धर्मशाळा जास्त करून उत्तर भारतातील बद्रिकेदार, गगोत्री-यम्नोत्री यात्रामार्गावरील एकट्या स्त्रीयात्रेकरूना रात्रीचा आसरा देत नाहीत

एकट्या, दुकट्याच्या, अगर लहान-मोठ्या ग्रुपच्या प्रवासाचे काही फायदे, काही तोटे आहेतच प्रत्येकाने आपला स्वभावधर्म, आर्थिक कुवत, शारीरिक क्षमता यानुसार ठरवाव की आपल्याला कुठल्या प्रकारचा प्रवास जास्त सुखकारक होईल ते

* *



# प्रवास मार्ग कसा निवडाल – बस, रेल्वे, विमान

एकदा का प्रवासाला कधी, कुठे, कोणाबरोबर जायच ठरल की बस, रेल्वे, विमान आणि क्वचित् काही ठिकाणी बोट यांपैकी कोणता मार्ग निवडावा हा त्याच्यापुढचा विचार. पदभ्रमण, सायकल किंवा स्वयचलित दुचाकी हे झाले आणखीनच वेगळे प्रात

चारचाकी म्हटली तरी बस, मेटॅडॉर का टॅक्सी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर वाहन ठरवून, स्वत-च्या वाहनाने का पब्लिक ट्रान्सपोर्टने अनेक पर्याय खुले असले, तरी प्रत्येक मार्गाची काही सुख-दु ख असतातच आणि ती आधीच गृहीत धरावी लागतात

एका टप्प्यातील लाबच्या प्रवासासाठी बरेचदा बस सोईस्कर वाटते परतु रात्री जरासुद्धा आडव न होता ताटकळत बसून करावा लागणारा प्रवास, घाटाचा रस्ता असल्यास बस लागण्यासारखे प्रकार, अस्वच्छ खाद्यपदार्थ आणि विशेष करून स्त्रियांना जाणवणारी

स्वच्छतागृहाची अडचण यामुळे बसप्रवास तसा त्रासदायकच. लाबचा खडित प्रवास करायचा असल्यास पुढच्या आणि परतीच्या खडित टप्प्यावरच्या प्रवासाच आपल्या गावाहून आगाऊ आरक्षण करता न येण ही बस प्रवासाची एक प्रमुख अडचण

थोड्या अंतरावरील प्रवासासाठी, कमी लोक असल्यास मेटॅडॉर सोईची वाटली तरी थोडे पाय पसरावे, जरा उभ राहाव म्हटल तर जागा नाही, हबके जास्त बसणार, उन्हाळ्यात टप तापून भट्टी होणार, पावसाळ्यात चाक पटकन् चिखलात रुतायची भीती, यासारख्या कारणामुळे मेटॅडॉरचा जास्त दिवसाचा प्रवास तसा कष्टकारकच

आपल्या ताब्यातील वाहनाचा मुख्य फायदा म्हणजे वाटेतील प्रेक्षणीय स्थळे जाता जाता पाहता येतात दरवेळी सामान चढवा, उतरवा हा प्रश्न नाही. यातील प्रमुख तोटा म्हणजे रात्रीचा प्रवास दिवसेन् दिवस सर्वच दृष्टीने तसा धोकादायक होत चालल्याने करावा लागणारा सक्तीचा मुक्काम आणि त्यामुळे वाढणारा हॉटेल वास्तव्याचा खर्च

आपल्या राज्याबाहेर गाडी न्यायची झाल्यास त्या राज्याचा टॅक्स द्यावा लागतो हा टॅक्स किती जणासाठीची बस किती कि मी प्रवास करणार यावर अवलबून असतो यासाठी त्या राज्यातील आपल्या प्रवास मार्गाचा आराखडा द्यावा लागतो सध्या हे आतरराज्य कर प्रचड आहेत राजस्थानसारख्या राज्यात ५० सीटर बसला किलोमीटर्स प्रवासानुसार साधारणत· सुमारे ४५०० रुपये पडतात हा कर दरडोई असतो आणि ५० सीटर बसमध्ये कमी लोक असले तरीही ५० लोकांच्या हिशेबानेच कर आकारणी होते म्हणजे बसच्या क्षमतेपेक्षा कमी लोक असल्यास दरडोई खर्च वाढतो

रेल्वे प्रवासाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे टप्प्या-टप्प्याच्या खडित प्रवासाची आगाऊ आरक्षण पुण्या-मुबईसारख्या मोठ्या शहरातून सहजतेने करता येतात त्यामुळे योजनापूर्वक प्रवास आराखडा आखता येतो. रेल्वेचे दुसऱ्या वर्गाचे दर किफायतशीर असल्याने प्रवासाच व्यवस्थित नियोजन केल्यास हा प्रवास सुविहित आणि माफक पैशात होऊ शकतो अर्थात् पैसे कमी तर कष्ट थोडे जास्त हे पक्क ध्यानात ठेवायला हव

रेल्वेतील प्रवासकाळ बहुताशी रात्रीचा ठेवून, दिवसा जास्तीच सामान रेल्वे क्लोकरूममधे ठेवून प्रेक्षणीय स्थलदर्शन केल्यास हॉटेल खर्चात खूप बचत करता येते. शक्य असणाऱ्यांनी दिवाळी, नाताळ, मे महिना या सारख्या सुट्ट्यांचा कालावधी टाळून प्रवासाला गेल्यास गर्दीच्या गदारोळालाही तोंड द्याव लागणार नाही

लाब पल्ल्याचा प्रवास रेल्वेने आणि स्थानिक प्रेक्षणीय स्थलदर्शन टॅक्सी/ मेटॅडॉर/ बसने करण सर्वांत सुखकारक व्हाव

विमान प्रवास फार खर्चिक असा 'बाऊ' अनेकाच्या मनात असतो आणि आपल्या देशात ते तस आहेही खरच म्हणा त्यातून विमानतळ गावाबाहेर, लांब. तेथे

जाण्या/येण्यासाठीही जास्त पैसे लागतात परंतु भारतातील काही ठिकाणी विमान प्रवास थोडा अधिक खर्च करूनही सारासार विचाराती परवडतो

ईशान्य भारत हा अति दुर्गम, डोंगराळ प्रदेश त्यातील आसाम सोडला तर इतर प्रातात रेल्वे नाहीच म्हटली तरी चालेल आणि आहे तीही अति स्लो येथे एका राज्यातून दुसऱ्यात जायच झाल्यास प्रसगी १०-१२ तासांचा हाड खिळखिळी करवणारा प्रवास करावा लागतो विमानाने हेच अतर अर्धा-पाऊण तासात काटता येत

याच भागातील त्रिपुराची राजधानी अगरताळ्याहून कलकत्त्याला यायच झाल्यास सबध बागला देशाला वळसा घालावा लागतो आणि त्यासाठी किती दिवस आणि किती गाड्याची अदलाबदल करावी लागेल याचा नुसता हिशेब करणही जीवावर येत विमान मात्र तासाभरात बागला देश ओलाडून कलकत्त्याला येत.

लेह-लडाखचही असच आहे श्रीनगर किंवा मनाली-लेह रस्त्याने जायच म्हटल्यास वाटेत एक मुक्काम करून दोन दिवस लागतात हा रस्ता जून अखेर ते ऑक्टोबरपर्यंतच खुला असतो श्रीनगर-लेह अतर काटायला विमान फक्त अर्धा तास घेत तर दिल्ली-लेहला सव्वातास लागतो

अदमान ( पोर्ट ब्लेअर ) चा विमान प्रवासही वरकरणी खूप महाग वाटला ( भाडे एकेरी प्रत्येकी सुमारे ३००० रु ) तरी फार सुखाचा होतो कारण कलकत्ता / मद्रास ते पोर्ट ब्लेअर हा विमान प्रवास आहे फक्त दोन तासाचा याउलट बोटीला हे अतर पार करायला ७२-८० तास लागतात शिवाय दहा दिवसातून एकदा बोट, आणि तीदेखील नक्की कधी सुटणार, किती वेळ घेणार हे मुख्यत लहरी हवामानावरच अवलबून असत त्यामुळे हॉटेल, पुढच्या प्रवासाची आरक्षणे करण फार अवघड होत बोटीच वेळापत्रक साधारणपणे तीन महिने आधी उपलब्ध होऊ शकत पैसे कमी असतील तर बोटीला पर्याय नाही परंतु बोटीच्या प्रवासाचा नुसता अनुभव घ्यायचा असल्यास पोर्ट ब्लेअर ते कार निकोबार / ग्रेट निकोबार पर्यंत जाऊन येता येईल तेथे जाण्यासाठीही नियमित बोट सेवा मिळेलच अस नाही त्यामुळे प्रवासाचा आगाऊ पक्का आराखडा आखणही कठीणच फक्त भरपूर वेळ काढून जायच.

पोर्ट ब्लेअर ते कलकत्ता हा बोट प्रवास तर फारच जिकिरीचा. कलकत्ता हे थेट बदर नसल्यास भरती येईपर्यंत बोट धक्क्याला लागूच शकत नाही तोपर्यंत डासाच्या माऱ्यात कलकत्त्याच्या चिकट उकाड्यात घामाघूम होत वेळ काढण्याची पाळी येते. अदमानच्या बोटींचे वेळापत्रक, दर, आरक्षण यासबधीची माहिती शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडियाच्या मुबई ( शिपिंग हाऊस, २४५ मादाम कामा रोड, मुबई ४०० ०२१ ) कलकत्ता ( शिपिंग हाऊस, १३, स्ट्रँड रोड, कलकत्ता ७०० ००१ ) मद्रास ( जवाहर हाऊस, राजाजी सलाई,

मद्रास ६०० ००१ ) येथील कार्यालयात मिळू शकते

भारतात पर्यटकाना बोटीचा आधार अदमान-निकोबार आणि लक्षद्वीप बेटे वगळता विशेष घ्यावा लागत नाही

लक्षद्वीप बेटावर मात्र पर्यटकांना बोटीने आपले आपण जाता येत नाही स्पोर्टस् ( SPORTS ) या प्रशासकीय यत्रणेमार्फत लक्षद्वीपच्या विविध प्रकारच्या सहलींचे आयोजन करण्यात येते काही सहली दोन-तीन बेटावर दिवसा हिंडून रात्री बोटीत काढायच्या असतात, तर काही सहलीत एखाद्या बेटावर जाऊन दिवसा मुक्काम असतो. सहलीचा प्रकार व कालमानानुसार जेवण-खाण, राहण्यासकट दर आकारला जातो अधिक माहितीसाठी सपर्क असिस्टट जनरल मॅनेजर, स्पोर्टस्, लक्षद्वीप ऑफिस, इदिरा गाधी रोड, विलिग्डन आयलड, कोचिन ६८२ ००३

* *



# प्रवास आराखडा कसा असावा ?

सहलीचा प्रवास काळ हा साधारणत पंधरा ते वीस दिवसाचा असावा म्हणजे कटाळवाण होत नाही एकदा घराबाहेर पडलोय तर घ्या बघून सगळ म्हणून महिनो न् महिने फिरत राहिल तर नतरचा प्रवास म्हणजे कित्येकदा नुसता व्यायामच व्हायची शक्यता असते एक वेळ शरीर दमणार नाही, परतु मन थकल्याने चागल्या गोष्टीही रटाळ, अनाकर्षक वाटू लागतील

प्रवासाचा आगाऊ आराखडा हा हवाच कित्येकदा हा आराखडा अत्यत काटेकोरपणे आखला जातो किंबहुना सर्वत्रच्या अतिगर्दीमुळे तो तसा आखून राबवावा लागतो मनात आल, उठल, निघाल अशी स्थिती आपल्याकडे बेसुमार लोकसख्येमुळे सध्या राहिलेलीच नाही म्हटल, तर वावग ठरू नये

गाड्याच उशिरा पळण ही आपल्याकडची तशी अगवळणी पडलेली नित्याचीच बाब त्यामुळे प्रवासात गाड्या बदलायच्या असल्यास दोन गाड्यामध्ये ५-६ तासाच अतर ठेवण इष्ट म्हणजे गाडी उशिरा पोहोचली तरी पुढची मिळू शकेल काही वेळा गाडी पकडण्यासाठी

त्याच गावातील दुसऱ्या स्टेशनवर जाव लागत तो वेळही गृहीत धरणं जरुरीच असत

काही उदाहरणे द्यायची झाल्यास पुण्याहून जयपूरला जाण्यासाठी झेलम एक्सप्रेसने गेल्यास आम्याला गाडी बदलावी लागते झेलम जाते 'आग्रा कँट'ला आणि जयपूरची गाडी पकडावी लागते तेथून पाच-सात किलोमीटर्स अतरावरील 'आग्रा फोर्टला' मुबई-पुण्याहून जाणाऱ्या रेलगाड्या जातात मद्रास सेंट्रलला आणि पाँडेचरी, रामेश्वर, मदुराईकडच्या गाड्या सुटतात 'मद्रास इग्मोर' हून. जशा मुबईहून गुजरातकडे जाणाऱ्या सर्व गाड्या बॉम्बे सेंट्रलहून निघतात हैद्राबाद-सिकदराबाद, दिल्ली-निजामुद्दिन या स्टेशन्समध्येही अतर असून तेथून वेगवेगळ्या गाड्या सुटतात नक्की कुठल्या स्टेशनला जायचं याची खात्री आधी करून घ्यायला हवी.

जातानाच वाटेतील प्रेक्षणीय स्थळे थांबत, थाबत येताना शेवटच्या ठिकाणाहून शक्यतो थेट परतलेलं चागलं कारण प्रवासाच्या दगदगीने आपण थकलेलो असतो सामानाच ओझही नाही म्हटल तरी वाढलेलं असत कन्याकुमारीला जाताना थेट गेल्यास दोन रात्री नुसत बसून काढूनच थकवा येतो, कटाळवाण होत याउलट येतानाचा हाच थेट प्रवास आयत्या आरामाने प्रवासाचा शिणवटा दूर करवणारा होतो

परतायच्या गाडीच्या नियोजित वेळेआधी शेवटच्या मुक्कामाला पोहोचता येईल या बेतान प्रवास आराखडा आखावा लाबच्या सहलीत एखाद-दुसरा दिवस 'बफर' सारखा रिकामा ठेवावा म्हणजे गाडी चुकली, रद्द झाली, जवळपासच ऐनवेळी कळलेल एखाद ठिकाण पाहावस वाटल, तद्देशीय लोकजीवनात थोड रममाण व्हावस वाटलं तरी शक्य होईल आजकाल आपल्या देशात जवळजवळ सर्वत्रच इतकी अशात परिस्थिती निर्माण झाली आहे की कधी, कुठे, कोणत्या कारणानी तिचा उद्रेक होईल त्याचा नेम नाही अशा वेळीही हा जास्तीचा दिवस कामी येईल

किमान प्रवासाचा तरी आगाऊ आराखडा आरक्षणासकट हवा. एकवेळ राहण्याची काहीतरी तजवीज आयत्या वेळी करता येऊ शकेल गट जर मोठा असेल तर ऐनवेळी जास्त लोकाना एकदम जागा मिळणही त्रासदायकच

काहीही आराखडा न आखता पोर-बाळ, म्हाताऱ्या-कोताऱ्यासकट लाबच्या प्रवासाला निघालेले अनेक महाभाग असतात 'दिसेल तो मार्ग स्वीकारायचा' ही त्यांची वृत्ती यामुळे प्रवासात कित्येकदा अतोनात हाल होतात

इदूरजवळील माडू गाव आमच्या बसमधील दोन परदेशी मुली उतरलेल्या पाहून पाच-सहा वयस्कर प्रवाशाचा चमू कडक्टरशी कशीतरी मिनतवारी करून भल्यामोठ्या सामानासकट बसमध्ये चढला रिकाम्या सीटस् होत्या फक्त दोन तरीही त्यानी ड्रायव्हरजवळच्या जागेत कसबस सामावून घेतल. पावसामुळे बसला ठिकठिकाणी गळती लागली होती त्याच्यातील

एका आजोबाच्या डोक्यावर तर सतत अभिषेक होत होता "इदूरमधील एखाद्या धर्मशाळेच्या जवळपास आम्हाला उतरवा" अस त्यानी कडक्टरला सागितल असल्याने त्याने त्या लोकाना भर पावसात एका चौकात उतरवल बरोबर अवाढव्य सामान, जवळपास आडोशाला झाडसुद्धा नाही काय सुख मिळत असेल अशा दिशाहीन अधातरी प्रवासाने ?

याउलट काही वेळा परिस्थितीच अशी निर्माण होते की, प्रवास आराखड्यात ऐनवेळी बदल करण सयुक्तिक ठरत, काही वेळा अपरिहार्य होत आयत्या वेळी प्रवासमार्गात बदल करण्याच्या कसोटीला सामोर जाण्याचा प्रसग उत्तर-पूर्व भारताच्या प्रवासात अनेकदा येऊ शकतो.

अरुणाचल प्रदेशाची राजधानी इटानगर नंतर आम्हाला जायच होत आसाममधील जोरहटला त्यासाठी इटानगरपासून रस्त्याने दोन-अडीच तासाचे अतरावर असलेल्या नॉर्थ लाखिमपूरला आलो नॉर्थ लाखिमपूर जोरहाटच्या मधे होती ब्रह्मपुत्रा नदी आणि ही फ्लाईट होती फक्त वीस मिनिटाची पण ती सपूर्ण भरलेली समोर दोन पर्याय होते एक तर मुक्काम करायचा, परतु त्यासाठी त्या छोट्या गावात काही सुविधा आहेत की नाही याची कल्पना नव्हती, किंवा रस्ता, फेरीबोट करत दहा-बारा तासाच्या जिकीरीच्या प्रवासानतर कस तरी जोरहाट गाठायच ब्रह्मपुत्रेवर फक्त गुवाहाटी व तेझपूर येथेच पूल असल्याने इतरत्र हा महानद पार करण म्हणजे महात्रासदायक, कष्टकारक काम

काय कराव या विवचनेत असताना दिब्रुगडच विमान उड्डाणाच्या तयारीत असलेलं दिसल; दिब्रुगडहून जोरहट रस्त्याने फक्त दोन अडीच तासांचे अतरावर. मग दहा-बारा तासाचा बदलाबदलीचा खडतर प्रवास करण्यापेक्षा विमानाने ( ही फ्लाईटही फक्त अर्ध्या तासाची ) दिब्रुगडला जाऊन रस्त्याने जोरहट गाठाव या विचाराने तातडीने प्रवासमार्ग बदलायचा निर्णय घेतला आणि घाईघाईने तिकीट काढून धावत-पळत लोकल गाठावी तस ते विमान पकडल अनुभवान जमत सार काही त्यात अवघड अस काहीच नाही !

* *



# काय बघावं ? कसं ठरवावं ?

आपला गट, आपली आवड, उपलब्ध वेळ, पैसा लक्षात घेऊन प्रवास आराखडा आखल्यास ती सहल जास्त आनददायी तर होईलच पण 'मनुजा चातुर्य ' देणारीही ठरेल

प्रवासात फक्त मूर्तरूप देवदर्शनाला प्राधान्य देऊन वेळ वाया घालवू नये कारण शेवटी सर्व देव नमस्कार. केशवम् प्रतिगच्छति मात्र मानवी कार्यातून प्रतित होणाऱ्या, कन्याकुमारीचे विवेकानदपुरम्, पाँडेचरीचा अरविंदाश्रम सारख्या श्रद्धास्थानाचा आवर्जून समावेश करावा या दोन्ही ठिकाणी हॉटेलऐवजी त्याच्या अतिथिगृहातील वास्तव्य जास्त आत्मिक समाधान देईल, एका वेगळ्याच वातावरणात नेईल

वैविध्यानी नटलेला आपला देश, आपले देशबाधव, त्याचे वैशिष्ट्यपूर्ण लोकजीवन, जितक जास्तीत जास्त जवळून पाहता येईल तेवढ पाहाव हॉटेल्समधील वातावरण, तेथील खाण-पिण थोड्या फार फरकान बहुतेक सर्वत्र सारखच असत म्हणूनच हॉटेलच्या उबदार कोषाच्या थोड बाहेर पडून स्थानिक लोकाशी सुसवाद साधला तर ज्या 'बदला' साठी आपण घराबाहेर पडतो तो सहजरीत्या मिळून जाईल आणि आपण सारे भारतीय एक आहोत ही आपलेपणाची भावनाही कळत-नकळत वाढीस लागेल

भारतभरच्या भ्रमतीतील अशा कितीतरी आठवणी रोजच्या धावपळीच्या जीवनात विरगुळ्याची सुखद झुळूक आणत असतात

हरणाचे कळप, मोर ज्याच्या घराभोवती मुक्तपणे भटकताना दिसतात अशी 'बिश्नोई' म्हणजे 'बीस और नौ' अशा एकोणतीस धर्माचाराच पालन करणारी, हिरव झाड न तोडणारी राजस्थानातील शुद्ध शाकाहारी लोकाची एक वैशिष्ट्यपूर्ण जमात जोधपूरजवळील गुडा मोगडा गावातील एका बिश्नोई कुटुबात बेधडकपणे गेलो काहीही ओळख-पाळख नसताना त्याच्या कुटुबप्रमुखाने मोठ्या अगत्याने बाज टाकून "बसा" म्हटल आणि विचारल, "काय नशा करणार का?" "कट्टर शाकाहारी असले तरी दारूबाज दिसतात" म्हणून घाबरून "नको" म्हटल नतर कळल की आपल्या गूळ पाण्यासारखी 'नशा' म्हणजे

छोटी अफूची गोळी देऊन अतिथीच स्वागत करायची त्याची रीत आहे! नशेला नाही म्हटल तरी कुठून तरी दूध आणून त्यानी चहा दिलाच

'चहाची' राजस्थानमधलीच एक अजब आठवण कायमची लक्षात राहिली आहे जैसलमेरला एका ब्राह्मणाच्या घरातील हॉटेलमध्ये राहण्याचा प्रसग आला. फक्त निवासाचीच सोय होती प्रवासातून दमून आल्याने "चहा मिळेल का?" विचारल बहुधा मुलाकडे बघून मोठ्या मुष्किलीने तो 'हो' म्हणाला आणि एक मोठा जगभर चहा घेऊन आला एवढा चहा जाण शक्य नव्हतं उरलेला चहा त्याने मोरीत ओतून दिला आमच्या कपबशाही तशाच पडल्या होत्या काही वेळाने लक्षात आल की हा आहे ब्राह्मण मग तो आमच्या उष्ट्या कपबशा कशा धुणार? नतर त्याला आम्ही कमी चहा पाठवायला सागत होतो दोन दिवसात चार-सहा वेळेला चहा घेतला हॉटेलमध्येही आपल्या कपबशा आपल्याला धुवायला लागतात म्हणून राग यायचा पण बिलात त्याने या चहाचे पैसे लावलेच नाहीत का तर तो त्याच्या घरून चहा देत असे म्हणून आम्ही त्याचे पाव्हणे होतो आणि पाव्हण्याकडून पैसे कसे घेणार म्हणून त्याने पैसे घ्यायचे नाकारले

चहा म्हटल की, श्रीनगरच्या शकील भटचीही आठवण येते आमचा हा टॅक्सी ड्रायव्हर खास काश्मीरी नमकीन चहा पाजण्यासाठी आपल्या घरी घेऊन गेला आणि त्याच्या वडिलानी तर घरी केलेला सफरचदाचा जॅम मोठ्या कौतुकाने बाटलीत घालून बरोबर दिला

जाता जाता ज्ञानसवर्धन करणाऱ्या कितीतरी गोष्टींचा प्रवास आराखड्यात समावेश करता येईल हैद्राबादजवळील नागार्जुनसागर धरण, गुजराथमधील आणदचा दूध प्रकल्प, बगलोरनजीकची कोलारची सोन्याची खाण, खजुराहोजवळील पन्ना येथील हिऱ्याची खाण ही झाली काही वानगीदाखल उदाहरणे महाराष्ट्रासारख्या राज्यात घडोघडी लागणाऱ्या साखरेचा एखादा कारखाना बघता येईल पन्नाची हिऱ्याची खाण रोज सकाळी ९ ते ११ कोणालाही पाहता येते आणि पन्ना बस स्थानकापासून २५ किलोमीटर्सवर असलेल्या या खाणीपर्यंत मुफ्त बससेवाही आहे.

चाद्रभूमी लडाखमधील हिमालयाच, थड वाळवटी अनोख रूप, जगातील सर्वाधिक पावसाची चेरापुजी, कच्छच रण, राजस्थानच वाळवट, यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थळाचा प्रवासात समावेश असावा अतापर्यंत पसरलेल्या वाळूच्या टेकड्या पाहण्यासाठी मात्र जैसलमेरपासून कमीत कमी ४० कि. मीटर्सवरील 'सम' गावापर्यंत जाव लागत

दोन देशामधील सीमारेषा सुद्धा मुद्दाम जाऊन बघण्यासारखी गोष्ट म्हणावी लागेल मणिपूरची राजधानी इंफाळपासून ११० कि.मी वरील मोरे गावची भारत-ब्रह्मदेशमधील सीमारेषा एवढी मुक्त आहे की, रोजचे शेकडो लोक काम धद्यानिमित्ताने एकमेकाच्या देशांत ये-जा करतात मोरेपासून पाच कि. मीटर्सवर असलेल्या ब्रह्मदेशातील 'तामो' गावी जाऊन

ब्रह्मी सस्कृतीची झलकही बघता येते

आपल्या आवडीच्या क्षेत्रातील आदरणीय व्यक्तींना भेटता आल किंवा किमान त्याच्या स्मृतिस्थळाना वदन करता आल तर सहलीचा आनद द्विगुणित होईल दार्जिलिगला आम्हाला एव्हरेस्ट विजेता तेनसिंग याला भेटायचा योग आला आणि त्याच्या घरी खास 'दार्जिलिग टी' घ्यायच भाग्य आम्हाला लाभलं मोठ्या व्यक्तींना भेटण ही बाब तशी आहे थोडी अवघडच कारण अशी लोक फार कार्यमग्न असल्याने आपल्याकडे असलेल्या थोड्या वेळात त्याची भेट मिळायला हवी

म्हैसूरचा दसरा, तामिळनाडूचा पोंगल, केरळातील ओणम् सारखे सण साधून त्या भागात गेल्यास त्या उत्सवात रगलेल लोकजीवन, सस्कृती अनुभवायला मिळेल मात्र या काळात तेथे गर्दी फार म्हणून आगाऊ आरक्षण करून जायला पाहिजे अशा वेळी एखाद्या स्थानिक कुटुबात राहता किंवा जाता आल तर फारच उत्तम

सहलीचा कितीही अभ्यासपूर्वक आराखडा आखला, तरी कधी नैसर्गिक आपत्ती तर कधी मानवनिर्मित दग्या-धोप्याची अशात परिस्थिती यामुळे त्यात बदल करण अपरिहार्य ठरतं.

अशा वेळी आपण जात असलेल्या प्रदेशातील पर्यटन स्थळाची माहिती असेल तर प्रवास आराखडा सहजतेन बदलता येतो

कधी असही होत की, प्रवास आराखड्यात कदाचित् बदल करावा लागेल याची आगाऊ कल्पना असते निदान अशावेळी तरी पर्यायी आराखडा तयार हवा म्हणजे ऐनवेळी गोंधळ न उडता वेळ, पैसा व मनस्ताप याची बचत होऊ शकेल बसचा प्रवास असेल तर आयत्यावेळी मार्ग बदलण सहज शक्यही होत

मध्यतरी भारत-नेपाळ राजकीय तणावाच्या परिस्थितीमुळे नेपाळला जाण फार मुष्कील झालं होत कलकत्ता-दार्जिलिग - काठमांडू (नेपाळ) अशी सहल आखली आणि दार्जिलिगहून रस्त्याने काठमाडूला जाताच आल नाही तर काय करायच? सरळ निसर्गरमणीयतेने बहरलेल्या कॅलिपाँगमार्गे १०० कि मी वरील गगटोक* (सिक्कीमची राजधानी) ला जायच. उत्तुग धवल काचनगगेच्या कुशीतील हिरव्या गालीच्यावर विराजमान झालेल्या, आधुनिक जगाच्या बेगड्या धकाधकीपासून दूर असलेल्या या चिमुकल्या सिक्कीम राज्याची सहल नेपाळइतकीच आकर्षक, चिरस्मरणीय होईल

* *




# कुठं उतराल ?

एकदा प्रवासमार्ग, वाटेतील मुक्कामाच्या तारखा नक्की करून प्रवासाची आरक्षण झाली की "उतराव कुठे ?" हा प्रश्न पिंगा घालू लागतो सडे फटींग दोघ-चौघं असतील, तर एक वेळ रेल्वे स्टेशन / बस स्टॅण्डजवळील दोन-चार हॉटेल्स धुडाळून एखाद हॉटेल निवडता येईल पण सहलीतील सहप्रवाशाचा चमू मोठा असेल किंवा बरोबर लहान मुल असतील तर केव्हाही निवासाची आगाऊ आरक्षण केलेली चागली.

अनुभव असा आहे की, कमी दराच्या हॉटेल्सची किंवा स्वस्त धर्मशाळाची आरक्षण पत्राने पैसे पाठवून सहसा केली जात नाहीत अशा वेळी मदतीला येतात राज्य पर्यटन महामडळाची निवासस्थाने अशी बहुतेक सर्व निवासस्थाने त्यांच्या दर्जाच्या इतर खासगी हॉटेल्सपेक्षा खूपच स्वस्त, मस्त आणि सोईस्कर असल्याने त्याच रिझर्वेशन जास्तीत जास्त लवकर केल तरच जागा मिळण्याची शक्यता असते विशेषकरून सिझनमध्ये आयत्या वेळी जाऊन तेथे जागा मिळण फारच मुश्कील

अनेक राज्य पर्यटन महामडळाची निवासस्थाने नुसतीच स्वस्त नसतात तर अतिशय सुरेख निसर्गरम्य जागी, शात, प्रफुल्लित वातावरणात असतात

एके काळी काळ कठोर म्हणून बदनाम झालेल्या परतु प्रत्यक्षात निळ्या पाण्यावरील हिरव्या लावण्यमय बेटानी बहारदार झालेल्या अदमानच लोभस निसर्गसौंदर्य निवात न्याहाळत बसावं अशी तेथील बरीचशी राज्य पर्यटक निवासस्थाने अदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर येथील समुद्राकाठच्या छोट्या टेकडीवरील स्वस्त टूरिस्ट होम मधील वास्तव्य हीच एक मेजवानी ठरते या टूरिस्ट होमच्या मागील बाजूच्या बागेतील मखमली हिरवळीवर बसून सागराच्या लाटाच धरतीशी चाललेल हितगूज ऐकाव, गर्द निळ्या पाण्यावर लहान-मोठ्या जहाजाची चाललेली ये-जा बघावी, पाठीवर शख घेऊन धीम्या गतीने निघालेल्या गोगलगाईची हालचाल निरखावी, किंवा रगी-बेरगी पक्ष्याच्या गोड किलबिलाटात रममाण व्हावे.

राजस्थानचे राज्य पर्यटक निवास म्हणजे गुळगुळीत संगमरवरी आकर्षक महालच त्यांत परत जोधपूरला गुलाबी, जैसलमेरला सोनेरी-पिवळा, तर जयपूरला पाढऱ्या रगछटाचा

अशी रगमय विविधता

हिमाचल प्रदेश पर्यटन महामडळाच्या मनाली येथील बियास नदीकाठच्या रम्य विश्रामधामाखेरीज धरमशाळा, कसौली, चैलसारख्या रमणीय निसर्गाच्या सान्निध्यातील गडबड-गोंधळापासून दूर अशा शात, आलिशान निवासस्थानातील वास्तव्य सहलीला खऱ्या विरगुळ्याची किनार लावेल.

ओरिसा पर्यटन महामडळाचीही कित्येक विश्रामधामे- पथ निवास- अशीच मनोहारी जागी आहेत, जगन्नाथपुरीला चंदेरी समुद्रकिनाऱ्यासमोर, देशोदेशीचे स्थलातरीत पक्षी येणाऱ्या चिल्का सरोवराकाठी, कोनार्कच्या जगप्रसिद्ध सूर्यमदिराच्या सान्निध्यात

विश्वविख्यात खजुराहो शिल्पाच्या पश्चिम समूहातील मदिराजवळ मध्यप्रदेश राज्य पर्यटन महामडळाच टुमदार निवासस्थान आहे. वैचित्र्यपूर्ण भूस्तर रूपानी, वृक्ष-वेलींच्या समेलनानी, लहान-मोठ्या प्रपातानी नटलेल्या पचमढी या मध्यप्रदेश मधील थड हवेच्या ठिकाणच्या '४० आवास होम' या राज्य पर्यटन महामडळाच्या निवासात अत्यत माफक दरात राहता येते

वाघ हमखास दिसतोच अशी ख्याती असलेल मध्य प्रदेशमधील कान्हा केसरी अभयारण्य म्हणा किंवा आसाममधील एकशिगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेल काझिरगा अभयारण्य म्हणा यासारख्या भारतातील अनेक सरक्षित वनातील सरकारी विश्रामधामे पर्यटकाना निसर्ग-प्राणी- वनस्पती जगाशी जवळीक घडवून आणतात

बद्रिकेदार, गगोत्री-यम्नोत्री या यात्रा मार्गावरील गढवाल विकास निगमची निवासस्थाने यात्रेकरूना राहण्या-जेवणा-खाण्याच्या सुविधा तत्परतेने पुरवत असतात

तामिळनाडू, कर्नाटक राज्य पर्यटन मडळाच्या तत्पर सेवेच्या निवासस्थानामधील वास्तव्याचा अनुभव अनेकानी घेतलेला असेल महाराष्ट्र पर्यटन महामडळाचीही महाबळेश्वर, गणपती पुळेसारखी निवासस्थाने निसर्गरम्य वातावरणात आहेत

भारतातील काही प्रमुख राज्य पर्यटन महामडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे पत्ते त्या राज्यातील इतर पर्यटक निवाससबंधीच्या अधिक माहितीसाठी उपयोगी पडतील

१] आध्र प्रदेश ट्रॅव्हल अँड टूरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड,
यात्री निवास कॉम्प्लेक्स, एस् पी रोड, सिकदराबाद ५०० ००३

२] दि डायरेक्टर ऑफ टूरिझम, अे अँड एन् ॲडमिनिस्ट्रेशन,
पोर्ट ब्लेअर, ७४४ १०१

३] डिरेक्टरेट ऑफ टूरिझम, गव्हर्नमेंट ऑफ आसाम,
गुवाहाटी, ७८१ ००७

४] दि डायरेक्टर ऑफ टूरिझम, गव्हर्नमेंट ऑफ अरूणाचल प्रदेश,

इटानगर, ७९१ १११

५] दिल्ली टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन,

१८ ए, शॉपिंग कम ऑफीस कॉम्प्लेक्स, डिफेन्स कॉलनी,

नवी दिल्ली, ११० ०२४

६] गढवाल मडल विकास निगम लिमिटेड,

मुनी-की रेती, हृषिकेश ( उत्तर प्रदेश )

७] गोवा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

ट्रिओनोरा अपार्टमेंटस्, पणजी ४०३ ००१ गोवा.

८] टूरिझम कॉर्पोरेशन ऑफ गुजराथ लिमिटेड,

टूरिस्ट इन्फर्मेशन ब्युरो, एच् के हाऊस, आश्रम रोड, अहमदाबाद ३८० ००९

९] हरयाना टूरिझम, १७-१८-१९, सेक्टर १७ बी, चदीगड १६० ०१७

१०] हिमाचल प्रदेश टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

रिट्झ् ॲनेक्स, शिमला १७१ ००१

११] जे ॲंड के टूरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड,

टुरिस्ट रिसेप्शन सेंटर, श्रीनगर १९० ००१ / जम्मू

१२] कर्नाटक स्टेट टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड

१०/४, कस्तुरबा रोड, बगलोर ५६० ००१

१३] केरळा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड

मस्कॉट स्क्वेअर, पो बॉ. न ५४२४, त्रिवेंद्रम ( थिरुवानतपुरम् ) ६९५ ०३३

१४] लक्षद्वीपसाठी दि असिस्टट मॅनेजर, ( SPORTS ), लक्षद्वीप ऑफिस, इंदिरा गाधी रोड, विलिग्डन आयलड, कोचीन ६८२ ००३

१५] दि डिव्हिजनल मॅनेजर ( टूरिझम ),

कुमाऊँ मडल विकास निगम लिमिटेड,

सेक्रेटारिएट बिल्डिंग, नैनीताल ( उत्तर प्रदेश )

१६] मध्यप्रदेश स्टेट टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

गगोत्री बिल्डिंग, चौथा मजला, टी टी नगर, भोपाळ ४२६ ००३

१७] डेप्युटी डायरेक्टर ( टूरिझम )

गव्हर्नमेंट ऑफ मणिपूर, इफाळ ७९५ ००१

१८] मेघालय टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

टूरिझम लॉज कॉम्प्लेक्स, पोलो ग्राऊंड, शिलाँग ७९३ ००१

१९] महाराष्ट्र टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

मुख्य कार्यालय एक्सप्रेस टॉवर्स, ९ वा मजला, नरिमन पॉईंट, मुबई ४०० ०२१

२०] ओरिसा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

पथ निवास, लेविस रोड, भुवनेश्वर ७५१ ०१४

२१] राजस्थान टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

१००, जवाहरलाल नेहरू मार्ग, जयपूर ३०२ ००४

२२] तामिळनाडू टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,

हेड ऑफिस २५, राधाकृष्णन् सलाई, मायलापोरे, मद्रास ६०० ००४

२३] उत्तर प्रदेश स्टेट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड

चित्रहार बिल्डिंग, ३, नवल किशोर रोड, लखनौ २२६ ००१

२४] गव्हर्नमेंट ऑफ वेस्ट बगाल,

रिजनल टूरिस्ट ऑफिस कम टूरिस्ट ब्युरो,

३/२ बी बी डी बाग, इस्ट, कलकत्ता ७०० ००१

वरीलपैकी बऱ्याच राज्यपर्यटन महामडळाची कार्यालये मुबईच्या कफ परेड रोडवरील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये आहेत

राज्य पर्यटन महामडळाच्या पर्यटन निवासासारखच किफायतशीर दरात राहता येत ते काही राज्यातील महाराष्ट्र मडळाच्या निवासस्थानातून

सर्व महाराष्ट्र मडळात कलकत्त्याच महाराष्ट्र निवास (१५, हजरा रोड, कलकत्ता ७०० ०२६, फोन न - ७५-४५३२, ७५-००७१ ग्रॅम **MAHANIWAS**) सर्वात अग्रणी म्हणाव अस दीडशे लोकाची राहण्याची सोय होऊ शकणाऱ्या, हावरा रोड स्टेशनपासून ८ कि मी वर असलेल्या महाराष्ट्र निवासात एकदा गेल की कसलीही काळजी करायला नको लहान मुल असतील, गरम पाणी-दूध मिळेल, उपवास असेल तर साबुदाण्याची खिचडी करून दिली जाईल, जास्तीच सामान ठेवण्यासाठी क्लोकरूम नाममात्र दरात मिळेल, पुढील अगर परतीच्या प्रवासाची आरक्षण विनंतीनुसार करण्यात येतील कलकत्त्याचा अवाढव्य आकार, मोसमामुळे त्याच्या जेवणाच्या वेळा सकाळी ७ ते ९ (रविवार व सुट्टीच्या दिवशी ११ ते १) आणि रात्री ७ ते ९ असल्या तरी उशीर होणार असल्याचे सागितल्यास जेवण झाकून ठेवले जाईल किंवा हव असल्यास बरोबर बाधून दिल जाईल इडियन टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (आय् टी डी सी) च्या प्रेक्षणीय स्थलदर्शनाच्या बसेस निवासाच्या दारातून घेऊन जाऊन कलकत्ता दाखवून आणतील. (सकाळी ७ १५ ते साय ७ ३०, शुक्रवारी बद) त्याच बुकिंगही मडळाच्या ऑफिसमध्ये करता येईल

पर्यटकाच्या कुठल्याही अडी-अडचणीची सोडवणूक महाराष्ट्र निवासाचे व्यवस्थापक डोळे बधू मोठ्या आस्थेने करत असतात मराठी माणूस म्हणजे तुसडा, आपली आळीही

सोडायला तयार नसलेला, आपल्या गावात मिळेल ती खर्डेघाशी करून नोकरी निमित्तानेही बाहेरगावी जायची टाळाटाळ करणारा, मग व्यापारधदा तर दूरच सर्वसाधारण मराठी माणसाच्या प्रवृत्तीच्या चांगल्या अर्थाने विरुद्ध आहे कलकत्याच महाराष्ट्र मडळ दोन वेळचे जेवण, चहा आणि रविवार व सुट्टीच्या दिवशी नाष्टा यासकट त्याचे राहण्याचे बेताचे दर आहेत

कलकत्याच्या महाराष्ट्र निवासात बऱ्याच वेळा मुक्कामाचा योग आला अगदी पहिल्या पत्रोत्तरात व्यवस्थापक श्री प्रभाकर डोळे यानी ता क. लिहिला होता

"आपल्या पत्त्यावरून आपल्या शेजारीच माझे मामा राहात असावेत शक्य असल्यास येताना गाठ घेऊन येणे तेवढीच ओळख होईल " माणस जोडणाऱ्या या दोन ओळी लगेच आपलेपणा निर्माण करून गेल्या एकदा महाराष्ट्र निवासात एवढी गर्दी होती की, सभागृह, रगमच, सगळीकडे पर्यटकाच्या पथाऱ्या पसरलेल्या दिसत होत्या त्यामुळे निवास सोडण्याआधी श्री डोळे याना आमचा हिशेब पूर्ण करायला वेळच मिळाला नाही उरलेले पैसे नतर पाठवून देतो म्हणाले आठ जणात ५०-६० रुपयाचाच प्रश्न असल्याने "ठीक आहे" म्हटल खर, पण मनातून मात्र वाटत होत, "आता कुठले ते पैसे पाठवायला? त्यावर पाणी सोडून विसरा आता " पण आश्चर्य म्हणजे त्याच्याकडून महिनाभरात ६२ रुपये ९० पैशाची मनिऑर्डर आली

कलकत्याच्या महाराष्ट्र निवासाइतकी प्रशस्त नसली तरी पर्यटकाच्या निवासाची काही प्रमाणात सोय दिल्ली (पहाडगज पोलीस स्टेशनसमोर, नवी दिल्ली ११० ०५५), मद्रास (२/७, रुडाल्स रोड, वेपरी, मद्रास ६०० ००७), बगलोर (२ क्रॉस स्ट्रीट, गाधीनगर, बगलोर ५६० ००९), जयपूर (अशोकनगर, विनोबा मार्ग, जयपूर ३०२ ००१), हैद्राबाद (टिळक रोड, रामकोटे, हैद्राबाद ५०० ००१) येथील महाराष्ट्र मडळाचे निवासस्थानातून होऊ शकते अधिक माहितीसाठी त्याच्या व्यवस्थापकाशी सपर्क साधावा

अदमानसारख्या दूरच्या ठिकाणीही राजधानी पोर्ट ब्लेअर येथे तेथील महाराष्ट्र मडळाचे सस्थापक अध्यक्ष श्री गोविंदराव हर्षे याच्या पुढाकाराने काही मोजक्या स्थानिक महाराष्ट्रीयनानी जिद्दीने प्रयत्न करून महाराष्ट्र मडळाची सावरकर स्मृति भवन (पोर्ट ब्लेअर ७४४ १०१) ही वास्तू बाधली त्यात डॉर्मेटरी पद्धतीवर १०-१५ लोकाची राहायची सोय होऊ शकते

महाराष्ट्रीय लोकानी चालविलेल्या हृषिकेशच्या निसर्गरम्य विठ्ठलाश्रमामध्ये (मूनी-की-रेती, हृषिकेश २४९ २०१) रोजी प्रत्येकी काही देणगी दिल्यावर दोन वेळचे साधे महाराष्ट्रीय जेवण, चहा वा कॉफी (दूध नव्हे) व राहण्यास जागा उपलब्ध करून दिली जाते विठ्ठलाश्रमी स्वयसेवा अभिप्रेत असली तरी भोजन, चहा वा कॉफी तयार

मिळते अथरूण-पाघरूण जवळ असण आवश्यक ( रजिस्टर्ड ऑफिस ५/१९, खाडके बिल्डिग, आर् के वैद्य मार्ग, मुबई ४०० ०२८ )

हृषिकेश ( हरिद्वारपासून २४ कि मी ) या बद्रिकेदार, गगोत्री-यम्नोत्री या यात्रांच्या सुरुवातीच्या ठिकाणी गगेच्या दोन्ही तीराला आश्रमच आश्रम आहेत त्यापैकी राम झुल्याजवळचा स्वामी शिवानद आश्रम, रामझुला ओलाडल्यावर येणारा स्वर्गाश्रम, परमतीर्थ, गीताभवन हे काही प्रमुख शेवटी असलेल्या बाबा काली कमलीवाला पचायत क्षेत्र याचेकडे २५ रुपयापासून सलग्र स्वच्छतागृहासहित ब्लॉक्स मिळू शकतात जेवण करायचे असल्यास भाडी, स्टोव्ह सारख्या सुविधा देण्यात येतात या चारधाम यात्रा मार्गावर या ट्रस्टचे बऱ्याच ठिकाणी आश्रम असून ऐच्छिक देणगी देऊन तेथे राहता येते

बद्रिकेदार, गगोत्री-यम्नोत्री यात्राच्या वाटेवर अनेक धर्मार्थ सस्थाच्या धर्मशाळा आहेत. गुजराथी ट्रस्टतर्फे चालविण्यात येणारे गुजराथ भवन ( शकर मूर्तीजवळ, जेसाराम रोड, हरिद्वार २४९४०१ ) असेच आहे त्याच आगाऊ आरक्षण होत नसल तरी, आधी कळवल्यास त्याच्या डायरीत नोंद होऊन जागा ठेवली जाते १/२ रूम्स, स्वयपाकखोली, सलग्र स्वच्छतागृहासहितच्या ब्लॉकात रोजी २५ रुपयापासून भाड घेतल जात त्याच्या उपहारगृहात माफक दरात जेवण, खाद्य पदार्थ, चहा कॉफी मिळू शकते तेथे धोब्याचीही सोय आहे

यूथ हॉस्टेल ॲसोसिएशन ऑफ इडियाच्या देशाच्या विविध भागातील निवासस्थानातूनही त्याच्या सभासदाना ( वार्षिक वर्गणी प्रत्येकी ३५ रुपये ) अत्यत अल्प दरात राहता येत

मुख्यत्वे धार्मिक कृत्ये करण्यासाठी जाणाऱ्या यात्रेकरूची सोय अखिल भारतीय महाराष्ट्र तीर्थ पुरोहित सघ, वाराणसी ( केंद्रीय कार्यालय २३/११८, वेद भवन, दूध विनायक, वाराणसी २२१ ००१ ) याच्या सलग्र असलेल्या तीर्थक्षेत्रीच्या महाराष्ट्र भवनात केली जाते त्यापैकी काही १] काशी महाराष्ट्र भवन २९/१३, गणेश दिक्षित गल्ली, वाराणसी २२१ ००१

२] प्रयाग महाराष्ट्र भवन त्रिवेणी गोपाल मदिर, दारागंज, अलाहाबाद ६

३] गया महाराष्ट्र भवन पंचमहल्ला, सुखमनामहादेवाजवळ, काठगच्ची, गया

४] रामेश्वर महाराष्ट्र भवन २/३९ देवळानजीक, रामेश्वरम् जि रामनाथपुरम् ( तामिळनाडू )

५] अयोध्या श्री दिगबर दत्तात्रेय देशपाडे, जठार साहब का गोरेराम मदिर, स्वर्गद्वार, सरयू घाट, पो अयोध्या

६] गोकर्ण महाबळेश्वर श्री नीळकठ बालकृष्ण जोगळेकर, सोमयाजी, मु पो गोकर्ण ( जि कारवार ) कर्नाटक

* *



# प्रवासाची तयारी

प्रवासा-निवासाची आरक्षण झाली की, गडबड सुरू होते ती प्रवासाची काय तयारी करावी, बरोबर काय, काय घ्यावे याची मापानुसार शिवायला वगैरे लागणारा वेळ गृहीत धरून कपड्याकडे आधी बघितलेल बरं.

कपडे 'एकनूर आदमी, दसनूर कपडा' म्हण असली तरी प्रवासात उगीचच अवास्तव साड्या, पँटस्, इत्यादी न घेता ज्या भागात जायच असेल तेथील मोसमाला सुयोग्य असे जितके कमीत कमी कपडे घेता येतील तेवढ चागल

'ट्रॅव्हल लाईट' करण्याकडे लक्ष असाव म्हटल तरी बरोबर लहान मुल असतील तर त्याच्या कपडे किंवा इतर अत्यावश्यक वस्तूमुळे कित्येकदा ते अवघड होत लाब पल्ल्याच्या सततच्या प्रवासात अनेकदा कपडे धुऊन, वाळवून घ्यायला पुरेसा वेळ नसतो त्यामुळे बरोबर जास्त कपडे घेण आवश्यक ठरतं, आणि हमाली द्यायची तयारी असेल तर आपल्याकडे बहुतेक सर्वत्र हमाल मिळत असल्याने ते शक्यही होत.

ज्या सीझनमध्ये, ज्या प्रकारच्या सहलीला जायच असेल त्यानुसार कपड्याचे प्रकार घेणं केव्हाही फायदेशीर जीन, शर्ट, जर्कीन हा आजकालच्या युवा पर्यटकाचा जागतिक पोशाख झालाय म्हटल तर वावग ठरू नये थड हवेत, विशेषकरून पदभ्रमणात जीन्स फारच उपयुक्त वाटतात. जीनच कापड जाड, मजबूत असल्याने वाटेत धडपडल्यास खरचटण, लागण यासारख्या लहान-सहान जखमापासून संरक्षण मिळत शिवाय त्या बरेच दिवस धुतल्या नाहीत तरीही चालू शकत

तरुण पिढीच एकवेळ ठीक आहे, पण आपल्याकडील मध्यमवयीन प्रौढ स्त्रियाना साडीतून एकदम पँटवर येण अवघडल्यासारख होत यासाठी स्त्रियांना पजाबी पोशाख सर्वोत्तम म्हणावा असा त्याला थोडे खिसे तेवढे असावेत आपली पाचवारी गोल साडी मात्र लांबच्या विशेषत हिमालयातील उत्तुग पर्वतराजींच्या सहलीत फारच भोंगळ, गैरसोईची आणि प्रसंगी धोकादायकही

साड्या म्हणजे मॅचिग ब्लाऊज, पेटीकोट इत्यादीमुळे कपड्यांच ओझं जास्त; धुवायला

त्रासदायक. पदर पटकन् कुठेही अडकणार घोड्यावर बसायला किंवा झोपायच्या वेळी सोईस्कर नसल्याने सकोचकारक वाटणारी अतिउचीवरील डोंगराळ प्रदेशात गोल साडीत हवा शिरून, पॅराशुटसारखं उडून, जवळील खोल दरीत पडल्याने अपघाती मृत्यूला सामोरं जायला लागल्याच्या दुर्घटनाही आपण ऐकल्या असतील

सुती कपडे प्रवासात फार चुरगाळतात शिवाय ते धुऊन वाळवायलाही वेळ खाणारे आणि वर इस्त्री लागणारे परतु पूर्ण कृत्रिम धाग्याच्या कपड्यामुळे विशेषकरून थड हवामानात बऱ्याचजणाना स्थिर विद्युतभारामुळे निर्माण होणाऱ्या छोट्या झटक्याना तोंड द्यायची वेळ येते आणि अति उष्म्यात घाम न शोषला गेल्याने या प्रकारच्या कपड्यामुळे फार अस्वस्थ गरम होत यासाठी टेरिकॉटचे ड्रेस ठीक वाटतात प्रवासातील कपडे गडद, मळखाऊ रंगाचे असावेत

हिमालयासारख्या थड हवेच्या प्रदेशात स्वेटर्स, लोकरीचे हातमोजे, पायमोजे, टोपी, मफलरसारखे गरम कपडे लागतात त्यात जर्कीन हा बहूपयोगी थडीपासून पूर्ण सरक्षण, थोड्या पावसापासून बचाव शालही तशीच दिवसा अगाभोवती लपेटता येते, रात्री पाघरायला उपयोगी पडते अति थड हवामानात रात्री झोपताना कानटोपी घातली अगर मफलरने कान झाकले आणि गरम पायमोजे घातले तर पटकन् ऊब येते

उन्हाळी प्रदेशात जायच असल्यास डोळ्यावरील काळ्या चष्म्याबरोबर डोक्यावर - स्त्रियानासुद्धा टोपी ही हवीच. प्रवासमार्गात पावसाची शक्यता असेल तर रेनकोटही आठवणीने बरोबर घ्यायला हवा छत्रीने हात अडकतो घडीची छत्री वार फार असल्यास उलटायचा सभव असतो पदभ्रमण करू इच्छिणाऱ्यानी पावसात काम करताना शेतकरी डोक्यावर इरल घेतात तस प्लॅस्टिकच जाड कापड शिवून घेतल तर दोन्ही हात रिकामे राहून चालायला सुटसुटीत होईल रेनकोटच्या कापडाचे हल्ली शर्ट-पँटस्, स्कर्टस्-ब्लाऊझही मिळतात मात्र ते पदभ्रमणात एवढे सोईस्कर वाटत नाहीत असा लोकाचा अनुभव आहे.

बाहेरचे कपडे बरेच दिवस तेच ते वापरावे लागले तरी विशेष वाटत नाही परतु आतील कपडे रोजच्या रोज बदलल्याखेरीज स्वच्छ वाटत नाही हे कपडे रोजच्या रोज धुवायला मिळतीलच याची खात्री नसल्यास आतल्या लहान कपड्यांचे तीन-चार जोड घ्यावेत वापरलेल्या, मळलेल्या कपड्याचा वास इतर कपड्याना लागू नये म्हणून असे कपडे एका वेगळ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवावेत वापरलेल्या पायमोज्याचा सगळ्यात घाण वास येतो ते शक्यतो बाहेरच्या बाजूच्या कप्प्यात वेगळ्या पिशवीत ठेवता येतील असे पहावे यासाठी लागणाऱ्या प्लॅस्टिकच्या पिशव्या मुद्दाम बरोबर घ्याव्यात

बऱ्याच राज्य पर्यटन महामंडळाच्या निवासस्थानातून किंवा चागल्या दर्जाच्या हॉटेल्समधून अगाचा साबण, टॉवेल्स देण्यात येत असल्याने प्रवासात अशा प्रकारच्या जागी मुक्काम

असल्यास अग पुसायच्या जाड टॉवेल्सच ओझ कमी करता येणं शक्य आहे मोठ्या टॉवेलऐवजी प्रवासात पचा जास्त सोईस्कर वाटेल

जीन्स, शर्ट किंवा पजाबी पोशाख सहलीत सोईचा असला तरी दक्षिण भारतातील बऱ्याच मंदिरात पुरुषाना लुगी नेसल्याखेरीज आत दर्शनाला जाता येत नाही यासाठी लुगी किंवा धोतर बरोबर ठेवावे लुग्या मदिरातूनही मिळतात आणि काही देवालयात कधी कधी लुगी पँटवरून नेसलेलीही चालते, पण साडी अथवा लुगी नसेल तर प्रवेश नाकारला जातो

प्रवासकाळात एखाद्या सांस्कृतिक, धार्मिक किंवा इतर काही खास विशेष समारभाला उपस्थित रहावे लागणार असेल, आपल गाव, राज्य, देश याच प्रतिनिधित्व करायच असेल, तर आपल्या पारपरिक पोशाखाचा आठवणीने बरोबर घेतलेला जोड बरच औचित्य साधून जाईल.

'देश तसा वेश' करण्याचा सूज्ञपणा आपल्या देशातील काही भागात हिंडताना स्त्रियानी दाखवण कित्येकदा हितकारक ठरत अजूनही काही प्रमाणात पडदा पद्धती असलेल्या, स्त्रिया, सार्वजनिक ठिकाणी मुक्तपणे वावरत नसलेल्या उत्तर भारतातील काही राज्यातून तरुण मुलींचे जीन्ससारखे 'मॉड' कपडे कधी कधी टारगट, टवाळ लोकाकडून छेड काढली जाण्याच्या दुष्कृत्याना आमत्रण देणारे ठरायची शक्यता असते या भागात ओढणीसह पजाबी पोशाख सर्व वयोगटाच्या स्त्रियासाठी सुरक्षित म्हणावा असा

आपल्याला सुटसुटीत वाटणारे, शारीरिक हालचाल सुलभ होईल असे आणि कमी धोक्याचे कपडे प्रवासात वापरण सर्वांत महत्त्वाच

योग्य प्रकारची पादत्राण असण हीसुद्धा प्रवासात कपड्याएवढीच महत्त्वाची गोष्ट बरच चालायच असेल तर चपलांपेक्षा केव्हाही बूट चागले विशेषकरून थड हवामानाच्या प्रदेशात बूट-मोज्यामुळे पाय गरम राहतात साधे कॅन्व्हसचे बूट एवढे आकर्षक दिसत नसले तरी त्याची किंमत खूप कमी असते शिवाय हे नवीन बूट सहसा 'चावत' नाहीत पदभ्रमणासाठी 'हंटर शूज' सर्वोत्तम निसरड्या चढ-उतारावर या बुटामुळे चागली पकड येते सतत पावसाचा, जगल-चिखला-पाण्यातून चालण्याचा प्रदेश असल्यास गबूट नेण्याचा विचार करावा

खोलीत वापरायला किंवा जवळपास जाण्यासाठी चपलाचा एक जोडही असावा कातडी अगर फोमच्या चपलांपेक्षा पी व्ही सी च्या पावसाळी चपला जास्त उपयुक्त खराब झाल्यास धुता येतात, ओल्या झाल्या तरी लगेच वाळतात उच, निमुळत्या टाचाच्या किंवा दोन पट्ट्याच्या 'हवाई चपला' मात्र लाबच्या प्रवासात फार धोक्याच्या पट्टा तुटून ऐनवेळी कधीही दगा देणाऱ्या। सतत बूट घालून चालल्याने पायमोज्याना घाण वास येऊ लागतो

अगर इतर कोणा विश्वासू शेजाऱ्याजवळ देऊन बागेची निगा राखता येईल. फ्लॅटमध्ये थोड्या कुंड्यात झाड असतील तर या कुंड्याही कोणाकडे तरी नेऊन ठेवता येतील अर्थात् हल्ली लहान जागा आणि प्रत्येकाचे आपापले व्याप यामुळे विचारणही थोड संकोचकारकच। आमच्या एका परिचिताकडे तर पन्नासच्या वर कुंड्या होत्या आता एवढ्या या कुणाकडे ठेवणार म्हणून त्यांनी काय केल तर त्याच्या हॉलच्या खालच्या पातळीवर असलेल्या गॅलरीच पाणी जायच तोंड बद करून त्यात पाणी साठवून कुंड्या ठेवल्या काही दिवस तरी तेवढीच ओल त्याची गच्ची गळत नव्हती म्हणून बर नाहीतर शेजाऱ्याकडून तक्रारी आल्या असत्या

झाडाना उपलब्ध पाणी अधिक काळ मिळत राहाव यासाठी 'जलशक्ती'सारख्या पाणी शोषून साठवून ठेवणाऱ्या बहुवारीक पदार्थांचा वापरही करता येईल 'इंडियन ऑरगॅनिक केमिकल्स लिमिटेड' या कपनीचे हे उत्पादन पाण्याशी सबध आल्यावर जलशक्तीचे कण आपल्या वजनाच्या जवळजवळ शभरपट पाणी शोषून घेऊन आपल्याभोवती धरून ठेवतात आणि नतर ते पाणी झाडाझुडपास अगर जमिनीस जरुरीनुसार सतत पुरवत राहतात जलशक्तीचा उपयोग करून पाणी घालण्यामधला काळ दीड पटीने वाढवता येतो अस सशोधक म्हणतात त्यामुळे झाडाची काहीही काळजी न करता आठवडाभराच्या सुट्टीसाठी तुम्ही परगावी जाऊ शकता एका कुंडीसाठी २-३ चहाचे चमचे जलशक्ती पुरेसं होत साधारणत दीड-दोन रुपयात हे काम होत शभर चौरस फुटाच्या हिरवळीसाठी २५०-३०० ग्रॅम्स जलशक्ती लागते या सबधीची अधिक माहिती इंडियन ऑरगॅनिक केमिकल्स लिमिटेडचे विक्री कार्यालय (पत्ता केमिकल्स डिव्हिजन, मेहता महल, १५, मॅथ्यू रोड, मुंबई ४०० ००४) देऊ शकेल

घरातील वृद्ध व्यक्तींचीही प्रवासाला घराबाहेर पडताना काळजी असते प्रवास झेपणार नाही म्हणून बरोबर नेणही धोक्याच असत किंबहुना कित्येकदा ते शक्यच नसत घरात त्याची जबाबदारी घ्यायलाही इतर कोणी नसत अशावेळी वृद्धाना सोबत करण, त्याना फिरावयास नेण, चर्चा करण, वाचून दाखवण किंवा अन्य रीतीनी त्याच मनोरजन करण यासारख वृद्धाच्या सोबतीच कार्य काही वयस्क मडळींनी पुण्यात नुकतच सुरू केल्याच वाचनात आल गावोगावी असलेल्या सेवाभावी सस्था, ज्येष्ठ नागरिक संघ यानाही याबाबतीत बरच काही करता येईल आणि लोकाना 'प्रवास' विरगुळा देता येईल

घर सपूर्ण कुलूपबद असून घरात कोणीही नाही हे चोर-दरोडेखोराना सहजासहजी कळू नये म्हणून परगावी जातेवेळी एखादा कमी पॉवरचा दिवा चालू ठेवण, एखादी खिडकी उघडी ठेवण, यासारख्या घरात वावर असल्याच्या काही खुणा ठेवाव्यात घराजवळ राहणाऱ्या मित्र/नातेवाईकाला रोज चक्कर टाकायला सांगावी शक्य असल्यास घराची एक किल्ली

अशाकडे ठेवावी घराचा आतील किमती वस्तूचा विमाही काढता येईल सर्वांत महत्त्वाच म्हणजे आपल्या सहलीचा मुक्कामाच्या तारखा-ठिकाणांसकट ( माहिती असल्यास हॉटेल्सची नावेही ) एक-दोघाकडे आठवणीने देऊन ठेवाव्यात आपल्या गावातील काही आप्ताचे पत्ते, टेलिफोन नबर्स सहलीत आपल्याबरोबर असावेत आपल्या घरी/गावी काही तातडीने कळवायचे झाल्यास, काही मदत हवी असल्यास उपयोगी पडतील

आपल्या गैरहजेरीच्या काळात येणारी पत्रे गहाळ/खराब न होता मिळावीत, यासाठी बाहेरच्या बाजूला टपालपेटी सारखी काही तजवीज करून ठेवावी फ्रीज बंद केल्यावर सपूर्ण कोरडा करून त्याच दार उघडच ठेवाव थोडा जरी दमटपणा राहिला तरी तो झपाट्याने खराब होतो खर म्हणजे फ्रीज चालू ठेवायलाही हरकत नाही, पण आपल्याकडे विद्युतपुरवठा बेभरवशाचा असल्याने तो कधी खडित होईल आणि परत नीट दाबाने सुरू होईल की नाही काहीच खात्री नसल्याने 'शॉर्ट सर्किट' वगैरे झाल तर समस्या नको म्हणून बऱ्याच दिवसाच्या प्रवासात जाताना फ्रीज बद केलेला चागला

मौल्यवान वस्तू बँकेच्या लॉकरमध्ये टाकणे; स्कूटर उघड्यावर राहणार असल्यास स्टेपनी काढून ठेवणे, वृत्तपत्रे, दूध टाकू नका सागणे चिमण्या घाण करू नयेत म्हणून खिडक्याची व्हेंटीलेटर्स बद करणे यासारखी अनेक लहान-मोठी काम प्रवासाला निघण्याआधी करावी लागतात कोणत्याही निवडणुका असतील तर आपल अमूल्य मत पोस्टाने पाठवायला जागरूक मतदारानी विसरू नये

अगदी निघताना कपाटाना कुलूप लावण, नळ, गिझर, दिवे, पखे, टी.व्ही , गॅस याची बटण नीट बद आहेत की नाही ते पाहण ( गॅस सिलेंडरचा रेग्युलेटर काढून ठेवलेला चागला ) आणि सर्वांत शेवटी सर्व सामान बरोबर घेतल आहे की नाही ते पाहून, शक्य असलेल्या आतील खोल्याना कुलुपे लावून घराला नीट कुलूप लावण

* *



# घरातून निघता निघता.....

प्रवासाची आधी कितीही सुनियोजित तयारी केली तरी काही ना काही भानगडी ऐनवेळी उद्‌भवून बहुधा घाई ही होतेच! बरोबरच्या वस्तूची एक स्वतंत्र यादी जवळ असू द्यावी घाई-गडबडीत महत्त्वाच काही- मुख्य म्हणजे तिकिटे- घरीच विसरल्याच लक्षात आलं तर गाडी सुटण्याआधी रिक्षेने घरी येऊन परत गाडी गाठायला वेळ राहील अशा बेताने घर सोडाव

पळती गाडी पकडण अत्यत धोकादायक आहे आजकाल अनेक कारणानी गाड्या अनेकदा 'लेट' पळत असतात यासाठी घर सोडण्यापूर्वी टेलिफोनवरून (चालू असल्यास आणि लागल्यास) गाडीच्या प्रयाण वेळेची खात्री करून घ्यावी

हमाली वाचवायची असेल तर स्वत च सामान स्वत ला सहज उचलता येईल एवढ्याच वजनाच असाव एक मोठी बॅग घेण्यापेक्षा दोन लहान बॅग्ज घेतल्यास त्या जास्त सहजतेने वाहून नेता येतील

पोट बिघडवणारं बाहेरच खाण निदान सुरुवातीला तरी टाळण्यासाठी घरून एक-दोन दिवसाचा डबा नेता येईल रेल्वेत कोणतेही खाद्यपदार्थ अधिकृत बिल्ला असलेल्या विक्रेत्याकडूनच घ्यावेत कारण या पदार्थांच चेकिंग होत असत

गाडी कुठल्या स्टेशनवर किती वेळ थाबणार आहे, याची माहिती आधी वेळापत्रक पाहून करून घ्यावी गाडी सुटायच्या अगदी शेवटच्या क्षणापर्यंत बाहेर न थाबता वेळीच जागेवर येऊन बसाव नाहीतर दुर्दैवी अपघात घडून सहलीतील सर्वांच्याच आनदावर विरजण पडण्याची शक्यता असते अपघात फक्त शारीरिकच असतात अस नाही कधी कधी अकल्पित अशा अपघाती प्रसगाला सामोरं जायची पाळी येते

दार्जिलिग-सिक्कीम सहलीला जातेवेळी आमच्या बरोबरच्या स्नेह्याना एका अगदी विचित्र अशा अपघाताला तोंड द्याव लागल त्याचं असं झाल एक अतिमहत्त्वाच पत्र टाकण्यासाठी हे स्नेही अकोला स्टेशनवर उतरले. पोस्टाची पेटी नेमकी दुसऱ्या फलाटावर होती. त्यांना वाटल आपण सहज जाऊन येऊ परतु तेथपर्यंत पोहोचण्याआधीच त्यांना गाडीची (सुटायची)

शिट्टी ऐकू आली पूल ओलांडून गाडी गाठण्याएवढा वेळ नव्हता म्हणून ते रेल्वेमार्गात उभ्या असलेल्या गाड्यामधून वाकत, रूळ ओलाडत, प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या बाजूने गाडी हालत असताना कसेबसे कोणत्या तरी डब्यात शिरले इकडे गाडी सुटली तरी 'बाबा' आले नाहीत म्हणून त्याच्या मुलानीही रडायला सुरुवात केली डबा शोधत दहा-पधरा मिनिटानी ते आले आणि 'हुश्‌ श्‌ ' करून जागेवर बसताच उभ्या गाड्याखालून वाकून रूळ ओलाडत असताना शर्टाच्या वरच्या खिशातून काही तरी पडल असाव अस वाटल्याने खिशात हात घालून बघतात तो काय ? त्याच्या चौघा कुटुबियाची परतीच्या प्रवासासकट सपूर्ण प्रवासाची आरक्षित तिकिटे गहाळ झाली होती

जीवावर बेतलेल तिकिटावर निभावल म्हणायच! फारच धोका पत्करून त्यानी गाडी गाठली होती आता सर्वांची तिकिटे परत काढण आल तेवढे पैसे सुदैवाने जवळ होते पण आयत्यावेळी रिझर्वेशन्स कशी मिळणार? त्यातल्या त्यात नशीब एवढच की कलकत्यापर्यंतच्या तिकिटाच चेकींग आधीच झाल्याने परत टी. सी येण्याची शक्यता कमी होती पण चुकून आला असताच तर विगरतिकीट प्रवासी म्हणून जबरदस्त दड कायद्याने भरावा लागला असता कलकत्याला उतरल्यावर आम्ही त्याच्यासाठी प्रथम प्लॅटफॉर्म तिकिटे काढून आणली आणि त्याना बाहेर काढल नंतरच्या प्रवासातील त्यांचे हाल तर विचारूच नका! सर्व प्रवास त्याना वेळोवेळी पैसे चारूनही अतिशय दगदगीत करावा लागला

रेल्वेचा सलग लाबचा प्रवास अनेकाना बरेचदा कटाळवाणा वाटतो परतु आपण जात असलेला प्रदेश, वाटेत लागणारे डोंगर-दऱ्या, नद्या, वृक्ष-वेली, लोकजीवन, औद्योगिक प्रकल्प, व्यापार-व्यवसाय याच बसल्या बसल्या नुसत निरीक्षण केल तरी, वेळ कसा जाईल ते कळणारही नाही यासाठी आपली गाडी जाणार असलेला मार्ग, वाटेत लागणारी स्टेशन्स, त्याचं ऐतिहासिक/भौगोलिक/व्यावसायिक महत्त्व इत्यादी माहिती जमा करत गेल, तर कुठलीही लाबची सहल 'बोअर' न होता रजकतेबरोबर ज्ञानवर्धकही होईल

पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयातील शालेय सहल सयोजक शिक्षकानी कुठल्याही सहलीला निघण्यापूर्वी प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला अभ्यासू मेहनतीने तयार करून दिलेली 'सहल-वही' केवळ शालेय विद्यार्थ्यांनाच नव्हे तर इतर कोणासाठीही आदर्शवत् म्हणता येईल या वहीत सहलीचा नकाशा, मार्ग, कार्यक्रमाचे वेळापत्रक, उतरणार असलेल्या ठिकाणाचे पत्ते, बरोबर काय सामान घ्यावे याच्या तयारीसबधीच्या उपयुक्त सूचना पाहयला मिळतात एखाद्या सहलीचे उदाहरणच द्यायचे झाल्यास काश्मीर सहलीच्या पुणे-जम्मू झेलम एक्सप्रेस प्रवासाचे सदर्भात सहल सयोजक 'सर' विद्यार्थी मित्राना सबोधतात -

"पुण्याहून हडपसर सोडल्यानतर लोणी स्टेशनजवळ एक मोठा राष्ट्रीय प्रकल्प उभारलेला

दिसेल बाँबे हाय' मधील तेल नळ्यावाटे आणून येथील अजस्त्र, लोखंडी टाक्यात साठविलेले आहे. दौंड जंक्शन नंतर लागणाऱ्या नगरला अनेक फौजी भाईंची या गाडीला गर्दी असते कारण जम्मू किंवा पुढे सरहदीवर जाण्यास ही गाडी फार सोईस्कर आहे."

"भोपाळ सोडल्यावर उजव्या बाजूच्या डोंगरावर असलेला साचीचा स्तूप व जुनी राजधानी विदिशा दिसेल. यानतर गाडी थाबणार आहे उत्तर प्रदेशामधील झाशीला झाशीच्या राणीचे कौतुक तुम्हाला माहीत आहेच तिचा किल्ला गाडीतूनच पाहून घ्या आजूबाजूला टेकड्या व वैशिष्ट्यपूर्ण ठोकळ्याचे पर्वत दिसतील"

"दुरून दिसणारा किल्ला ग्वाल्हेर आल्याची वर्दी देतो गाडी किल्ल्याला वळसा घालून जात असल्याने त्याच्या विस्ताराची कल्पना येते. आग्र्याला उजव्या बाजूला ताजमहालचा घुमट दिसतो आग्र्याहून सुटलेली गाडी थाबेल भगवान श्रीकृष्णाच्या जन्मभूमीत मथुरेला, तेलशुद्धीकरणाचा मोठा कारखानाही आहे यानतरचा थाबा म्हणजे राजधानी दिल्ली"

"दिल्ली सोडल्यावर गाडीने हरियाना राज्यात प्रवेश केला तेथील प्रमुख शहरे सोनपत, कर्नाल, अबाला लागली तेव्हा तुम्ही गाढ झोपेत होतात परतीच्या प्रवासात ही गावे तुम्हाला पहायला मिळतील अबाला नतर पजाब राज्य सुरू होते"

"पजाबातून जाताना ठाई ठाई हरित क्रातीची खात्री पटते याचबरोबर लहान-मोठ्या उद्योगधद्यानी वेढलेली लुधियाना, जालधर ही शहरे आहेत पठाणकोट ही पजाबची सरहद्द. तेथून जम्मू - काश्मीरची सरहद्द"

कुठल्याही सहलीत अस केवळ निरीक्षणातून ज्ञानार्जन कोणालाही सहज करता येईल, विशेषत मुल जाता जाता नकळत वेगळ काही शिकून जातील

आसमतातील भूभाग निरखण्याबरोबरच केवळ आप्तेष्टाच्या ग्रुपमध्ये न रमता आजूबाजूच्या लोकाशी सवाद साधला तर नवनवीन गोष्टी कळू शकतील देशाच्या कानाकोपऱ्यात आवडीने बघितले जाणारे हिंदी चित्रपट आणि दूरदर्शनवरील 'हिंदी सिरीयल्स' यामुळे मोडक तोडक का होईना पण हिंदी बहुतेकाना समजत प्रवासातील मैत्री दीर्घकाळ टिकणारी नसते अस म्हणतात तरीही प्रवास मजेत होण्यासाठी तात्पुरते मित्र मिळवायला काय हरकत आहे? सभाषण मात्र आपण आधी सुरू करायला हव.

गाड्या 'लेट' असण ही आपल्याकडची तशी नित्याचीच बाब त्यामुळे गाडी बदलायची असल्यास दोन गाड्यामध्ये कमीत कमी तीन-चार तासांच अतर ठेवलेल चागल मधला कालावधी फार मोठा असेल तर तो फार कटाळवाणा होतो अशावेळी जवळ एखाद चागल ठिकाण असेल तर किंवा गावाचा नुसता चेहरा-मोहरा क्लोकरूममधे अवजड सामान ठेवून पाहून येता येईल वेटिंगरूममध्ये रात्र काढायची वेळ आली, तरीही क्लोकरूममध्ये सामान ठेवल्यास जरा जास्त निर्धास्तपणे झोपता येईल रेल्वे क्लोकरूम्स २४ तास चालू

असतात आणि त्यात अल्प दरात सामान ठेवता येत मात्र त्यात ठेवायच्या प्रत्येक डागाला ( अगदी होल्डॉलला देखील ) कुलूप असण आवश्यक असत

बऱ्याच मध्यमवर्गीयांना सहलीत जास्तीचा मुख्य खर्च जाणवतो तो बऱ्यापैकी हॉटेल वास्तव्याचा बऱ्याच ठिकाणच्या धर्मशाळाही अतिशय स्वच्छ असतात मात्र त्याच सहसा आगाऊ आरक्षण होत नाही. जास्तीत जास्त रात्रीचा प्रवास, सकाळी क्लोकरूममध्ये सामान टाकून प्रेक्षणीय स्थलदर्शन, सायकाळी वेळ मिळेल तेव्हा वेटिंगरूममध्ये आघोळ असा प्रवास आराखडा आखला तर कमीत कमी पैशात प्रवास करण शक्य होऊ शकेल अर्थात् पैसे कमी तर आरामही थोडा कमी, थोडी जास्त धावपळ हे ध्यानात ठेवायला हव रेल्वे स्लिपरची कन्फर्मड् रिझर्वेशन्स हाती असतील तर असा प्रवास बिलकुल त्रासदायक होत नाही अस विविध भागातील प्रवास अनुभवाती वाटत

* *



# प्रेक्षणीय स्थलदर्शनात गाईडचं महत्त्व

कोनार्कच विश्वविख्यात सूर्यमदिर प्रवेशद्वारातून आत जाताच लागणाऱ्या नृत्य मडपाच्या बाह्य भिंतीवरील दागदागिने, पेहराव, चेहऱ्यावरील सूक्ष्म हावभाव यामुळे जिवत वाटणारी, नृत्यागनाची ऐटबाज, डौलदार शिल्प पाहताना भान हरपून गेल होत नुसतीच भारावलेली मत्रमुग्धता होती. परतु बरोबरच्या गाईडने जेव्हा सागितल की ज्या मूर्तीच्या चेहऱ्यावर सूर्यकिरण पडलेत त्या अप्सरा बघा कशा मोहक हसत आहेत ते तेव्हाच ते ध्यानात आल दिवसभरात कोणत्या ना कोणत्या मूर्तीच्या शिल्पावर सूर्यप्रकाश पडत असतो आणि फक्त त्याच मूर्ती स्मित हास्य करताना दिसतात ही चमत्कृतिपूर्ण, आश्चर्यचकित करणारी गोष्ट जाणवते मार्गदर्शकाने बघण्याची दृष्टी दिल्यावरच !

जीवनातील विविध अगाच, वेगवेगळ्या घटनांच सारं सारच या कोनार्कच्या सूर्य मदिरात कोरलेल असल तरी या महान शिल्पाची महती अधिक भावते ते गाईडने ती सुसबद्धपणे, आकर्षकरीत्या उलगडून दाखवल्यावरच ! एरवी आपण एखाद्या मदिर अगर मडपाच्या पायऱ्या मुद्दामहून मोजायला कशाला जातोय ? पण गाईडने सागितल्यावरच जाणीवपूर्वक

पाहिल जात, ते या नृत्यमडपाला सोळा आणि वर अजून दोन अशा अठरा पायऱ्या असल्याच ! म्हणजे अठरा वर्षांनी पूर्ण वयात आल्यानतरच मुलींना तेथे नृत्याद्वारे सेवा करता येत असे याच नृत्यमडपाला पश्चिमेकडे असलेले तीन दरवाजे सूर्याच्या विविध कोनातून होणाऱ्या राशीभ्रमणाच्या स्थिती लक्षात घेऊन इतके अचूक बाधलेले आहेत, की वर्षातील कोणत्याही दिवशी पहिला सूर्यकिरण बरोबर त्याच्यासमोरील देवळातील मूर्तीवर पडावा. या तिन्ही दरवाज्यातून पाहिल असता समोरच्या देवळाचा दरवाजा बरोबर मध्यभागीच दिसतो. ही थक्क करणारी किमया कळते गाईडने मुद्दाम सागितल्यावरच !

कोनार्कच्या रथाच्या आकाराच्या मुख्य मदिराच्या रथाला ७ घोडे आणि १२/१२ अशी २४ चाके आहेत. सात घोडे हे आठवड्याचे सात दिवस आणि चोवीस चाके हे वर्षाचे चोवीस पधरवडे किंवा दिवसाचे चोवीस तास दर्शवतात काहींच्या मते हे सात घोडे सूर्यकिरणातील सात रगाचे प्रतीक असावेत या रथाच्या चाकाच्या आठ आऱ्या दिवसाचे अष्टप्रहर दाखवतात या सूर्यमदिराच्या रथाचे चाक हे एक सौर घड्याळच आहे आरीच्या पडलेल्या सावलीवरून दिवसाची वेळ कळते

कोनार्कच्या सूर्यमदिराच्या बाह्य भिंतीवर खालच्या बाजूला कमळ-पुष्पे, पशू-पक्षी, विशेषकरून हत्ती कोरलेले असून, मधल्या भागात कामसूत्रातील प्रसग व सर्वांत वरच्या भागात देव-देवताच्या मूर्ती खोदलेल्या दिसतात बाल, तरुण, वानप्रस्थाश्रम या जीवनातील तीन अवस्थाच येथे असलेल अप्रतिम चित्रण अधिक चागल्या प्रकारे पाहता येऊन जास्त भावत जर सुयोग्य गाईडची साथ असेल तर ! नाहीतर नुसतच “फार छान, उत्तम, अवर्णनीय” यासारखे शब्द वापरून माघारी फिरल जातं

कर्नाटक राज्यातील मन तृप्त करणाऱ्या म्हैसूरजवळील बेलूर-हळेबीडच्या मदिर शिल्पाविषयीही असच म्हणता येईल सुयोग्य गाईड असेल तरच त्याचा रसास्वाद, त्यातील बारकावे तो आवर्जून दाखवतो बेलूरच्या चन्ना केशव मदिराच्या बाह्य भिंतीवरील तळात कोरलेल्या सहाशेच्यावर हत्तींपैकी एक हत्ती दुसऱ्यासारखा नाही तसेच मानवी भावना, हावभाव उत्कटतेने व्यक्त करणाऱ्या नाजूक कुशल कारागिरीच्या मदनिकाच्या ४० च्या वर वेधक मूर्ती भान हरपवून टाकतात काही नर्तिकाच्या हातातील कोरीव कामाच्या बागड्या अजूनही हालतात किंवा गर्भगृहातील पॉलिशड् ग्रॅनाईटच्या कोरीव कारागिरीच्या ४८ खाबापैकी एक खाब दुसऱ्यासारखा नाही आणि त्यातील एक खाब १६ शतकापर्यंत फिरत असे, हे गाईड सागतो तेव्हाच समजत.

हळेबीडच्या सूक्ष्म नजाकतीच्या होयसाळ शिल्पकलेच्या भान हरपवणाऱ्या कसबी कोरीव कामाचे अनेक बारकावे गाईड बरोबर हिंडताना दृष्टीस येतात मूर्तीची नख, डफासारख्या वाद्याच्या स्पष्ट दिसणाऱ्या वेगळ्या वाद्या, उदरावर स्वार झालेल्या गणपतीच्या

वजनाने दबून वाकलेला खालचा दगड, इतकच काय कोरलेली एखादी माशीही तो नजरेस आणतो  बेलूर ही आतून बघायची, तर हळेबीडची मदिरे बाहेरून बघायची चीज आहे, हे गाईडकरवी जास्त बिंबत

कोनार्क अगर खजुराहो येथील मदिरावरील उत्कट, कामुक शिल्पाची वर्णन त्यापाठीमागील अर्थ जाणून न घेता काही पोटार्थी गाईड अनेकदा तिखट-मीठ लावून अधिक एगवून सागतात  अल्पवयीन मुल बरोबर असतील तर त्याच हे ऐकण कित्येकदा सकोचकारक होत  यासाठी मार्गदर्शक नीट पारखून घेण आवश्यक ठरत  प्रौढ मार्गदर्शक जास्त समजस असतात  तरीही अशा ठिकाणी गाईडने कोणती गोष्ट कितपत खोलात जाऊन सागावी याची त्याला आगाऊ कल्पना दिलेली बरी. गाईड प्रशिक्षित असेल तर त्याला तारतम्य भावही असतो

माहितगार माणूस बरोबर असण किती महत्त्वाच असत याचा ओरिसाच्या सहलीत अनेकदा पडताळा आला  ओरिसाची राजधानी भुवनेश्वरमध्ये लहानमोठी पाच हजारच्या वर मदिर असल्याच सागितल जात  एवढी मदिरे ओझरती बघायची म्हटल तरी कित्येक दिवस लागायचे! मूर्तरूप देवदर्शनात विशेष स्वारस्य नसल्याने "सर्वांत मोठे लिगराज मदिर सोडून इतर मदिरे तू आम्हाला दाखवूच नकोस" अस सुरुवातीलाच गाईडला सागितल पण आमचा 'काकाजी' हा पष्टीचा पुरलेला मार्गदर्शक असल्याने त्याने आमच्या सागण्याकडे विशेष लक्ष न देऊन स्वत  मुसलमान असूनही मोठ्या आग्रहाने इतर काही महत्त्वाची मदिरही बघायला लावली  त्या देवालयातील नाजूक नजाकतीचे अप्रतिम कोरीव काम बघून गाईड नसता तर आपण मदिर शिल्प-सौंदर्याच्या केवढ्या मोठ्या खजिन्याला मुकलो असतो याची जाणीव झाली

हरिहरेश्वर हे कोकणातील श्रीवर्धन जवळील निसर्गाचा वरदहस्त लाभलेल मनोरम देवस्थान "हरिहरेश्वर बघितलत?" विचारल्यावर "हो, फारच सुदर" अस उत्तर मिळत  पण सुंदर म्हणजे नक्की काय? कशात दडलंय हरिहरेश्वरच मनोहारी सृष्टिसौंदर्य? याची माहिती मात्र सहसा विशेष कोणाला असत नाही

लोकमान्य टिळकाचे देवस्थान असलेल्या हरिहरेश्वरच्या देवळातील स्वयभू मूर्तींना नुसत नमस्कार करून परत येण्यात काही हशील नाही, तर देवळाला प्रदक्षिणा घालण फार महत्त्वाच आहे. ही प्रदक्षिणा आहे देवालयाच्या डोंगराभोवतालून आणि ती फक्त ओहोटीच्या वेळेसच घालता येते  यासाठी तेथे भरती-ओहोटीची वेळ पाहून जायला हव

कुठल्याही जाती-धर्मीयाना, नास्तिकाला आस्तिक करेल एवढ परमेश्वराच निसर्गातून दिसणारं अगाध रूप या प्रदक्षिणेत पाहायला मिळत  समुद्राच्या लाटा, वारा, भोवरे यामुळे सागरकिनाऱ्यावरील डोंगरकड्याची झीज होऊन त्यावर मधमाशाच्या पोवळ्यासारख चितारल



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७५३
दा. क्र. २८७९८

गेलेल नक्षीकाम, त्यात तयार झालेल्या गुहा, काही गुहात असलेली गोड्या पाण्याची कुडं, रांगोळी घातल्यासारखी कोरली गेलेली खालची जमीन, डोंगराच्या कडेनी समुद्राला मिळणारी नदी, एका बाजूला पाय घसरला तर अंग कापून काढणारी कडक धारदार कालव्याची धार, तर दुसऱ्या बाजूला मऊशार वाळूची लाब पुळण येथील सूर्यास्त तर अवर्णनीयच शालेय जीवनात रूक्ष वाटणाऱ्या भूगोलाच अतिशय रोमाचकारी दर्शन हरिहरेश्वरच्या या डोंगरप्रदक्षिणेत घडत

लेण्या, मंदिर शिल्पासारखच अनेक पुरातन वास्तू, गड-किल्ल्याविषयी म्हणता येईल बहुसख्य गड-किल्ले सध्या मोडक्या, तोडक्या भग्न अवस्थेत असल्याने तेथपर्यंत पोचायचे एवढे कष्ट घेऊन तेथे बघायच काय तर नुसती दगड-माती म्हणून बरेचदा हे ऐतिहासिक प्राचीन ठेवे टाळले तरी जातात किंवा 'बघितले' सागण्यासाठी घाईघाईने फेरफटका मारून सपवले जातात अशा ठिकाणी जाणकार अभ्यासक मार्गदर्शक साथीला असेल तर तो या अवशेषाना स्ववाणीतून बोलत करून त्या जागेचा गतकाल, पूर्वेतिहास खडा करवतो

राजस्थानातील चितोडगड अनेक ऐतिहासिक घटनाचा साक्षीदार आहे तीनदा सपूर्ण विध्वस होऊनही तेरा किलोमीटर्स परिसरात पसरलेल्या चितोडगडावर राणा कुभाचा महाल, दरबार, रूपमती राणी पद्मिनीचा महाल, अल्लाउद्दिन खिलजीने पद्मिनीच्या महालाभोवतालच्या तळ्यातील पाण्यात पडलेले प्रतिबिंब पाहिलेला आरसा, राणी पद्मिनी व इतर स्त्रियानी केलेल्या जोहाराची जागा, पन्ना दाईचा महाल, मीराबाईचे मंदिर, यासारख्या अनेक वास्तू पाहत असताना गाईडच्या मुखातून जणू इतिहासाचा वर्तमानकाळच होत असतो देवानदच्या प्रसिद्ध 'गाईड' सिनेमाच बरचस शूटिंगही चितोडला झाल चितोडसारख्या अजरामर स्थळी गाईड न घेता जाण म्हणजे नुसत दिशाहीन भटकण्यासारख आहे

अभयारण्यात तर तज्ज्ञ गाईडशिवाय हिंडण म्हणजे वनस्पती, प्राणी जगताचा अभ्यास नसणाऱ्यानी नुसतेच गटांगळ्या खाण्यासारख होत कुठल्याही अभयारण्याच्या अर्ध्या एक दिवसाच्या धावत्या भेटीत वाघ-सिंहासारखी मोठी श्वापद दिसण किंवा एखादी रोमाचकरी घटना अनुभवायला मिळण यासाठी नशीब फारच बलवत्तर हव या क्षेत्रातील अनुभवी जाणकार बरोबर असेल तर प्रत्यक्ष चित्तथरारक प्रसग नाही तरी नुकत्याच घडून गेलेल्या किंवा दूरवर घडत असलेल्या एखाद्या वेगळ्याच घटनेचा तो नुसता अन्वयार्थ तरी सागू शकेल.

एकशिगी गेंड्यासाठी जगभर प्रसिद्ध असलेल्या आसाममधील काझिरंगा अभयारण्यात हत्तीवरून फेरफटका चालला होता गेंडा हा तसा एकलकोंडा प्राणी असल्याच तेथे माहीत झाल बरेच एकेकटे गेंडे इतस्तत पाणथळ जागी चरत होते तुरूतुरू धावणारा गोजिरवाण्या हरणाचा एक कळप एकाएकी जागच्या जागी थाबून एक विशिष्ट प्रकारचा आवाज करू

लागला "हे काय?" विचारता बरोबरच्या गाईडने जवळपास कुठेतरी वाघ असावा म्हणून ती एकमेकाना सावध करत आहेत अस सागितल आपल्यालाही आता व्याघ्रराजाच दर्शन घडणार म्हणून सर्वजण डोळे विस्फारून चिडीचूप उत्सुकता ताणली जात असताना त्या हरणानी आवाज करायच थाबवल आणि ती मुकाट्यान दिशा बदलून निघून गेली "हे काय घडल?" विचारल्यावर गाईड म्हणाला, "तिकडे दूरवर जे रानरेडे, जगली म्हशी चरत आहेत ना, त्यानी वाघाला पळवून लावल असाव"

राजस्थानच्या भरतपूर येथील केवलधना पक्षी अभयारण्यात पी.एच् डी करत असलेले बरेच विद्यार्थी मार्गदर्शक म्हणून काम करतात. त्यांचा दर थोडा जास्त असला तरी त्यामुळे स्थलातरीत पक्षी कोणते, स्थानिक कुठले, त्याच्या जाती, सवयी इत्यादींची सखोल माहिती कळल्याने वेगळ काही बघायला मिळाल्याच समाधान होत गाईडची बारकाव्याची दृष्टी नसल्यास आपण फक्त विविधरगी सुदर पक्षी पाहिल्याच्या खुशीत बाहेर पडतो

लहान-सहान प्रेक्षणीय स्थळी आपल्याकडे प्रशिक्षित गाईड मिळण कित्येकदा मुष्कील होत माहिती फलकही नसतात ही आणखी दुर्दैवाची गोष्ट सुलभ सपर्क भाषा ही जाणकाराशी सवाद साधण्यात- विशेषकरून लहान गावी- येणारी आणखी एक अडचण कर्नाटकातील ऐहोळला असच झाल तेथे फक्त कानडी बोलणाराच गाईड होता. अशा वेळी जवळ असलेली माहिती पुस्तके कामी येतात आणि गाईडची उणीव काही प्रमाणात भरून काढता येते

राजस्थानच्या प्रवासात अनेक एकेकट्या परदेशी स्त्री पर्यटक स्वतत्र गाईड घेऊन मोठ्या उत्सुकतेने हिंडताना दिसल्या. आपल्याकडे मात्र गाईडवरचा पैसा हा निष्कारण खर्च असा अत्यत चुकीचा समज बऱ्याच लोकाच्या मनात घर करून असतो कुठलही प्रेक्षणीय स्थळ हे स्वत. बघण आणि गाईडबरोबर बघण यात जमीन-अस्मानाचा फरक असतो म्हटल तरी वावग ठरू नये. यासाठी गाईडसाठीचे पैसे म्हणजे वायफळ खर्च ही भावनाच मनातून काढून टाकायला हवी म्हणजे मग त्या खर्चाचा बोजा वाटणार नाही उलट सहलीतील एक अत्यावश्यक खर्च म्हणून त्याची तरतूद आधीच करून ठेवायला पाहिजे

तज्ज्ञ, जाणकार, मार्गदर्शक नेहमीच वरकरणी महाग वाटले तरी त्याच्याकडून मिळालेल्या बहुमोल माहितीतूनच मनुजाच चातुर्य' वाढत असत गाईडने दिलेली माहिती अनेकदा कोणत्याही छापील पुस्तकात सहजासहजी मिळत नाही हा स्वानुभव आहे. गाईडने समजा काहीही सागितल तरी त्यातून नीर क्षीर विवेकाने आपण काय घ्यायच, त्यानी सागितलेल्या आख्यायिकाचा अन्वयार्थ कसा लावायचा हे मात्र आपणच ठरवायला हव

* *




# खरेदी

एका दिवाळीतील लक्ष्मी पूजनाचा दिवस होता तो उदयपूरला होतो आम्ही त्या वेळी आमच्याच हॉटेलमध्ये उतरलेल्या पुण्याच्या एका सधन व्यावसायिकांनी ‘सायकाळी लक्ष्मी पूजनाला यायच’ म्हणून आग्रहाच आमत्रण दिल होतं तिन्हीसाजा व्हायला आल्या तरी त्याची काही गडबड दिसेना हिरवळीवर खेळणाऱ्या त्याच्या मुलाना विचारलं, “किती वाजता यायच रे तुमच्याकडे लक्ष्मी पूजनाला ?” त्यावर त्याचा थोरला मुलगा उत्तरला, “आई-बाबा आल्यावर ते गेलेत खरेदी करायला त्यामुळे केव्हा येतील ते मात्र सागता यायचं नाही अहो, जयपूरला तर आम्हाला गाडीत बसवून त्याची सात तास खरेदी चालली होती ”

थोड्या वेळाने “लक्ष्मी पूजनाला चला” म्हणून मुल बोलवायला आली सहलीतील एवढ्या गर्दी-धावपळीत किती आठवणीने आपले सणवार, रीतिरिवाज पाळतात याच कौतुक करत त्याच्या खोलीत गेलो, “या, बसा पूजेसाठी लक्ष्मीची मनाजोगी मूर्ती मिळायला थोडा वेळ लागला म्हणून उशीर झाला ” यजमानीणबाईंनी तोंड भरून स्वागत केल खर, पण त्याच्या खोलीत बसायलाच काय पण उभ राहायलाही जागा नव्हती मोठमोठ्या पेटाऱ्यानी खोली व्यापून टाकली होती तर ताज्या खरेदीच्या पुडक्यानी कॉटसवर आपल साम्राज्य जमवल होत

उच्च प्रतीची सगमरवरी, कृत्रिम मोत्याच्या दागिन्यानी आभूषित लक्ष्मीची मूर्ती, घरून निघतेवेळी चादीच्या वाटीत निरजनासाठी आठवणीने आणलेल तूप, मिठाई, फटाके, परस्थळीच्या लक्ष्मी पूजनाच्या दणक्याचा थाट नजर टिपत असताना, प्रश्न पडला होता एवढाले पेटारे कसले असावेत याचा मनात खदखदणारे प्रश्नचिन्ह चेहऱ्यावरही प्रतीत झाल्याने की काय यजमानीणबाई अभिमानाने खुलासा करत्या झाल्या “ही आहे सगळी खरेदी नाहीतरी अर्ध्या एक दिवसाच्या मुक्कामात, काय काय म्हणून पाहणार ? त्यापेक्षा खरेदीच केलेली बरी ” काय बोलणार ? आवाजच खुटला “आम्हाला प्रवासाची फार हौस हो ! दरवर्षी दिवाळीत कुठे ना कुठेतरी सहलीला जातोच. मला धुळीची ॲलर्जी आहे

त्रास होऊ नये म्हणून गाडीही मुद्दाम वातानुकूलीत करून घेतली आहे''   यासारखं त्याच सभाषण खरेदीच्या भेंडोळ्यात कधीच विरून गेल असल तरी पुन्हा पुन्हा नजरेसमोर येत राहिली त्याची प्रचड खरेदी !

खरच, काहीजण का धरतात खरेदीचा इतका अतिरेकी हव्यास ? आपण हौशी पर्यटक प्रवासात खरेदी करतो का खरेदीसाठी प्रवास करतो ? यावरून अजून एक प्रसग आठवतोय

मद्रासजवळील महाबलीपुरम् बीच  आधीच सकाळी बस मद्रासहून निघायलाच उशीर झालेला  त्यामुळे असलेल्या तुटपुज्या वेळात गाईडबरोबर महाबलीपुरम्चे शिल्पकाम बघायचे सोडून काही लोक इम्पोर्टेड वस्तू विकणाऱ्याना गराडा घालून त्याच्याशी भावाची घासाघीस करण्यात मशगूल झाले होते  आणि या वस्तू तरी कोणत्या होत्या म्हणाल तर परफ्युमस्, पावडर, कॉम्पॅक्टस्, पर्सेस्, बॅग्ज् अशा की ज्यामध्ये भारतीय बनावटीच्या चागल्या वस्तू उपलब्ध आहेत

तस पाहिल तर मुबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरातून कुठलीही वस्तू थोडे अधिक पैसे मोजले असता मिळू शकते  मग प्रवासातील अमूल्य वेळ निसर्ग/मानवनिर्मित कलाकृती, तेथील लोकजीवन, सस्कृती पाहण्यात खर्च करण्याऐवजी अमाप खरेदीचा लोभ कशासाठी ?

मग काय, सहलीमध्ये बहुतेकाच्या जिव्हाळ्याची अशी खरेदी अजिबात करूच नये की काय ? नाही, अस मात्र बिलकुल नाही  खरेदी अवश्य करावी पण ती फक्त खास वैशिष्ट्यपूर्ण अशा स्थानिक हस्तशिल्पकला वस्तूचीच  कुठे काय खरेदी करता येण्याजोगे आहे याची आगाऊ माहिती असेल तर चौकशी करण्यात निष्कारण वेळ जाणार नाही आणि फालतू अगर कमी महत्त्वाच्या गोष्टींवर जास्त खर्चही होणार नाही

आपला देश इतक्या नानाविध मोहक खरेदीयोग्य गोष्टींनी समृद्ध आहे  वानगीदाखल सागायच तर उदयपूरला लाकडी, जोधपूरला पाढऱ्या धातूच्या, जयपूरला ब्रासवरील कोरीव कारागिरीच्या वस्तू जास्त चागल्या व स्वस्त मिळतात  म्हैसूर ( कर्नाटक ) चदन, हस्तीदत, जबलपूर सगमरवरी, खजुराहो प्लास्टर ऑफ पॅरिस, तर नैनिताल मेणबत्ती-मेणाच्या सुशोभित वस्तूसाठी प्रसिद्ध आहे

कुठल्या प्रकारच्या साड्यांची कुठे खरेदी करावी याची माहिती बहुधा स्त्रीवर्गाला असते परतु काश्मीर सिल्क म्हणून घेतलेली साडी काश्मीरमध्ये तयार झाली असेल अस नाही काही अपवाद वगळता काश्मीरमध्ये मिळणाऱ्या साड्या बाहेरून छापून येतात अस म्हटल जात  यासाठी काश्मीरमध्ये साड्यांपेक्षा घ्याव्यात शाली, आक्रोडाच्या वस्तू आणि केशर शालीसकट सर्व काश्मीरी वस्तू अनेकदा श्रीनगरपेक्षा जम्मूमध्ये जास्त स्वस्त मिळतात

भावाची/किंमतीची घासाघीस हा बऱ्याच प्रातातून चालणारा आणि कधीही खरेदीचा पूर्ण समाधान न देणारा प्रकार. पाडून मागितलेल्या किंमतीत वस्तू मिळाली तर अजून

थोडी किंमत कमी करायला हवी होती ही रुखरुख लागतेच! कलकत्याला तर याचा फारच अतिरेक वाटतो इतका कमी भाव सांगायला लाज वाटेल, एवढ्या अल्प दरात एखादी वस्तू मिळून जाते साड्या तर फूटपाथवर कित्येक ठिकाणी भाजीसारख्या विकायला असतात सारख्या वाटणाऱ्या साड्यांच्या किंमतीतही खूप तफावत असते दोन नग अगदी शेजारी ठेवले तरच त्याच्या प्रतीतील फरक कळणार! 'एकच भाव', 'फिक्सड् रेट' असलेलं कलकत्यात साड्यांच एकच दुकान आढळलं बाकी बहुतेक सर्वत्र भाव, दर खाली आणण्यासाठी चाललेली गिऱ्हाईकाची झटापट! आणखी एक अजब प्रकार कलकत्याला अनुभवायला आला "आईये बहेनजी." म्हणून आतुरतेने पुकारत विक्रेते गिऱ्हाईकांना आपल्या दिशेने अक्षरश ओढून नेत होते एकाच दुकानात एकाच वेळी वेगवेगळ्या दिशांना ही माणसं का खेचत आहेत याचा शोध घेता पत्ता लागला की चार कोपऱ्यात चार वेगवेगळ्या मालकाची दुकानं होती.

भावाची हुज्जत घालणं, घासाघीस करणं नको असेल तर राज्य सरकारी पर्यटन एम्पोरियममध्ये खरेदी करणं इष्ट तेथील माल बाहेरच्या बाजारपेठेपेक्षा थोडा महाग असला तरी त्याच्या प्रतीची बऱ्याच प्रमाणात खात्री असते

राजस्थान, काश्मीर राज्य सरकारी एम्पोरियममध्ये मौल्यवान खडे, दागिन्यांसाठी सोन्या-चांदीच्या दुकानासारखा वेगळा बंदिस्त काऊंटर असलेला दिसला तेथे खड्याच्या वजन, प्रतीनुसार किंमत ठरविण्यात येऊन तशी रीतसर पावतीही देण्यात येते नाहीतर कित्येकदा हुबेहूब खऱ्यासारखे दिसणारे खडे म्हणजे निव्वळ गारगोट्या ठरण्याची भीती असते दार्जिलिंगला अशाच अत्यल्प किमतीत मिळालेल्या खड्यांचे दागिने नेहमीच्या सोनाराकडे करायला घेऊन गेल्यावर त्यांनी त्याचे चांदीत दागिने घडविण्यास नकार दिला का, तर असे खडे तापविल्यावर काळे ठिक्कर पडतात म्हणून यासाठी थोडं महाग पडलं तरी फसवणूक टाळायची असेल तर मान्यताप्राप्त सरकारी दुकानातून अशा मौल्यवान वस्तूंची खरेदी केलेली चांगली

कधी, कधी असंही होतं अपेक्षेपेक्षा एखादी वस्तू स्वस्तात मिळाली तर त्याची प्रत तर चांगली नसेल ना या कुशंकेने जास्त घेतली जात नाही आणि मग "आपलं चुकलंच" म्हणून वाईटही वाटतं मणिपुरी शालींच्या बाबतीत असंच झालं संपूर्ण लोकरीची, सुरेख रंग, डिझाईनची पांघरायची मोठी शाल फक्त शंभर रुपयात मिळाली "कशी असेल कोण जाणे?" म्हणून एकच घेतली आज इतकी वर्षे वापरूनही अजून नव्यासारखी दिसणारी ती उबदार शाल बघून आपण एकच का घेतली याची खंत वाटते आपल्याकडे अशा शालीची विणणावळच शंभराच्या वर रुपये द्यावी लागली असती त्रिपुरामध्ये बांबूच्या अत्यंत नाजूक कलाकुसरीच्या वस्तू, बांबूची मोठमोठाली भित्तीचित्रं अतिशय अल्प किंमतीत

मिळतात पण इतक्या लाब रस्त्याने अगर विमानातूनही या मोठ्याल्या वस्तू कशा आणायच्या हा प्रश्न असतो

पशुपतीनाथ यात्रेसाठी बरेच जण नेपाळला जातात नेपाळ हा परदेश असला तरी त्या देशात आयात होत असलेल्या वस्तू आपल्याला आणता येत नाहीत तो देश आयात करत असलेल्या काहीही वस्तू आपल्याला आणायला परवानगी नसली तरीही अनेक जण भरमसाट खरेदी करतात आणि कस्टम्सच्या जजाळात अडकतात इम्पोर्टेड साड्याही तेथे प्रचड महाग मिळतात तरीही बायकाना त्याचा अनेकदा मोह टळत नाही बस प्रवाशांपैकी कोणी ना कोणी अशी खरेदी केलेलीच असल्याने नेपाळहून बसने येणाऱ्याना कस्टम्सच्या जाचक त्रासाला बरेचदा सामोर जाव लागत काही वर्षांपूर्वी फॅशनमध्ये असलेले 'फोल्डिंग गॉगल्स' नेपाळमधून बऱ्याच प्रवाशाकडून आणले जात. नेपाळला गेलेल्या अशाच एका मोठ्या ग्रुपमधील सर्वांनी हे फोल्डिंग गॉगल्स खरेदून बॅग्ज तपासणीत कस्टम्सच्या हाती लागू नयेत म्हणून डोळ्यावर लावले पण ते कस्टम्सवाल्याच्या नजरेतून सुटण्याऐवजी लगेच दृष्टीस पडल्याने प्रत्येकाच्या डोळ्यावरून काढून त्यानी ते जप्त केले त्याच्यातील एकानेच गॉगल डोळ्यावर न लावता चुकून बॅगेत टाकल्याने तो फक्त सुटला

सिक्कीम प्रसिद्ध आहे वाईन्स आणि परफ्युम्ससाठी. गगटोकहून सिलिगुरीमार्गे कलकत्याला बसने परततेवेळी चालत्या गाडीत कस्टम्सतर्फे चेकिंग केल गेल, का तर म्हणे या बसमध्ये नेपाळहून खरेदी करून आलेले प्रवासीही असतात म्हणून बॅग्ज, होल्डॉलसहित आम्हाला सर्व सामान उघडून दाखवाव लागल तपासणी करणाऱ्याने सिक्कीमहून आणलेल्या परफ्युमच्या दोन बाटल्या जणू काही इम्पोर्टेडच असाव्यात अशा आवेशात बाजूला काढून ठेवल्या सामानाच सर्व चेकींग झाल तरी या बाटल्या आपल्या बाहेरच! सोईस्कररीत्या मुकाट्याने त्या खिशात टाकण्याचा त्याचा डाव असल्याचा सशय आल्याने तोंड उघडल आणि थोडा आवाज चढवून सिक्कीम हा परदेश नसून भारतातीलच एक राज्य आहे याची आम्हाला माहिती असल्याची जाणीव करून देताच त्याने त्या निमूटपणाने परत केल्या

सहलीमध्ये प्रामुख्याने खरेदी करायला हवी ती स्थानिक कलाकुसरीच्या वस्तूची, प्रेक्षणीय स्थळांसबधीच्या माहिती पुस्तकाची आणि प्रवासस्मृती क्षण टिपणारा कॅमेरा बरोबर नसेल तर फोटोंची. उपलब्ध पैसा, वेळ पाहून कुठल्या सहलीत काय खरेदी करता येईल हे आधीच ठरवून ठेवावं

खरेदी म्हणजे फक्त पैसे टाकून काहीतरी वस्तू विकत घ्यायला पाहिजे अस नाही. उलट अमूल्य वेळ सत्कारणी लावून सहलीत स्वकष्टाने, आवडीने जमा केलेल्या काही वस्तूच मोल मला अधिक वाटत प्रवासात अनेकजण अनेक वस्तू विविध छद, हेतूनी गोळा करत असतात आमची अशी काही थोडी वेगळी खरेदी वानगीदाखल सांगायची

तर

राजस्थानमधील विविध ठिकाणचे वेगवेगळ्या रगाचे सगमरवरी दगड आणि तशीच वाळू जोधपूरचे गुलाबी, जैसलमेरचे सोनेरी पिवळे, जयपूरचे पाढऱ्या-करड्या रगछटाचे तर चितोडचे ऐतिहासिक स्मृतिभट्टीत भाजून तप्त पावन झालेले एकेकाळी सागर असल्याची खात्री पटवणारे जैसलमेरच्या वाळूच्या टेकड्यातील चिमुकले शख, साभर लेक मधील गुलाबी खडे मीठ, पन्नाच्या हिऱ्यांच्या खाणीच्या परिसरातील दगड-माती, गगा, सिधू, लिडर, गडकी, नर्मदा, बेटवा, कावेरी यासारख्या नद्यातील दगड, गोटे, गुवाहाटीच्या ब्रह्मपुत्रेतील सिमेंटसारखी मऊ रेती, भान हरपून वेचलेले अन् विमानातून जपून आणलेले अदमानच्या नील आयलंडवरील नानाविध आकार, प्रकाराचे रगीत, नक्षीमय शख-शिपले. तात्कालिक समाधान देणाऱ्या वनस्पती- चहाची पाने, कॉफीची फळ, किती, किती म्हणून आठवाव ?

सहलीत जीव ओतून गोळा करत, जमा होत गेलेल्या यासारख्या आपल्या छद, आवडीच्या कितीतरी गोष्टींनी आपल प्रवासजीवन समृद्ध होत राहत

* *



# धार्मिक पर्यटन : काही विचार ......

आपल्या प्रवास, सहलीत धार्मिक पर्यटनाला फार महत्त्वाच स्थान आहे पूर्वीच्या काळी तर बहुसख्य लोकाचं उतारवयात घराबाहेर पडण व्हायच ते मुख्यत· तीर्थयात्रा, धर्मकार्यानिमित्तानेच ! आपल्या पूर्वजानीही अतिशय कल्पक विचारानी देव-देवताची स्थापना अशा काही शात, मनोरम जागी केलेली दिसते, जेथे निसर्गरूपी परमेश्वराच्या आगळ्या आगाध रूपाच किंवा मानवनिर्मित अजोड कलाकृतीच दर्शन घडाव अशा ठिकाणी जाता जाता विविध लोकजीवन सस्कृती, निसर्गाविष्कारानी समृद्ध अशी आपली सुजलाम् सुफलाम् मातृभूमीही दृष्टोपत्तीस पडावी महादेव, शकराची स्थान तर बहुधा आडमार्गी ऊंचावर असल्याने निढळाचा घाम गाळून ईश्वरचरणी पोहोचल्यावर कष्टाच महत्त्व -आपसूक पटाव आणि प्रयत्नाती परमेश्वर म्हणून नतमस्तक व्हाव. केदारनाथचं अत्युच्च उदाहरण तर सोडाच पण

भूनंदनवन काश्मीरच्या १९८४च्या प्रथम भेटीत श्रीनगरमधील दल सरोवराकाठच्या शंकराचार्य टेकडीच्या पायऱ्या चढून गेल्यावर ही अशीच अनुभूती आली

रमणीय टेकडीवरील स्वच्छ, उदात्त, विलोभनीय परिसराने मन प्रफुल्लित होऊन वरून दिसणार निळ्या संथ पाण्याच्या, शिकाऱ्यानी सजलेल्या दल, नगिन सरोवराच अप्रतिम दृश्य बघताना भान हरपून गेल. गलिच्छ, बाजारू गजबजाटापासून मुक्त अस हे स्थान इतक हृदयात जाऊन बसल की, वाटेत वाचलेल्या 'हा परिसर चागला ठेवण्यासाठी फक्त ट्रस्टच्या दानपेटीतच दान करा ' या एकमेव ट्रस्टी महाराज करणसिंग याच्या आवाहन फलकानुसार आपणही यथाशक्ती जास्तीत जास्त दानाचा हातभार लावायचा ठरवून मदिरात प्रवेश केला

मंदिराच्या गाभाऱ्यातील ट्रस्टच्या मोठ्या भक्कम पोलादी तिजोरीत पैसे टाकायला जाताच त्या तिजोरीच पैसे टाकण्यासाठी भोक, तीवर एक जुनाट पत्र्याची ट्रक ठेवून बंद केलेल दिसल वरच्या ट्रकेलाही पैसे टाकण्यासाठी एक भोक होत "तिजोरीत पैसे कुठून टाकायचे ?" तेथील सन्यासी पुजाऱ्याला विचारता त्याने ती तिजोरी भरली असल्याने वरच्या पेटीत पैसे टाका अस सागितल त्याच्या या सागण्याने बिलकूल समाधान न झाल्याने तेथे आलेल्या एका दर्शनार्थी फौजीला त्यासबधी विचारल त्यानेही श्रद्धाळूपणे त्याच ट्रकेकडे बोट केल तरीही काही ठीक वाटेना काहीतरी गडबड असावी अस मनातून वाटत होत, म्हणून पुन्हा त्याच पुजाऱ्याकडे जाऊन त्याने खर सागाव म्हणून त्याच्या तबकात एक रुपया दक्षिणा टाकत परत तोच प्रश्न विचारला माझ्या हेतूबद्दल सशयाने पाहत पुजारी उद्दामपणे म्हणाला, "दक्षिणा वरून टाका, शिवू नका" माझ्या प्रश्नाकडे मात्र त्याच सोईस्करीत्या सपूर्ण दुर्लक्षच ! ५-१० रुपये दक्षिणा टाकत असलेल्याना आवर्जून देत असलेले साखर फुटाण्याचे चार दाणेही त्याने माझ्या हातावर ठेवले नाहीत दानपेटीत काही टाकावस वाटत होत, पण दिलेल दान योग्य मार्गी जाईलच अस मात्र का कोण जाणे अजिबात वाटत नव्हत. दुसरा काहीच मार्ग न सुचल्याने दोलायमान अवस्थेत शेवटी त्या पत्र्याच्या पेटीत दहा रुपये टाकले

अस्वस्थ मनाने बाहेर आल्यावर बरोबर असलेल्या स्थानिक काश्मीरी ब्राह्मण मार्गदर्शकाला या खटकलेल्या गोष्टींविषयी विचारताच तो म्हणाला, "अहो, ही सगळी या पुजारी कपूचीच बनवाबनवी ती पत्र्याची पेटी त्याच लोकानी ठेवलेली त्याचा एक खबऱ्या टेकडीच्या पायथ्याशी उभा असतो ट्रस्टींपैकी कोणी येताना दिसल की, तो लगेच धावत वर येऊन या लोकाना सावध करतो आणि ती उपरी पेटी तेथून तातडीने हालवून लपवली जाते हिंदु धर्मशास्त्रानुसार संन्याशाला पुजारी म्हणून कामच करता येत नाही. सन्याशाने देवाची पूजा-अर्चा करण हे आम्हाला पटतच नाही. म्हणूनच मी आत देवळात

न येता बाहेरच उभा होतो '' हे ऐकून मन विषण्ण होऊन गेलं वाटल, हे जर खर असेल तर ट्रस्टच रोजच किती नुकसान होत असेल त्याला काही गणतीच नाही. कारण काश्मीरला येणारे बहुतेक पर्यटक शकराचार्य हिलला भेट दिल्याशिवाय जातच नाहीत त्या मार्गदर्शकाच्या बोलण्यात काही तथ्य असाव याची प्रचिती १९८९ च्या काश्मीर भेटीत आली त्यावेळी ती पत्र्याची टूकही तेथे दिसली नाही आणि पुजारीही सन्यासी नव्हता

आपली कित्येक तीर्थस्थाने फक्त त्या त्या धार्मिक प्रवृत्तीच्याच नव्हे तर कुठल्याही जातिधर्माच्या निसर्ग, पदभ्रमण, पर्यटनप्रेमींना मुद्दाम जावस वाटावीत इतकी सुरेख आहेत मध्य प्रदेशमधील थड हवेच ठिकाण पचमढी येथील महादेवही असेच वैशिष्ट्यपूर्ण आहेत सातपुड्यातील दुसऱ्या क्रमाकाच्या ऊचीचा ( १३३६ मीटर्स ) महादेवाचा डोंगर धार्मिक आणि राजनैतिक हालचालींचे महत्वाचे केंद्र होऊन राहिला होता इ स १८५८ च्या नोव्हेंबरमध्ये येथील चौरागड, महादेवाच्या डोंगरामध्ये शूर सेनापती तात्या टोपे यानी सैन्य एकत्रित केल होतं त्यामुळे पचमढीचा बडा महादेव, त्या जवळील गुप्त महादेव, चौरागड, जटाशकर ही ऐतिहासिक, भौगोलिक धर्मस्थाने अनेक गोष्टींच चितन करायला लावतात

कोणाही जाती-धर्माच्या प्रवास पदभ्रमण उत्सुकाना जावस वाटणार एक जवळच ठिकाण म्हणजे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल भीमाशकर. देवदर्शनाखेरीज सदाहरित जगलातील भटकती, कोकण कड्याची चढण, अधारल्यावर अनेकदा दिसणारे तरस, लाडग्या, सशासारखे वनचर यामुळे भीमाशकर विलोभनीय झालं आहे झुपकेदार शेपटाच्या देखण्या खारी हे तर येथील अभयारण्याच खास वैशिष्ट्य उन्हाळ्यात पाण्याची चणचण असली तरी रम्य वनश्रीचा गारवा, पावसाळ्यात डोक्यावर उतरणारे ढग आणि त्याच्या दुलईत बघता बघता गुडुप होऊन जाणारं आसमत. आल्हाददायक निसर्गरम्यतेमुळे सुट्टयाच्या दिवशी तर भीमाशकरला पर्यटकाची खूपच वर्दळ

धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, नैसर्गिकदृष्ट्या महत्त्व असलेल भीमाशंकर पहिल्याच भेटीत इतक भावलं की, तेथील पुरातन मंदिराचं नीट जतन व्हायलाच पाहिजे अस मनोमन वाटायला लागल म्हणून ' जीर्णोद्धार फडाचे पैसे येथे स्वीकारले जातील या देवळातील फलकाजवळ काही द्याव या हेतूने उभे राहिलो तेथे पैसे स्वीकारण्यासाठी कोणीच नव्हत. समोरच्याच टेबलावर अभिषेकासाठी पावती फाडू इच्छिणाऱ्याची भली मोठी राग होती आणि त्यातील सुविद्य, पाढरपेशी स्त्री-पुरुष अशा काही विचित्र नजरेने आमच्याकडे पाहत होते की त्याची नजर जणू बोलत होती, '' कोण हे विक्षिप्त लोक, पूजाभिषेकाच पुण्य गाठीला बाधायच सोडून आपणहून मदिराच्या जीर्णोद्धाराला पैसे देण्यासाठी उगाचच ताटकळत उभे आहेत '' वर, मंत्रोच्चार कानावर पडावेत तर हा अभिषेक आपल्यासमोर लगेच थोडा होणार होता ? नतर कधीतरी कदाचित् सर्वांचा एकत्रितही - करण्यात येऊन त्याचा

प्रसाद पोस्टाने पाठवला जाणार होता वैयक्तिक पुण्यप्राप्तीसाठी, पूजाभिषेक करता येण्यासाठीसुद्धा प्रथम मदिर सुस्थितीत राहण आवश्यक आहे. मग त्यासाठी पैसा नको ? तो कोणी द्यायचा ? कसा उपलब्ध होणार ?

बहुतेक सर्व मदिराच्या ट्रस्टींतर्फे दान-दक्षिणेसाठी एखादी तरी कुलुपबद्द पेटी ठेवलेली असते त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग त्या देवालयाच्या देखभालीबरोबरच अनेक देवस्थानातर्फे शैक्षणिक, सामाजिक कार्यासाठी, समाज प्रबोधनासाठी करण्यात येतो पुजाऱ्याच्या समोरील तबकात दक्षिणा म्हणून ठेवलेले पैसे मात्र त्याचे स्वत ‘चे वैयक्तिक समजले जाऊन या आमदनीचा विनियोग ते स्वमर्जीनुसार करू शकतात यासाठीच पर्यटकानी प्रवासात दानधर्म करतेवेळी कुठे, किती पैसे द्यावेत म्हणजे केवळ पुजारीच गब्बर न होता आमजनांना त्याच्या दानाचा जास्तीत जास्त चागला उपयोग होऊ शकेल याचा विचार करण अत्यत अगत्याचं आहे

आपल्या कमाईतील काही हिस्सा नि स्पृह वृत्तीने सत्कार्यासाठी द्यायलाच हवा दान करण्यात फार मोठे आत्मिक समाधान आहे मात्र दह्या, दुधासारख्या अभिषेकावर पैसे खर्च करून अमूल्य अन्नपदार्थांची नासाडी करण्याऐवजी तोच पैसा त्या वास्तूचे जतन, परिसर प्रसन्न, स्वच्छ, सुशोभित ठेवणे, प्रवासी-यात्रेकरूंसाठी पिण्याच्या पाण्याची, सावलीची, विश्रांतीची सोय करणे यासारख्या विधायक कार्यांवर खर्च केला, गुरुद्वारासारखी कारसेवा-स्वयसेवा करण्याची वृत्ती ठेवली आणि वाढीस लावली तर आपली धार्मिक पर्यटनस्थळं अधिक मन शाती देणारी होतील

* *



# उन्हाळ्यात सहल आखताना......

कुठल्याही सहलीला जाण्याआधी त्या भागातील मोसमाचा प्राभुख्याने विचार करायला हवा परतु अनेकदा होत काय, सुट्ट्या आहेत, सवड आहे किंवा अनेकदा चागली सोबत आहे, यासारख्या कारणानी जाणार असलेल्या प्रदेशातील काळ, वेळेच भान न ठेवता सहल आखली जाते. विशेषकरून उन्हाळ्याच्या सुट्टीतील सततच्या उष्ण भूभागातील लाब

पल्ल्याची सहल सुखकारक तर होत नाहीच. उलट कित्येकदा ती अघोरी ठरण्याची, बाधण्याची शक्यता असते नतर पश्चात्ताप करूनही काही उपयोग नसतो

उन्हाळ्यात एकवेळ दमट हवामानाच्या कोकण-गोवा, दक्षिण भारताच्या सहलीला गेल तरी चालू शकेल, परतु कडक उन्हाची तीव्रता सागतानाही धग लागावी अशा राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश सारख्या तप्त भागातील राज्यांतून प्रेक्षणीय स्थलदर्शनासाठी दिवसाच सारख वणवण भटकण म्हणजे आजाराला आमत्रण दिल्यासारखच म्हणाव लागेल तरुण वयात एकवेळ सगळ खपून जाईल. पण लहान मुल अगर प्रौढाच्या प्रकृतीला अस उन्हातान्हात फिरण कदाचित मानवणार नाही निवृत्तीनतर किंवा कधीही वेळ काढता येणाऱ्या लोकानी तर कुठल्याही भागातील सर्वोत्तम मोसम पाहून गेलेल केव्हाही आनददायी सुट्ट्यातील ऐन गर्दीचा काळही टाळलेला बरा

अनेकाची अशी कल्पना असते की, सयोजकानी सहल आयोजित केलीय म्हणजे त्यानी त्या भागातील योग्य हवामान पाहिल असणारच ! परतु कित्येकदा सहल आखताना प्राधान्य दिल जात ते सुयोग्य मोसमापेक्षा निजी लाभाला त्यामुळेच आकर्षक जाहिरातबाजीला भुलून, मोलाचा वेळ व पैसा खर्च करून विकतचा मनस्ताप घेण्याची पाळी काहींवर येते काहीही विचार न करता आयोजित केलेल्या उन्हाळ्यातील अशाच एका सहलीचा ऐकलेला एक विदारक सत्य अनुभव

शरीर करपवून टाकणाऱ्या उन्हाच्या भट्टीतून जाणारी एक-दोन दिवसाची नव्हे तर तब्बल तीन आठवड्याची मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश राज्याची बसची सहल वाटेत उन्हातच कुठेतरी थाबून, मिळेल तेथून, असेल तस पाणी आणून केलेला स्वयपाक, रणरणत्या उन्हातील सततची भटकती, अपुरी विश्राती यामुळे सहलीतील बऱ्याच जणाच्या पोटाचा निकाल लागलेला त्यात नुकत्याच निवृत्त होऊन लगेच सहलीला आलेल्या एका गृहस्थाना उष्माघाताचा झटका आला, आणि दुर्दैवाने त्यात त्याचा अगदी पत्नीच्या डोळ्यादेखत अत झाला मध्य प्रदेशमधील खजुराहो जवळील आडमार्गी जागी झालेल्या त्याच्या या आकस्मिक मृत्यूमुळे सर्वजण हादरून गेले मृताचा वैद्यकीय आणि पोलिसाकडून दाखला मिळायला हजार-दोन हजार रुपये चारायला लागले मृतदेह इतक्या लाबून पुण्याला आणण अशक्यप्रायच असल्याने सहलीतील काही तरुण मडळींनी जवळच्या जगलातील लाकूडफाटा गोळा करून त्यच्यावर अत्यसस्कार केले खजुराहो, जबलपूरचा नर्मदेचा भेडा घाट यासारखी स्थळ अनेकाना प्रकृति अस्वास्थ्यामुळे पाहताच आली नाहीत ज्यासाठी गेलो त्यातील कित्येक न पाहताच परताव लागल अस न होता, अशा करुण प्रसगाना सामोर जायची पाळी येऊ नये म्हणून तीव्र उन्हाळी भागातील सततचा सलग लाबचा प्रवास, विशेषकरून बसचा, शक्यतो टाळलेलाच बरा !

उन्हाळ्याच्या सुट्टीतील हिमालयातील थडी कदाचित बाधेल, विशेषकरून मुलाना, या विचाराने आणि "फळा-फुलाच्या मोसमातील भूनदनवन काश्मीरला चला" यासारख्या जाहिरातींवर भाळून बरेच पर्यटक दिवाळीच्या सुट्टीत तेथे जायचं ठरवतात आम्हीही त्यातील एक होतो बर्फाने रसरसलेल्या काश्मीरच्या स्वर्गसम निसर्गसौंदर्याची स्वप्ने रगवत ऑक्टोबरच्या मध्यानतर श्रीनगरमध्ये प्रवेश केला आणि दारुण निराशा झाली तेथे बर्फ विकत घेऊन किंवा कल्पनेद्वारेच पाहायला लागला. गुलाबाचा पत्ता नव्हता मोगल गार्डनमधील कारजी कोरडी ठणठणीत होती. दल सरोवरातील पाणी आटल्याने आतील शेवाळ वर येऊन गलिच्छ दलदल झाली होती पाणी नाही म्हणून विजेचीही कमतरता, विजेचा सारखा लपडाव चाललेला; वीजकपातीमुळे गरम पाणीही हॉटेलमध्ये चटकन् मिळण अवघड श्रीनगर आणि पुण्यात विशेष काही फरक जाणवलाच नाही

काश्मीरला येऊनही बर्फाच सौंदर्य, त्यात खेळण नाही म्हणजे काय ? मुल तर फारच नर्व्हस झाली बर्फात मुक्त खेळायच्या शोधात पहेलगाम, चदनवाडी, गुलमर्ग झाल पहेलगामला चकचकीत बर्फाच्या टोप्या ल्यालेले डोंगरमाथे होते, पण चदनवाडी मात्र रूक्ष वैराण ! सोनमर्गला नक्की बर्फ असेल अस अनेकांनी खात्रीने सागितल्याने वेड्या आशेवर सोनमर्ग गाठल

टॅक्सीतून उतरल्या, उतरल्या घोडेवाल्यानी घेराव घातला "हाँ, हाँ, बरफ जरूर मिलेगा, क्यूँ नही ? हम लेके जाऐंगे" घोडेवाल्याची मिठ्ठास साखरपेरणी "पर मेमसाब, वहाँ थडी होगी, बहोत थड लगेगा आपको गरम कपडा पहेनके जाईये" झाल, आमच्या 'हो', 'नाही'ची वाट बघण्याआधी ते जवळच्या गरम कपडे भाड्याने मिळणाऱ्या दुकानात घेऊनही गेले ओव्हरकोट, टोपी, हातमोजे असा अवजड, उबदार जामा-निमा करून बर्फात मनसोक्त हुदडायची स्वप्ने बघत आमच्या स्वाऱ्या अश्वारूढ झाल्या आसमतात थडी, बर्फ याचा लवलेशही नव्हता. दिसत होते फक्त वुलनचा साज-शृगार करून हिमनदीच्या दिशेने चाललेले पर्यटक गरम कपड्यामुळे आत घामाच्या धारा लागल्या होत्या पाऊण-एक तासाच्या दगड-धोंड्यातील ठेचकाळत, धडपडतच्या रूक्ष घोडचालीनतर दूरवरील डोंगरावर बर्फाची उतरण दिसू लागली; आणि घोडे, घोडेवाले आणि पर्यटक याची जत्राही ! एका छोट्या प्रवाहाकाठी खाण्या-पिण्याच्या स्टॉल्सच्या राहुट्या लागल्या होत्या "चला उतरा आल ठिकाण" गोंधळात उतरवल गेल "अरे, पण बर्फात नेतो म्हणालात आणि इथे बर्फ कुठय ?" विचारताच त्यानी दूरवर चकाकणारा ग्लेशियरचा बर्फ दाखवला "तेथे घेऊन चला" म्हणताच घोडेवाले म्हणाले, "आम्ही येथपर्यंतच आणतो ग्लेशियरपर्यंत जाऊन यायला अजून ५-६ तास लागतील" बर्फ नक्की बघायला मिळेल हे त्याच आश्वासन त्यानी पुरं केलं होत, पण फक्त दुरून हे तेथे गेल्यावर उमगल पुरी निराशा

केली सपूर्ण काश्मीरेच !

मे महिन्यातील काश्मीर भेटीने आधीच निराशजनक चित्र पार पालटवून टाकल. या मोसमातील काश्मीर म्हणजे खरोखरच भूनदनवन श्रीनगरला स्वागत झालं ते बर्फाची शाल पाघरलेल्या डोंगराकडून दल लेकच्या सथ निळ्या पाण्यावरील शिकारा विहार, मोगल गार्डन्स मधील लता-वेलींच्या कुज कमानींमधून थुई-थुई नाचणारी नैसर्गिक पाण्याची कारजी, गुलाब-पुष्पाचे ताटवे, हिरव्या डेरेदार चिनार वृक्षाचा आल्हाददायक गारवा, दुथडी भरून खळखळत वाहणाऱ्या नद्या, बर्फात लपेटलेले चदनवाडी, गुलमर्ग, सोनमर्ग, तेथील बर्फातील मनसोक्त घसरण, सर्वच लाजवाब !

हिम प्रदेशापासून दूर असणाऱ्याना त्याचच जास्त आकर्षण ज्याना बर्फाची, त्यावरील खेळाची मजा लुटायचीय त्यानी काश्मीरच काय पण सिमला, मनालीसारखी हिमालयातील रम्य ठिकाण किंवा बद्रीकेदार सारख्या निसर्गयात्राना मे/जूनमध्येच जायला हव त्यानतर खालचा बर्फ हळू हळू वर सरकायला लागतो, आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये दुरून बर्फ बघण्यावर समाधान मानायला लागत जितकं उशीरा जाऊ तितक बर्फापर्यंत पोचण्यासाठी जास्त चालाव लागतं त्यासाठी घोड्यालाही जास्त पैसे द्यावे लागतात शिवाय पावसाळ्यात हिमालयाच्या ठिसूळ खडकामुळे कित्येकदा दरडी कोसळून रस्ता बंद होऊन अडकून पडण्याची भीती असते

यासाठीच ज्याना हिमालयीन भागात एकदाच जाण शक्य असेल त्यानी शक्यतो मे/जूनमध्येच जाव (काश्मीरमधील अमरनाथ यात्रा किंवा बद्रिनारायण जवळील पुष्प धाटीसाठी मात्र जुलै/ऑगस्ट लडाखचा रस्ताही जून अखेर सुरू होतो )

हिमालय आणि इतरत्रच्या थड हवेच्या ठिकाणाखेरीज उन्हाळ्यात जाता येण्यासारखी आणखी एक जागा म्हणजे अभयारण्य ! अर्थात् अभयारण्यापर्यंतचा प्रवास उष्ण प्रदेशातून असेल तर तो त्रासदायक होणारच ! परंतु याच काळात पाण्याच्या शोधार्थ जगलातील पाणवठ्यावर आलेली जनावर जास्त जवळून दिसण्याची शक्यता असते आसाममधील काझिरगा, मध्य प्रदेशामधील कान्हा-केसरीसारखी अभयारण्ये पावसाळ्यात दलदलीने पाऊल टाकायला देखील अयोग्य होतात हिवाळ्याच्या सुरुवातीला गेल तरी पावसाळ्यात वाढलेल्या गवतात जगली श्वापद दडून राहिल्याने नीट दिसत नाहीत उन्हाळ्यात हे गवतही नष्ट झाल्याने रानावनातील वन्य प्राण्याच जास्त चागल दर्शन घडू शकत

उन्हाळ्यात कुठेही सहलीला जाताना, अगदी हिमालयासारख्या थड प्रदेशात सुद्धा, घ्यायची मुख्य काळजी म्हणजे न फुटणारी पिण्याच्या पाण्याची बाटली कारण हवा थड असली, बर्फ असला तरी आपल्याकडे उन्हाला आचही बऱ्यापैकी असते शिवाय भटकंतीने तहानही लागतेच ! आणि पाण्याची तहान दुसऱ्या कशाने भागत नाही

सहलीत पदभ्रमण, बर्फावर चालणं असल्यास चागले बूट हे हवेतच (हटर शूज किंवा पदभ्रमणात वापरता येणारे अन्य बूट कातडी बूट, चपला नसाव्यात. ) याशिवाय माकडटोपी, स्कार्फ, मोठ्या कडाची हॅट, गॉगल, स्वेटर, इत्यादी तसेच पावसाची शक्यता असल्यास प्लॅस्टिकच जाड शिट अथवा रेनकोटही असावा.

* *



## दरवर्षी महाबळेश्वरच कशाला ?

उन्हाळ्यात एखाद्या थड हवेच्या ठिकाणी जावस वाटत पूर्वी उन्हाळ्याची सुट्टी लागली की बहुतेक बायका माहेरी म्हणजे मुल आजोळी जात आता बऱ्याच स्त्रिया नोकरी करू लागल्याने महिनाभराच माहेर इतिहासजमाच होत चाललंय ! शिवाय प्रत्येकजण आपापल्या व्यापात लहान जागा, वाढती महागाई यामुळे माहेरची झाली तरी त्यांना कशाला उगाच त्रास द्या, त्यापेक्षा सगळ्यानी मिळून चार दिवस जाव कुठेतरी एखाद्या थड हवेच्या स्थळी अस हल्ली बऱ्याचशा नोकरदार गृहिणींना वाटत आत्ताच्या मुलांना तर नित्य नवीन हव असत

लाब कुठे जायच तर खूप अगोदरपासून कार्यक्रम ठरवा, रागेत उभ राहून आगाऊ रिझर्वेशन्स करा, नाहीतर उन्हाळ्यातील चिकट गर्दीच्या गदारोळात आणखी घामाघूम होत प्रवास करा किंवा पैसे चारून जागा मिळवा एवढी सगळी कटकट करण्यापेक्षा आपल जवळच महाबळेश्वर बर म्हणून परत परत महाबळेश्वरचीच निवड होत असते उन्हाळ्यात नित्य नियमाने चार-आठ दिवस महाबळेश्वरला जाणं हे कित्येक उच्चभ्रू वर्गात 'हाय्', 'फाय्' स्टेटस्‌चा जणू एक भागच झाल्यासारखा वाटतो

दरवर्षी महाबळेश्वरला जाण्यात काहीच गैर नाही आर्थिकदृष्ट्या ज्याना हे शक्य त्यानी खुशाल जाव परतु नोकरदार मध्यमवर्गीयासाठी मात्र महाराष्ट्रातील थड हवेच्या ठिकाणाचा राजा असलेल हे ठिकाण आज फक्त श्रीमतानाच परवडाव इतक महाग झालेल दिसत याच प्रमुख कारण म्हणजे महाबळेश्वरमधील बहुतेक सर्व मध्यमवर्गीय हॉटेल्समध्ये खाण्या-पिण्यासकटचा आकारला जाणारा दरडोई दर सध्याचा हा दर आहे माणशी सुमारे

दोन-अडीचशेहून अधिकच प्रेक्षणीय स्थलदर्शनासाठीचा खर्च वेगळाच त्यामुळे एका चौकोनी कुटुबाला महाबळेश्वरमधील आल्हाददायक वास्तव्यासाठी रोजचा कमीत कमी खर्च येतो अदाजे १००० रुपये याला अपवाद आहे महाराष्ट्र पर्यटन महामडळाच्या हॉलिडे होमचा पण त्याकरता सीझनमध्ये ३-४ महिने आधी बुकिंग कराव लागत

महाबळेश्वरमधील काही थोडी हॉटेल्स खाण्या-पिण्याच सक्तीच बधन न घालता नुसत्या निवासाच्या सुविधा देतात पण गमत म्हणजे त्याचाही दर डबल रूमप्रमाणे नसून, जादा बेडही न देता आत किती लोक राहतात यावर दरडोई आकारला जातो. शनिवार-रविवार सारख्या सुट्टयाच्या दिवशी तर त्याच्या भाड्यात जास्तच वाढ होते पत्र्याचे पलग, समाईक अस्वच्छ स्वच्छतागृह, मोडक जुनाट फर्निचर, भर बाजारातील कोंदट खोलीसाठी चारशे, पाचशे, सातशे देखील, समोरचा किती गरजवत आहे ते पाहून सागितले जातात गर्दीचे प्रसगी सागितला गेलेला हजार-पधराशे दर न परवडल्याने गाडीतच रात्र काढायला लागली किंवा महाबळेश्वरहून परताव लागल्याच्या घटनाही आपण कदाचित ऐकल्या असतील

विदेशातून गावाबाहेरची हॉटेल्स-मोटेल्स बहुधा जास्त स्वस्त असतात परतु आपल्याकडे अशा हॉटेल्सचे गिऱ्हाईक म्हणजे फक्त गाडीवाले श्रीमत पर्यटकच असल्याने की काय ती अमळ अधिकच महाग असतात महाबळेश्वरला तर याचा जास्तच प्रत्यय येतो

खा अगर खाऊ नका पण त्याचे पैसे मात्र द्या खाण्या-पिण्यासकट हॉटेलच भाड घेण्यासारखा जाचक 'जिझिया' कर अगदी काश्मीर, लडाख पासून ते कन्याकुमारी, अदमानपर्यंत आणि इकडे राजस्थान ते ईशान्य भारताच्या पूर्व टोकापर्यंतच्या प्रवासात कुठेही आढळला नाही. मग महाबळेश्वरमध्येच अशी सक्तीची पिळवणूक का असावी ?

सर्वसामान्यपणे आपण तिन्ही त्रिकाळ एवढ साग्रसंगीत जेवतही नाही प्रवासात तर एक वेळच व्यवस्थित जेवण मिळाल तर एकवेळ थोड कमी खाल्ल तरी चालत म्हणण्यापेक्षा कमी जातच ! पैसे मोजलेत म्हणून पोटाला ताण देऊन आडवा हात मारा असही कित्येकदा होत प्रेक्षणीय स्थलदर्शनासाठी एकदा दूरवर गेल्यावर केवळ चहा-नाष्ट्यासाठी वेळ साधून धडपडत हॉटेलवर परत येण कित्येकदा जमत नाही ते अडचणीच आणि खर्चिकही होत शिवाय पॉईंटस् बघत हिंडताना दमछाक होते म्हणून वाटेत थड पेय, आइस्क्रीम, भेळ, भजी इत्यादींचा अधून मधून आस्वाद घेण चालूच असत मुलाना तर दर पॉईंटवर अबर-चबर हवच असत मग एवढाले पैसे मोजून हॉटेलवर सकाळ-सध्याकाळ आपण अस कितीस जेवणार ?

महाबळेश्वर बघितल नसल्यास एक-दोन वेळा जाण ठीक आहे पण रोजचे प्रत्येकी दोन-अडिचशे रुपये खर्च करून दरवर्षी परत त्याच महाबळेश्वरला गर्दीत जाण्यात काहीच मजा नाही.

महाबळेश्वरच्या अफाट महागाईचा आणखी एक तोटा म्हणजे विशेष न हिंडणाऱ्याना वाटत, जवळच महाबळेश्वर एवढ महाग म्हणजे उटी, कोडाईकॅनाल, सिमला, कुलू-मनाली, नैनीताल, लेह-लडाख सारख्या दूरच्या ठिकाणी जायच म्हणजे केवढा खर्च येईल ? परतु महाबळेश्वरसारखा पैसे घेऊन सक्तीच्या खाण्या-पिण्यासकटचा अगडबब दरडोई दर भारतातील इतरत्रच्या हिल स्टेशन्सना नसल्याने आपल्या बजेटनुसार हॉटेल निवडता येत खाण्या-पिण्याच थोड अधिक सामान बरोबर घेऊन पैसे वाचवता येतात रेल्वेची दुसऱ्या वर्गाची भाडी खूपच कमी असल्याने आगाऊ आरक्षण केल्यास जाण्या-येण्याचा कालावधी सोडला तर महाबळेश्वरमधील चार दिवसाच्या खर्चात महाबळेश्वरपेक्षा कित्येक पटींनी सुदर अशी भारतातील इतरत्रची अनेक थड हवेची ठिकाणे सहजतेने करता येतील अगदी सध्या काश्मीरला पर्याय झालेल 'मनाली' देखील

हिमशिखरानी फेर धरलेल्या हिरव्यागार टेकड्यामधील हिमाचल प्रदेशातील 'डलहौसी' हे असच एक नितात रमणीय हिल स्टेशन रेल्वेने थेट जाता येणाऱ्या पठाणकोटपासून फक्त ८० कि मी वर असलेल्या विलोभनीय डलहौसीला सहजतेन जाता येत

मध्य प्रदेशमधील पचमढी हे हिल स्टेशन भारतातील मी पाहिलेल्या थड हवेच्या ठिकाणात सर्वात स्वस्त म्हणता येईल ऊटीला देखील अल्प दरात राहता येण्यासारख्या जागा आहेत पंचमढीला जाण्याचा त्यातल्या त्यात सोईस्कर मार्ग म्हणजे नागपूरला जाऊन तेथून २६२ कि मी वरील पचमढीला रस्त्याने जाणे नागपूर-पचमढीचे दरम्यान रोज सकाळी १० वाजता बस आहे. भूस्तराची विविध रूपे, वृक्षवेलींच्या समेलनाला प्रपाताची जोड मिळालेल्या पदभ्रमण, निसर्गप्रेमींना आकर्षक वाटेल अशा पचमढीत मोठाले इमलेवाले खासगी हॉटेल्स काढायला परवानगीच नसल्याच सांगितल जात त्यामुळेच तेथील मध्य प्रदेश पर्यटन महामडळाच्या राज्य सरकारी निवासस्थानांतून अत्यल्प दरात राहता येत.

खर्चाचा विषय निघाला की " कोडाईला किती खर्च येईल ? सिमल्याला किती लागतील ? मनालीच काय ? लेह-लडाखसाठी कितीची तरतूद करावी ? यासारखे प्रश्न विचारले जातात खर्चाचा सरसकट अदाज सागणं कित्येकदा अवघड होत कारण कुठल्याही सहलीला किती खर्च येईल ते कितीजण, कोणत्या मार्गाने प्रवास करणार ? कुठल्या प्रतीच्या हॉटेलमध्ये राहणार ? काय अन् किती वेळा खाणार-पिणार यावर मुख्यत्वे अवलबून असत आणि पैसे कमी तर आरामही कमी, कष्ट थोडे जास्त हे ओघान आल तरी ध्यानातही ठेवायला हव.

अजूनही बऱ्याच प्रमाणात रम्यता टिकवून असलेल्या सहज जाता येण्यासारख्या जवळच्या महाबळेश्वरची ओढ वाटण ठीक आहे. पण परत परत महाबळेश्वरच्या त्याच त्या मजेवर पैसे खर्च करण्याऐवजी इतरत्रची महाबळेश्वरएवढीच किंबहुना थोडे अधिकच रम्य प्रदेश

बघण्याची, तेथील देश बाधवाची सुख-दु खे जाणून घेऊन त्याच्यातीलच काही काळ एक होऊन राहण्याची इच्छा ठेवली तर अशा प्रवासाने घडणारा बदल जास्तच हवासा वाटेल

यावर्षी महाबळेश्वरला जाऊन आला असाल तर ठीक आहे, पण पुढील वेळी भारताच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणाचा थडावा, तेथील आदरातीथ्याचा अनुभव घेण्याचा बेत आखण्यास काय हरकत आहे ?

* *



## पाहावं असं विशेष काही

जाणकार मार्गदर्शकाशिवाय पर्यटन म्हणजे केवळ अधातरी भटकण्यासारख माहितगार साथीला नसेल किंवा कुठल्याही स्थळी नक्की काय पाहायच याची काही माहिती नसेल तर अशी सहल म्हणजे ' आम्ही हे ठिकाण बघितल, ' एवढी मित्रमडळीत फक्त फुशारकी मारण्यासाठी ठीक म्हणता येईल. अमूल्य वेळ, पैसा खर्च करून सहलीला जायच आणि हॉटेलच्या चार भिंतींच्या चौकटीत बसून नुसता वरवरच बघून परत यायच नसेल तर आपल्या आवडीनुसार कुठल्या ठिकाणी जाव आणि नेमक काय पाहाव याची माहिती अगोदर करून घ्यायला हवी.

कोणार्कचीच गोष्ट आहे मानवी जीवनाचे विविध पैलू प्रतीत करणार सूर्यमदिराचं ते कुशल शिल्प पाहून तृप्त भारावलेल्या मनाने बाहेर आलो एवढ्यात एका मेटॅडोरमधून पर्यटक स्त्रियाचा एक जथ्था कलकलाट करत बाहेर पडला आणि घाईघाईने जवळच्या नवग्रह मदिराकडे दर्शनासाठी पळाला सूर्यास्ताला सूर्यमदिराचे दरवाजे बद व्हायला दहा मिनिटाचा अवधी होता परतु त्या स्त्रियाना बहुधा कोणी सागितल नसाव, "बायानो, उशीर झाला तरी असेल त्या वेळात प्रथम सूर्यमदिराचं अप्रतिम शिल्प पाहून घ्या आणि नंतर इतरत्र वळा नवग्रह मदिर तर सूर्यास्तानतरही उघड असत "

काश्मीरला गेलं की गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाम पाहायच हे माहित असत बसने या ठिकाणी सोडल की, "आता तुमच तुम्ही हिंडा," अस सागितल जातं त्यामुळे

बरेच पर्यटक जवळपास पायी भटकून वेळ काढताना दिसतात.

गुलमर्गला बस स्टॅंडसमोरील हिरवळीच विस्तीर्ण मैदान सोडल्यास काही नाही चेअरकार चालू असेल तर प्रवासी तेथपर्यंत जाऊन येतात 'बॉबी कोठी' पाहतात परंतु गुलमर्गच्या निसर्गसौंदर्याची खरी मजा चार किलोमीटर्सवरील खिलनमर्गला जाण्यातच आहे यासाठी वेगळे पैसे खर्च करावे लागतात आणि तेवढा वेळही संयोजकानी द्यावा लागतो

जी गोष्ट गुलमर्गची तीच पहेलगामची खुद्द पहेलगाममध्ये खळखळत्या लिडरशिवाय बाजारचा सामान्य रस्ता आणि इथेही परत बॉबी कोठी सोडता, विशेष काही नाही पहेलगामच खरं स्वर्गवत् निसर्गसौंदर्य अनुभवायचं असेल तर चंदनवाडी अगर आडू-लिडरवटपर्यंत जायला हवं पण येथेही परत टॅक्सीला भरमसाट पैसे मोजावे लागतात आणि मुक्काम नसेल तर टॅक्सीला पर्यायही राहत नाही.

पदभ्रमणाची झलक चाखायची असेल तर पहेलगाम आडू (११ कि मी ) - लिडरवट (११ कि मी ) हा कोणालाही विशेष खास काही तयारी न करता करता येण्याजोगा फॅमिली ट्रेक एका बाजूला ऋतूनुसार हिरवेगार, अगर हिम ल्यालेले धवल डोंगर. दुसऱ्या बाजूला साथीला जवळ-दूर होत जाणारा लिडरचा खळखळणारा प्रवाह, काळेशार आकाश; वाटेत भेटणारी मेंढ्याचे कळप राखणारी, कळकट वेषातील गोड काश्मिरी पोरं. सर्वच निसर्गसान्निध्याच चैतन्य देणारं! नितांतसुंदर निसर्गाच्या कुशीत पहुडलेल्या आडूपर्यंत टॅक्सीनेही जाता येत. पुढे मात्र फक्त चालत अगर घोड्यावरूनच

भूनंदनवन काश्मीर सध्या पर्यटकासाठी बाद झाल्याने त्याच्या दृष्टीने ओसाड वाळवटच झालय म्हणाव लागेल. खरं वाळवट पाहण्यासाठी राजस्थानची सहल ठरवली जाते आणि त्यात बरेचदा फक्त घेतली जातात अबू, उदयपूर, चितोड, जयपूर ही ठिकाण प्रदेश वालुकामय असला तरी या भागात वाळूच्या टेकड्या अशा नाहीत अतापर्यंत पसरलेल्या वाळूच्या टेकड्या पाहायच्या असतील तर जैसलमेरपर्यंत जायला हवं जैसलमेरपासून ४० कि मी.वरील 'सम' येथे वाळूच्या टेकड्याचा महासागर पाहायला मिळतो तेथपर्यंत जाण शक्य नसेल तर वाळूची टेकडी - सँडड्यून असते कशी हे मारवाडचे प्रवेशद्वार जोधपूरपासून ६५ कि मी वर असलेल्या ओसियाँ येथे पाहायला, अनुभवायला मिळेल

रेगीस्तानच्या वाळवटातून आपण भारताच्या पूर्वेकडील टोकाला गेलो तर ईशान्य भारताच प्रवेशद्वार म्हणता येईल अशा आसामच्या राजधानीत गुवाहाटीत प्रवेश करतो ब्रह्मपुत्रा नदी नव्हे 'नद' (कारण येथे तिला पुल्लिंगी संबोधल जात) पहाणं हा एक विलक्षण अनुभव आहे ब्रह्मपुत्रेवर घाट असे नाहीतच, कारण तीत स्नान करणे हे एक शिवरात्रीचा अपवाद वगळता अशुभ समजल जातं त्यामुळेच ब्रह्मपुत्रा स्वच्छतेच्या दृष्टीने जास्त पवित्र राहिली असावी

देवस्थान जितकं जागृत म्हणून बोलबाला तेवढी दर्शनासाठी भली मोठी रांग, पंड्याचा

ससेमिरा, ठराविक वेळी गाभारा बंद करायची पद्धत बहुदा असते. त्यात प्राण्यांना बळी द्यायची प्रथा असेल तर अनेकदा मन शांती ऐवजी उद्विग्नता घेऊन बाहेर पडायची वेळ येते कालीच्या ५१ पीठांपैकी एक प्रमुख स्थान म्हणून गणले गेलेले गुवाहाटीच्या निलाचल टेकडीवरील कामाख्या मंदिर असेच म्हणावे लागेल कामाख्या मंदिरापर्यंत बसने जाता येत त्याच्या थोडं वर भुवनेश्वरीचं मंदिर आहे तेथपर्यंत जाण्यासाठी मात्र चढाच्या रस्त्याने १५-२० मिनिटांची पायपीट करावी लागत असल्याने की काय तेथे गर्दी नसते परंतु या मंदिराच्या वाटेवर भव्य, संथ ब्रह्मपुत्रेकाठच्या पाचूच्या रंगाच्या टेकड्यांमधून वसलेल्या गुवाहाटीचं मनोपटलावर कोरलं जाणारं निवांत, सुरेख दर्शन घडतं

मूर्तरूप देवदर्शनाची आसक्ती असणाऱ्या, अगर नसणाऱ्या बहुसंख्यांना सोन्या - मोत्या - हिऱ्यांचं आकर्षण असतं या गोष्टी विकत घ्यायला परवडल्या नाहीत तरी त्यांच्या उत्पादनाची प्रक्रिया पाहण्याचं औत्सुक्य असतं मध्य प्रदेशमधील खजुराहोच्या ओढीने अनेक पर्यटक तेथे जातातच विश्वविख्यात खजुराहोपासून फक्त ४५ कि मी वरील पन्ना येथे भारतातील एकमेव अशी हिऱ्याची खाण आहे आणि हिरे कसे काढले जातात ते सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान कोणालाही पाहता येतं पन्ना बस स्टँडपासून या खाणीपर्यंत मुक्त बससेवाही उपलब्ध आहे स्वतःचे वाहन करून खजुराहोहून पन्नाला गेल्यास वाटेत पन्ना अभयारण्य, पांडव फॉल्स, छत्रसाल महाराजाचा राजवाडा यासारखी प्रेक्षणीय स्थळेही पाहता येतील

विशेष माहिती नसलेल्या बघण्यासारख्या असंख्य गोष्टी आपल्या भारतवर्षात आहेत. थोडा डोळसपणे प्रवास केला तर लहान-मोठी कितीतरी पर्यटनस्थळ आपल्या दृष्टोत्पत्तीस येतील

* *




# रेल्वे देत असलेल्या सोई

मोठ्या टप्प्या-टप्प्याच्या प्रवासाची आगाऊ आरक्षणं कशी करायची, हा मुख्य प्रश्न असतो परंतु यासाठी घाबरून जायचं काही विशेष कारण नाही रेल्वेच्या कितीही मोठ्या खंडित प्रवासाची सर्व आरक्षण पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरातून अगदी सहजतेने होऊ

शकतात रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या लाबच्या सर्क्युलर तिकिटाचे दर माफक म्हणण्याइतपत कमी असतात परत हा चक्री प्रवास आपण आखलेल्या मार्गानुसार करता येतो आपल्या प्रवासाचा आराखडा, तारखा आणि वाटेत उतरायच्या ठिकाणासह रेल्वे स्टेशनवरील अधिकाऱ्याकडे दिल्यावर असे तिकीट मिळू शकत पुढील कनेक्टींग गाड्याची तसेच परतीच्या प्रवासाची आरक्षणही रेल्वेतर्फे केली जातात यासाठी थोडा आकार द्यावा लागतो

लाबच्या प्रवासाची रेल्वे आरक्षण ही करायलाच हवीत एकवेळ काही कारणानी सहल रद्द झाली तर थोडे पैसे वाया जातील, पण मोठ्या ग्रुपला आणि सुट्ट्याच्या कालावधीत आयत्या वेळी रेल्वे आरक्षण मिळण महामुश्कीलच आरक्षण हातात असली की प्रवास तर सुखकर होतोच पण रात्रीचा प्रवास करून सकाळी क्लोकरूममध्ये सामान टाकून प्रेक्षणीय स्थलदर्शन केल्यास हॉटेलचा खर्च कमी करण शक्य होत. अतिशय नाममात्र दरात या क्लोकरूम २४ तास उपलब्ध असतात मात्र कुलूप असल्याशिवाय कुठलही सामान स्वीकारल जात नाही काही प्रमुख रेल्वे स्थानकावर सामान ठेवण्यासाठी लॉकरचीही सोय आहे.

रेल्वे आरक्षण ४५ दिवस आधी करता येतात पुणे - मुबई आरक्षण मात्र फक्त तीन दिवस आधी होत रेल्वेच नुसत आरक्षण करून उपयोग नाही तर ते कन्फर्म्डही हव तरच जागा मिळण्याची खात्री आपण जितकी लवकरात लवकर आरक्षण करू तेवढी पुढच्या खडित प्रवासाच्या खात्रीची शक्यता जास्त! आरक्षण नक्की झाल्याची रेल्वे अधिकाऱ्याकडून नोंद करून घ्यावी, नाहीतर असा अनुभव येतो की, आपल्या गावी आरक्षण नक्की झाल्याच सागितल जात आणि परगावी आपली नाव आरक्षण यादीत नसतात.

आपल्याकडे ४०० कि.मी पेक्षा लाबच्या अतराच तिकीट असेल तर दर २०० कि मी ला एक दिवस याप्रमाणे तिकिटाच्या अतराच्या प्रमाणात मार्गावरील कुठल्याही स्टेशनवर प्रवास खडित करता येत असला तरी ३०० कि मी अतरानंतरच पहिल्यादा प्रवास खडित करता येतो मात्र चढता-उतरताना प्रत्येक वेळी स्टेशन मास्तरकडून तिकिटावर तशी नोंद करून घेणे आवश्यक असत. काही कारणामुळे पुढचा प्रवास करण शक्य नसेल तर स्टेशनमास्तरकडून सही - शिक्क्यानिशी नोंद करून घेतल्यास त्याच स्टेशनवर पैसे परत मिळण्याची सोय आहे परतीच्या प्रवासाची तिकीटे रद्द करायची झाल्यास ज्या स्टेशनवरुन तिकीटे काढली असतील तेथेच पैसे परत मिळतात

एका व्यक्तिला एकावेळी चार जणाचे आरक्षण करता येते एकाच कुटूबातील लोक असतील तर एकजण सहा लोकाचे आरक्षण करू शकतो. आरक्षणासाठी प्रवाशाची नावे, लिग, वय, पत्ता इत्यादी माहिती रेल्वेच्या छापील निवीदा अर्जात स्वाक्षरीनिशी भरावी लागते रेल्वेची तिकीटे फक्त रेल्वे स्थानकावरील खिडक्यामधून किंवा रेल्वे बुकिंग एजन्सीमार्फत अगर मान्यताप्राप्त एजटकडूनच घ्यावीत. एकाच्या नावाने आरक्षित रेल्वे

प्रवास तिकीट दुसऱ्याला देता येत नाही किंवा त्याची पुन्हा विक्री करता येत नाही तो कायद्याने गुन्हा आहे विक्री करणारा आणि विकत घेणारा दोघही गुन्हेगार ठरून त्याना दंड अथवा सक्तमजुरी किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात म्हणूनच लवकरात लवकर रिझर्वेशन करण महत्त्वाच

पाच वर्षांखालील मुलाना रेल्वेत तिकीट लागत नाही ५ ते १२ वर्षांपर्यंतच्या मुलाना अर्धं तिकीट पडत ६५ वर्षांवरील वयोगटाच्या लोकाना तिकिटामध्ये २५% सवलत मिळ्ते. तसेच विद्यार्थी, खेळाडू, शिक्षक, स्वयसेवी सघटना, अपग, आधळे, मूक - बधिर, टी बी , कॅन्सरसारख्या व्याधीग्रस्त व्यक्ती, इत्यादींनाही रेल्वे तिकिटात सवलत मिळू शकते काहींना सहाय्यकालाही सवलतीच्या दरात बरोबर नेता येतं ही सवलत मिळविण्यासाठी खास निविदा अर्ज भरून रेल्वेची मान्यता घ्यावी लागते स्वातत्र्यसैनिकानाही भारतात कुठेही रेल्वेच्या पहिल्या वर्गाने सहाय्यकासह मोफत प्रवास करता येतो परदेशी नागरिकासाठी अगर परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयासाठी ठराविक मुदतीचे सवलतीच्या दरातील ‘ इंडरेल पासेस ’ उपलब्ध आहेत

भारतीय रेल्वेत साधारणत पहिला व दुसरा आणि स्लीपर असे प्रवासी वर्ग असतात काही गाड्याना फक्त दुसऱ्या वर्गाचे सर्वसाधारण अगर वातानुकूलित डबे असतात बहुतेक सर्व रात्रीच्या मेल/एक्सप्रेस गाड्यांना शयनयाने असतात

ग्रुपने प्रवास करू इच्छिणारे पर्यटक, यात्रेकरू इत्यादींसाठी रेल्वेतर्फे प्रवासाच्या कार्यक्रमानुसार विविध वर्गांचे कोचेस ( टूरिस्ट कार्स ) उपलब्ध करून दिले जातात अधिक माहितीसाठी त्या त्या झोनच्या चीफ कमर्शियल सुपरिंटेंडटशी संपर्क साधणे आवश्यक

रेल्वेमधून प्रत्येक पूर्ण तिकिटामागे वातानुकूलित ७० किलो; पहिला वर्ग, दुसरा वर्ग वातानुकूलित शयनगार ५० किलो, एसी चेअरकार ४० किलो, दुसरा वर्ग ३५ किलो एवढे सामान नेण्यास परवानगी आहे प्रत्येक अर्ध्या तिकिटामागे याच्या निम्मे सामान नेता येते यापेक्षा जास्तीचे सामान ‘ लगेज व्हॅन ’ या सामानासाठी असलेल्या वेगवेगळ्या बोगीत ठेवावे लागते आणि मुक्कामाला पोहोचताच ताब्यात घ्यावे लागते लगेज व्हॅनमधून स्कूटर नेऊन प्रेक्षणीय स्थळदर्शन करणारे बरेच जण आहेत या स्कूटरची पेट्रोल टाकी रिकामी असावी लागते

पहिला वर्ग, एसी टूटायर आणि काही जलद गाड्यातील दुसरा वर्ग यातील प्रवाशाना रेल्वेतर्फे महत्त्वाच्या स्टेशनवर बिछाने ( बेड रोल्स ) हवे असल्यास दिले जातात ( बिछान्यामागे रात्रीसाठी १० रु ).

रेल्वेच्या महत्त्वाच्या गाड्याना डायनिंग कार असते त्यामुळे जागेवर गरम जेवण, नाष्टा, चहा-कॉफी मिळू शकते. गाडीबरोबर जेवणाचा डबा नसला तर वाटेतील स्टेशनवरून

जेवण पुरविण्याची सोय केली जाते. बऱ्याच गाड्यातून ॲल्युमिनियमच्या चादीसारख्या वेष्टनातून प्रवाशाना गरमागरम जेवण दिले जाते

चालत्या गाडीत एकाएकी काही वैद्यकीय मदत लागली तर गार्ड किंवा कोचचा ॲटेंडट/कडक्टर याच्याशी संपर्क साधावा रेल्वेतर्फे त्वरित वैद्यकीय मदत आणि औषधे देण्याचा प्रयत्न ठरलेल्या दरात केला जातो

रेल्वेच्या वेटिंग रूममध्ये स्नान करण्याचीही सोय असते रेल्वेस्थानकावर असलेल्या रिटायरिंग रूम्सही उपलब्धतेनुसार प्रवाशाना मिळू शकतात नवी दिल्ली स्टेशनच्या अजमेरी गेटच्या बाजूला प्रचड मोठ रेल यात्री निवास आहे मात्र हे मिळण्यासाठी आपल्याजवळ कुठून तरी रेल्वे प्रवास करून आल्यावर उतरल्याच तिकीट असण आवश्यक आहे फक्त जायच रेल्वे तिकीट असेल तर तेथे राहता येत नाही

रेल्वे सुटण्याआधी दहा मिनिटे स्टेशनवर हजर राहणे आवश्यक आहे नाहीतर आरक्षित जागा दुसऱ्याला दिली जाते सुरुवातीच रिझर्वेशन पुढच्या कनेक्टिंग गाड्याच्या रिझर्वेशनची हमी देत नाही सध्याची रिझर्वेशन फी आहे प्रत्येक वातानुकूलित २५ रु , पहिला वर्ग/वातानुकूलित टू-टायर १५ रु , वातानुकूलित चेअरकार/दूसरा वर्गस्लिपर १० रु , दूसरा वर्ग- आसन ५ रुपये

रेल्वेच कोणत्याही वर्गाचे आरक्षण नसलेल तिकीट काही कारणामुळे वापरल न जाता गाडी सुटल्यानतर तीन तासाच्या आत परत केल्यास पाच रुपये कापून पूर्ण रक्कम परत मिळते

आरक्षित तिकीटे गाडी सुटल्यानतर तीन तासापर्यंत परत केल असता रिफड मिळतो त्यासाठी खालीलप्रमाणे पैसे कापले जातात

१] प्रवासाचा दिवस सोडून एक दिवसापेक्षा जास्त आधी परत केल्यास वातानुकूलित ३० रुपये, पहिला/वातानुकूलित दूसरा वर्ग / एसी. चेअरकार २० रु दूसरा वर्ग १० रुपये

२] प्रवासाच्या एक दिवस आधी ते गाडी सुटण्यापूर्वी ४ तास आधी परत केल्यास २५% कॅन्सलेशन चार्जेस गाडी सुटण्यापूर्वी ४ तासांपेक्षा कमी ते गाडी सुटल्यावर ३ तासापर्यंत ५०% कॅन्सलेशन चार्जेस्

वरील नियम आर ए. सी ( रिझर्वेशन्स अगेन्स्ट कॅन्सलेशन ) किंवा वेटिंग लिस्टवरील तिकिटानाही लागू होतात मात्र आर ए. सी अगर प्रतिक्षा यादीवरील तिकिटासाठी कॅन्सलेशन चार्जेस आकारले जात नाहीत. शेवटपर्यंत कन्फर्मड रिझर्वेशन मिळाले नाही तर तिकिटामागे ५ रुपये कापण्यात येतात मात्र कुठल्याही तिकिटाच्या बाबतीत रिझर्वेशन फी परत केली जात नाही

वरील रिफंड, अर्धवट वापरलेल्या तिकिटाचा रिफंड, वातानुकूलित यत्रणा बद पडणे, पुढील प्रवासाचे रिझर्वेशन न मिळणे इत्यादींसाठी स्टेशन मास्तराशी सपर्क साधावा

हरविलेल्या किंवा गहाळ झालेल्या तिकिटाचा रिफड रेल्वे देत नाही रिझर्वेशन असलेले तिकीट हरविल्यास तिकिटाच्या रकमेच्या २५% पैसे भरून त्याच रिझर्वेशनवर प्रवास करण्याची परवानगी देण्यात येते यासाठीच दोन किंवा अधिक कुटुबानी प्रवास करताना सर्वांचे एकत्रित रिझर्वेशन करण्यापेक्षा एकाच वेळी पण वेगवेगळ्या स्लिप्स भरून आरक्षण केलेली चागली

रेल्वेच फेरफारीच नवीन वेळापत्रक दर १ जुलैपासून अमलात येत असत रेल्वेच 'ट्रेन्स ॲट ग्लान्स' हे छोट वेळापत्रक प्रवासात जवळ ठेवल्यास आपण कुठे आहोत हे कळायला मदत होते शिवाय रेल्वेच्या नेहमीच्या उपयुक्त नियमाची माहितीही त्यात दिलेली असते

मोठ्या खडित प्रवासाची आरक्षण स्वत करायची म्हटल तर बऱ्याच जणाच्या मनात थोडी धास्ती असते, "कशी करायची ही रिझर्वेशन्स ? जमेल का आपल्याला हे सगळ ? आपल्या तर तिथे कोणी ओळखीच नाही "

रेल्वेची आरक्षण करायला ओळख वगैरे कोणाची लागत नाही लागते ती फक्त स्टेशनवर थोडे हेलपाटे घालायची तयारी, परत परत जाण्याची चिकाटी ग्रुपमधल्या प्रत्येकाने सवडीनुसार हे काम वाटून घेतल तर त्यात अवघड काही नाही

आपल्या प्रवासमार्गाच्या मुक्कामाच्या टप्प्यासहित आराखड्याचा अर्ज साध्या कागदावर स्टेशनमास्तर/स्टेशन सुपरिटेंडट यांच्या नावे दिला की ते सपूर्ण प्रवासमार्गाचे अतर मोजून त्यासाठी लागणार भाड सागतात म्हणजे त्याच अर्जावर लेखी लिहून देतात यासाठी अर्ज दिल्यापासून गर्दीनुसार ८-१५ दिवसानी बोलावल जात याला प्रवासमार्ग मान्य (रूट अप्रूव्ह) करून घेण म्हणतात

कुठल्याही नेहमीपेक्षा वेगळ्या मार्गाला वर्तुळाकार मार्ग (सर्क्युलर रूट) म्हटल जात आणि हा सर्क्युलर रूट आधी अप्रूव्ह करून घेण आवश्यक असत उदाहरणच द्यायच झाल तर पुणे-कलकत्ता-पुणे हे अलाहाबाद किंवा नागपूरमार्गे नेहमीचे रूट होतील परतु कलकत्त्याला भुवनेश्वर अथवा दिल्लीमार्गे जायच झाल्यास तो सर्क्युलर रूट होईल

आपण दिलेल्या/आखलेल्या कोणत्याही वर्तुळाकार मार्गाच तिकीट मिळू शकत सध्या या प्रकारच्या तिकिटाना वेगळी सवलत नसली तरी जितक अतर जास्त तितक पुढे पुढे रेल्वेच भाड अगदी कमी 'मायक्रोस्कोपिक रेटने' वाढत असल्याने प्रत्येक खडित प्रवासाच्या टप्प्यावर वेगळ तिकीट काढण्यापेक्षा ते खूपच स्वस्त पडत ५००० कि मी च्या पुढे रेल्वे भाड दर ५ किलोमीटर्सला न वाढता दर ५० किलोमीटर्सना वाढत आगाऊ तिकीट काढल्यामुळे तेवढे पैसेबरोबर बाळगावे लागत नाहीत आणि दर वेळी तिकीट काढण्यासाठी वेळ वाया जात नाही

रेल्वेकडून प्रवासमार्ग मान्य करून भाड्याची रक्कम काढून घेतली की तिकीट काढायचे नुसते तिकीट काढून उपयोग नाही तर रिझर्वेशन हवेच, तरच लाबचा प्रवास सुखकर होणार हे रिझर्वेशन निघायच्या तारखेपासून ४५ दिवसांपर्यंत आधी करता येत नुसत रिझर्वेशन करूनही जागा मिळेलच याची खात्री नाही त्यासाठी हे रिझर्वेशन कन्फर्मड् हव जितक तुम्ही लवकरात लवकर रिझर्वेशन कराल तितकी कन्फर्मेशनची शक्यता जास्त

एका व्यक्तीला एका वेळी एकाच कुटुबातील सहा जणाचे आणि वेगवेगळ्या कुटुबातील चार जणाचे आरक्षण करता येते यासाठी रेल्वेचा छापील फॉर्म भरावा लागतो. त्यात प्रवाशाची नावे, लिग, वय, प्रवासाची तारीख, वर्ग, गाडीच नाव, नबर इत्यादी माहिती लागते ६५ वर्षावरील लोकाना ५०० कि मी च्या पुढील प्रवास भाड्यात २५% सवलत मिळते यासाठी तिकीट काढताना कोणतेही सर्टिफिकेट लागत नाही मात्र ज्याचे वय सीमारेषेवर असेल त्यानी प्रवासात वयाचा दाखला जवळ ठेवलेला चागला प्रत्येक खडित प्रवास-टप्प्याच्या ४५ दिवस अगोदर स्टेशनवर जाऊन तिकीट आरक्षण कराव लागत खडित प्रवास जेवढा जास्त तेवढे हेलपाटे अधिक

रेल्वे नियम न २५५ आय आर.सी ए. नुसार सर्क्युलर तिकिटावरील कोणत्याही दोन स्टेशन्समधील प्रवास हा थेट जवळच्या मार्गाने करावा लागतो कर्फ्यू, दगल, पूर, वादळ इत्यादी अनेक कारणानी उद्भवू शकणाऱ्या असाधारण परिस्थितीमुळे प्रवाशाना आधी मान्य करवून तिकिटावर नोंदवून घेतलेल्या मार्गाने पुढे प्रवास करणे अशक्य होऊन, मध्येच प्रवास खडीत करून परत फिरावे लागले, तर अशा असाधारण परिस्थितीत स्टेशनमास्तर त्याच्या अखत्यारीत प्रवाशानी लेखी अर्ज दिल्यास त्याच सर्क्युलर तिकिटावर जवळच्या मार्गाने परतीचा प्रवास करण्याची परवानगी देऊ शकतात. मात्र उरलेला प्रवास रद्द केला तरी त्याचे पैसे परत मिळत नाहीत ज्या स्टेशन मास्तरानी अशी सवलत रेल्वे नियम ' २५५ अ ' नुसार दिली असेल त्या सर्क्युलर तिकिटावर तशी नोंद करण आवश्यक आहे वरील उदाहरणात कलकत्त्याहून थेट मुबई/पुण्याला परतावे लागल्यास कलकत्त्याच्या स्टेशनमास्तराकडे असा अर्ज द्यावा लागेल

पहिल्या वर्गाच सकाळच्या अगर रात्रीच्या गाड्याच आरक्षण रेल्वेतर्फे सगणकावरून अथवा तारा पाठवून केल जात तर दुसऱ्या वर्गाच फक्त रात्रीच्या स्लिपरचच अस आरक्षण होत दिवसाच आरक्षण त्या त्या स्टेशनवर कराव लागत आरक्षण केल्यानतर काही दिवसानी स्टेशनवर जाऊन कन्फर्मेशन आल असेल तर त्याची नोंद तिकिटावर करून घ्यावी टेलिग्रामला उत्तर आल नसेल तर ' नो रिप्लाय ' अशी नोंद तिकीटावर केली जाते. आपल्याला कन्फर्मेशनचा टेलिग्राम आला असला-नसला तरीही आपली नाव प्रत्यक्ष रिझर्वेशन लिस्टमध्ये आहेत ना याची खात्री प्रत्येक खडित प्रवासाच्या वेळी करावी लागते या यादीतील नावात अनेकदा

बऱ्याच चुका असतात

आपल्या स्टेशनवरून पाठविलेल्या टेलिग्रामला 'हो' किंवा 'नाही' उत्तर पाठवलेच पाहिजे, याचे त्या स्टेशनला कायदेशीर बधन नसल्याने बऱ्याचदा अधातरीच प्रवास करावा लागतो प्रत्येक स्टेशनला अगदी थोडा रिझर्वेशनचा कोटा असल्याने, ग्रुप मोठा असल्यास सर्वांची कन्फर्मेशन मिळण अवघड होत कित्येकदा आर.ए.सी मिळत आर ए.सी म्हणजे निदान बसायला जागा मिळायची शाश्वती जसजसे बर्थ खाली होत जातील तसतसे दिले जातात हा आर.ए.सी कोटा वातानुकूलित डब्याना ८, पहिल्या वर्गाला ६ आणि थ्री टायरला १८ असतो

जी शहरे सगणकाद्वारे एकमेकाना जोडलेली आहेत त्याचं कन्फर्मेशन लवकर येतं. पूर्वी कलकत्याहून कन्फर्मेशन आल तर फार नशीबवान म्हणायला लागायच. सध्या पुण्याला कलकत्याहून साधारणत तीन दिवसात कन्फर्मेशन येत रेल्वेच जसजस सगणीकरण होत जाईल तसतस रिझर्वेशनच कन्फर्मेशन येण्याचा प्रश्न कमी होत जाईल, अस वाटत

आपल्या हातात नुसतच रिझर्वेशन असेल आणि कन्फर्मेशन नसेल तर त्याचा काहीही उपयोग नाही पहिल्या वर्गात तर रात्री ९ नतर अशा लोकाना नुसत डब्यात शिरायलाही परवानगी नाही आधी तसच घुसल्यास रात्री ९ नंतर ( सकाळी ६ पर्यंत ) वाटेतील कुठल्याही स्टेशनवर तुम्हाला ते खाली उतरवू शकतात

गाडीला तुफान गर्दी असली, त्यातून आपल्याकडे आरक्षित तिकीट असल की आपल्याला वाटत एवढे लोक उभे असताना एखादी जास्तीची बोगी का लावत नाहीत ? रेल्वेला लाख वाटेल की जादा बोगी लावावी, परतु त्याच्याकडे बोगीज् कमीच त्याचीच मुळात वानवा कधी जादा गाडी सोडली तर या गाडीचे, त्या गाडीचे डबे काढून अनेकदा गाडी जोडली जाते आणि नेहमीच्या प्रवासी गाडीला जास्तीत जास्त १८ डब्याच बधन असत

गर्दीच्या वेळी दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास करण्याचा मोह होण अशक्य नाही परतु रेल्वे तिकीट हस्तातरित करण हा कायद्याने गुन्हा आहे आणि १ सप्टेंबर १९९० पासून अमलात आलेल्या इडियन रेल्वे कायदा १९८९ नुसार अशा गुन्हेगाराना वाढीव शिक्षा आहेत उदाहरणार्थ

* विनातिकीट प्रवास दड ५० रु न दिल्यास एक महिन्यापर्यंत कारावास
* तिकिटाचे हस्तातर दंड ५०० रु ३ महिने कारावास अथवा दोन्ही
* उचित पास किंवा तिकिटाशिवाय प्रवास करून केलेली फसवणूक दड १००० रु ६ महिने कारावास किंवा दोन्ही.
* तिकिटाची अनधिकृत खरेदी व विक्री दंड १०,००० रु ३ वर्षे कारावास अथवा दोन्ही

* विनाकारण चेन खेचणे दंड १००० रु १ वर्षे कारावास किंवा दोन्ही

भिक्षा मागणे, अनधिकृत फेरीवाल्याचा व्यवसाय करणे यानाही नवीन कायद्यानुसार २००० रु दड, १ वर्ष कारावास किंवा दोन्ही एवढी शिक्षा आहे रेल्वेतील खाद्यपदार्थ फक्त अधिकृत बिल्ला असलेल्या विक्रेत्याकडूनच घ्यावेत कारण या पदार्थांची, त्याच्या गुणवत्तेची रेल्वेकडून तपासणी करण्यात येत असते आज-काल कुठल्या आकस्मिक आपत्तींमुळे रेल्वे किती काळ मध्येच थाबवली जाईल याचा अदाज बाधणे अवघड त्यामुळे कितीही जवळचा-लाबचा प्रवास असला तरी थोडे खाद्यपदार्थ आणि पिण्याच पाणी कायम जवळ ठेवण इष्ट

रेल्वेच्या नियमांचे पालन करून हे खातं देत असलेल्या सोई-सुविधाचा अधिकाधिक उपयोग करून घेऊन आपला प्रवास जास्तीत जास्त सुखकर करता येईल.

आपली प्रचड लोकसख्या आणि मर्यादित साधनसामग्री यामुळे अतिगर्दीच्या वेळी या सुविधावर ताण पडल्याने अनेकदा गैरसोय होते मनस्तापही होतो शक्य असणाऱ्यानी सुट्ट्याचे, गर्दीचे दिवस टाळून प्रवास करावा एखाद्या वेळी कटू अनुभव आला तरी पुढच्या वेळी तसा येईलच अस नाही लाबच्या प्रवासाच आगाऊ नियोजन केल तर बऱ्याचदा हा प्रवास आरामदायी होतो हा स्वानुभव आहे आणि कुठल्याही वाईट अनुभवातून काहीतरी चागल शिकायला मिळत ही वृत्ती ठेवली तर कुठलाही प्रवास त्रासदायक वाटणार नाही

* *

बऱ्याच चुका असतात

आपल्या स्टेशनवरून पाठविलेल्या टेलिग्रामला 'हो' किंवा 'नाही' उत्तर पाठवलेच पाहिजे, याचे त्या स्टेशनला कायदेशीर बधन नसल्याने बऱ्याचदा अधातरीच प्रवास करावा लागतो प्रत्येक स्टेशनला अगदी थोडा रिझर्वेशनचा कोटा असल्याने, ग्रुप मोठा असल्यास सर्वांची कन्फर्मेशन मिळण अवघड होत कित्येकदा आर.ए.सी मिळत आर.ए.सी म्हणजे निदान बसायला जागा मिळायची शाश्वती. जसजसे बर्थ खाली होत जातील तसतसे दिले जातात हा आर.ए.सी कोटा वातानुकूलित डब्याना ८, पहिल्या वर्गाला ६ आणि थ्री टायरला १८ असतो

जी शहरे संगणकाद्वारे एकमेकाना जोडलेली आहेत त्याच कन्फर्मेशन लवकर येत पूर्वी कलकत्याहून कन्फर्मेशन आल तर फार नशीबवान म्हणायला लागायच सध्या पुण्याला कलकत्याहून साधारणत. तीन दिवसात कन्फर्मेशन येत रेल्वेच जसजस सगणीकरण होत जाईल तसतस रिझर्वेशनच कन्फर्मेशन येण्याचा प्रश्न कमी होत जाईल, अस वाटत

आपल्या हातात नुसतच रिझर्वेशन असेल आणि कन्फर्मेशन नसेल तर त्याचा काहीही उपयोग नाही पहिल्या वर्गात तर रात्री ९ नतर अशा लोकाना नुसतं डब्यात शिरायलाही परवानगी नाही आधी तसचं घुसल्यास रात्री ९ नंतर ( सकाळी ६ पर्यंत ) वाटेतील कुठल्याही स्टेशनवर तुम्हाला ते खाली उतरवू शकतात

गाडीला तुफान गर्दी असली, त्यातून आपल्याकडे आरक्षित तिकीट असल की आपल्याला वाटत एवढे लोक उभे असताना एखादी जास्तीची बोगी का लावत नाहीत ? रेल्वेला लाख वाटेल की जादा बोगी लावावी, परतु त्याच्याकडे बोगीज् कमीच त्याचीच मुळात वानवा कधी जादा गाडी सोडली तर या गाडीचे, त्या गाडीचे डबे काढून अनेकदा गाडी जोडली जाते आणि नेहमीच्या प्रवासी गाडीला जास्तीत जास्त १८ डब्याच बधन असत

गर्दीच्या वेळी दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास करण्याचा मोह होण अशक्य नाही परतु रेल्वे तिकीट हस्तातरीत करण हा कायद्याने गुन्हा आहे आणि १ सप्टेंबर १९९० पासून अमलात आलेल्या इडियन रेल्वे कायदा १९८९ नुसार अशा गुन्हेगाराना वाढीव शिक्षा आहेत उदाहरणार्थ

* विनातिकीट प्रवास दड ५० रु न दिल्यास एक महिन्यापर्यंत कारावास
* तिकिटाचे हस्तातर दड ५०० रु ३ महिने कारावास अथवा दोन्ही
* उचित पास किंवा तिकिटाशिवाय प्रवास करून केलेली फसवणूक दड १००० रु ६ महिने कारावास किंवा दोन्ही
* तिकिटाची अनधिकृत खरेदी व विक्री दंड १०,००० रु ३ वर्षे कारावास अथवा दोन्ही

* विनाकारण चेन खेचणे : दंड १००० रु. १ वर्ष कारावास किंवा दोन्ही

भिक्षा मागणे, अनधिकृत फेरीवाल्याचा व्यवसाय करणे यानाही नवीन कायद्यानुसार २००० रु दड, १ वर्ष कारावास किंवा दोन्ही एवढी शिक्षा आहे रेल्वेतील खाद्यपदार्थ फक्त अधिकृत बिल्ला असलेल्या विक्रेत्याकडूनच घ्यावेत कारण या पदार्थांची, त्याच्या गुणवत्तेची रेल्वेकडून तपासणी करण्यात येत असते आज-काल कुठल्या आकस्मिक आपत्तींमुळे रेल्वे किती काळ मध्येच थाबवली जाईल याचा अदाज बाधणे अवघड. त्यामुळे कितीही जवळचा-लाबचा प्रवास असला तरी थोडे खाद्यपदार्थ आणि पिण्याच पाणी कायम जवळ ठेवण इष्ट

रेल्वेच्या नियमाचे पालन करून हे खात देत असलेल्या सोई-सुविधाचा अधिकाधिक उपयोग करून घेऊन आपला प्रवास जास्तीत जास्त सुखकर करता येईल

आपली प्रचड लोकसख्या आणि मर्यादित साधनसामग्री यामुळे अतिगर्दीच्या वेळी या सुविधावर ताण पडल्याने अनेकदा गैरसोय होते मनस्तापही होतो शक्य असणाऱ्यानी सुट्ट्याचे, गर्दीचे दिवस टाळून प्रवास करावा एखाद्या वेळी कटू अनुभव आला तरी पुढच्या वेळी तसा येईलच अस नाही लांबच्या प्रवासाच आगाऊ नियोजन केल तर बऱ्याचदा हा प्रवास आरामदायी होतो हा स्वानुभव आहे आणि कुठल्याही वाईट अनुभवातून काहीतरी चागल शिकायला मिळत ही वृत्ती ठेवली तर कुठलाही प्रवास त्रासदायक वाटणार नाही

* *

# काही सहली......
# ......काही आराखडे




# बंगलोर– म्हैसूर– उटी

प्रवासाचा आराखडा कसा असावा आणि तो कसा आखावा यासबधी थोड सागायच तर ज्याना ‘एल्.टी सी सारखी फक्त सरकारी वाहनानीच प्रवास करायला पाहिजे अशी सक्ती असलेली सुविधा घ्यायची नसेल, त्यांनी बंगलोर/ मद्रास/ अहमदाबाद/ दिल्ली आणि परत एवढेच फक्त रेल्वेचे आरक्षण करून बाकी पुढचा प्रवास बस/ टॅक्सीने केल्यास ऐनवेळी प्रवासमार्गात काही यथोचित बदल करण शक्य होईल कर्नाटक, तामिळनाडू, राजस्थान, हिमाचल प्रदेश, इत्यादी राज्यातून सुलभ बससेवा उपलब्ध आहे मात्र ग्रुप लहान असेल तरच असा प्रवास सोईस्कर ठरेल मोठ्या ग्रुपने प्रवास-निवासाच्या सपूर्ण आगाऊ आरक्षणाशिवाय सहलीला जाण्यात काही मजा, अर्थ नाही

लाबच्या प्रवासासाठी नव्यानेच घराबाहेर पडू इच्छिणाऱ्या कोणत्याही वयोगटाच्या लोकाना तशी वर्षभर सहजतेने करता येण्याजोगी सहल म्हणजे बगलोर- म्हैसूर- उटी या आठवडाभराच्या सहलीचा आराखडा कसा आखता येईल ते आपण आता पाहू

**दिवस १** ६५२९ उद्यान एक्सप्रेसने (मुबई स ७.५५, पुणे दु १२) बगलोरकडे प्रयाण उद्यानशिवाय २१०३ कुर्ला- बगलोर (कुर्ला रात्री १० २० पुणे मध्यरात्री २ १५) ही बगलोरला दुसरे दिवशी रात्री ९ ३० ला पोचत असल्याने विशेष सोईस्कर न वाटणारी गाडी किंवा बस घेता येईल

**दिवस २** बंगलोरला आगमन (स ८ १०) थेट किंवा अर्धा दिवस बगलोर पाहून रस्त्याने म्हैसूरला (१३८ कि मी ) प्रयाण मुक्काम म्हैसूर.

**दिवस ३ :** म्हैसूर स्थानिक स्थलदर्शन (राजवाडे, चामुडी टेकडी, श्रीरगपट्टणम्, इत्यादी सायकाळी वृदावन गार्डन )

**दिवस ४ :** जैन धर्मियाचे पवित्र स्थान श्रवणबेळगोळा, टेकडीवरील गोमतेश्वर (८० कि मी. ), अप्रतिम कोरीव कारागिरीची बेलूर (१५५ कि मी ) आणि हळेबीड (बेलूरपासून १६ कि मी ) येथील वास्तुशिल्प मदिरे कडक्टेड टूरबरोबर.

**दिवस ५ :** पहाटे उटकमडकडे प्रयाण (१६० कि मी ), वाटेत जाता/येताना बदिपूर/

मदुमलई अभयारण्ये वेळ असल्यास उटीला मुक्काम

**दिवस ६ :** सकाळी लवकर बगलोरकडे प्रयाण बगलोर स्थानिक स्थळदर्शन ( विधानसभा, कव्बन पार्क, लालबाग, बुलटेंपल, विश्वेश्वरय्या औद्योगिक संग्रहालय इत्यादी ) रात्री ८ ३० च्या ६५२० उद्यान एक्सप्रेसने पुणे/मुबईला प्रयाण ( २१०४ बंगलोर-कुर्ला रात्री ९ वा )

**दिवस ७ :** 'उद्यान 'ने आगमन पुणे ( दु ४ वा ) मुबई ( रा ८ ३० वा )

वरील आराखड्यानुसार फक्त बगलोरपर्यंतची जाण्या-येण्याची रिझर्वेशन्स करायची आणि उरलेला प्रवास आराखडा मोकळा ठेवून तो कडक्टेड टूर ( बस ) अगर टॅक्सीने करायचा टॅक्सीचा सध्याचा दर सर्वसाधारणपणे ३ ५० - ४ रु प्रतिकिलोमीटर आहे या भागात असलेल्या डिझेल टॅक्सी जास्त स्वस्तात मिळू शकतात या सहलीत अजून एखादा दिवस असल्यास म्हैसूरपासून १२० कि मी वरील मडिकेरी या कर्नाटकातील सर्वात सुदर, निसर्गसपन्न कूर्ग जिल्ह्याच्यचा मुख्य ठिकाणी जाऊन येता येईल

समजा 'उद्यान' किंवा कुर्ला-बगलोरची पक्की आरक्षण मिळालीच नाहीत तर काय करायचं ? इतक्या लांब ताटकळत बसने जायच ? आणि बस लागत असेल, बस प्रवास झेपत नसेल तर काय करायच ? सहलच रद्द करायची ? नाही, अजिबात नाही याला पर्याय म्हणजे सध्या आठवड्यातून तीनदा ( मगळ, गुरु , रवि ) धावणारी २१३५ नेत्रावती एक्सप्रेस ( मुबई रा ८ १५ ) किंवा आठवड्यातून दोनदा ( सोम , शनि ) असणारी ६६५७ दादर- कोचीन / मगलोर एक्सप्रेस ( दादर साय ७ १५ ) यापैकी एका गाडीची आरक्षण करायची पुण्यात मध्यरात्री येणाऱ्या वरीलपैकी एका गाडीने निघून बगलोरपासून सुमारे ११ कि मी वर असलेल्या कृष्णराजपुरम् स्टेशनवर उतरायच. या दोन्ही गाड्या सायकाळी ६ १५ वाजता कृष्णराजपुरम्ला पोहोचतात तेथून लगेच बगलोरची पॅसेंजरही मिळू शकते ( एल् टी सी घेणाऱ्यासाठी ) पण ती सुमारे पाऊणतास घेते त्यापेक्षा रिक्षा/ टॅक्सीने हे अतर झटपट कापता येते 'उद्यान' सोडून इतर गाड्यानी जाणाऱ्याना बगलोरला एक दिवस मुक्काम आवश्यक.

उद्यानाच गाव म्हणून नावाजलेल बगलोर शहरच प्रेक्षणीय आहे जास्त वेळ नसल्यास अर्धा दिवस पुरेसा होतो फक्त विश्वेश्वरय्या औद्योगिक सग्रहालयाला थोडा अधिक वेळ ठेवावा ( दर सोमवारी बद )

बगलोर- म्हैसूरच्या दरम्यान दर १५ मिनिटानी बसेस असून त्या बगलोर सेंट्रल स्टेशनसमोरील मध्यवर्ती बस स्थानकावरून सुटतात दिवसा-उजेडी गेल्यास वाटेतील मनोरम निसर्गाचा आस्वाद घेता येईल

म्हैसूरला पोचल्यानतरच्या दिवशी स्थानिक स्थलदर्शनाची सहल घेतल्यास लाबच्या प्रवासाचा शीणवटा जाणवणार नाही हाती थोडे मर्यादित दिवस असल्यास कडक्टेड टूर

घेणं किंवा टॅक्सीने प्रेक्षणीय स्थळं पाहाणं चांगलं दोन चौकोनी कुटुंब एकत्र सहल करत असतील तर कंडक्टेड टूरचा दर ( २-५ वर्षांच्या मुलांना पूर्ण आकार पडतो ) आणि संपूर्ण टॅक्सीचं भाडं जवळजवळ सारखंच पडतं बरोबर लहान मुलं किंवा छायाचित्रणाचा छंद असणाऱ्यांनी थोडा महाग पडला तरी स्वतंत्र वाहनाने प्रवास करण्यासारखं सुख नाही शेवटच्या दिवशी हॉटेल सोडून, सर्व सामान टॅक्सीत ठेवून, थेट स्टेशनवर सोडायला सांगितलं तर एखाद्या दिवसाच्या निवासाचा खर्च वाचवणं शक्य व्हावं !

बंगलोर- म्हैसूरच्या बहुतेक सर्व हॉटेल्समधून प्रेक्षणीय स्थलदर्शनाच्या कोणत्या ना कोणत्या प्रवासी कंपनीबरोबर आरक्षण केलं जातं कर्नाटक राज्य पर्यटन महामंडळातर्फेही हा व्यवसाय सुसूत्रतेने चालवला जातो

उटीच्या कंडक्टेड टूरमध्ये बंदिपूर अभयारण्याचा समावेश असतो पण दाखवणं म्हणजे फक्त बाहेरूनच कारण उटीचा रस्ताच मुळी कर्नाटकातील बंदिपूर आणि त्याला लागून असलेल्या तमिळनाडूतील मदुमलई अभयारण्यातून जातो तेथे जीपने अगर हत्तीवरून फेरफटका मारायचा असेल तर टॅक्सीने गेलेलं चांगलं या दोन्ही अभयारण्यात मुक्काम करण्याचीही सुविधा आहे मात्र त्यासाठी आगाऊ आरक्षण आवश्यक मदुमलईचं आरक्षण उटीला होतं बंदिपूरसाठी संपर्क दि असिस्टंट कॉन्झर्वेटर ऑफ वाईल्ड लाईफ, डिस्ट्रिक्ट ऑफीसर, देवाण रोड, म्हैसूर.

उटीच्या स्थानिक स्थलदर्शनात बोटॅनिकल गार्डन, लेक इत्यादींबरोबर निलगिरीतील सर्वोच्च शिखर दोडाबेट्टा ( २६३३ मी ) आवर्जून बघण्याजोगे

कर्नाटक स्टेट टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ( के एस् टी डी सी ) अनेक कंडक्टेड टूरसचे आयोजन करते त्यांच्यातर्फे लहान-मोठे कोचेस्, टॅक्सीज्ही भाड्याने मिळतात यासाठी रोजचा कमीत कमी २५० कि मी प्रवास होणं आवश्यक असतं खर्चाच्या २५% रक्कम बुकिंगचे वेळी आणि संपूर्ण रक्कम सहलीआधी एक दिवस भरावी लागते के एस टी डी सी. च्या मयुरा ग्रुप ऑफ हॉटेल्समध्ये किफायतशीर दरात राहता येते बुकिंग आणि अधिक माहितीसाठी के एस् टी डी सी हेड ऑफिस, १०/४ कस्तुरबा रोड, बंगलोर ५६० ००१ यांच्याशी संपर्क साधावा बंगलोर विमानतळ आणि बंगलोर तसेच म्हैसूर सिटी रेल्वे स्टेशन्सवरील के एस् टी डी सी च्या इन्फर्मेशन काऊंटर्सवरही सहलीसंबंधीची माहिती मिळू शकते

सहलीचा काळ वर्षभर म्हटला तरी चालेल

खरेदी सिल्क साड्या, कृत्रिम खड्यांचे दागिने, चंदनी व हस्तीदंती वस्तू.

विशेष सूचना खरेदी शक्यतो म्हैसूरमध्ये करावी वृंदावन बागेत स्वत चे वाहन असल्यास दुपारी चारपर्यंत पोहोचता येईल या बेताने गेल्यास आणि दिवेलागण होताच रोषणाई पाहून

परत फिरल्यास नेहमी होणाऱ्या ट्रॅफीक जाममध्ये अडकून पडाव लागणार नाही

बगलोर- म्हैसूर- उटी या एका आठवड्याच्या सहलीला किती खर्च येईल ते कुठल्या मार्गाने कोणत्या वर्गाने प्रवास करणार; कुठल्या प्रतिच्या हॉटेलमध्ये किती दिवस राहणार, काय खाणार-पिणार; कितपत खरेदी करणार यावर अवलबून राहिल

* *




# अठरा दिवसात दक्षिण सफर

सपूर्ण दक्षिण भारताची सहल करावयाची झाल्यास खालीलप्रमाणे स्थूलमानाने आराखडा आखता यइल

**दिवस १ :** ६५११ दादर मद्रास एक्सप्रेसने प्रयाण दादर ( दु. २ २५/पुणे साय ६ २० )

**दिवस २ :** दु १-४५ रेणीगुठा तिरुमल्ला बालाजी दर्शन व परत (रेणीगुंठ्याहून टेकडीवरील तिरुमल्ला देवस्थानापर्यंत दर अर्ध्या तासाने थेट बसेस तिरुपती या पायथ्याच्या गावापासून तिरुमल्लाला दर ५-१० मिनिटानी बसेस तिरुमल्लाहून तिरुपतीला परतण्यासाठी शेवटची बस रात्री ११ ३० वाजता (तिरुपती-रेणीगुठा - रिक्षा/टॅक्सी) रात्री २.३० च्या ७००१ मुबई मद्रास मेलने मद्रासकडे ( तिरुपतीला मुक्काम करायचा असल्यास दुसऱ्या दिवशी दुपारी १ ४५ च्या दादर-मद्रासने दु. ४.४० वा मद्रास )

**दिवस ३ :** पहाटे ५.४५ मद्रास सेंट्रल दुपारी अर्धा दिवस मद्रास स्थानिक स्थलदर्शन ( मरिना बीच, फोर्ट सेंट जॉर्ज, वालुवर कोट्टम्, स्नेक पार्क, कपालेश्वर मदिर, गव्हर्नमेंट म्युझियम- शुक्रवारी बंद )

**दिवस ४ :** महाबलीपुरम्, काचीपुरम्, थिरुकालीकुंदरम् ( पक्षितीर्थम् ) कडक्टेड टूर ( रेल्वेने पॉडिचेरीस जावयाचे झाल्यास लाबची सहल आधी घ्यावी रात्री ८ ४५ च्या ६१०१ मद्रास-रामेश्वर एक्स्प्रेसला पाँडिचेरी बोगी विल्लुपुरमला हा डबा पाँडिचेरीच्या गाडीला जोडला जाऊन स ६ १० वा पोहोचतो. रेल्वेप्रवास वेळखाऊ )

**दिवस ५ :** सकाळच्या बसने ( टी.पी टी.सी स्टँडपासून खासगी बसेस सकाळी ६ पासून ३ तास ) पाडचेरी स्थानक स्थलदर्शन, आतरराष्ट्रीय मुक्त गाव 'आरुव्हिलो' सकट

रात्री ९ च्या ६३४ पॅसेंजरने रात्री १० वा मद्रास-रामेश्वर एक्सप्रेसने प्रयाण ( थेट रामेश्वरला जायचे असल्यास दुसरे दिवशी दुपारी १ ३० वा रामेश्वर )

**दिवस ६ •** पहाटे ४ २५ तजावर. दुपारी १२ पर्यंत स्थानिक स्थलदर्शन करून बसने तासाभराच्या अतरावरील त्रिचनापल्लीला त्रिचि स्थानिक स्थलदर्शन आणि रात्री १ च्या ६११३ मद्रास-रामेश्वर सेतू एक्सप्रेसने रामेश्वरकडे.

**दिवस ७** सकाळी ७.१५ रामेश्वरम् स्थानिक स्थलदर्शन धनुष्यकोडीला ( १९ कि मी ) जावयाचे झाल्यास रामेश्वरच्या मुख्य मदिरापासून बसेस रात्री १० च्या ७७० रामेश्वर-मदुराई पॅसेंजरने मदुराईकडे.

**दिवस ८ :** पहाटे ४ ३५ मदुराई. मीनाक्षी मदिर दर्शन बसने १२० कि मी वरील कोडाईकॅनाल वेळ व पैसा असल्यास मुक्काम किंवा परत मदुराई ( मेटॅडोरने कोडाई स्थानिक स्थलदर्शन तामिळनाडू टूरिझमची मदुराईहून कोडाईची कडक्टेड टूर स ७ ते साय ७) कोडाईकॅनालहून पेरियार लेक. अभयारण्य करून कन्याकुमारीकडे किंवा मदुराईहून रात्रीच्या बसने कन्याकुमारी (रेल्वेने जायचे झाल्यास पहाटे ४ ४५ च्या ६११९ नेलाई एक्सप्रेसने सकाळी ८ ५० ला तिरुनेलवेल्ली तेथून सकाळी ९ ४० ची ३८४ तिरुनेलवेल्ली-कन्याकुमारी पॅसेंजर दुपारी १२ १५ ला कन्याकुमारी )

**दिवस ९ :** कन्याकुमारीच्या अलीकडे ४ कि मी वरील विवेकानदपुरमूला उतरणे विवेकानद शिलास्मारक (स ७ ते ११, दु. २ ते ५) / कन्याकुमारीला जाण्यासाठी आश्रमातर्फे बससेवा कन्याकुमारी मदिर दुपारी बद लाईट हाऊस साय ५ ला बद सूर्यास्त पाहून मुक्काम विवेकानदपुरम्

**दिवस १० :** पहाटे सूर्योदय पाहून रस्त्याने सुमारे २॥ ते ३ तासावरील त्रिवेंद्रमकडे किंवा पहाटे ५.१५ च्या १०८२ कन्याकुमारी एक्सप्रेसने सकाळी ७.३० ला त्रिवेंद्रम कोवालम बीचसह स्थानिक स्थलदर्शन. मुक्काम त्रिवेंद्रम (म्हैसूर-बगलोरची सहल आधी केली असल्यास कोचीन अल्लेपी करता येईल किंवा )

**दिवस ११ :** सकाळी ७ ३० च्या १०८२ च्या कन्याकुमारी एक्सप्रेसने पुणे-मुबईकडे

**दिवस १२** रात्री १२ ३८ पुणे

**दिवस १३ :** पहाटे ५ ०५ मुबई

**किंवा**

**दिवस ११** केरळचे सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठी दिवसाची गाडी घेण योग्य सकाळी ९ ४० च्या २६२५ केरळ एक्सप्रेसने कोईम्बतूरकडे. साय ५ १५ ला कोईम्बतूर. रेल्वे स्टेशनपासून उटीचा बसचा स्टँड सुमारे ४ कि मी वर उटीची शेवटची बस रात्री ८ वा रेल्वे उशिरा पोहोचल्यास कोईम्बतूरला मुक्काम

**दिवस १२ :** छोट्या रेल्वेने उटीला जायचे झाल्यास कोईम्बतूरजवळील ( सुमारे ३५ कि मी ) मेटापल्यमूला जावे लागते

( कोईम्बतूरहून सकाळी ५.५५ ला ६००५ मद्रास-मेटापल्यम् रेल्वे ती सकाळी ७ २० ला पोहोचते सकाळी ७.४५ ला ५६४ मेटापल्यम्-उदग्मगलम् म्हणजे उटकमड मिनी ट्रेन असून ती सकाळी ९ ३० वा उटीला पोहोचते सीझनमध्ये मेटापल्यमूहून सकाळी ९ ३० ला ५६४ मेटापल्यमू-उदग्मगलम् जादा गाडी सोडण्यात येते ) उटी स्थानिक स्थलदर्शन ( दोडाबेट्टा या निलगिरीतील सर्वोच्च शिखरासह ) मुक्काम उटी

**दिवस १३ :** बसने म्हैसूरकडे टॅक्सीने गेल्यास वाटेत बंदिपूर/मदुमलई अभयारण्य मुक्काम म्हैसूर

**दिवस १४ :** म्हैसूर स्थानिक स्थलदर्शन

**दिवस १५ :** म्हैसूरहून श्रवण बेळगोळा, बेलूर, हलेबिड कडक्टेड टूर

**दिवस १६ :** बस अगर टॅक्सीने १२० कि मी वरील अत्यत निसर्गसुदर 'मेडिकरी' व परत म्हैसूर.

**दिवस १७ :** सकाळी लवकर बगलोरकडे प्रयाण स्थानिक स्थलदर्शन वेळ असल्यास मुक्काम किंवा रात्री ८ ३० च्या ६५३० उद्यान एक्सप्रेसने पुणे-मुबईकडे. [ २१०४ बगलोर-कुर्ला सकाळी ९ ०५ वा आगमन दुसरे दिवशी ( पुणे रात्री ३ ४०, मुबई सकाळी ७.३० ) ]

**दिवस १८ :** पुणे ( दु. ४ ) / मुबई ( रात्री ८ २५ ) आगमन

दक्षिण भारताच्या एवढ्या मोठ्या सहलीचा आराखडा वाचून कोणाला वाटेल काहीतरीच सागतीय ही बाई इतक्या वेगाने प्रवास म्हणजे एखाद्याला जर जास्त धावपळ वाटली तर वाटेत आणखी मुक्काम करता येतील परतु थोड्याफार फरकाने वरील आराखड्यानुसार दक्षिण भारताची सहल केल्यास, रेल्वेची रिझर्वेशन्स हाती असतील तर अजिबात दगदग होत नाही अस मला स्वत च्या आणि इतर अनेकाच्या अनुभवावरून वाटत

* *




# हैद्राबादसह भुवनेश्वर, कोनार्क, पुरी

उत्कृष्ट कलागुणाच्या जिवंत अविष्कारानी आकर्षक झालेलं राज्य म्हणजे ओरिसा. कलिंगधर्तीच्या शिल्पाच्या अगणित नमुन्यांच वेधक दर्शन घडवणारा हा प्रदेश कोणार्कच सूर्यमंदिर हा त्यातील मेरूमणी भुवनेश्वर ही ओरिसाची राजधानी आंध्र प्रदेशातील हैदराबाद ( नागार्जुनसागर, श्रीशैलम् ) सह भुवनेश्वर-कोणार्क-पुरीची सहल करून परतता येईल किंवा पुढे एका रात्रीच्या रेल्वे प्रवासावर असलेल्या कलकत्याला जाऊन दार्जिलिंगही करता येईल

हैदराबाद परिसर अगोदरच बघून झाला असेल तर मुक्काम न करता रात्रीच्या २१०१ मिनार एक्सप्रेसने (मुबई २१ ५५, पुणे १ ४७) थेट भुवनेश्वर गाठता येईल मिनार सिकंदराबादला दुसऱ्या दिवशी १२ १५ ला येते आणि सिकंदराबादच्या पुढे ती २११० कोणार्क एक्सप्रेस होऊन भुवनेश्वरला दुसऱ्या दिवशी म्हणजे निघाल्यापासून तिसऱ्या दिवशी ९ १० ला पोहोचते

या सहलीचा आराखडा असा आखता येईल

**दिवस १ :** ७०३१ बॉम्बे-हैदराबाद एक्सप्रेसने ( मुबई १२ ३५, पुणे १७ १५ ) प्रयाण

**दिवस २ :** सकाळी ६ ३० वा. हैदराबादला आगमन ( हैदराबाद, सिकंदराबाद वेगळ्या दिशाना १० कि मी वर ) स्थानिक स्थलदर्शन *

**दिवस ३, ४ :** नागार्जुनसागर ( १५० कि मी रोज सहल ) श्रीशैलम् ( २२० कि.मी आंध्र प्रदेश टूरिझम डिपार्टमेंटतर्फे दर शनिवारी सहलीच आयोजन )

**दिवस ५ :** हैदराबाद स्थानिक स्थलदर्शन *

**दिवस ६ .** २१२० कोणार्क एक्सप्रेस (१२ ४० सिकंदराबाद) किंवा ८०४६ ईस्ट कोस्ट एक्सप्रेस ( हैदराबाद ७.००, सिकंदराबाद ७ ३० ) ने भुवनेश्वरकडे

**दिवस ७ :** ९ १० ( कोणार्क एक्सप्रेस ) वा भुवनेश्वरला आगमन स्थानिक स्थलदर्शन ** दुपारी चिल्का सरोवर ( ११० कि मी ) मुक्काम

**दिवस ८ :** भुवनेश्वरहून कोणार्क, पुरी करून परत भुवनेश्वरला किंवा पुरीला मुक्काम

**दिवस ९ :** स्थानिक स्थलदर्शन ८००८ हावरा एक्सप्रेस (पुरी १८ ००, भुवनेश्वर

२० १० ) किंवा ८४१० श्रीजगन्नाथ एक्सप्रेस (पुरी २०.४५, भुवनेश्वर २२ ३० ) ने कलकत्याकडे प्रयाण अथवा

**दिवस ९ :** १८ ४५ च्या २१११९ कोणार्क एक्सप्रेसन भुवनेश्वरहून पुणे/मुबईला परत

* हैदराबाद स्थलदर्शन सालारजग म्युझियम ( शुक्रवारखेरीज १० ते ५ ), गोवळकोंडा किल्ला, चारमिनार, जामा मशिद, बिर्ला मदिर, नेहरू झुलॉजिकल पार्क ( ७ कि मी सोमवार सोडून ९ ते ६ ) हिमायतसागर व उस्मानसागर लेकस् ( २० कि मी )

टॅक्सी/कोचेस, सहल/निवासासाठी सपर्क

१] आध्र प्रदेश टूरिझम, फर्स्ट फ्लोअर, गगन विहार, एम. जे रोड, हैदराबाद ५०० ००१

२] आध्र प्रदेश ट्रॅव्हल अँड टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, यात्री निवास कॉम्प्लेक्स, एस् पी रोड, सिकदराबाद ५०० ००३

खरेदी पटोला, पोचपल्ली, टचोई सिल्क साड्या, वेलवेटच कापड, बिद्रीकामाची पितळी भाडी, चारमिनारजवळील बाजारात लाख/खड्याच्या बागड्या, कृत्रिम खड्याचे दागिने

** भुवनेश्वर स्थलदर्शन लहान मोठी पाचशेच्यावर देवालये, ४५ मीटर उचीचे लिगराज मदिर सर्वात मोठे, धौली येथील बौद्ध स्तूप ( ८ कि मी ), उदयगिरी, खडगिरी या जुळ्या टेकड्यावरील बौद्ध गुफा ( ७ कि मी ), नदनकाननपार्क ( १२ कि मी ), म्युझियम, हँडीक्राफ्ट एम्पोरियम, भुवनेश्वरला राहून कोणार्क, पुरी तसच हिवाळ्यात स्थलातरित पक्षी येणारे चिल्का लेक करता येईल किंवा वरीलपैकी कुठेही मुक्काम करता येईल ओरिसा पर्यटन महामडळाची 'पथनिवास' राज्यात सर्वत्र आहेत सपर्क ओरिसा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि , ९, सत्यनगर, भुवनेश्वर ७५१ ००७

भुवनेश्वरपासून ६० कि मी. वर जगन्नाथपुरी आणि ६५ कि मी वर कोणार्क त्रिकोणात येतात (पुरी-कोणार्क ८५ कि मी. ) पुरीला ओ टी डी सी च्या चदेरी समुद्रकिनाऱ्यावरील किफायतशीर दरातील निवासस्थानाखेरीज अनेक कमखर्चिक निवासाच्या सोईही आहेत चौकशी ओरिसा सरकारचे पर्यटन कार्यालय, स्टेशन रोड किंवा रेल्वे स्टेशनवरील टूरिस्ट काउटर.

कोणार्कचे सूर्यमदिर फक्त सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंतच उघडे असते काही कारणानी कोणार्कला पोचायला उशीर झाला तर तेथील सग्रहालय, नवग्रह मदिर, इत्यादी पाहण्याआधी सूर्यमदिरात जावे नाहीतर हे अप्रतिम शिल्प फ्लडलाईटस्‌मध्ये दुरून पाहण्यावर समाधान मानाव लागेल तसच सूर्यमदिर बघताना गाईड हा घ्यावाच, तरच त्याच सौंदर्य अधिक भावेल

खरेदी . चांदीच्या नाजूक कोरीव कामाच्या वस्तू, पट्टचित्रे, पिपली येथील कलाकुसरीच्या वस्तू, मोगा सिल्क साड्या, इत्यादी.




# कलकत्ता, दार्जिलिंग, सिक्किम, नेपाळसह –

उत्तुग काचनगगेच्या कुशीत विराजमान झालेलं दार्जिलिग म्हणजे हिलस्टेशन्सची जणू सम्राज्ञीच  दार्जिलिगला जाण्यासाठी जाव लागेल प्रथम कलकत्त्याला  तेथे जाताना वाटेत हैदराबाद, भुवनेश्वर, कोणार्क, पुरी करता येईल  ही ठिकाण समजा आधीच बघून झाली असतील तर थेट कलकत्ता गाठण सोयीच  गीताजली ही कलकत्त्यासाठीची सर्वांत जलद गाडी  कलकत्ताही आधी पाहिल असल्यास ५६४५ दादर-गुवाहाटीन ( दर शनि  बुध ) थेट सिलीगुरीपर्यंत जाता येईल  कलकत्त्यावरून दार्जिलिग-गगटोक ( सिक्कीम ) नेपाळच्या प्रवास आराखड्याबाबत आता पाहू.

**दिवस १ :** २८५९ गीतांजलीने मुबई व्ही  टी  ( ६.०५ )हून प्रयाण.

**दिवस २ ·** १४ ३० कलकत्त्याला ( हावरा ) आगमन

**दिवस ३ :** कलकत्ता स्थानिक स्थलदर्शन ( बेलूर मठ, दक्षिणेश्वर मदिर, जैन मदिर, म्युझियम, जवाहरलाल शिशू भवन, व्हिक्टोरिया मेमोरिअल, प्राणीसग्रहालय, रवींद्र सरोवर- आय टी डी सी  कंडक्टेड टूर सोमवार सोडून ८ ते ५. )

**दिवस ४ ·** १७.३५ च्या ५६५९ कामरूप एक्सप्रेसने दार्जिलिगकडे ( सिआल्डाहून १९ ०० ची ३१४३ दार्जिलिग मेल किंवा ६.०० ची २५५७ हावऱ्याहून काचनगगा एक्सप्रेस या पर्यायी गाड्या )

**दिवस ५ :** न्यु जलपैगुरीला उतरणे ७.०५ ( ५६५९ कामरूप ), ८ ३० ( ३१४३ दार्जिलिग मेल ), १६ ४५ ( २५५७ काचनगगा एक्सप्रेस )

न्यू जलपैगुरीहून टॉय ट्रेन  ७ १५ 3D (NG) किंवा ९ ०० 1D (NG) ने १५.३० किंवा १७ ३० दार्जिलिंग  रस्त्याने जायचे झाल्यास  न्यूजलपैगुरी ते सिलीगुरी सायकल रिक्षा अगर टॅक्सीने  सिलीगुरीहून बस किंवा मिनी बस अगर टॅक्सीने ( रस्त्याने सुमारे तीन तास )

**दिवस ६ व ७ :** दार्जिलिंग स्थलदर्शन ( टायगरहिल, बटासिया रेल्वे लूप, घुम बौद्ध मठ, हिमालयन माऊटेनिअरिंग इन्स्टिट्यूट, पद्मजा नायडू हिमालयन झुलॉजिकल पार्क,

नॅचरल हिस्टरी म्युझियम, लॉईड्स बोटॅनिकल गार्डन, ऑब्झर्व्हेटरी हिल, हॅपी व्हॅली टी इस्टेट, रगीत व्हॅली रोपवे, तिबेटीयन रेफ्युजी सेंटर, इत्यादी )

**दिवस ८ :** कॅलिपाँग ( आकर्षक थंड हवेचे ठिकाण ) मुक्काम

**दिवस ९ ·** सिक्कीमची राजधानी गगटोककडे प्रयाण ( ८० कि मी )

**दिवस १० .** गगटोक स्थानिक स्थलदर्शन (ताशी व्ह्यू पॉईंट, राजवाडा, न्यामगाल इन्स्टिट्यूट ऑफ तिबेटॉलॉजी, हँडीक्राफ्ट इन्स्टिट्यूट, ऑर्कीड सँक्युरी, इ )

**दिवस ११ :** सिलीगुरीकडे ( १२० कि मी ) सिलीगुरीहून बस किंवा रेल्वेने कलकत्याला परत किंवा तेथून बसने काठमाडू

दार्जिलिंगहून काठमाडू ( नेपाळ ) ला जायचे असल्यास

**दिवस ८ :** काठमाडूकडे प्रयाण

**दिवस ९, १० .** स्थलदर्शन ( पशुपतीनाथ मदिर, दरबार चौक, हनुमान ढोका, त्रिभुवन सग्रहालय, स्वयभूनाथ स्तूप, बालाजू वॉटर गार्डन, पाटण व भडगाव किंवा भक्तपूर ही गावे, माऊटन फ्लाईट, इ )

**दिवस ११, १२** पोखरा व्हॅली व परत काठमाडू.

**दिवस १३ :** विमानाने वाराणसी ( ९०० रु + १५० रु एअरपोर्ट टॅक्स ), कलकत्ता ( १४०० रु + १५० रु एअरपोर्ट टॅक्स ), मुबई ( ३८५० रु ), दिल्ली ( १८०० रु ) किंवा रस्त्याने पाटणा किंवा गोरखपूर मार्गे परत

विशेष सूचना ट्रॅफीक जाम विशेषत ऑफीसेस सुटयच्या वेळाना- ही कलकत्याची नित्याचीच बाब ! त्यामुळे हावरा स्टेशनवर गर्दीच्या वेळी पोहचायचे असल्यास २-३ तासांचा जादा वेळ ठेवून निघणे इष्ट कलकत्ता हॅंडलूम साड्या आणि बगाली मिठाईचा आस्वाद घ्यावा

दार्जिलिगच्या टायगर हिल ( ११ कि मी. ) वरून दिसणारा अवर्णनीय सूर्योदय पाहायला पहाटे ३॥लाच निघावे उशीर झाल्यास, गाडी लाब उभी करावी लागली तर जास्त तगडतोड करावी लागते हिमालयातील हवामान सतत बदलत असल्याने हवा स्वच्छ असल्यास गेल्या गेल्या सूर्योदय पाहून घ्यावा नाहीतर तो हुकायची शक्यता असते. दार्जिलिगचा चहा ( पत्ती ) कोणाला भेट देण्यासाठी घेतला तरी त्याचा स्वाद आवडेलच अशी खात्री नाही लोकरीचे स्वेटर्स, शाली, इ ची खरेदी दार्जिलिगला करता येईल.

सिक्कीम प्रसिद्ध आहे ते तेथील वाईन्स, परफ्युम्स आणि कुकरी ( हत्यार ) यासाठी

नेपाळहून तिथे आयात होणारा काहीही माल भारतात आणता येत नाही नेपाळहून बसने परतणाऱ्याना तर कस्टम्स अधिकाऱ्यांकडून बरेचदा फार त्रास दिला जातो यासाठी एकदा विमान प्रवास करावयाचा असल्यास तो येताना करावा. कल्चर्ड मोती, रुद्राक्ष,

रंगीत मणी, याच्या माळा, स्थानिक कलाकुसरीची एखाद-दुसरी वस्तू सोडली तर नेपाळहून इतर काही आणण्याचा हव्यास न धरणंच चांगलं

नेपाळला जाण्यासाठी भारतीयांना एंट्री परमिट लागते या प्रवेश परवान्याचे सर्टिफिकेट पोलिस कमिशनरच्या ऑफीसमध्ये मिळते त्यासाठी कराव्या लागणाऱ्या अर्जाबरोबर रेशनकार्ड, दोन फोटो; कधी, कशासाठी जाणार इ माहिती लागते स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ट्रॅव्हलर्स चेक्सवर हे चेक्स त्या देशात चालत असल्यास खास शिक्का मारून घेणं आवश्यक आहे नेपाळमध्ये हे चेक्स कॅश करताना कमिशनही द्यावं लागतं

* *




# कुमाऊँ प्रदेशाची सफर

उत्तर प्रदेश राज्याला हिमालयाचा फार मोठा भाग लाभला आहे. या राज्यातील कुमाऊँ पर्वत शृंखलात अनेक निसर्गरम्य स्थळं आहेत त्यातील प्रमुख म्हणजे नैनीताल, राणीखेत, अल्मोडा, कौसानी, पिठोरगड इत्यादी या सर्वातील रत्न म्हणजे नैनीताल नावाप्रमाणे 'ताल' म्हणजे शांत! रमणीय नैनी तलावाकाठी, उत्तुंग गिरिशिखराच्या कुशीत, निवांत विराजमान झालेलं हे नितांत सुंदर थंड हवेचं ठिकाण नैनीतालला जाण्यासाठी आग्रा फोर्ट रेल्वे स्टेशनहून रात्री १० वाजता सुटणाऱ्या ५३११ कुमाऊँ एक्सप्रेसने दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता येणाऱ्या काठगोदामाला किंवा त्याआधीच्या हलद्वानी स्टेशनवर उतरावं लागेल या दोन्ही ठिकाणाहून नैनीतालसाठीच्या ( ३५ कि मी. ) उ प्र. परिवहन/ खासगी बसेस सतत सुटत असतात मारुती टॅक्सीही मिळतात दिल्लीहून नैनीतालला ( ३२२ कि मी ) बसने ८-१० तासात पोहोचता येते कुमाऊँ भागात हिंडण्यासाठी दिल्लीहून खासगी मेटॅडोर्सही मिळू शकतात

दिल्ली/आग्रा आधी बघून झालं असल्यास किंवा रेल्वे आरक्षणाच्या दृष्टीने सोयीस्कर म्हणून ते येताना करून आणखी काही भाग बघायचा असल्यास जाताना उत्तर प्रदेशाची राजधानी लखनौ करता येईल मुंबई व्ही टी हून सकाळी ११ २० ला निघणारी १०१५ कुशीनगर एक्सप्रेस ( कल्याण दु. १२.५० ) ही लखनौसाठीची ( दुसऱ्या दिवशी दुपारी

३ २५ ) सोईस्कर गाडी लखनौहून रात्री ९ २५ ला ५३०८ नैनीताल एक्सप्रेस असून ती दुसऱ्या दिवशी सकाळी ८ ३५ ला काठगोदामला पोहोचते.

नैनीतालचे प्रवेशद्वार तालीताल येथे बस/टॅक्सी स्टँड असून तेथेच कुमाऊं मडल विकास निगम ( के.एम व्ही एन. ) चे टूरिस्ट रिसेप्शन सेंटर आहे जवळच त्याच निवासस्थानही आहे

याखेरीज नैनीताल जिल्ह्यातील इतर टूरिस्ट बगले, भीम ताल ( २३ कि मी ) टूरिस्ट बगले, सतताल ( २१ कि मी ) टूरिस्ट बगले, रामनगर, लॉग हट, नैना पीक, नैनीताल याच्या आरक्षणासाठी त्याच्या 'इनचार्जला' लिहाव लागेल के एम व्ही एन च्या निवासस्थानाचे सीझनमधील दर ऑफ-सीझनच्या साधारणत दुप्पट असतात आणि त्याचा सीझन असतो १ मे ते १५ जुलै आणि सप्टेंबर १५ ते नोव्हेंबर १५

नैनीताल भागात सीझन १ मे रोजी सुरू होत असल्याने त्यापूर्वी ३० एप्रिलपर्यंत किंवा दिवाळीच्या सुट्टीत गेल असता अनेक खासगी हॉटेल्सही कमी दरात मिळू शकतात

के एम व्ही एन च्या पर्यटक निवासस्थानाशिवाय नैनीतालमधील सरकारी व इतर काही निवास - सुविधा आणि त्याचे सपर्क पुढीलप्रमाणे

१] नगरपालिका टूरिस्ट होम ( असिस्टट डायरेक्टर, टूरिझम, टूरिस्ट ब्युरो ),

२] यूथ हॉस्टेल ( वॉर्डन यूथ हॉस्टेल ),

३] नैनीताल क्लब ( इस्टेट ऑफिसर, यू. पी सचिवालय, लखनौ मे/जून आणि सप्टे /ऑक्टो मधील आरक्षणासाठी ),

४] पी डब्लू. डी इन्स्पेक्शन हाऊस ( एक्झिक्युटिव्ह इजिनीअर, पी डब्लू. डी., प्रोव्हिन्शियल डिव्हिजन ),

५] आर्य समाज मदिर, ६] गुरुद्वारा,

७] लाला परम शिवलाल साह धर्मशाळा,

८] सेवासमिती धर्मशाळा याखेरीज नैनीतालमध्ये फ्लॅट्स, घरे, बगले उपलब्ध असून त्याची माहिती आणि मार्गदर्शनासाठी सपर्क यू. पी गव्हर्नमेंट टूरिस्ट ब्युरो, दि माल, नैनीताल

रेल्वे, बँका आणि इतर सस्थाची कमी खर्चातील निवासस्थानेही नैनीतालमध्ये असून त्यापैकी काही

१] वाय एम सी ए , दि माल, वाय डब्लू. सी ए. मल्लीताल,

२] रेल्वे हॉलीडे होम, दि माल,

३] स्टेट बँक हॉलीडे होम, बी डी पाडे हॉस्पिटलजवळ, मल्लीताल

४] अलाहाबाद बँक हॉली डे होम, जगती हॉटेल, माल रोड,

५] बँक ऑफ इडिया हॉलीडे होम, हेडिंग्ले कॉटेज, माल,
६] इडियन ऑईल हॉलीडे होम, बी डी. पाडे हॉस्पिटलजवळ,
७] पोस्ट अँड टेलिग्राफ हॉलीडे होम, तल्लीताल याच्या आरक्षण दरासबधी त्याच्या मॅनेजमेंट इनचार्जला किंवा टूरिस्ट ब्युरो, नैनीताल याना लिहावे लागेल

नैनीतालजवळील नैना पीक ( ६ कि मी ), लारिया काता ( ६ कि मी ), तसेच डोरोथी सीट ( ४ कि.मी ), लँडस्एड ( ५ कि मी ) या चढणीच्या उचवट्याच्या स्थळाहून हिमालयाचा आणि नैनीताल परिसराचा विविध कोनातून लावण्यमय देखावा दिसतो मात्र या पॉईंटस्ना जाण्यासाठी वाहन नाही चालत अगर घोड्यावरून जावं लागत नैनीतालमधील निवात जाता येण्यासारखी जागा म्हणजे नैना लेक, तेथील बोटिंग आणि स्नो व्ह्यू पॉइट माल रोडच्या टोकापासून स्नो व्ह्यू पॉईंटला रोप वेमधून विहगम दृश्य बघत आरामात जाता येत या केबल कारची वेळ आहे ९ ३० ते ५ आणि दर प्रत्येकी २५ रुपये या ठिकाणाहून दिसणार हिमशिखराच धवल दृश्य भान हरपवून टाकतं दुपारनतर ढग/धुक असल तर मात्र दुर्दैव

नैनीतालमधील धार्मिक स्थान आणि सूर्यास्त पॉईंट, हनुमान गढी, स्टेट ऑब्झर्व्हेटरी या प्रेक्षणीय स्थळाखेरीज याच्या परिसरात भीम ताल ( २३ कि मी ), नऊ कोनाचा नौकुचिया ताल ( २६ कि मी ), सात ताल ( २१ कि मी ), खुरपा ताल ( १० कि मी ) यासारखे रमणीय तलाव आहेत याशिवाय कुमाऊँ परिसरातील ऑर्किड्ससाठी ख्यातनाम रामगढ ( २६ कि मी ), मनोरम मुक्तेश्वर ( ५२ कि मी ) ही नैनीतालची जवळची इतर काही ठिकाण आहेत

१५ नोव्हेंबर ते १५ जूनपर्यंत उघड असणारा आणि मुख्यत व्याघ्र प्रकल्पासाठी नावाजलेला जिम कॉर्बेट पार्क नैनीतालपासून ११५ कि मी वर आहे ५२५ चौ कि मी मध्ये पसरलेल्या या अभयारण्याची सहल नैनीतालहून एक दिवसात करता येण शक्य असल तरी एवढ्या थोड्या वेळात आणि तेही दिवसा हत्ती, वाघ, चित्यासारखी मोठी जनावर दिसायला नशीब फारच बलवत्तर हव वन्य जीवन निरीक्षणासाठी आत खास मनोरे आहेत

राणीखेत हे कुमाऊँ भागातील अतिशय आकर्षक थड हवेच ठिकाण नैनीतालहून ६० कि मी वर येत अस म्हणतात, की येथील मोहक सृष्टिसौंदर्याने मोहित होऊन कुमाऊँ भागातील एक राणी येथेच कायम वास्तव्याला राहिल्याने याच नाव राणीखेत पडल राणीखेतपासून १० कि.मी वर असलेल 'चौबातिया' म्हणजे हिमालयाच्या पार्श्वभूमीवरील सुरेख वनउद्यान जगलात फिरायची आवड असणाऱ्याना येथील वनविहार फारच आवडेल फळाच्या मोसमात येथे ताजी सफरचंदे आणि त्याचा रस विपुल प्रमाणात मिळतो

अल्मोडा हे आणखी एक थंड हवेच ठिकाण नैनीतालपासून ६७ कि मी वर असून

तेथून ५३ कि मी  वर कौसानी हे भारतातील स्वित्झर्लंड म्हणावं इतकं निसर्गसौंदर्यानं बहरलेलं अतिरम्य थंड हवेचं ठिकाण आहे  म  गांधींनी १९२९ मध्ये कौसानीत बारा दिवस वास्तव्य केलं होतं आणि जगात एवढी सुरम्य जागा इतरत्र क्वचितच असावी, असं त्यांना येथील सृष्टिदेवीचं रूप पाहून वाटलं  सुप्रसिद्ध हिंदी कवी सुमित्रानंदन पंत यांचा जन्म याच गावचा त्यांच्या सुरवातीच्या काही काव्यातून कौसानीच्या निसर्गरमणीयतेचा उल्लेख आढळतो अल्मोडापासून ३० कि मी  वर असलेल्या बिन्सर ( उंची २४१२ मीटर ) येथून निरनिराळ्या कोनातून हिमशिखराचा अतिशय सुरेख, भान हरपवून टाकणारा देखावा दिसतो  मात्र ही हिमशिखरं सकाळी लवकर उठून बघायला हवीत. सकाळी दहानंतरही चकाकणारी चांदीसारखी हिमशिखरं ढगाच्या पडद्यात लुप्त होऊन जायचा संभव असतो

शहरी गडबड, गजबजाटापासून दूर, अगाध निसर्गाच्या सान्निध्यात चार घटका रममाण होऊ इच्छिणाऱ्यांना राणीखेत, कौसानी भावतील  मुक्कामासाठी सरकारी निवासस्थानं आणि खासगी हॉटेल्स आहेत

तिब्बत ( तिबेट ) आणि नेपाळच्या सीमारेषावरील उत्तर प्रदेशमधील पिठोरगड या निसर्गसंपन्न जिल्ह्याचं गिरिप्रेमी, धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांना फार आकर्षण वाटतं तिब्बतमधील कैलास - मानस सरोवराचा यात्रा मार्ग याच भागातून जातो  काश्मीरसारख्याच मनोहारी खोऱ्यात वसलेलं पिठोरगड हे जिल्हा मुख्यालय  ( नैनीताल १८८ कि मी  )

कैलास - मानसची यात्रा फार खडतर अन् खर्चिकही  शिवाय अनेक वैद्यकीय तपासण्यांना सामोरं जाऊन शरीरानं ऐनवेळी तंदुरुस्त असल्याची खात्री पटवायला हवी  त्यामुळे इच्छा असली तरी ही यात्रा घडेलच असे नाही. यासाठी के.एम व्ही एन. ने संपूर्ण भारतातील प्रवासमार्गाची या भागातील 'छोटा कैलास' व 'पार्वती सरोवर' ही यात्रा सुरू केली आहे  अधिक माहितीसाठी त्यांच्या दिल्ली ऑफिसशी संपर्क साधावा

पिठोरगडहून ११२ कि मी  वर असलेल्या चौकोरी येथून हिमशिखराचं अतिशय विलोभनीय दर्शन घडतं  या ठिकाणी एक कस्तुरीमृगाचा पार्क नुकताच सुरू करण्यात आला असल्याचं समजतं  'मिलाम' ( उंची ४२६७ मी ) हा उत्तर प्रदेशमधील सर्वांत मोठा ग्लेशिअर पिठोरगडपासून २०८ कि मी वर आहे.

कुमाऊँचा परिसर पदभ्रमणप्रेमींना स्वर्गसम असा म्हणावा लागेल  रमणीय निसर्गाशी हितगुज करत सहजतेनं करता येतील असे अनेक पायी भटकंतीचे मार्ग या भागात आहेत 'मिलामखेरीज पिंडारी ( उंची ३८२० मीटर्स ), काफनी ( ३८०० मी. ), सुंदरधुंगा ( ३८७६ मी  ) हे येथील प्रमुख ग्लेशियर्स  शरयूच्या काठचं बागेश्वर हे या ग्लेशियर्सच्या पदभ्रमणासाठीचं सुरवातीचं ठिकाण  पदभ्रमणाचं आयोजन के एम व्ही एन.तर्फे करण्यात येतं किंवा त्यासाठीचं मार्गदर्शन केलं जातं  पदभ्रमणासाठी लागणारी साधनसामग्रीही त्यांच्यातर्फे पुरवण्यात येते

( सपर्क  मॅनेजर, ट्रेकिंग, के. एम  व्ही. एन  टूरिस्ट बगला, बागेश्वर, डिस्ट्रिक्ट, अलमोरा ). या ट्रेकींग मार्गावर बहुतेक सर्वत्र के. एम  व्ही  एन  ची अल्प दरातील निवासस्थाने आहेत तबूतही सोय केली जाते  दि पर्वत टूर्स अँड टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर ( तालीताल, नैनीताल ) याच्या बसेस कुमाऊँ भागात सगळीकडे जात असतात

या भागातील ग्लेशियर्सना भेट देण्याचा मोसम म्हणजे मे / जून आणि सप्टेंबर मध्य / ऑक्टोबर. पावसाळ्यात मात्र त्याच्यापर्यंत पोहोचण कठीण होत  अधिक माहितीसाठी सपर्क

१] दि डिव्हिजनल मॅनेजर ( टूरिझम )
कुमाऊँ मडल विकास निगम लिमिटेड,
सेक्रेटारिएट बिल्डिंग, नैनीताल.
२] के. एम  व्ही  एन  टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर,
तालीताल, नैनीताल
३] यु  पी  टूरिस्ट ब्युरो,
दि माल, नैनीताल
४] दि मॅनेजर, के  एम  व्ही  एन  लि ,
द्वारा  यू. पी  टूरिझम,
चद्रलोक बिल्डिंग, ३६ जनपथ, नवी दिल्ली

* *




# उत्तराखंडातील निसर्ग यात्रा

उत्तराखडातील, उत्तर प्रदेशाच्या गढवाल विभागातील बद्रिकेदार, गगोत्री-यम्नोत्री या चार धाम यात्रेला आपल्या जीवनात फारच महत्त्वाच स्थान आहे  यात्रा म्हटली की तो प्रौढ वयातच करायची असा जणू सकेतच ठरून गेल्यासारखा झालाय  त्यातून या यात्रा पूर्वी फारच कठीण असल्याने प्रापचिक जबाबदारीतून मुक्त झाल्यावरच बहुसख्य कौटुबिक लोक उत्तराखडातील या चार धाम यात्रेला जायला निघत

आज प्रवासाच्या सोयी-सुविधा वाढल्या असल्याने ही यात्रा बरीच सुखकर झाली असली तरीही अजूनही कष्टप्रदच म्हणावी लागेल बद्रिनाथ, गंगोत्रीपर्यंत बससेवा उपलब्ध असली तरी केदारनाथ आणि यमनोत्रीसाठी चालावच (किंवा घोडे, दडी, कंडी, इ ) लागत हिमालयातील लहरी हवामान, पावसाळ्यात दरड कोसळून रस्ते बद होऊन अडकून पडण्याची भीती यामुळे त्या आणखीनच त्रासदायक व्हायचा सभव 'चार धाम निसर्गयात्रेतून' जास्तीत जास्त आनद मिळवायचा असेल तर त्यासाठी शरीर तदुरुस्त हव

उत्तराखडातील प्रवास वेगवेगळ्या प्रकारे करता येईल आपला वयोगट, आवड, वेळ, शारीरिक, आर्थिक कुवत यानुसार कुठल्या मार्गांनी-चालत, बस, टॅक्सी, इ जायचं ते ठरवावं लागेल आपल्या गावापासून दिवस, वेळेच्या बधनात जखडून घेऊन ही यात्रा/निसर्गसहल करण्याऐवजी आपला आपण आयोजित केलेला प्रवास हिमालयन प्रकृति-सस्कृतीशी जास्त सान्निध्य घडवणारा ठरेल या सपूर्ण यात्रा मार्गावर यात्रेकरू/पर्यटकासाठी खाण्या-पिण्याच्या, निवासाच्या खूप सुविधा असल्याने अगदी एकट्याने ही यात्रा केलेले अनेक जण- त्यात काही स्त्रियाही- माझ्या माहितीत आहेत

मे ते ऑक्टोबरपर्यंत या यात्रा करता येत असल्या तरी मे-जून आणि सप्टेंबर-ऑक्टोबर हे यासाठीचे सर्वोत्तम महिने जुलै ते सप्टेंबर हा पावसाळा असल्याने त्या वेळी दरडी वगैरे कोसळून रस्ते बद होण्याची शक्यता अधिक

हृषिकेश हे या यात्राच सुरुवातीच ठिकाण रेल्वेच्या खडीत- प्रवास- निवासाच विशेष आयोजन न करता, करता येण्यासारखा हा प्रवास फक्त दिल्लीपर्यंत रेल्वे आरक्षण असेल तर पुढचा सर्व प्रवास बसने सहजगत्या करता येण्यासारखा असल्याने त्यात ऐनवेळी बदल करता येण सहज शक्य आहे.

दिल्ली- आग्रा आधीच बघून झाल असल्यास बॉबे सेंट्रलहून रात्री १० १५ला सुटणाऱ्या (दादर रात्री १० २५) ९०१९ डेहराडून एक्सप्रेसने तिसरे दिवशी दुपारी २ ३० वा थेट हरिद्वारला पोहोचता येईल हरिद्वारपासून हृषिकेश रस्त्याने २४ कि मी वर असून हरिद्वारहूनही चार धाम यात्रेसाठी खासगी टॅक्सी मिळतात दिल्लीला मुक्काम करायचा झाल्यास दिल्लीहून रात्री १० ५५ च्या ४०४१ मसुरी एक्सप्रेसने हरिद्वारला जाता येईल (दुसरे दिवशी सकाळी ६ २०) किंवा नवी दिल्ली स्टेशनबाहेरून हरिद्वारसाठी सकाळी अगर रात्री ९-१० चे दरम्यान डिलक्स कोचेस आहेत उत्तर प्रदेश रोडवेजच्या साध्या बसेस दर अर्ध्या तासाने दिल्लीच्या काश्मिरी गेटजवळील इटर स्टेट बस टर्मिनसहून सुटतात सुमारे ५-६ तासाची धाव आहे हरिद्वारचे रेल्वे स्टेशन आणि बस स्टँड समोरासमोरच आहेत

कडक्टेड टूरच्या चौकटीत फारस बाधून घ्यायच नाही, प्रवासी गट मोठा असल्यास प्रवास-निवासाच्या आरक्षणाची खात्री हवी, अथवा एक दोघजणच असतील तर सोबत

असलेली बरी, अशाना गढवाल मडल विकास निगम ( जी एम् व्ही एन् ) लि च्या सहलीबरोबर जाता येईल त्याच्यातर्फे या भागातील चौदा विविध प्रकारच्या सहलींचं आयोजन करण्यात येत या सहली हृषिकेश येथील मुनी-की-रेती किंवा दिल्लीहून निघतात यात अथरुण-पाघरुणसह रात्रीचा निवास आणि मार्गदर्शक याचा समावेश असतो उपलब्धतेनुसार लहान-मोठ्या खोल्या दिल्या जातात मुक्कामाच्या ठिकाणी शाकाहारी जेवण मिळण्याची सुविधा असते वाटेतही अनेक जागी खाण्या-पिण्याचे धाबे असतातच यासबध यात्रामार्गावर मद्यपान निषिद्ध आहे जी एम् व्ही एन् ची कुठलीही सहल कमीत कमी २० प्रवासी ( टॅक्सीसाठी ४ ) असतील तरच निघते, नाहीतर पुढच्या सहलीत सामावून घेतले जाते किंवा मागितल्यास पैसे परत दिले जातात यम्नोत्रीसाठी हनुमान चट्टी, गोमुखसाठी गगोत्री, केदारनाथसाठी गौरीकुड, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स आणि हेमकुडसाहिब याच्यासाठी गोविंदघाट येथे डोल्या, घोडे, सामानवाहक मिळतात त्यांच्या खर्चाचा समावेश सहलीच्या तिकिटात नसला तरी ते मिळवून देण्याचे कामी जी एम् व्ही एन् तर्फे प्रवाशाना सहाय्य केल जात

एल् टी सी घ्यायच असल्यास तस सर्टिफिकेटही देण्यात येत यात्रेकरू/पर्यटकाना हव असल्यास प्रवास एकदा पुढे ढकलता येतो मात्र हव्या त्या टूरमध्ये रिकामी जागा पाहिजे

सकाळी ७ ३०च्या आधी निघणाऱ्या सहलींसाठी प्रवाशाना हृषीकेशच्या मुनी-की-रेती येथील रेस्ट हाऊसमध्ये एक दिवस आधी 'रिपोर्ट' कराव लागत ७ ३० नतर निघणाऱ्या सहलींसाठी निघायच्या वेळेआधी एक तास जाव लागत सहल रद्द करायची झाल्यास पैसे परत मिळण्याचे दर आहेत सहलीच्या नियोजित वेळेआधी ११ दिवस ( ९०% ) ८ ते १० दिवस ( ७५% ), ४ ते ७ दिवस ( ६०% ), ३ दिवस ( काहीही नाही )

जी एम्.व्ही एन् तर्फे स्किईंग, रिव्हर राफ्टींग, ट्रेकींग, वाईल्ड लाईफ सहली इत्यादींच आयोजनही केल जात अधिक माहिती, आरक्षणासाठी सपर्क

१] दि असिस्टट जनरल मॅनेजर ( टूरिझम )
यात्रा ऑफीस, जी एम् व्ही एन् , मुनी की रेती,
हृषिकेश

२] दि जनरल मॅनेजर ( टूरिझम )
जी एम् व्ही एन् लि ,
७४/१, राजपुर रोड, डेहराडुन ( यू.पी )

यासबधीची माहिती त्याच्या खालील प्रादेशिक कार्यालयातही मिळू शकेल

१] पी. आर्. ओ., जी एम् व्ही एन् ,
द्वारा एम् टी डी सी

मादाम कामा रोड, मुंबई
२] पी. आर्. ओ , जी. एम् व्ही एन् ,
द्वारा यू. पी टुरिझम, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा
मुबई
३] पी आर्. ओ , जी एम् व्ही एन् ,
इद्रप्रकाश बिल्डिंग, २१ बाराखाबा रोड, दिल्ली

* *

## बद्रिकेदार, गंगोत्री, यम्नोत्री

हिमालयातील अवघड यात्रांना जाण्याआधी किमान काही काळ चालण्यासारखा व्यायाम घेऊन आपली शारीरिक क्षमता जास्तीत जास्त वाढवण महत्त्वाच जरी घोडा दडी/कडी करायची ठरवली तरी चालण्याचा, विशेषकरून बूट घालून चालण्याचा सराव कधीही उपयोगी पडेल उत्तराखडातील बद्रिकेदार, गगोत्री, यमुनोत्री यात्रा एकाच वेळी करायची झाल्यास सुरवात यम्नोत्रीपासून केलीली ठीक राहिल.

स्वतत्र टॅक्सीने प्रवास करायचा असल्यास आगाऊ आरक्षणाची कटकटही करावी लागणार नाही अनेक खासगी टॅक्सीबरोबर रोडवेज् स्टँडजवळील हरिद्वार टॅक्सी ओनर्स असोसिएशनतर्फे खात्रीशीर टॅक्सी मिळू शकतात

हरिद्वारमध्ये राहण्यासाठी बऱ्याच ट्रस्टतर्फे धर्मशाळा चालविण्यात येतात त्यापैकी बसस्टँड/रल्वे स्टेशनजवळील गुजराथी ट्रस्टतर्फे चालविल्या जाणाऱ्या गुजराथ भवनमध्ये (शकर मूर्तीजवळ, जेसाराम रोड, हरिद्वार) मुक्काम करून आणि जास्तीच सामान तेथेच ठेवून पुढे जाता येईल

टॅक्सीने सर्वसाधारणपणे खालील प्रवासमार्ग ठरवता येईल

**दिवस १:** हरिद्वारहून प्रयाण. हृषिकेश, डेहराडून, सहस्त्रधारा फॉल, मसूरी मुक्काम घाटाची राणी मसुरी

**दिवस २ :** मसुरीहून प्रयाण वाटेत केम्टी फॉल, यमुना ब्रीज बारकोट, स्याना चेट्टी, हनुमान चेट्टी (सु १२६ कि मी ) हनुमान चेट्टी ते जानकी चेट्टी ८ कि मी. पायी/घोडा/दडी/कडी मुक्काम जानकी चेट्टी

**दिवस ३ :** जानकी चेट्टी ते यम्नोत्री, ५ कि मी पायी/घोडा/दडी/कंडी, यमनोत्री दर्शन आणि परत १३ कि मी हनुमान चेट्टीपर्यंत दु. ४ वा. तेथून टॅक्सीने दोन तासावरील बारकोटला मुक्काम

**दिवस ४ :** बारकोटहून सकाळी लवकर प्रयाण. उत्तर काशी, गगोत्री दर्शन व परत

मुक्काम उत्तरकाशी ( १८० कि मी ) ( गगेचा प्रत्यक्ष उगम गगोत्रीपासून १८ कि मी. वरील गोमुख येथे असून तेथे फक्त पायीच जाव लागत गोमुखाला जायच झाल्यास गगोत्रीला मुक्काम आवश्यक )

**दिवस ५ :** उत्तरकाशी विश्वनाथ मदिर दर्शनानतर प्रयाण टेहरी, श्रीनगर, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग, गौरी कुंड या केदारनाथाच्या बेसकॅम्पला मुक्काम. ( सु २६० कि.मी )

**दिवस ६ :** गौरी कुड ते केदारनाथ ( १४ कि मी पायी/ घोडा/ दडी/ कडी ) आणि परत मुक्काम गौरीकुड

**दिवस ७ :** गौरीकुडाहून बद्रीनाथला जाण्यासाठी रुद्रप्रयाग ( अलकनदा, मदाकिनी नद्याच्या संगम ) पर्यंत परत यावे लागते तेथून बद्रिनाथ सुमारे १६० कि मी या रस्त्यावर कर्णप्रयाग, नदप्रयाग, चमोली, जोशी मठला मुक्काम

**दिवस ८ :** जगद्गुरु शकराचार्यांचे मदिर. जोशी मठ ते बद्रिनाथकडे ( ४५ कि मी ) सकाळी लवकर प्रयाण १८ कि मी व्हॅली ऑफ फ्लॉवर्स गोविंदघाट बद्रिनाथहून ३ कि मी. वरील व्यास गुंफाचे निसर्गसुदर माना आणि परत मुक्काम बद्रिनाथ

**दिवस ९ :** बद्रिनाथ, पाडुकेश्वर, जोशी मठ, चमोली, नदप्रयाग, कर्णप्रयाग, रुद्रप्रयाग, श्रीनगर ( १९३ कि मी ) मुक्काम श्रीनगर

**दिवस १० :** देवप्रयाग ( ३५ कि मी ) ( भागीरथी-मदाकिनीचा अलकनदेशी सगम ) हृषिकेश ( ७० कि मी ) टॅक्सी सोडून हृषिकेशला गगाकिनारी निवात विश्राती

या सपूर्ण मार्गावर यात्रेकरूची काही ना काही सोय ही होतेच उत्तराखडातील यात्रेत गगोत्री आणि बद्रिनाथला थेट बस जाते यम्नोत्री आणि केदारनाथला चालाव लागत आणि इच्छा असल्यास गोमुखसाठीही!

बद्रिनाथच्या वाटेवरील गोविंदघाटी ( हरिद्वार २१५ कि मी , हृषिकेश २०० कि मी ) येथे बस/टॅक्सीने उतरून जुलै/ऑगस्टमध्ये व्हॅली ऑफ फ्लॉवर्सला जाता येते याच काळात तेथे फुल दिसतात गोविंदघाट ते घागरिया ( १३ कि मी ) पर्यंत पायी अथवा घोडा घागरियापासून ३ कि मी वर फुलांची घाटी आणि ६ कि मी वर हेमकुड हे शिखाचे धार्मिक स्थान येते हेमकुडसाहिबला घोडा न्यायला परवानगी असली तरी फुलाच्या घाटीत मात्र चालतच जाव लागत

दहा कि मी ची व्हॅली जितक चालाव तितकी फुल जास्त दिसतात व्हॅलीत मुक्कामाला परवानगी नसल्याने वेळेच भान ठेवूनच माघारी फिराव लागत लहरी हवामानाच्या पावसाने गाठलं तर अनेकाना फुल न बघताच परताव लागत. सूर्यप्रकाश असेल तरच बर पावसामुळे फुल मलूल होतात. व्हॅली ऑफ फ्लॉवर्सची आकर्षक रगीत चित्र बघून आपण कल्पना केलेली असते की रगमय फुलाचा अथाग गालिचा पसरलेला असेल मात्र असा गालिचा

एखाद-दुसरा दिवस जाणाऱ्या पर्यटकाना दिसण हा अलभ्य लाभच हिरव्या गालिच्यावर रगीत फुलाच नक्षीकाम करावे अस दृश्य दिसत घागरियाला राहायला जागा बहुदा मिळते, पण नाही मिळाली तर गोविंदघाटीपर्यंत एक दिवसात परत यायच म्हटल तर व्हॅलीमध्ये जास्त आत जाता येत नाही म्हणजे या पुष्पघाटीच चागल दर्शन घडण्यासाठी नशिबाने, निसर्गाने साथ द्यायला हवी

आपल्या धर्मात चार धाम यात्रेच पुण्य फार असल्याने ही अवघड यात्रा गटानेच नव्हे तर एकट्याने स्वतत्रपणे केलेले पुरुषच नाही तर स्त्रियाही आहेत मात्र एकट्या स्त्रियाना काही धर्मशाळातून झोपण्यासाठी जागा मिळण्यात अडचण येते. यासाठी दोन स्त्रिया असतील तर उत्तम प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर पाहिजे त्या मार्गाने उत्तराखडातील चारधामची ही अवघड यात्रा घडण कोणालाही अशक्यप्राय होऊ नये

* *



हिमाचल प्रदेश

# हिमाचल प्रदेश

भूनदनवन काश्मीरचे दरवाजे पर्यटकाना बद होऊ लागल्यावर कुलु-मनाली भारतवर्षाच पर्यायी नदनवन म्हणून बहरू लागल केवळ कुलु-मनालीच नव्हे तर सर्व हिमाचल प्रदेश राज्यच स्वर्गसम अशा शात, प्रसन्न, विलोभनीय सृष्टीसौंदर्यान नटलेलं आहे देवभूमी हिमाचलचं म्हणूनच पर्यटकाना फार आकर्षण वाटत

हिमाचल प्रदेशाची राजधानी शिमला आणि त्याला जोडून कुलु-मनाली ही नेहमीची साचेबद सहल सिमल्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनहून सकाळी ६ वाजता ४०९५ हिमालयन क्विन, आणि दुपारी ४ २५ ला २००५ शताब्दी एक्सप्रेस असून दिल्ली रेल्वे स्थानकावरून रात्री १० ४५ ला २३११ हावरा-कालका मेल आहे वरील गाड्या सिमल्याला अनुक्रमे साय ५.०५ आणि दुसरे दिवशी सकाळी ९ ५० व ११ ४० वाजता पोहोचतात वाटेत कालका येथे गाडी बदलावी लागते

चदीगढपासून सुमारे १२० कि मी वर असलेल्या शिमल्याला रस्त्याने जाण्यास अडीच ते तीन तास लागतात. याच्या साधारणत दुप्पट वेळ चदीगडजवळील कालका येथून सुटणाऱ्या

छोट्या रेलगाडीला लागतो ( रोज चार गाड्या ) थोडी वाकडी वाट केल्यास चदीगडपासून सुमारे ६५ कि मी वरील मनोरम पर्वतराजीत विसावलेल निवात, सुदर कसौली पाहता येईल

२२०० मीटर्स उचीच्या पर्वतराजीत विराजमान झालेल, १८ चौ कि मी क्षेत्रफळात विस्तारलेल 'शिमला' हे एक महाग थड हवेच ठिकाण वेगवेगळ्या डोंगरावरील वस्तीमुळे चालत हिंडण तस अवघडच! 'दि माल' हा पर्यटकानी नेहमी गजबजलेला शिमल्यातील प्रमुख रस्ता याच भागात हिमाचल प्रदेश टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे टूरिस्ट ऑफिस असून त्याच्यातर्फे सिमला आणि जवळच्या वाईल्ड फ्लॉवर हॉल, कुफ्री, फागु, नालडेहरा, नारकडा, चैल इत्यादी सहली तसेच कुलु-मनाली, कसौली इत्यादी लाबच्या सहलींच आयोजन केल जात अधिक माहितीसाठी सपर्क टूरिस्ट ऑफिस, दि माल, शिमला

हिमाचल प्रदेश पर्यटन महामडळाची सुरेख जागची, सुसज्ज निवासस्थाने सर्वत्र असून त्यात किफायतशीर दरात राहता येत माल रोडवरील टूरिस्ट ऑफिसतर्फे पर्यटकाना त्याच्या बजेटनुसार हॉटेल मिळवून देण्यासाठी सहाय्य केल जात हिमाचलमधील पर्यटनासबधीच्या अधिक माहितीसाठी सपर्क कमिशनर ऑफ टूरिझम, हिमाचल प्रदेश, गौरिश बिल्डिंग, डेझी बँक इस्टेट, शिमला १७१ ००१ ( मुबई ऑफिस ३६, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ०५५ )

सपूर्ण हिमाचल प्रदेशचा प्रवासच मोठा लोभस, रोमाचकारी पठाणकोट हे यासाठीच सुरुवातीच योग्य ठिकाण प्रत्येक ऋतूतील या राज्याच सृष्टी वैभव काही न्यारच! मात्र येथील शिवालीक आणि धौलाधर पर्वत शृखला म्हणजे एका मागून एक सतत येणाऱ्या डोंगराच्या रागा आणि त्यामधून नागमोडत जाणारा वळणावळणाचा रस्ता त्यामुळे बस लागणाऱ्याना जास्त काळजी घ्यायला लावणारा हा प्रवास हिमाचल भ्रमणाचा खालील आराखडा कोणीही जाऊ इच्छिणाऱ्याना बऱ्याच प्रमाणात मार्गदर्शक व्हावा

**दिवस १ :** सायकाळी ५ ४० च्या पुण्याहून निघणाऱ्या ४६७७ झेलम एक्सप्रेसने पठाणकोटकडे प्रयाण

**दिवस ३ :** पठाणकोटला आगमन ( सकाळी ८ ) थेट ८० कि मी वरील मनमोहक डलहौसीकडे बस/ टॅक्सीने प्रयाण विश्राती दुपारनतर स्थानिक स्थलदर्शन ( सुभाष बावली, सातधारा, शहीद स्मारक पजपुल्ला, बारकोटा हिल, कालाटोप, दाईनकुड, इत्यादी ) मुक्काम

**दिवस ४ :** देवदार वृक्षाच्या दाट जगलातील, खोलगट बशीच्या आकाराच्या मखमली हिरव्या गर्द हिरवळीच, मत्रमुग्ध करणार खज्जियार लेक ( २५ कि मी ), तेथून २२ कि मी वर लावण्यमय, निसर्गसपन्न चबा ( लक्ष्मीनारायण मदिर, चामुडा देवी मदिर, भुरीसिंह म्युझियम इ ) व परत मुक्काम डलहौसी ( ५३ कि मी. )

**दिवस ५ :** डलहौसी ते धरमशाला ( १६० कि.मी ) सकाळी ८ ची बस साय. ५ ३० चे सुमारास पोहोचते किंवा डलहौसीहून पठाणकोट आणि तेथून धरमशाला ( ९० कि मी ) मुक्काम.

**दिवस ६ :** सकाळी लवकर निघून कांग्रा ( २० कि मी ), ( ब्रजेश्वरी मंदिर, कांग्रा फोर्ट ) तेथून पुढे ३५ कि मी वर ज्वालामुखी मंदिर. परत येताना धरमशालेच्या अलीकडे १५ कि मी चामुंडादेवी मंदिर, चिन्मय तपोवन आश्रम ( १० कि मी. ), वॉर मेमोरियल इत्यादी दुपारी धरमशालेच्या वर १० कि.मी अप्पर धरमशाला किंवा मॅकलिऑडगंज येथील दलाई लामाचं निवासस्थान- बौद्ध मंदिर, भागसूनाग मंदिर, दल लेक, एलिन्स चर्च इ ( टॅक्सी असल्यास एक दिवसात शक्य ) मुक्काम

**दिवस ७ .** धरमशाला ते मनाली ( सुमारे २६० कि मी ) पहाटेची बस सुमारे १२ तासानी पोहोचते टॅक्सीने गेल्यास धरमशालेपासून ७० कि मी.वरील बैजनाथ ज्योतिर्लिंगाच स्थान, पालमपूरचे चहाचे मळे पाहता येतील मुक्काम मनाली किंवा त्याआधी ४० कि मी.वरील कुलू.

**दिवस ८ :** मनालीहून हि प्र. टूरिझमच्या दिवसभराच्या साधारणपणे तीन कंडक्टेड टूर्स जातात मिळेल तस रिझर्वेशन करून ठेवणे किंवा टॅक्सी (१) मनाली - नेहरु कुंड ( ६ कि मी )- कोठी ( १२ कि मी )- राहला फॉल्स ( १५ कि मी )- रोहतांग पास ( ५१ कि मी ) बर्फावरील खेळासाठी

**दिवस ९ :** (२) मनाली - नग्गर ( पूर्वीची राजधानी ) ( २२ कि मी )- मनाली

**दिवस १० :** (३) मनाली- कुलु- मनीकरण येथील उकळत्या पाण्याची कुंड ( ८५ कि मी )- मनाली मनीकरण कुलुपासून ४५ कि मी वर असल तरी तेथून कंडक्टेड टूर्स् नाहीत

**दिवस ११ :** मनाली स्थानिक स्थलदर्शन ( वसिष्ठ गरम पाण्याची कुंड, हिडिंबा मंदिर, क्लब हाऊस, बुद्ध मंदिर, हिमालयन माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूट, इत्यादी ) ( ट्रेकर्ससाठी अनेक लहान-मोठे ट्रेक्स याखेरीज स्किइंग, पॅराग्लायडिंग, रिव्हर राफ्टिंग इत्यादी सुविधा ) मुक्काम किंवा सायंकाळी सिमल्याकडे ( २८५ कि मी )

**दिवस १२ व १३ :** हि प्र टूरिझमच्या साधारणत दोन टूर्स् घेतल्यास सिमल्याच्या आसपासची कुफरी, नारकंडा, नालडेहरा, चैल इत्यादी स्थळे पाहून होतात

**दिवस १४ :** सिमला-दिल्ली ( ३७० कि मी. बसने ९-१० तास ) रेल्वे · शताब्दी एक्सप्रेस सकाळी ११ ५५, हिमालयन क्विन दुपारी १ ०५, कालका- हावरा मेल साय ५ ४० या गाड्या अर्थातच कालकाला बदलाव्या लागतात

**दिवस १५ :** दिल्लीला आगमन स्थानिक स्थलदर्शन.

**दिवस १६ :** ४६७८ झेलम एक्सप्रेस (सकाळी १० १५) किंवा इतर सुयोग्य गाडीने प्रयाण

**दिवस १७ :** पुणे आगमन (दुपारी ३ २०)

विशेष सूचना  हिमाचलची सहल, बर्फाची मजा लुटायची असल्यास एप्रिलमध्ये करण जास्त फायद्याच ! कारण येथील खरा सीझन १ मे नतरच सुरू होत असल्याने त्या गर्दीच्या आधी प्रवास-निवासाची आरक्षण मिळण सुलभ होत  हॉटेल्सच्या दरातही भरीव सवलत मिळू शकते

लाहूल आणि स्पिती व्हॅली हा हिमाचलमधील अगदी वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश या भागाच्या कडक्टेड टूर्स जून ते ऑक्टोबरपर्यंत काढल्या जातात

* *




जम्मू काश्मीर

## लडाख

हिमालयाच अगदी आगळ, वृक्षरहित थड वाळवटी मनोवेधक रूप पाहण्यासाठी जाव लागेल भूनदनवन काश्मीर खोऱ्यापलीकडील चद्रभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लडाखला.

दुर्गम पहाडी प्रदेशातील चित्ताकर्षक निसर्गाविष्काराच लोभस दर्शन घडविणाऱ्या जगातील सर्वाधिक उचीच्या पठारावरील, ३५०० मीटर्स उचीवरील लेह ही राजधानी

लेहला जाणाऱ्या दोन प्रमुख रस्त्यांपैकी श्रीनगर- लेह (४३४ कि मी ) हा रूळलेला मार्ग गेल्या काही वर्षांपासून अशांत परिस्थितीमुळे पर्यटकाना तसा बदच म्हणावा लागेल या मार्गावरील सोनमर्गजवळील 'बाल्टाल' येथून जुलै/ ऑगस्टमध्ये एक दिवसात अमरनाथला जाऊन येता येत  मनालीवरून जाणारा लेहचा दुसरा रस्ता (४७५ कि मी ) जास्त खडतर. वाटेत फारशी वस्ती नसल्याने कित्येकदा पाणी, पेट्रोल न मिळणारा, अति थडीमुळे डिझेल गोठविणारा  मनालीहून रोहताग खिडीतून जाणाऱ्या या मार्गावरही आता प्रवासी वाहतूक सुरू झालीय. बसबरोबर जीप्सही मिळतात. या काहीशा कष्टप्रद प्रवासाला वेळ लागतो वाटेतील रात्रीच्या एका मुक्कामासह दोन दिवस

ग्रंथालय ठाणे

लेह- लडाखला एक वेळ तरी रस्त्याने जाण फार जिकीरीच, रोमाचकारी असल तरी हे रस्ते फक्त जूनअखेर ते ऑक्टोबरपर्यंतच सुविहित चालू असतात इतरवेळी बर्फामुळे बद असतात त्यामुळे मुलांच्या सुट्ट्या वगैरे साभाळून लडाखला जायच झाल्यास विमानाच्या पखाचा आधार घ्यावा लागेल श्रीनगर, जम्मूशिवाय दिल्ली आणि चदीगडहून आठवड्यातून काही ठराविक वारी लेहसाठी विमान आहे (दिल्ली-लेह वेळ सुमारे सव्वा तास भाड प्रत्येकी सुमारे १५०० रु ) विमानाच वेळापत्रक आणि भाड सातत्याने बदलत असल्याने त्यासबधी खात्री करून जाण इष्ट.

श्रीनगर- लेह बसने वाटेतील कारगिल येथे मुक्काम करून दोन दिवस लागत असले तरी विमान मात्र घेते फक्त पाऊण तास (जम्मूहून एक तास ) विमानातून खाली बर्फाच्या धवल महासागरात अक्षरश शेकड्यानी दिसणारी लहानमोठी हिमशिखरे भान हरपवून टाकतात हिमालयाच्या अगाध भव्यतेने डोळे सुखावतात मन तृप्त होतय तोपर्यंत बर्फाच्या टोप्या ल्यालेल्या, खोऱ्यातील काही भाग सोडल्यास हिरव्या झाडाचा लवलेशही नसलेल्या पर्वतराजींमधील पिवळसर, मऊ वाळूच्या काहिलीत वसलेल्या लेहवर विमान घिरट्या घालू लागत

हवामान ठीक असेल तर सुदैवच ! नाहीतर अनेकदा वाईट हवामानामुळे विमान उतरवण अशक्य झालं तर प्रसगी माघारीही फिरवल जात त्यामुळे जाणकार म्हणतात, श्रीनगर अगर दिल्लीहून येणार विमान उतरल तरच त्या दिवशी परत जायची शाश्वती

लडाखच हवामान आहेच अतिशय विचित्र ! उन्हात थाबल तर चटका जाणवतो सावलीत गेलं की हुडहुडी भरते निळ्या, निरभ्र आकाशात ढग येतात, पाऊस पडेल वाटत, परतु काही वेळातच ढग पागतात लडाखच्या वाळवटी प्रदेशात पाऊस अगदी कमी नाहीच म्हटल तरी चालेल. म्हणूनच लडाखी शेतकरी पावसाऐवजी सूर्याची प्रार्थना करतो कारण त्यामुळे बर्फ वितळून त्याला पाणी मिळणार असत

लेहला रस्त्याने गेल्यास उचीमुळे विरळ होत जाणाऱ्या वातावरणाशी शरीर जुळवून घेत जातं पण विमानाने गेल्यास घ्यायची महत्त्वाची काळजी म्हणजे कमीत कमी एक दिवस सपूर्ण विश्राती नाहीतर एकदम फार धावपळ, धावाधाव केल्यास तेथील विरळ वातावरणामुळे डोकेदुखी, उलट्या, छातीत धडधडण, घाम येण, पाय लटपटण यासारखा त्रास होण्याची शक्यता असते

लेहमध्ये स्वागत करते एक प्रचड प्रार्थना चक्र आणि गावावर जणू लक्ष ठेऊन उभी असलेली लेह मोनास्ट्री तिच्याखालच्या बाजूचा जुना राजवाडा - खार पॅलेस

लेहचा आसमत अनेक प्रेक्षणीय गुफानी समृद्ध असून शे (१५ कि मी ), ठिकसे (१७ कि मी ) आणि हेमिस (५० कि.मी ) या त्यातील एका मार्गावरील प्रमुख गुफा

कातरलेल्या डोंगरामधून, सिधू नदीच्या कडेनी जाणारी वाट लडाखच्या पहिल्या राजाच्या 'शे' या राजधानीच्या गावी घेऊन येते एका उच टेकडीवर १६४५ मध्ये बाधल्या गेलेल्या राजवाड्याचे जीर्ण अवशेष असून त्याच्या थोड खाली बौद्ध मदिर आहे. त्यातील शाक्यमुनी बुद्धाचा दोन मजली उचीचा, सोन्या-चादीच्या मुलाम्यातील रत्नजडीत अलंकारातील बैठा पुतळा अतिशय वेधक आहे

शे पासून दोन कि मी वर आठव्या शतकातील बाधण्यात आलेल्या बारा मजली ठिकसे गुफेत दहा लहान-मोठी मदिरे असून त्याची दालने पुतळे, स्तूप, ठका ( कापडावर रगकाम केलेल्या कलाकृती ), ताब्या-पितळ्याची कलात्मक भाडी यानी सपन्न असून भिती, खाब बुद्धाच्या शिकवणूकीच्या, तसेच तात्रिक विद्येसबधीच्या चित्रांनी चितारल्या आहेत

हेमिस गुंफेची स्थापना १७ व्या शतकाच्या सुरुवातीस पहिल्या लामाने केली हेमिस फेस्टिव्हल जगप्रसिद्ध आहे पद्मसभवाचा जन्मदिन साजरा करण्यासाठी तिब्बेटियन कॅलेंडरप्रमाणे ५ व्या महिन्याचा ९, १० व ११ या दिवशी ( साधारणत जूनच्या मध्यात ) होणारा हा समारभ पाहण्यासाठी देशोदेशीचे लोक लडाखमध्ये येतात या महोत्सवात नाटक, लामांचे चित्र- विचित्र मुखवटे, पारपारिक वाद्याच्या साथीने नृत्ये, ठकाचे प्रदर्शन असे विविध कार्यक्रम होतात

लेह श्रीनगर रस्त्यावरील लेहपासून स्पितुक ( ८ कि.मी. ), फियाग ( २० कि.मी ), लिकिर आणि आलची ( १३५ कि.मी ) या आणखी काही महत्त्वाच्या गुफा श्रीनगरहून रस्त्याने आल्यास वाटेवर पाहता येतात लामायुरु ही लडाखमधील सर्वांत जुनी गुफा लेहपासून १२५ कि मी वर असून तिच्या आसपासचा प्रदेश चांद्रभूमीची आठवण करून देतो

बहुतेक सर्व गुफाचा आतील साचा ठराविक पद्धतीचा वाटतो बुद्धाचा वेगवेगळ्या अवस्थातील भव्य पुतळा, त्याला अर्पण केलेले स्कार्फस्, चादी-ताब्यावरील नक्षीकामाची पवित्र पाण्याची भाडी, भिंती-कापडावरील चित्रे, पिवळ्या रेशमी वस्त्रात व्यवस्थित गुडाळून लावून ठेवलेल्या धार्मिक ग्रथाचे दालन येथील गुफातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे चेहरा झाकलेली कालीची मूर्ती, जिचे दर्शन बऱ्याच ठिकाणी स्त्रियाना घेऊन देत नाहीत बाहेर पताका फडकत असतात त्यावर लडाखी भाषेत प्रार्थना लिहिलेल्या असतात वारे ही प्रार्थना ऐकायला स्वर्गात देवापर्यंत पोचवतात अशी बौद्ध धर्मियाची श्रद्धा आहे

१८,३८३ या जगातील सर्वाधिक उचीवरील मोटर-रस्त्यावरील खारदुगला खिडीत लेहहून ( ५१ कि मी ) जीपने जाता येते मात्र यासाठी तेथील कमिशनरकडून इनरलाईन परमिट घेण आवश्यक आहे खारदुगला खिडीतून सियाचिन ग्लेशियरकडे जाणारा रस्ता अति निसर्गरम्य नुब्रा व्हॅलीतून जातो वाळवटातील ओॲसिस वाटणारी नुब्रा व्हॅली रानगुलाब, गव्हाची शेती, जर्दाळुची झाड यानी नटलेली आहे. डिकसिट या तालुक्याच्या ठिकाणी

याक प्रजोत्पादन केंद्रही आहे

लडाखमधील पँगसू किंवा पँगाँग हे निळसर रंगाच्या खाऱ्या पाण्याचं आकर्षक सरोवर आता पर्यटकांसाठी खुलं करण्यात आलं असून, खास परवानगीने तेथे टॅक्सीने जाता येतं एक दिवसाचा मुक्काम करावा लागत असल्याने पैसे अर्थातच जास्त अधिक माहितीसाठी लेहमधील टूरिस्ट ऑफिसशी संपर्क साधावा

सेसपाल तोंडुक नामग्याल राजाने इ.स. १८२५ मध्ये बांधलेला लेहजवळील स्तोक पॅलेस आणि म्युझियम सकाळी ७ ते सायंकाळी ७ चे दरम्यान बघता येतं (प्रवेश फी प्रत्येकी २० रुपये) या संग्रहालयात राजघराण्यातील पोषाख, दागदागिने, तांब, चांदी, चिनीमाती यांची सुशोभित भांडी, जुने ठका, नाणी इत्यादी पहायला मिळते लडाखचे निळे खडे फार ख्यातनाम. ज्याच्याकडे हे खडे जास्त ते श्रीमंत मानले जातात

अनेकदा श्वास रोखून धरायला लावणारं, येथील भूस्तराचं रूप पहायला मिळणाऱ्या या भागातील गिर्यारोहण, पदभ्रमणाच्या मोहिमा, सहलींच तसेच सिंधू नदीतील साहसी नौकायानाचं - रिव्हर राफ्टींग आयोजन अनेक खासगी कंपन्यामार्फत करण्यात येतं पदभ्रमण, गिर्यारोहण करणाऱ्याना लडाख हे एक वेगळं आव्हानच आहे.

काळ्या अगर गडद वेलवेटचा पायघोळ झगा, पाठीवर मेंढी/ बकरीचं पांढरं कातडं, दोन वेण्या, डोक्यावर खास लडाखी टोपी, मोती-नीलमण्याचे दागिने, अशा वैशिष्ट्यपूर्ण वेषातील लडाखी स्त्रिया, काळसर-लाल पायघोळ अंगरख्यातील बौद्ध भिक्षू / लामा, भारतीय सेनादलातील गणवेशधारी आणि मुख्यत्वे विदेशी पर्यटक हे लेहच्या रस्त्यावरील नेहमीचे दृश्य !

लडाख भागाची पर्यटनविषयक अधिक माहिती जम्मू- काश्मीर सरकारच्या मुंबई येथील मुख्य पर्यटन कार्यालयात ( २५, नॉर्थ विंग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ) मिळू शकेल

* *




# राजस्थानची सहल

नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा काळ हिमालयातील अतिउच प्रदेश सोडला, तर इतरत्र कुठेही प्रवासास सर्वोत्तम म्हणावा असा मुलाना घेऊन सहलीला जायच असेल, तर दिवाळीची सुटी चांगली हिवाळा किंवा उन्हाळा दोन्ही फार तीव्र नसल्याने प्रवास बाधायची शक्यता कमी

आपल्या पराक्रमी, कर्तृत्ववान, कलासक्त पूर्वजाच्या वैभवशाली इतिहासाच स्फुरणीय दर्शन घडविणाऱ्या राजस्थानची सहल कशी आखता येईल, ते पाहू.

राजस्थान म्हटल, की रखरखीत, रुक्ष वाळवटच नजरेसमोर येत. मात्र हे सपूर्ण राज्य अस नाही अरवली पर्वत या राज्याचे दोन भाग करतो आग्नेयेकडील भागाला मेवाड म्हणतात आणि वायव्येकडील अतिकमी पावसाच्या ओसाड तालुकामय प्रदेशाला मारवाड म्हटल जातं भौगोलिकदृष्ट्या आपल्याला जवळ असलेल्या मेवाडमधील माउट अबू, उदयपूर, चितोड ही काही प्रेक्षणीय स्थळे. मारवाडातील दूरच्या भागात जोधपूर, जैसलमेर, बिकानेर इत्यादी प्रेक्षणीय स्थळे येतात जयपूर ही राजस्थानची राजधानी पुण्या-मुबईहून जयपूरला थेट रेल्वेने जाता येत नाही मुबईहून फ्रॉंटियर मेलने सवाई माधवपूर किंवा पुण्याहून झेलम अगर वास्को-दिल्ली एक्स्प्रेसने आम्याला गाडी बदलावी लागते.

राजस्थानचा प्रवास जयपूर अगर माऊट अबू किंवा उदयपूरहून सुरू करण सोईस्कर पडत अबू/उदयपूरला जाण्यासाठी जाव लागतं अहमदाबादला तेथून ही दोन्ही गावे अदाजे दोनशे कि मी अतरावर त्रिकोणात आहेत आठ-दहा दिवसच असतील, तर खालील प्रवासमार्ग आखता येईल अहमदाबाद- माउंट अबू- उदयपूर- चितोड- जयपूर- आग्रा- मुबई / पुणे

आमच्या तीन आठवड्याच्या राजस्थान सहलीचा वर्तुळाकार रेल्वे प्रवासमार्ग असा होता पुणे- अहमदाबाद- अबू रोड- (बसने)- माउट अबू- (बसने)- उदयपूर- चितोड/राणकपूर- अजमेर- जोधपूर- जैसलमेर- जयपूर- भरतपूर- आग्रा- पुणे दहा

जागी खडित प्रवास असूनही रेल्वेची सर्व आरक्षण हाती असल्याने सहल अगदी आरामशीर झाली

आपली आवड, वेळ, पैसा यानुसार वरील प्रवास मार्गात यथायोग्य फेरफार करून आपल्या प्रकृतीला मानवेल, असा सहल आराखडा आखता येईल राजस्थानात विदेशी पर्यटक फार मोठ्या सख्येने येत असल्याने पर्यटकाना अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत राजस्थानच अस्सल रूप न्याहाळण्यासाठी मात्र जैसलमेरपर्यंत जायला पाहिजे

आता राजस्थानमधील प्रेक्षणीय स्थळाविषयी थोडस

अहमदाबादहून माउट अबूपर्यंत थेट बसेस आहेत रेल्वेने अबू रोड स्टेशनला उतरून २८ कि मी वरील माउट अबूला रस्त्याने जाव लागत

माउट अबू हे राजस्थानमधील थड हवेचे ठिकाण मुख्यत विश्वविख्यात आहे ते तेथील डोळ्यांच पारण फेडणाऱ्या नाजूक सगमरवरी कोरीव कामगिरीच्या दिलवाडा मदिराबद्दल (ही मदिरे फक्त दुपारी बारा ते सहा उघडी असतात) याखेरीज नख्वी लेक, अर्बुदा देवी, गुरू शिखर, सनसेट पॉइंट या अबूतील इतर काही प्रेक्षणीय जागा

माउट अबूहून बसने १८५ कि मी वर आहे 'लेक सिटी ऑफ इडिया' म्हणून ओळखल जाणार सरोवर, बगीचे, राजवाडे यानी सजलेल उदयपूर. येथील सिटी पॅलेस, फत्तेसागर तलावातील नेहरू पार्क, मोतीमगरी टेकडीवरील महाराणाप्रतापच स्मारक, सहेलीयोंकी बाडी हे सुदर उद्यान, भारतीय लोककला म्युझियम, ही काही प्रमुख प्रेक्षणीय स्थळे

उदयपूरचा सर्व आसमतच सरोवरे, मठ-मदिरे, किल्ले आणि ऐतिहासिक स्थळे यानी समृद्ध आहे. महाराण्याचे कुलदैवत एकलिगजी मदिर (२२ कि मी), महाराणाप्रतापने मुगलसम्राट अकबराबरोबर दिलेल्या प्रखर लढतीची आठवण करून देणारी हलदी घाटी (४० कि मी), वैष्णवाचे तीर्थस्थान, नाथद्वारा (४८ कि मी), द्वारकाधीश श्रीकृष्णाचे कक्रोली मदिर व जवळील राजसमद सरोवर (६५ कि मी), आशियातील दुसऱ्या क्रमाकाचे मोठे जयसमद सरोवर (४८ कि मी)

जैन मदिराच्या सगमरवरी कोरीव कारागिरीचा नेत्रदीपक आविष्कार उदयपूरपासून शभर कि मी वरील राणकपूरला बघायला मिळतो येथे ओतप्रोत नक्षीकामानी भरलेले १४४० लहान-मोठे सगमरवरी कोरीव खाब असून, एक खाब दुसऱ्यासारखा नाही

राजपुताच्या अतुलनीय पराक्रमाच्या वीरगाथा लिहिल गेलेल चितोड उदयपूरपासून ११५ कि मी वर येत (चितोड, उदयपूर-जयपूर रेल्वेमार्गावर असल्याने वाटेतही करता येईल) तेरा कि.मी परिसरात पसरलेला चितोडचा किल्ला उच टेकडीवर असून, तेथपर्यंत रिक्षा, बस, टॅक्सीने जाण सोयीस्कर रूपवती राणी पद्मिनीचा महाल, राणा कुभाचा राजवाडा, जोहाराच्या जागा, नऊ मजली विजयस्तभ, सत मीराबाईंचे मदिर, फत्तेप्रकाश राजवाड्यातील

संग्रहालय ही चितोडची काही स्मृतिस्थळे. उदयपूरच्या आसमंतातील ठिकाणे पाहण्यासाठी कमीत कमी तीन दिवस मुक्काम आवश्यक

हिंदू-मुस्लीम संस्कृतीचा मिलाफ असलेल्या अजमेरचे ( चितोड १९० कि मी., जयपूर १३० कि मी ) हिंदूंना आकर्षण वाटत ते तेथून अकरा कि मी वर असलेल्या पुष्कर तीर्थक्षेत्राबद्दल ( दर कार्तिक पौर्णिमेस मोठी यात्रा ) आणि मुस्लिमाना ख्वाजा मोइनुद्दिन चिस्तींच्या दर्ग्यासाठी मूळचे संस्कृत विद्यालय व हिंदू मंदिरे पाडून केवळ अडीच दिवसात महमद घोरीने बांधलेली मशीद 'ढाई दिनका झोपडा,' 'अनासागर कृत्रिम तलाव' ही अजमेरमधील भेट देण्यायोग्य आणखी दोन ठिकाण

राजस्थानच्या वालवटी प्रदेशाच प्रवेशद्वार म्हणजे जोधपूर उच खडकावर बांधलेला तांबडा संगमरवरी अतिभव्य आणि प्रेक्षणीय मेहेरगड किल्ला, जसवंत थडा, उम्मीदभवन पॅलेस, एकेकाळची मारवाडची राजधानी मंडोर किंवा मांडव्यपूर ( नऊ कि मी )ही खुद्द जोधपूरमधील काही आकर्षणे याशिवाय बालसमद ( सात कि मी ), कैलाना ( अकरा कि मी ), सरदारसमद ( ५५ कि मी ), ही सरोवरे, धावा वाइल्ड लाईफ सँक्च्यरी ( ४५ कि मी ) ओसियाँची जैन मंदिरे, वाळूच्या टेकड्या ( सँडड्यून्स ) ( ६५ कि मी. ) ही आजूबाजूची इतर काही प्रेक्षणीय स्थळे

राजस्थानच्या वाळूतील सोनेरी स्वप्न म्हणजे जैसलमेर खुद्द जैसलमेरमधील पिवळ्या सँडस्टोनचा प्राचीन किल्ला, सोनेरी पिवळ्या संगमरवरातील नाजूक, जाळीदार नक्षीकामाच्या एकापेक्षा एक सरस हवेल्या भारावून टाकतात अतापर्यंत पसरलेल्या वाळूच्या टेकड्याचा महासागर पाहण्यासाठी मात्र जैसलमेरपासून ४० कि मी वरील 'सम' या गावी जाव लागत आसपासच्या एखाद्या खेडेगावात त्याच्यातीलच एक होऊन राहण्यासाठी 'कॅमल सफारी'चे आयोजनही होत

थरच्या वाळवंटाशी अहोरात्र झुंज घेणारे बिकानेर हे राजस्थानमधील आणखी एक गाव ( जोधपूर- बिकानेर २७५ कि मी , जयपूर- बिकानेर ३७८ कि मी रेल्वेने ) जैसलमेर पाहिल्यावर बिकानेरला गेल नाही, तरी चालू शकेल

राजधानी जयपूरमधील प्रेक्षणीय स्थळे म्हणजे हवामहल, सिटी पॅलेस, त्यातील म्युझियम, जंतर-मंतर, सेंट्रल म्युझियम, अंमेर किल्ला व अंबर राजप्रासाद ( ११ कि मी ), जयगड ( अंमेरच्या वर दीड कि मी ), नहरगड ( १५ कि मी ), सिसोदिया पॅलेस, गलता येथील गालव्य ऋषींचे मंदिर, इत्यादी

जयपूरहून १८५ कि मी ( आग्र्याहून ५१ कि मी ) वर येते भरतपूरचे विश्वविख्यात केवलघना पक्षी अभयारण्य हिवाळ्यात येथे देशोदेशींचे स्थलांतरित पक्षी येतात. भरतपूरखेरीज रणथंबोर ( जयपूरहून १४५ कि मी , सवाई माधवपूरपासून १३ कि मी ), सारिस्का ( जयपूर

जागी खडित प्रवास असूनही रेल्वेची सर्व आरक्षण हाती असल्याने सहल अगदी आरामशीर झाली

आपली आवड, वेळ, पैसा यानुसार वरील प्रवास मार्गात यथायोग्य फेरफार करून आपल्या प्रकृतीला मानवेल, असा सहल आराखडा आखता येईल राजस्थानात विदेशी पर्यटक फार मोठ्या संख्येने येत असल्याने पर्यटकाना अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत राजस्थानच अस्सल रूप न्याहाळण्यासाठी मात्र जैसलमेरपर्यंत जायला पाहिजे

आता राजस्थानमधील प्रेक्षणीय स्थळाविषयी थोडस

अहमदाबादहून माउट अबूपर्यंत थेट बसेस आहेत रेल्वेने अबू रोड स्टेशनला उतरून २८ कि मी वरील माउट अबूला रस्त्याने जावं लागत

माउट अबू हे राजस्थानमधील थड हवेचे ठिकाण मुख्यत विश्वविख्यात आहे ते तेथील डोळ्याच पारण फेडणाऱ्या नाजूक सगमरवरी कोरीव कामगिरीच्या दिलवाडा मदिराबद्दल (ही मदिरे फक्त दुपारी बारा ते सहा उघडी असतात) याखेरीज नख्खी लेक, अर्बुदा देवी, गुरू शिखर, सनसेट पॉइट या अबूतील इतर काही प्रेक्षणीय जागा

माउट अबूहून बसने १८५ कि मी वर आहे 'लेक सिटी ऑफ इडिया' म्हणून ओळखल जाणार सरोवर, बगीचे, राजवाडे यांनी सजलेल उदयपूर येथील सिटी पॅलेस, फत्तेसागर तलावातील नेहरू पार्क, मोतीमगरी टेकडीवरील महाराणाप्रतापच स्मारक, सहेलीयोंकी बाडी हे सुदर उद्यान, भारतीय लोककला म्युझियम, ही काही प्रमुख प्रेक्षणीय स्थळे

उदयपूरचा सर्व आसमतच सरोवरे, मठ-मदिरे, किल्ले आणि ऐतिहासिक स्थळे यानी समृद्ध आहे महाराण्याचे कुलदैवत एकलिगजी मदिर (२२ कि मी ), महाराणाप्रतापने मुगलसम्राट अकबराबरोबर दिलेल्या प्रखर लढतीची आठवण करून देणारी हलदी घाटी (४० कि मी ), वैष्णवाचे तीर्थस्थान, नाथद्वारा (४८ कि मी ), द्वारकाधीश श्रीकृष्णाचे कक्रोली मदिर व जवळील राजसमद सरोवर (६५ कि मी ), आशियातील दुसऱ्या क्रमाकाचे मोठे जयसमद सरोवर (४८ कि मी )

जैन मदिराच्या सगमरवरी कोरीव कारागिरीचा नेत्रदीपक आविष्कार उदयपूरपासून शभर कि मी वरील रणकपूरला बघायला मिळतो येथे ओतप्रोत नक्षीकामानी भरलेले १४४० लहान-मोठे सगमरवरी कोरीव खाब असून, एक खाब दुसऱ्यासारखा नाही

राजपुतांच्या अतुलनीय पराक्रमाच्या वीरगाथा लिहिलं गेलेल चितोड उदयपूरपासून ११५ कि मी वर येत (चितोड, उदयपूर-जयपूर रेल्वेमार्गावर असल्याने वाटेतही करता येईल ) तेरा कि मी परिसरात पसरलेला चितोडचा किल्ला उच टेकडीवर असून, तेथपर्यंत रिक्षा, बस, टॅक्सीने जाण सोयीस्कर रूपवती राणी पद्मिनीचा महाल, राणा कुभाचा राजवाडा, जोहाराच्या जागा, नऊ मजली विजयस्तभ, सत मीराबाईंचे मदिर, फत्तेप्रकाश राजवाड्यातील

सग्रहालय ही चितोड्ची काही स्मृतिस्थळे उदयपूरच्या आसमतातील ठिकाणे पाहण्यासाठी कमीत कमी तीन दिवस मुक्काम आवश्यक

हिंदू-मुस्लीम सस्कृतीचा मिलाफ असलेल्या अजमेरचे ( चितोड १९० कि.मी., जयपूर १३० कि मी ) हिंदूना आकर्षण वाटत ते तेथून अकरा कि मी वर असलेल्या पुष्कर तीर्थक्षेत्राबद्दल ( दर कार्तिक पौर्णिमेस मोठी यात्रा ) आणि मुस्लिमाना ख्वाजा मोइनुद्दिन चिस्तींच्या दर्ग्यासाठी मूळचे सस्कृत विद्यालय व हिंदू मदिरे पाडून केवळ अडीच दिवसात महमद घोरीने बाधलेली मशीद 'ढाई दिनका झोपडा,' 'अनासागर कृत्रिम तलाव' ही अजमेरमधील भेट देण्यायोग्य आणखी दोन ठिकाण

राजस्थानच्या वालवटी प्रदेशाच प्रवेशद्वार म्हणजे जोधपूर उच खडकावर बांधलेला ताबडा सगमरवरी अतिभव्य आणि प्रेक्षणीय मेहेरगड किल्ला, जसवत थडा, उम्मीदभवन पॅलेस, एकेकाळची मारवाडची राजधानी मडोर किंवा माडव्यपूर ( नऊ कि मी )ही खुद्द जोधपूरमधील काही आकर्षणे याशिवाय बालसमद ( सात कि मी ), कैलाना ( अकरा कि मी ), सरदारसमद ( ५५ कि मी ), ही सरोवरे, धावा वाइल्ड लाईफ सँक्च्यरी ( ४५ कि मी ) ओसियाँची जैन मदिरे, वाळूच्या टेकड्या ( सँडड्यून्स ) ( ६५ कि मी ) ही आजूबाजूची इतर काही प्रेक्षणीय स्थळे

राजस्थानच्या वाळूतील सोनेरी स्वप्न म्हणजे जैसलमेर खुद्द जैसलमेरमधील पिवळ्या सँडस्टोनचा प्राचीन किल्ला, सोनेरी पिवळ्या सगमरवरातील नाजूक, जाळीदार नक्षीकामाच्या एकापेक्षा एक सरस हवेल्या भारावून टाकतात अतापर्यंत पसरलेल्या वाळूच्या टेकड्याचा महासागर पाहण्यासाठी मात्र जैसलमेरपासून ४० कि मी वरील 'सम' या गावी जाव लागत आसपासच्या एखाद्या खेडेगावात त्याच्यातीलच एक होऊन राहण्यासाठी 'कॅमल सफारी'चे आयोजनही होत

थरच्या वाळवटाशी अहोरात्र झुज घेणारे बिकानेर हे राजस्थानमधील आणखी एक गाव ( जोधपूर- बिकानेर २७५ कि मी , जयपूर- बिकानेर ३७८ कि मी रेल्वेने ) जैसलमेर पाहिल्यावर बिकानेरला गेल नाही, तरी चालू शकेल

राजधानी जयपूरमधील प्रेक्षणीय स्थळे म्हणजे हवामहल, सिटी पॅलेस, त्यातील म्युझियम, जतर-मतर, सेंट्रल म्युझियम, अमेर किल्ला व अबर राजप्रासाद ( ११ कि मी. ), जयगड ( अमेरच्या वर दीड कि मी ), नहरगड ( १५ कि मी ), सिसोदिया पॅलेस, गलता येथील गालव्य ऋषींचे मदिर, इत्यादी

जयपूरहून १८५ कि मी ( आग्र्याहून ५१ कि मी ) वर येते भरतपूरचे विश्वविख्यात केवलघना पक्षी अभयारण्य हिवाळ्यात येथे देशोदेशींचे स्थलातरित पक्षी येतात. भरतपूरखेरीज रणथबोर ( जयपूरहून १४५ कि मी , सवाई माधवपूरपासून १३ कि मी ), सारिस्का ( जयपूर

दिल्ली रस्त्यावरील अलवार या १४३ कि मी वरील गावापासून ३४ कि मी. ) ही इतर काही महत्वाची अभयारण्ये राजस्थानमधील पूर्वीच्या राजेमहाराजानी तेथील भौगोलिक परिस्थिती जाणून अनेक कृत्रिम तळी-तलाव बांधले ते बाधतानाही कलात्मक अभिरूची वापरल्याने अनेक सौंदर्यस्थळे निर्माण झाली तसेच पाणथळ जागामुळे देशोदेशीचे पक्षीही येऊ लागले आपल्या प्रवासमार्गातील सोयीस्कर अशी यांपैकीची काही ठिकाणे आवड असणाऱ्याना पाहता येतील

तस म्हटल तर किल्ला, राजवाडा, कोरीव कारागिरीच्या छत्र्या ( समाध्या ), मदिरे ही राजस्थानच्या गावातील प्रमुख वैशिष्ट्ये वेळेनुसार काय पहाव, काय सोडाव ते ठरवाव राहण्यासाठी कमी-जास्त दरान अनेक हॉटेल्स असून, राजस्थान पर्यटन महामंडळाची निवासस्थाने तर त्याच्या दराच्या मानाने उच्च दर्जाची आहेत जयपूर, जोधपूर आणि उदयपूर येथे स्थानिक कुटुबात वास्तव्याची सुविधा राजस्थान पर्यटन महामडळातर्फे करण्यात आलेली आहे अधिक माहितीसाठी सपर्क ·

राजस्थान टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,
१००, जवाहरलाल नेहरू मार्ग, जयपूर ३०२ ००४

**खरेदी :** बाधणी, कोटा साड्या, खडे, चादी, लाख, मीनाकारी कामाचे अलकार, हातछपाईच्या कापडाचे बेड-शीटस्, कमी वजनाच्या कापसाच्या मऊ दुलया, पेंटिंग्ज, लाकूड, पितळ आणि पाढऱ्या धातूच्या कोरीव कारागिरीच्या वस्तू, जोधपूरी जोडे, इत्यादी

**खास स्थानिक खाद्यपदार्थ :** डाळ-बाटी, माव्याची कचोरी, बिकानेरी शेव, इत्यादी

**विशेष सूचना :** जोधपूर-जैसलमेर हा प्रवास शक्यतो रात्री करावा या भागातील दिवसाचा प्रवास फारच त्रासदायक असतो प्रवासात पाणी, खाद्यपदार्थ बरोबर ठेवावेत

* *




# मध्यप्रदेश

वैभवशाली इतिहास, निसर्गदत्त प्रसन्नता, वन्यप्राणी जीवन, कला, वास्तूशिल्पकला याच्या विविध दिमाखदार रूपानी समृद्ध अस आपल शेजारी राज्य म्हणजे मध्य प्रदेश पर्यटनदृष्ट्या मध्यप्रदेश अतिशय संपन्न असूनही तेथील पर्यटन स्थळाची विशेष माहिती नसल्याने अनेकदा त्याचा प्रवास बहुधा जाता-येताच घडत असतो

आडवाट करूनही मुद्दाम जाऊन पहावीत अशी कित्येक पर्यटनस्थळे मध्यप्रदेशात आहेत बऱ्याच ठिकाणपर्यंत थेट रेल्वे नसल्याने रेल्वे आणि बस असा या राज्याचा प्रवास जास्त सोयीस्कर होतो हे दोन्ही मार्ग वापरून मध्यप्रदेश राज्याच्या केलेल्या प्रवासाचा आमचा मार्ग होता पुणे-खाडवा बसने इदूर ( मांडू, ओंकारेश्वर, महेश्वर, उज्जैन )- भोपाळ ( साची, विदिशा, भोजपूर )- ग्वाल्हेर ( शिवपुरी )- झाशी ( उ प्र ) ( ओर्च्छा बस )- खजुराहो बस- जबलपूर- पिपरिया बसने- पचमढी बस- इटारसी पुणे

इदूरला मुक्काम करून माडू, ओंकारेश्वर, महेश्वर, उज्जैन करण सोयीस्कर पडत

बाझ बहादूर- राणी रूपमतीच्या प्रेमकहाणीने अजरामर झालेली आनदनगरी माडू-मांडवगड इदूरपासून १०० कि मी. येते प्राचीन राजवैभवाच्या खुणा माडूगडावर सुमारे ७५ जागी विखुरलेल्या असून जहाजमहाल, हिंदोळा महाल, अश्रफी महाल, चंपा बावडी, होशागशहाचे थडगे, जामा मशिद, रुपमतीच दालन ही त्यातील काही प्रमुख स्थाने.

बारा ज्योतिर्लिंगापैकीचे ओंकारेश्वर, उज्जैनीचा महाकालेश्वर, अहिल्यादेवीची राजधानी नर्मदातटीच्या सुदर घाटावरचे महेश्वर ही धार्मिक स्थळे आपल्या परिचयाची आहेत

भोपाळ ही मध्यप्रदेशाची राजधानी. जुन भोपाळ अगदी गलिच्छ असल तरी बडा तालाब किंवा ग्रेट लेक ही अतिशय रमणीय जागा याच्या जवळच भारत भवन ही प्रसिद्ध कला सस्था आहे

बौद्ध धर्मियांचे पवित्र स्थान साची भोपाळपासून ४५ कि मी वर असून साचीचा ग्रेट स्तूप किंवा स्तूप न १ हा सर्वांत भव्य. साचीपासून १२ कि मी वर विदीशा ही आणखी एक ऐतिहासिक नगरी येते. तेथील ४-५ शतकातील उदयगिरी गुफा प्रेक्षणीय आहेत

भोपाळहून ३० कि मी  वर असलेले भोजपूरचे भव्य शिवमदिर आणि भोपाळच्या दक्षिणेकडे ४० कि मी  वरील डोंगराळ प्रदेशातील दाट जगल आणि खडकाळ मुलुख्याच्या भागातील भिमबेटकाच्या अतिप्राचीन दगडी गुहाचा समूह ही पर्यटकांची आकर्षण स्थाने होऊ शकतात

एकेकाळची सस्थानी राजधानी असलेल्या ग्वाल्हेरच्या टेकडीवरील भव्य चिरेबदी किल्ला पाहिलाच पाहिजे  तानसेन आणि महमद घौसच स्मारक, राणी लक्ष्मीबाईंची समाधी, जीवाजीराव शिंदे म्युझियम ही ग्वाल्हेरमधील इतर काही प्रेक्षणीय स्थळे

ग्वाल्हेरपासून ११७ कि मी वर शिवपुरी हे सुरेख स्थान आहे  ग्वाल्हेरच्या पूर्वीच्या राजघराण्यातील लोकाचे हे उन्हाळी निवासस्थान

झाशी उत्तरप्रदेशात येत असली तरी पर्यटकाच्या दृष्टीने मध्यप्रदेशातच म्हणायला हवी राणी लक्ष्मीबाईंनी अमर केलेला झाशीचा किल्ला पाहिल्यावर झाशीपासून फक्त १५ कि मी. वर असलेल्या मध्यप्रदेशातील ओर्च्छा या मध्यमयुगकालीन इतिहासविश्वात भ्रमण करवून आणणाऱ्या, बेटवा नदीकाठच्या गावाला जायलाच हव

मध्य प्रदेशात जाणाऱ्या पर्यटकाला कुतुहलात्मक आकर्षण असत ते खजुरोहोच झाशीपासून रस्त्याने १७२ कि मी  खजुराहोच ही विश्वविख्यात शिल्पे येतात  खजुराहो थेट रेल्वेमार्गावर नाही  हरपालपूर ( ९४ कि मी  ), मोहोबा ( ६३ कि मी. ), सटणा ( ११७ कि मी  ) ही खजुराहो जवळची काही रेल्वे स्टेशन्स  येथून खजुराहोसाठी नियमित बससेवा आहे  खजुराहोची शिल्पमदिरे सूर्योदय ते सूर्यास्त उघडी असतात  खजुराहोपासून ४५ कि मी वरील पन्ना येथील भारतातील एकमेव हिऱ्याची खाण पर्यटकाना सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान पाहता येते  पन्नाच्या वाटेवरील पाडव फॉल्स, छत्रसाल महाराजाचा राजवाडा, पन्ना अभयारण्यही पाहता येईल

खजुराहोसारखच जबलपूरच्या नर्मदेच्या भेडा घाटाचही आपल्याला आकर्षण असत भेडा घाट जबलपूरपासून २३ कि मी  वर असून नर्मदेने खोदलेल संगमरवरी डोंगरकड्याच आश्चर्य पाहायला छोट्या बोटीतून जावं लागतं  बोटीची सुविधा नोव्हेंबर ते मेपर्यंत उपलब्ध असते  येथील नर्मदेचा धुवाधार धबधबाही अतिप्रेक्षणीय आहे

नर्मदेच उगमस्थान म्हणजे विंध्य पर्वतातील निसर्गरम्य अमरकटकला जाण्यासाठी जबलपूरहून ( २४६ कि मी. ) नियमित बससेवा आहे  मुख्यत  मध्यप्रदेशामधून होणारी नर्मदा परिक्रमा ही एक प्रमुख तीर्थयात्रा  पूर्वी ही प्रदक्षिणा पायीच करत. आजही असे लोक आहेत पण फार कमी  बसने सुमारे ४-४॥ हजार कि मी ची होणारी नर्मदा परिक्रमा यात्रा अजूनही तशी कष्टप्रदच म्हणायला हवी

मध्यप्रदेशाचा एक-तृतीयांश भाग जगलानी व्यापलेला असल्याने या राज्यात लहान-मोठी

बरीच अभयारण्ये आहेत वाघ हमखास दिसतोच अशी ख्याती असलेले कान्हा जबलपूरपासून १७३ कि मी वर येत मात्र जून अखेर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत पावसाळ्यामुळे हे अभयारण्य सर्वसाधारण पर्यटकाना बद असत बाधवगड हे मध्यप्रदेशमधील आणखी एक नावाजलेले राष्ट्रीय उद्यान (जबलपूर १९४ कि मी )

सातपुड्याच्या सदाहरित टेकड्यामधील पचमढी हे मध्य प्रदेशातील अतिरम्य थड हवेच ठिकाण पदभ्रमणाची आवड असणाऱ्याना तर पचमढी फारच आवडेल अलाहाबादमार्गे जाणाऱ्या मुबई-हावरा रेल्वे मार्गावरील पिपरिया या स्टेशनपासून रस्त्याने सुमारे ५० कि मी वर सुरेख पचमढी आहे पचमढीला नागपूरहून बसनेही ( २६२ कि मी ) जाता येत.

मध्यप्रदेश पर्यटन महामडळाची किफायतशीर दरातील निवासस्थाने सर्वत्र आहेत त्याच आरक्षण ५ दिवसांपेक्षा जास्त आधी करायच असेल तर सेंट्रल रिझर्वेशन्स, एम्. पी स्टेट टूरिझम डेव्हलपमेंट कार्पो लि , ४ था मजला, गगोत्री, टी टी नगर, भोपाळ ४६२ ००३ याच्याशी सपर्क साधावा

मध्यप्रदेश राज्य पर्यटक महामडळातर्फे आता मुबईहूनही या राज्यातील अनेक सहलींचे आयोजन करण्यात येत यासबधीच्या अधिक माहितीसाठी सपर्क

दि रेसिडेंट मॅनेजर, एम् पी टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, ७४ वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुबई ४०० ००५

पचमढी आणि कान्हा या प्रत्येकी तीन दिवसाच्या सहली नागपूरहूनही आयोजित केल्या जातात

महेश्वरी, चंदेरी साड्या, खजुराहोच्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, भेडा घाटावरील सगमरवर अथवा सगझिऱ्याच्या दगडातील मूर्ती वा कोरीव वस्तू, बस्तरच्या आदिवासींच्या कलात्मक वस्तू, इत्यादी खरेदी आपल्याला मध्यप्रदेश सहलीत करता येईल

* *




गुजरात

# गुजरात

राष्ट्रपिता महात्मा गाधी याचा गुजरात आणि आपला महाराष्ट्र १९६० पर्यंत एकत्रित असल्याने गुजरातला बंधू राज्य म्हणण औचित्यपूर्ण ठरेल आजही बडोदा, अहमदाबादसारख्या गावी अनेक मराठी भाईबद वास्तव्य करून आहेत गुजरातच वेगळे राज्य झाल्यावर अहमदाबाद त्याची राजधानी झाली सध्याची राजधानी गाधीनगर ही अहमदाबादपासून २३ कि मी वर आहे

पुण्या-मुबईहून गुजरातकडे जाणाऱ्या अनेक बस / रेल्वे गाड्या असून रेल्वे बॉंबे सेंट्रलहून सुटतात पुण्याहूनही आता अहमदाबादसाठी आठवड्यातून एकदा १०९६ अहिंसा एक्सप्रेस आहे अहमदाबादला जाताना वाटेत नाशिकपासून ८२ कि मी वर असलेल सापुतारा हे सह्याद्रीतील गुजरातमधील छोटेखानी रम्य थड हवेच ठिकाण लागत ( मुबई बुकिंग दि रिजनल मॅनेजर, टूरिझम कॉर्पोरेशन ऑफ गुजरात लि , धनराज महाल, अपोलो बदर, मुबई ४०० ०३९ )

याशिवाय लागतात ती मराठा सस्कृतीशी जवळीक साधणार बडोदा ( आताच वडोदरा ), तसेच सूरत, भडोचसारखी व्यापारी गाव वडोदऱ्याला मोठा इडियन पेट्रोकेमिकल्स कॉम्प्लेक्सही आहे

मुबईपासून १७० कि मी वर असलेल वापी हे गुजरातमधील एक मोठ औद्योगिक गाव वापी रेल्वे स्टेशनपासून १३ कि मी वर दमण येत

वडोदरा-अहमदाबाद रस्त्यावर ( वडोदरा ८९ कि.मी , अहमदाबाद ९२ कि मी ) डाकोरच सुप्रसिद्ध कृष्णमदिर येत येथे भगवान श्रीकृष्णाला रणछोडजी म्हणण्यात येत ( मदिराचा दरवाजा दु. १ ते ४ बद ) आणदचा दूध-भुकटी आणि दुग्धजन्य पदार्थ करण्याचा याच मार्गावरील कारखाना ( डाकोर ३० कि मी ) पूर्वपरवानगीने पाहता येईल

अहमदाबादची प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे साबरमती आश्रम, गीता मदिर, अक्षरमदिर, कांकेरिया तलाव, त्याजवळील टेकडीवरील बाळवाटिका, जुम्मा, राणी रूपमतीसारख्या मशिदी, कॅलिको म्युझियम ऑफ टेक्सटाईल्स, इ

अहमदाबादपासून ६१ कि मी वरील नळ सरोवरात ३०० पेक्षा अधिक जातींचे पक्षी दिसू शकतात अहमदाबादहून भावनगरला ( २१२ कि मी. ) जाताना ८० कि मी वरील लोथल येथे मोहेंजोदरो-हडाप्पासारख्या एका प्राचीन नगरीचे उत्खनन केलेले अवशेष पहायला मिळतात

भावनगर या खंबायतच्या आखातातील बंदरगावी सेंट्रल सॉल्ट अँड मरिन रिसर्च इन्स्टिट्यूट असून भावनगरला मुख्यत जायच ते पलिताणाची जैन मदिर पहायला गिरनार, शत्रुंजय, समेदशिखर, अबू आणि तरग या पाच पवित्र पर्वतापैकी मुख्यत्वे श्वेतांबरी श्रावकाचे पुण्यक्षेत्र असलेला शत्रुंजय पर्वत पलिताण्याला लागून उभा आहे सुमारे दोन हजार फूट उंचीच्या आणि सहा हजार पायऱ्या असलेल्या या डोंगराच्या माथ्यावर सुमारे ९०० लहान-मोठी मदिरे आहेत या सर्व मदिर समुहातील श्री आदिनाथाचे प्रशस्त सगमरवरी मदिर हे प्रमुख वर जाण्यासाठी डोल्या मिळू शकतात. श्रावकाना डोंगरावर जेवणखाण वर्ज्य असून वस्तीही करायची नाही, असा नियम आहे.

जैन धर्मियाच्या गिरनार या आणखी एका पवित्र पर्वतावर जाण्यासाठी भावनगरपासून २१५ कि मी वर असलेल्या जुनागडला जाव लागत जुनागडपासून ५ कि मी वर हा गिरनार किंवा पुराणप्रसिद्ध रैवतक पर्वत आहे गिरनारशी शाक्त, दत्त आणि जैन हे तीन धर्मसप्रदाय निगडित असले तरी यात्रेकरूत जैन बहुसख्येने असतात कारण पलिताण्याची यात्रा सुफळ होण्यासाठी गिरनार चढायला हवा, असे जैन धर्मशास्त्र सागते गिरनारची चढाई दहा हजार पायऱ्याची असून दत्त आणि गोरक्ष या दोन शिखराच्या मध्ये जैनाचे बाविसावे तीर्थंकार भ नेमिनाथ याचे पवित्र मदिर आहे वर जाण्यासाठी डोल्या, खुर्च्या मिळतात

सिंहासाठी ख्यातनाम असलेल गीरच अभयारण्य बघण्यासाठी जुनागडहून सासनगीरला जाव लागेल गीर आणि सोमनाथसाठीच वेरावळ हे रेल्वे स्टेशन ( वेरावळ-सासनगीर एक तासाचा रस्ता ) गीरच्या अभयारण्यात हिंडण्यासाठी जगल खात्यातर्फे जीप्स मिळतात ( सीझन ऑक्टोबर मध्य ते जून मध्य ) मात्र सिंह दिसतीलच, याची खात्री नाही राहण्याचीही सुविधा आहे ( सपर्क असिस्टट डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन, रगमहाल, जुनागड )

बारा जोतिर्लिंगापैकी एक सोमनाथ गुजरातमधील सौराष्ट्र भागात येत. सोमनाथपासून ५ कि मी.वरील वेरावळ हे यासाठीच रेल्वे स्टेशन गुजरातमधील बहुतेक सर्व ठिकाणाहून ( सासनगीर बसने ४८ कि मी ) सोमनाथला बसेस आहेत. इतिहासकाळात या मदिराचा परधर्मीयाकडून अनेकदा विध्वस झाला भारत स्वतत्र झाल्यावर तत्कालीन केंद्रीय गृहमत्री गुजरातचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यानी सोमनाथचा पुनरुद्धार करून मंदिराच्या मूळ पीठिकेवरच नव्या मदिराची कलापूर्ण उभारणी केली मुख्य मदिराभोवती अनेक

लहान-मोठी देवालय, तीर्थकुड आहेत सोमनाथच्या पूर्वेला एक-दीड कि मी वर हिरण्या, सरस्वती व कपिला नद्याचा त्रिवेणी सगम असून भगवान श्रीकृष्णानी इथ जवळच भालुका तीर्थावर देहत्याग केला अस मानण्यात येत

वेरावळपासून ३० कि मी वर आणि जुनागडपासून ६५ कि मी वर 'चोरवाड' हे सागर किनाऱ्यावरील रम्य ठिकाण असून येथील जुनागडच्या महाराजाच्या उन्हाळी निवासस्थानाच आता भव्य पर्यटन खात्याच्या हॉटेलमध्ये रूपातर करण्यात आल आहे

महात्मा गाधींचे जन्मस्थान पोरबदर जुनागडपासून १०७ कि मी वर येत समुद्रकिनाऱ्यावरील या छोट्या गावातील गाधीजींच्या जन्मघराच जतन करण्यात आल असून कीर्तिमंदिर स्मारक सग्रहालय उभारण्यात आल आहे

श्रीकृष्णाची द्वारका नगरी हे प्राचीन पुण्यक्षेत्र पोरबदरपासून १२४ कि मी वर असून तेथील द्वारकाधीश किंवा रणछोडजींचे भव्योत्तुग मदिर, रुक्मिणी मदिर, आद्य शकराचार्यांनी स्थापलेला शारदापीठ मठ, भद्रकेश्वर, भद्रकाली मदिर ही काही श्रद्धास्थान द्वारकेत इडॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, वेदपाठशाळा- वेदभवनही असून येथील ए सी सी. सिमेंट फॅक्टरी, द्वारकेपासून ३२ कि मी वरील ओखा बदराच्या रस्त्यावर असलेला ( २२ कि मी ) टाटा केमिकल्सचा कारखाना आधी परवानगी काढून पाहता येईल

ओखा बदरापासून समुद्रात ५ कि मी. अतरावरे बेट द्वारका असून तीच मूळची द्वारका असल्याचे मानण्यात येते तेथे जाण्यासाठी यान्त्रिक/वल्ह्याच्या नावा मिळतात.

द्वारकेपासून १८० कि मी वर येत रजपूताची एके काळची राजधानी आणि रणजी ट्रॉफीचे प्रणेते विख्यात क्रिकेटियर प्रिन्स रणजी याच जामनगर. बाधणी साड्या आणि नवरात्रातील गरबा नृत्यासाठी जामनगर ख्यातनाम आहे याखेरीज येथील सुरसागर तलाव, त्यातील राजवाडे, जैन मदिर इत्यादी प्रेक्षणीय आहेत

जामनगरनतर येणार राजकोट ( जामनगर १३७ कि मी , जुनागड १०३ कि मी , अहमदाबाद २२० कि मी. ) हे गुजरातमधील पूर्वीचे एक सस्थान म गाधींचे वडील या सस्थानात दिवाण असल्याने त्याच्या बालपणीच्या अनेक स्मृती या गावाशी निगडित आहेत त्याचे राहते घर म्हणजे सध्याचे बालमदिर. येथील ज्युबिली गार्डन, वॅटसम म्युझियम, कलकत्याच्या बेलूर मठाची प्रतिकृती रामकृष्ण मदिर, खास राजकुमारासाठीच राजकुमार कॉलेज, हाजीधरण या काही भेट देण्याच्या जागा

राजकोटहून मोरवी ( परशुराम पॉटरीज्चा कारखाना ) मार्गे गाधी धाम या काडला 'फ्री पोर्ट'च्या गावी जाता येईल अहमदाबाद-गाधी धाम अतर ३८५ कि मी असून मुबईहून तेथे थेट रेल्वे आहे

गुजरातमधील कच्छचे रण हा एक भौगोलिक वैशिष्ट्यपूर्ण भाग पाहायला हवा

पावसाळ्यात पावसाच पाणी आत येऊन सर्वत्र खारी दलदल माजते उन्हाळ्यात हा उजाड, रखरखीत होतो हिवाळ्यात मात्र फ्लेमिंगोसारखे पक्षी येथे वास्तव्याला येतात भूज ही एके काळच्या कच्छ सस्थानाची राजधानी हस्तकला वस्त्रोद्यासाठी प्रसिद्ध. भूजला भारतीय वायुसेनेचा मोठा तळ असून तेथील म्युझियम, तलाव, जुना राजवाडा, छत्र्या या काही प्रेक्षणीय गोष्टी

अहमदाबादहून राजस्थानमधील सगमरवरी कारीव कारागिरीच्या दिलवाडा मदिराच थड हवेच ठिकाण माउट अबू आणि सरोवराच गाव उदयपूर (दोन्ही सुमारे २०० कि मी ) यानाही भेट देण सोयीच होत

गुजरात तसेच राजस्थानमधील वरील काही सहलींचे आयोजन राज्य पर्यटन महामडळातर्फे करण्यात येत अधिक माहितीसाठी सपर्क

टूरिझम कॉर्पोरेशन ऑफ गुजरात लिमिटेड, टूरिस्ट इन्फर्मेशन ब्युरो, एच के हाऊस, टाईम्स ऑफ इंडियाजवळ, आश्रम रोड, अहमदाबाद ३८० ००९

* *




# आंध्र प्रदेश

अद्याक्षरक्रमानुसार पहिल आणि भाषिक तत्त्वानुसार स्थापन झालेल पहिल राज्य म्हणजे आपल्या शेजारच आंध्र प्रदेश मुस्लिम सस्कृतीचा ठसा असलेल हैदराबाद ही आंध्र प्रदेशची राजधानी हैदराबाद, सिकदराबाद ही जुळी शहरे (रेल्वे स्टेशन्समधील अतर सुमारे १० कि मी )

७०३१ बॉम्बे-हैदराबाद एक्सप्रेस ही हैदराबादला जाणारी सोयीस्कर गाडी रात्रीची २१०१ मिनार एक्सप्रेस सिकदराबादला जाते

५३ मीटर उचीची चारमिनार ही ऐतिहासिक वास्तू हैदराबादच्या भर गावठाणातील गजबजलेल्या बाजारातील रस्त्यावर असून शेजारीच हैदराबादची सर्वात जुनी जामा मशीद आहे जवळच्या मक्का मशिदीत एकावेळी दहा हजार लोक नमाज पढू शकतात

चारमिनारसारख हैदराबादचे आणखी एक ऐतिहासिक प्रेक्षणीय स्मृतिस्थान म्हणजे

गोवळकोंड्याचा किल्ला ( ८ कि मी. ) सुलतान कुतुबशहानी राज्य केलेल्या या किल्ल्यात ध्वनिशास्त्राचा अतिशय अचूक वापर संदेश देण्यासाठी करण्यात आलेला दिसतो गोवळकोंडा हिऱ्यांच्या व्यापाराचे केंद्र म्हणून मान्यता पावलेला होता मौल्यवान कोहिनूर हिरा येथलाच किल्ल्याबाहेर कुतुबशाहीतील गोवळकोंड्याच्या सुलतानाची थडगी निद्रस्थ आहेत

सालारजग म्युझियम बघितल्याखेरीज हैदराबाद भेटीच समाधान मिळतच नाही ( दर शुक्रवारी बंद ) या हैदराबादच्या संस्थानिक निजामाच्या प्रधानमंत्री सालारजंग ( तिसरा ) याने स्वत:चे तन, मन, धन खर्च करून देशोदेशीच्या कलात्मक वस्तूचा खजिना जमा केला सालारजग म्युझियममध्ये जगातील सुमारे ३५००० दुर्मिळ वस्तूचे अभूतपूर्व प्रदर्शन पाहायला मिळत वेळ मात्र भरपूर ठेवून जायला हव

हैदराबाद रेल्वे स्टेशनपासून सात कि मी वर असलेल्या विस्तीर्ण नेहरू प्राणीसग्रहालयात सुमारे २५० जातींचे प्राणी नैसर्गिक वातावरणात मोकळेपणान व्यवहार करताना दिसतात ( दर सोमवारी बद ) या नेहरू झुलॉजिकल पार्कसाठी अर्धा दिवस तरी हवा. उस्मानिया युनिव्हर्सिटी, गगनविहार पब्लिक गार्डन, बिर्ला मदिर, लेपाक्षी हँडीक्राफ्ट एम्पोरियम, वीस कि.मी वरील हिमायतसागर व उस्माननगर सरोवरे ही हैदराबादची इतर काही प्रेक्षणीय स्थळे याखेरीज न्यूट्रीशन रिसर्च सेंटर, इडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी यासारख्या सस्थाही हैदराबादमध्ये आहेत

कृष्णा नदीवरचे प्रचड धरण नागार्जुनसागर ( हैदराबाद १५० कि मी ) मुद्दाम जाऊन बघावे असे ३८० चौरस कि.मी मध्ये पसरलेला धरणाचा विस्तीर्ण जलाशय पाहून अक्षरश सागराचा भास होतो प्राचीन काळी धरणाच्या खोऱ्यातील विजयपुरी नगरीतील डोंगरावरील विहारात वास्तव्य करून असलेल्या नागार्जुन या बौद्ध आचार्यांचे नाव या धरणास देण्यात आल आहे नागार्जुनसागरामध्ये तयार झालेल्या बेटावर नागार्जुनकोंडातील ( कोंड म्हणजे डोंगर ) उत्खननात सापडलेले अवशेष सग्रहित करण्यात आलेले आहेत हे सग्रहालय पाहण्यासाठी यात्रिक बोटीतून जाण्याची सुविधाही आहे

बारा जोतिर्लिंगापैकी एक श्री शैलम्- मल्लिकार्जुन हैदराबादपासून २२० कि मी वर येत. सभोवतालचा भाग व्याघ्र प्रकल्प म्हणून प्रसिद्ध आहे. श्री शैलम्चे देऊळ मोठे आणि परिसर सुरेख असून विविध सस्थाच्या धर्मशाळाही आहेत हैदराबादहून श्री शैलमूला जाण्यासाठी बसेस असून पर्यटन विभागातर्फे दर शनिवारी श्री शैलम्ची कडक्टेड टूर निघते

दक्षिण भारतातील सर्वात मोठे म्हणावे असे तीर्थस्थान तिरुपती, आध्र प्रदेशातच येत ( हैदराबाद सुमारे ६५० कि मी ) असल तरी तिरुपतीच्या तिरुमल्ला बालाजीचे दर्शन मद्रासला ( १५० कि.मी ) जाते वेळी घेणे सोयीस्कर. आध्र प्रदेशमधील पूर्व किनाऱ्यावरील बदर विशाखापट्टणम् ( हैदराबाद ६४० कि मी ) आणि उद्योगधद्याचे विजयवाडा ही पर्यटकांच्या

दृष्टीने तशी दूरच

हैदराबाद आणि आसपासची सहल ३-४ दिवसात आरामात होऊ शकते श्री शैलम्साठी एखादा दिवस अजून आध्र प्रदेश राज्य सरकारी पर्यटन मडळातर्फे हैदराबाद शहर आणि या राज्यातील इतर सहलींचे आयोजन करण्यात येते वाहनेही भाड्याने दिली जातात, यात्री-निवासी या त्याच्या निवासस्थानात राहण सोयीच पडत (चेक आऊट टाईम २४ तास)

अधिक माहितीसाठी संपर्क :

१] आध्र प्रदेश ट्रॅव्हल अँड टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड
यात्री निवास कॉम्प्लेक्स, एस. पी रोड, सिकंदराबाद ५०० ००३

२] आंध्रप्रदेश टूरिझम. पहिला मजला, गगन विहार,
एम जे रोड, हैदराबाद ५०० ००१

* *




# कर्नाटक

भुलवणाऱ्या एकाहून एक सुदर स्थळानी नटलेल कर्नाटक राज्य म्हणजे पर्यटनप्रेमींची जणू पंढरीच विविध उद्योग व्यवसाय, सस्थानी भरभराटीला आलेल आणि तरीही औद्योगिकरणाच्या प्रदुषणापासून दूर असे रम्य उद्यानाच बगलोर ही या राज्याची राजधानी बगलोर, म्हैसूर, उटी ही कुठल्याही ऋतूत कोणालाही सहजतेने करण्याजोगी अत्यत आकर्षक सहल

मुबई/पुण्याहून बंगलोरला नेणाऱ्या अनेक बसेस, रेल्वे असून त्या सुमारे २२-२४ तास घेतात

एवढ औद्योगिकीकरण होऊनही बकाली न आलेलं बंगलोर शहर नुसत हिंडत रहाव इतक मनोरम आहे वेळ आणि आवड यानुसार तेथील प्रेक्षणीय स्थळे (लाल बाग, विधानसभा, विश्वेश्वरअय्या औद्योगिक सग्रहालय, कर्नाटक आर्टस् अँड क्राफ्ट एम्पोरियम, तसेच आधी परवानगी काढून एच एम टी , भारत इलेक्ट्रॉनिक्स, इंडियन टेलिफोन इडस्ट्रीज,

नॅशनल एरोनॉटिकल लॅबोरेटरी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, इत्यादी) पाहून रस्त्याने १३८ कि मी. वरील म्हैसूरला जाता येईल बंगलोर-म्हैसूर दरम्यान दर पंधरा मिनिटांनी बसेस धावत असतात

कर्नाटकची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बगीचे, राजवाड्यांच्या शांत म्हैसूरला कमीत कमी ३-४ दिवस मुक्काम आवश्यक दसरा हा म्हैसूरचा खास सण, मुद्दाम जाऊन बघण्याजोगा लता-वेली रंगमय फुलांनी सुशोभित कमानींच्या साथीने नर्तन करणाऱ्या बहुविध आकाराच्या कारंज्यांनी मनोवेधक झालेलं, रात्रीच्या रंगीत प्रकाशझोतात स्वर्गविहाराचं नेत्रसुख देणार, कृष्णराजसागर धरणाकाठचं वृंदावन गार्डन हे म्हैसूरचं मुख्य आकर्षण याखेरीज येथील राजप्रासाद, सरकारी सँडलवुड आणि सिल्क फॅक्टरी, प्राणीसंग्रहालय, इ प्रेक्षणीय

म्हैसूरला लागूनच असलेल्या चामुंडी टेकडीवर म्हैसूर राजघराण्याचं देवस्थान असलेलं चामुंडेश्वरीचं द्राविड शैलीतील मंदिर असून त्याच्या अलिकडे थोड्या अंतरावर महिषासुराचा भव्य, उग्र, अन् शस्त्रसज्ज पुतळा आहे याच चामुंडी हिलवर अखंड शिलेतून घडवलेला, चौथऱ्यावर विश्रब्धपणे बसलेला जगप्रसिद्ध अतिप्रचंड सालंकृत नंदी आहे

म्हैसूरच्या उत्तरेस १६ कि मी वर असलेल्या ऐतिहासिक स्मृतिस्थळांनी समृद्ध अशा श्रीरंगपट्टण या टीपू सुलतानाच्या राजधानीचं दर्शन घ्यायला हवं टिपू सुलतानाचा 'दर्यादौलत' हा उन्हाळी राजमहाल आजही पर्यटकांना आकृष्ट करतो

म्हैसूरहून करायला हवी अशी श्रवणबेळगोळ (८० कि मी ) बेलूर (१५५ कि मी ), हळेबीड (बेलूरपासून १६ कि मी ) ही सहल दिगंबर जैनांचे तीर्थस्थान असलेल्या श्रवण बेळगोळ्याला डोंगरमाथ्यावरील अखंड शिलेत केलेला १७ मीटर्स उंचीचा गोमतेश्वराचा भीमकाय पुतळा बघायला मिळतो चामुंडरायाने हे महाशिल्प निर्माण केले पुतळ्याच्या पायापाशी तसा मराठीतील शिलालेख दिसतो

१२ व्या शतकातील होयसळ मंदिर शिल्पकलेचे नाजूक कोरीव कामाचे अत्युत्तम, अप्रतिम नमुने पाहण्यासाठी बेलूर, हळेबीडला जायलाच हवे होयसळ कलाकारांनी निर्मिलेले सर्वांगसुंदर शिल्प म्हणजे बेलूरचे चेन्नाकेशव (म्हणजे सुंदर नारायण) मंदिर

उटकमंड किंवा उटी हे मोहक थंड हवेचे ठिकाण तामिळनाडूत येत असलं तरी ते बंगलोर-म्हैसूर सहलीतच करणं सोयीचं म्हैसूरहून उटीला (१६० कि मी.) जाण्यासाठी खूप बसेस असून एक दिवसीय कंडक्टेड टूर्सही निघतात टॅक्सीने गेल्यास मध्य वाटेतील बंदिपूर, मदुमलई अभयारण्यात थोडा फेरफटका मारता येईल

हिरवी गर्द झाडी, कॉफीचे मळे, मसाल्याच्या पदार्थांच्या बागा, भात शेती यांनी लावण्यमय झालेला कूर्ग हा कर्नाटकातील सर्वांत सुंदर जिल्हा म्हैसूरहून १२५ कि मी वर असलेल्या

मेडिकरी या कूर्ग जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणाची भेट तेथील देखण्या निसर्ग, लोकजीवनाची जवळीक घडवून आणेल

मगलोर हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कर्नाटकमधील एक महत्त्वाचे बदर मेडिकेरीपासून १४५ कि मी वर येते दादर-मगलोर थेट रेल्वेही आहे मगलोरजवळील 'धर्मस्थळ' या शात ठिकाणाची ओढ बऱ्याच श्रद्धावताना वाटते मोठा सुदर समुद्र किनारा लाभलेले कारवार ( हुबळी १६१ कि मी ) हे कर्नाटकातील आणखी एक निसर्गरम्य ठिकाण तेथून ५६ कि मी वर येते 'गोकर्ण महाबळेश्वर' हे भाविकाचे पवित्र तीर्थक्षेत्र

राजा, राणी, रॉकेट आणि रोअरर अशा चार प्रवाहातून गर्जत २६० मीटर्स खाली झेप घेणारा गिरसप्पा अथवा जोग फॉल्स हा कर्नाटकातच येतो आडवाटेला ( बिलूरहून तालगुप्पा रेल्वे स्टेशन १६ कि मी रस्त्याने सागर ३४ कि मी , शिमोगा १०० कि मी ) कष्ट घेऊन गेल्यावर डोळ्याच पारण फेडणारा एके काळचा हा अतिसुदर धबधबा शरावती नदीवर बाधलेल्या धरणामुळे भरपूर पाण्याअभावी रोडावल्यासारखा झाला आहे

कर्नाटक राज्यातील विजापूर, बदामी, ऐहोळ, पट्टद्कल, हपी ही गतइतिहासात विहार करवून आणणारी पण विशेष न रूळलेली सहल कर्नाटकाचा हा भाग उष्ण, रूक्ष असल्याने उन्हाळा सोडून तिकडे गेलेल चागल

रेल्वे मार्गावरील सोलापूरपासून १०० कि मी वर आदिलशाही विजापूर येत विजापूरला थडगी, कबरींच गाव म्हणाव लागेल त्यातील प्रमुख म्हणजे महमद आदिलशहाची कबर असलेला जगप्रसिद्ध गोलघुमट. एका अगदी बारीकसुद्धा आवाजाचा आठ-दहा वेळा प्रतिध्वनी निर्माण करणारी गोलघुमटाची 'व्हिस्परिंग गॅलरी' स्थापत्यशास्त्राची आणि त्याच्या निर्मात्याची एक अद्भूत कौशल्यपूर्ण रचना आहे विजापुरात मशिदींचीही कमी नाही दोन-अडीच हजार माणस नमाज पढू शकतील अशी भव्य जुम्मा मशीद ही त्यातील प्रमुख इब्राहिम रोझा कबर, असर महाल, मुलुखमैदान तोफ यासारखी इतिहास जागवणारी अनेक स्मारके ढासळलेल्या तट-भिंतींच्या साथीने विजापूरमध्ये जागोजाग दिसतात

चालुक्याची राजधानी असलेली बदामी विजापूरपासून १२० कि मी वर असून तेथील बनशकरीचे मदिर आणि गुफा/लेण्यातील शिल्पकला प्रसिद्ध आहे बदामीपासून १४ कि मी वरील पट्टद्कल आणि बदामीच्या पूर्वेस २६ कि मी वर असलेले ऐहोळ येथील अनेक लहान-मोठी मदिरे ५-६व्या शतकातील वास्तुशिल्पकलेच दर्शन घडवितात

तुगभद्रातीरीच हपी ( लोखडाच्या कारखान्यासाठी प्रसिद्ध होस्पेटपासून ११ कि मी ) म्हणजे सोळाव्या शतकातील विजयानगर साम्राज्याची राजधानी आजही हपीत वैभवाची साक्ष देणारे अनेक अवशेष वीस चौरस कि मी च्या परिसरात विखुरलेले आहेत हपीच विठ्ठल मदिर हा या सर्व अवशेषातील मेरुमणी या मदिराच्या खाबातून वाद्याचे नाद निघतात

एकाच दगडात कोरलेला अत्यत प्रमाणबद्ध असा विजयनगरचा सुप्रसिद्ध रथ याच आवारात आहे रामायणातील किष्किधा हंपीजवळच होती परिसरात टेकड्या, दगड खूप असल्याने सर्व राजधानीच दगडातून निर्माण केली गेली असावी हपीच पपापती विरूपाक्ष मंदिरही प्रसिद्ध आहे

ही झाली कर्नाटकातील काही महत्त्वाची पर्यटनस्थळे याशिवाय हे राज्य अनेक लहान-मोठ्या निसर्गरम्य, मानवनिर्मित सुरेख स्थळानी सपन्न आहे या राज्यात पर्यटन व्यवसाय अत्यत सुसबद्धरीत्या चालविण्यात येत असल्याने पर्यटकाना तस विशेष कोणत्याच अडचणींना तोंड द्याव लागत नाही कर्नाटक स्टेट टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ( के.एस टी डी सी. ) तर्फे राज्यातील अनेक सहलींचे आयोजन केले जाते तसेच टॅक्सी, बसेस भाड्यानेही मिळतात अनेक खासगी हॉटेल्सबरोबर ठिकठिकाणी असलेल्या के एस टी डी.सी च्या निवासस्थानातून किफायतशीर दरात राहता येत

आरक्षण आणि अधिक माहितीसाठी सपर्क के एस टी डी. सी हेड ऑफिस, १०/४, कस्तुरबा रोड, बगलोर ५६० ००१

* *




# कूर्ग

'कूर्ग' कर्नाटकातील सर्वांत सुदर जिल्हा 'कूर्ग' हे नाव कानडीतील 'कोडगु' म्हणजे चढाचा रस्ता, घाटी यापासून पडलं असावं या प्रदेशाच्या डोंगराळ उच-सखलपणामुळे ब्रिटिशाच्या काळात त्याला काही वेळेस 'वेल्स ऑफ इडिया' म्हणून सबोधण्यात येत असे गर्द झाडीच्या येथील अनेक टेकड्याची उची ५००० फूटाहून अधिक आहे ३८०० फूट, उचीवरील मडिकेरी ( पूर्वीच मरकारा ) हे कूर्ग जिल्ह्याच मुख्यालय म्हैसूरहून हळूवार चढाचा रस्ता दाट होत जाणाऱ्या हरितवृक्ष-वेलींच्या साथीने १२५ कि मी वरील मडिकेरीला घेऊन जातो ( मगलोर १४५ कि मी ) वाटेतील एके ठिकाणची भगव्या कपड्यातील बौद्ध भिक्षूची वर्दळ लक्ष वेधून घेते दलाईलामाबरोबर तिबेटमधून आलेल्या काही निर्वासिताच कुशालनगरजवळ पुनर्वसन करण्यात आलेलं आहे रस्त्याच्या दुतर्फा दिसणारे तुकतुकीत

काळपट-हिरवे कॉफीचे मळे, सत्र्याच्या बागाबरोबर मडिकेरी जवळ आल्याचं सागू लागतात

मडिकेरीसारखी मध्यवर्ती दुर्गम जागा मड्डुराजाने १६८१ मध्ये निवडली आणि आपली राजधानी हुलेरीहून जास्त सुरक्षित म्हणून मडिकेरीला हलविली त्यानतर लिंगे राजाने गावाच्या दक्षिणेस किल्ला बाधला टिपू सुलतानने किल्ला आणि आतील राजवाडा या दोन्हीच बाधकाम पक्क्या विटानी पुन्हा बाधून घेऊन त्याला जाफराबाद अस नाव दिल सध्या या किल्ल्यातील इमारतीत सरकारी कचेऱ्या कोर्ट, म्युझियम, इ आहेत वरून हिरव्यागार डोंगरउताराच्या कॅन्व्हसवर घर-रस्त्याच नक्षीकाम असलेल्या मडिकेरीचा मनोहारी देखावा दिसतो जवळच शिवभक्तांच महत्त्वाच स्थान, तळ्याकाठच ओंकारेश्वर मदिर असून नोव्हेंबरच्या अखेरीस या देवालयात मोठा उत्सव साजरा करण्यात येतो.

देखण्या, सुसस्कृत आणि शूर कुळीच्या फोडवाची मातृभूमि असलेल्या कूर्गने आपल्याला जनरल करिअप्पा, थिमय्या याच्यासारखे अग्रगण्य, कुशल सेनानी दिले आपल्या हॉकी सघातले धडाडीचे हॉकीपटू सोमय्या, गणेश, गोविंदा याच भागातले कूर्गी लोकाच्या विलक्षण चालीरीती, विशिष्ट पद्धती, पोशाखाच्या विवक्षित तऱ्हा, त्याचे सण, उत्सव, तेथील हवामान आणि सृष्टीसौंदर्य या सर्व गोष्टींना स्वत च अस एक वेगळेपण आहे मार्च सोडला तर पावसाची हजेरी ही बहुधा रोजचीच पण उचीमुळे हवामान फार आल्हाददायक

'दक्षिणेकडील गगा' गणली गेलेली कावेरी आणि तिच्या उपनद्यानी, कूर्गला अधिक सुजलाम्, सुफलाम् केलय या लोकाच सर्व जीवनच कावेरीवर अवलबून असल्याने या जीवनदायी नदीची देवी समजून भक्तिभावान पूजा केली जाते म्हणूनच कूर्गच सर्वात पवित्र यात्रेच ठिकाण म्हणजे कावेरीच उगमस्थान 'तल कावेरी '

मडिकेरीपासून ४६ कि मी वर ब्रह्मगिरी डोंगर उतरणीवरील मोहक निसर्गसौंदर्याच्या कोंदणात असलेल्या तलकावेरीला (उची १४२५ मीटर्स) जाताना कूर्गच्या प्रदूषणमुक्त शात, लोभस, सृष्टीसौंदर्याच दर्शन घडत

गर्द जगलाचे डोंगरमाथे, तजेलदार कॉफीचे मळे, सत्री, वेलदोडे, दालचिनी, मिरी यासारख्या मसाल्याच्या पदार्थांच्या बागानी, पाचूच्या रगछटा ल्यालेले डोंगरउतार, आणि त्याखालील सपाट खोऱ्यातील हसतमुखी भातशेतीचा गालिचा ताजगी देणारे हिरवेगार मळे, वृक्षवेलींच्या समेलनात अवचित दिसणार टुमदार घरकुल तलकावेरीचा सहा-सात किलोमीटरचा घाट चढायच्या आधी असलेल्या भागमडल गावातील भागमडलेश्वराचे देवालय प्रसिद्ध असून येथील कावेरीच्या पाण्यात स्नान करून वर दर्शनाला जायच अशी प्रथा आहे भागमडलाला कावेरी, सुजोती, कनिका या नद्याचा सगम असून त्यातील सुजोती ही जमिनीखाली एखादे गटार फुटून पाणी वर यावे अशी जमिनीखालून एका छोट्या ओहोळाच्या रूपाने बाहेर येते भागमडलेश्वरचे मदिरात दरसाल ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये मोठा उत्सव

साजरा केला जातो

*ब्रह्मगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका कुंडात कावेरीचं पाणी बुडबुड्याच्या* रूपानं येताना दिसतं. याच पाण्याची भाविक पूजा करतात. 'तुला संक्रमण' हा बहुधा ऑक्टोबरमध्ये येणारा, तलकावेरीला भेट देण्याचा पवित्र दिवस. या दिवशी एका ठराविक वेळी कावेरीदेवी येथे प्रगट होते आणि तिच्या आगमनाने कुंडापुढील तलावातील पाण्याच्या पातळीत एकदम वाढ होते. पाण्याच्या पातळीत एकदम झालेल्या वाढीतून कावेरीचे अस्तित्व प्रतित होते अशी भाविकाची श्रद्धा आहे.

तलकावेरीपासून ब्रह्मगिरी डोंगरमाथ्याची उंची ३०० फूट असून ३५० चे वर पायऱ्या चढून गेल्यावर वरून आसमंतातील पर्वतराजींचं विलोभनीय दृश्य दिसतं. या ब्रह्मगिरीच्या माथ्यावर सात मोठ्या तपस्वी ऋषिमुनींनी तपश्चर्या केल्याचं सांगण्यात येतं.

आपला देश कूर्गसारख्या वेधक निसर्ग, लोकजीवन संस्कृतीच्या प्रदेशानी समृद्ध आहे. त्याचं डोळे भरून दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या अडी-अडचणींचा विशेष बाऊ न करता अधिरतेनं घराबाहेर पडायला हवं.

* *




# गोवा

नितांत सुंदर वनश्री, समुद्रस्नानासाठीचे सुरम्य, सुरक्षित समुद्रकिनारे, कलासक्त माणसं यानी विलोभनीय झालेलं, हिंदू-ख्रिश्चन संस्कृतिच्या मिलापाचं चिमुकलं गोवा राज्य आपल्यातीलच एक वाटतं. तेथील निसर्गरम्य, शांत, लोभस वातावरणामुळे पर्यटकांना गोव्याची ओढ वाटते.

मांडवी नदीतीराची पणजी ही गोमांतकाची राजधानी. पणजीत राहून गोवा पाहणं सोयीचं पडतं कारण प्रेक्षणीय स्थलदर्शनाच्या बऱ्याच सहली येथूनच निघतात. अर्थात् एखाद्या लहान जागी किंवा सागरकिनारी मुक्काम करण्यातही वेगळीच मजा आहे. गोव्याला जाण्यासाठी बसच जास्त सोईस्कर. रेल्वेने गेल्यास मडगावला उतरून पणजीला यावं लागेल.

पावसाळा सोडून, शक्यतो उन्हाळा टाळून जावं अशा गोव्यामध्ये वास्तव्यासाठी राज्य

पर्यटन खात्याची अनेक निवासस्थाने असून त्याच्या आरक्षणासाठी द मॅनेजर, ट्रॅव्हल डिव्हिजन, गोवा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि , ट्राइओनोरा अपार्टमेंटस्, डॉ. अल्वारेस कोस्टा रोड, पणजी ४०३ ००१ याना लिहाव लागेल

वेधक सृष्टीसौंदर्याबरोबरच लक्षात राहतात ती गोव्यातील प्राचीन मदिरे आणि चर्चेस् प्रत्येकी एक दिवसीय सहलीसाठी गोव्याची दक्षिणोत्तर भागात विभागणी केल्यास उत्तर गोव्याच्या सहलीत येतात, श्रीदत्त आणि श्री विठ्ठल मदिरे, मायेम लेक, व्यापारउद्योगानी गजबजलेल म्हापसा, वागातोर, अजुना आणि कलगुट बीचेस, अग्वार फोर्ट दक्षिण गोव्याच्या सहलीत दाखवली जातात जुन्या गोव्यातील कलात्मक चर्चेस्, मगेशी आणि शातादुर्गा मदिरे, मडगाव, कोलवा बीच, मार्मगोवा बदर, खास गोवन सस्कृतिचे वास्को-डी-गामा, पीलर सेमिनरी, अप्रतिम सूर्यास्त दिसणारे दोना पावला आणि मीरामार बीच

वरील दोन तसेच 'धार्मिक स्पेशल', 'बीच स्पेशल', 'आयलड स्पेशल', फेसाळत्या पाण्याचा 'दूधसागर' धबधबा याच्या सहलींचे आयोजनही गोवा पर्यटन महामडळातर्फे केल जात माडवी नदीतील नौकायानाच्या विशेष सहलींचे आयोजनही त्याच्यातर्फे करण्यात येत टूरिस्ट टॅक्सी, स्पेशल बसेस, तसेच बोटीही भाड्याने मिळू शकतात यापैकी कुठलीही सुविधा किंवा इतर काही सहाय्य हवे असल्यास सपर्क साधावा मॅनेजर, ट्रॅव्हल डिव्हिजन, गोवा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि , टूरिस्ट हॉस्टेल, पणजी ४०३ ००१ याच्याशी

गोव्यात कॉंटेसा, एन् ई ११८, मारुती, अँबेसेडॉर, प्रिमिअर पद्मीनी, यासारख्या गाड्या ड्रायव्हरसह किंवा स्वत. चालविण्यासाठी भाड्याने मिळण्याचीही सुविधा आहे सपर्क बजेट रेंट-अ-कार, साई सर्व्हिस, द्वारा युनायटेड एअर ट्रॅव्हल्स, कॅमिला बिल्डिंग, जुन्या बसस्टँडजवळ, पणजी किंवा विमानतळावर. तसेच गोव्यात मोटरसायकल, टॅक्सीही मिळतात त्याची खूण म्हणजे पिवळ्या मडगार्डवरील पाढरी नबर प्लेट

दिवाळी, विशेषकरून तुळशीच लग्न आणि नाताळ हे सण गोव्यात मोठ्या उत्साहात साजरे केले जातात हा काळही गोव्याला भेट देण्यासाठी सर्वोत्तम म्हणावा असा. अर्थात् यावेळी पर्यटकाची अमाप गर्दी असल्याने किफायतशीर दरात रहायला जागा मिळण अवघड होत मंगेशी, शातादुर्गा, रामनाथी यासारख्या मदिरातील धर्मशाळेतून अल्प दरात राहता येत गोव्याच्या अस्सल ग्रामीण सस्कृतितील मनोरम लहान गावातील वास्तव्य हा एक आगळाच अनुभव ठरेल

* *



लक्षद्वीप

# लक्षद्वीप

अरबी समुद्रात केरळमधील कोचीनच्या पश्चिमेस २५० ते ४०० किलोमीटर अतरावर विखुरलेल्या लक्षद्वीपच्या मोहमयी प्रवाळ बेटांवर जाण्यासाठीचे आगाऊ परवानगीचे बरेच निर्बंध सैल करून काही वर्षांपूर्वी योजनाबद्धरित्या पर्यटकाचे लक्ष वेधण्यात आले कोचीनपासून बोटीने सुमारे १२-१६ तासाच्या अतरावर असलेल्या या निसर्गसपन्न बेटाच्या सृष्टीसौंदर्यावर लुब्ध होऊन हजारोंच्या सख्येने पर्यटक लक्षद्वीपला जाऊ लागले लाभलेल्या लोभस निसर्गवरदानाचे जाणीवपूर्वक रक्षण करून पर्यटन करणारे फारच थोडे त्यामुळे पर्यटकाची सख्या वाढू लागताच या भागाचा पर्यटन आणि काही अशी आर्थिकदृष्ट्या विकास झाला असला, तरी त्याच्या निसर्गदत्त रूपसपदेचा वेगाने ऱ्हास होण्याची भीती निर्माण होऊ लागली आहे. यावर उपाय किंवा पर्यटकाच्या अमाप सख्येवर लगाम घालण्यासाठीच की काय, परतु सुरवातीला सात- आठशे रुपयात होणाऱ्या लक्षद्वीप बेटाच्या सहलीला सध्या त्याच्या पाच-सहापट पैसे मोजावे लागतात त्याचे दर, दिवस व वर्गानुसार असतात या सहली वेगवेगळ्या प्रकारच्या असून अनेक एकत्रित बेटांच्या सहलीत दिवस बेटावर तर रात्री बोटीत काढाव्या लागतात

ऑक्टोबर-नोव्हेंबर ते फेब्रुवारी हे महिने लक्षद्वीपच्या सहलीला सर्वांत चांगले मार्च, एप्रिल कडक उन्हाळ्याचे, तर जून ते सप्टेंबर धो-धो मोसमी पावसाचे ३२ ४ चौ कि.मी क्षेत्रफळात पसरलेल्या लक्षद्वीपच्या चिमुकल्या ३६ बेटांपैकी फक्त १० बेटावरच मनुष्य वस्ती आहे बाहेरच्या पर्यटकाकडून येथील पर्यावरणाचा समतोल फार ढळू नये म्हणून, या बेटाची राजधानी 'कावारत्ती', 'कोरल्स' आणि समुद्रजीवसृष्टीने सपन्न 'काल्पिनी', सुरेख समुद्रकिनारा लाभलेले 'कदमत' आणि सर्वांत मोठे लॅगून असलेले 'मिनिकॉय' ही चार बेटे आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी बगाराम बेट खुली करण्यात आली आहेत

प्रामुख्याने मुस्लीम वस्तीच्या या बेटावर मुख्यत मल्याळी भाषा बोलली जाते ( मिनीकॉय बेटावरील 'माही' ही बोलीभाषा ) गाईड जास्त करून इग्रजी आणि मल्याळी बोलतात लक्षद्वीपला भेट द्यायच ठरल्यावर असिस्टट जनरल मॅनेजर ( स्पोर्टस् सोसायटी फॉर प्रमोशन

ऑफ रिक्रिएशनल टूरिझम अँड स्पोर्टस् ) लक्षद्वीप ऑफिस, इंदिरा गांधी रोड, विलिंग्डन आयलंड, कोचीन ६८२००३ यांना लिहून त्यांचा अधिकृत फॉर्म मागवून घ्यावा फक्त 'स्पोर्टस्'तर्फेच लक्षद्वीपला जाता येते हा फॉर्म भरून आणि आपल्याला हव्या असलेल्या प्रकारच्या सहलीच्या रकमेचा 'स्पोर्टस् सोसायटी'च्या नावाने कोचीनमधल्या कुठल्याही बँकेवर काढलेला 'क्रॉस्ड डिमांड ड्राफ्ट' पाठवावा सहलीला वेळ असेल तर पोस्टाने तिकिट पाठवले जाईल 'फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड्' तत्त्वानुसार जागा राखून ठेवण्यात येत असल्याने निराशा टाळण्यासाठी जितके आधी पैसे पाठवता येतील तितकी नक्की जागा मिळण्याची शक्यता अधिक आपल्याला सोईस्कर असलेल्या फक्त एका ऐवजी बोट असलेल्या दिवसाच्या दोन-तीन तारखा कळवाव्यात म्हणजे एखाद्या दिवशीच्या तारखा संपूर्ण भरल्या असल्यास, दुसऱ्या एखाद्या दिवशीच्या लगेच राखून ठेवणं त्यांना शक्य होऊ शकेल नाहीतर पत्रव्यवहारातच वेळ जाईल

लक्षद्वीपच्या बोटी कोचीनहून दुपारी बाराच्या सुमारास सुटतात आणि पाचव्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास कोचीनला परत येतात

बोटीमधील फर्स्ट क्लास आणि एक्झिक्युटीव्ह क्लासमध्ये वातानुकूलित चार बर्थच्या केबिन्स असतात, तर टूरिस्ट क्लासमध्ये वातानुकुलित हॉलमध्ये 'पुश बॅक' पद्धतीच्या खुर्च्या असतात

सहलीच्या भाड्यात बोटीचा प्रवास, चढणे, उतरणे, खाणे-पिणे, निवास, प्रेक्षणीय स्थळदर्शन, लॅगूनमधील बोटविहार यांचा समावेश असतो पाण्यावरील खेळांचे ( ऐच्छिक ) वेगळे पैसे द्यावे लागतात १६ जणांच्या प्रवासी गटाबरोबर एका व्यक्तीस मोफत प्रवास करता येतो पालकाबरोबर प्रवास करणाऱ्या २ ते १२ वयोगटाच्या मुलांना टूर चार्जेसमध्ये ५०% सवलत देण्यात येते ट्रान्स्पोर्ट चार्जेस् मात्र संपूर्ण भरावे लागतात

'चला लक्षद्वीपला' च्या काही खासगी सहल संयोजकांच्या ठळक जाहिराती आपल्याकडील वृत्तपत्रात वाचायला मिळतात त्यांच्या सहलखर्चावरून ते टूरिस्ट क्लासनेच नेतात, असा अनुभव आहे. समजा जादा पैसे भरून फर्स्ट क्लासने जायचे असेल तरी त्यांच्या तुटपुंज्या संख्येमुळे केबिन मिळेलच याची खात्री नाही. टूरिस्ट क्लासमध्ये विमानासारख्या एका पाठोपाठ एक अशा नुसत्या आरामखुर्च्या असतात झोपायचे झाल्यास दोन रांगामधील जागेत पथारी पसरावी लागते किंवा डेकचा आधार घ्यावा लागतो वारा, पाऊस फार असेल तर ते शक्यही होत नाही समाईक स्वच्छतागृहे असतात पाच दिवस आडवं होऊन नीट न झोपता काढणे फार त्रासदायक असते यासाठी आपले पुरेसे अंथरुण-पांघरूण घेऊन जाणे इष्ट सामानाच्या सुरक्षिततेसाठी साखळी-कुलूप असलेले चांगले बोट लागणे, उलट्यांचा त्रास वगैरेही व्हायची शक्यता असते मोठी बोट थेट

किनाऱ्यावरील धक्क्याला लागत नाही. ती दूर खोल समुद्रात नागर टाकते आणि तेथून छोट्या लाँचनी किनाऱ्यावर जावे लागते. लाँचमध्ये उडी टाकताना किंवा लाँचमधून मोठ्या बोटीत चढताना सवय नसल्याने कसरत करावी लागते. वयस्कर लोकाना हे थोडे त्रासदायक होते लक्षद्वीपच्या मोहमयी गुलाबाच्या सफरीत येऊ शकणारे काही अडचणींचे काटे आधीच ध्यानात घेतले तर ही सहल जास्त आनददायी होईल

परदेशी पर्यटकाना लक्षद्वीपमधील मनुष्यवस्ती नसलेल्या फक्त बगाराम बेटावरच जाता येते अशानी किंवा बगारामचे आरक्षण करू इच्छिणाऱ्या देशी पर्यटकानी, दि बगाराम आयलड रिसॉर्ट, कॅसिनो हॉटेल, विलिग्डन आयलड, कोचीन ६८२ ००३ याना लिहावे

लक्षद्वीपच्या डोमेस्टिक पॅकेजेस ट्रॅव्हल गाईडनुसार या सहलीच बुकींग महाराष्ट्रातील खालील एजटतर्फे करता येईल

१] राज ट्रॅव्हल्स अँड टूर्स प्रा लि , २७-बी, पचरत्न, ग्राऊड फ्लोअर, ऑपेरा हाऊस, मामा परमानद मार्ग, मुंबई ४०० ००४

२] लक्षद्वीप ट्रॅव्हलिक्स, पासपोर्ट स्टुडिओ, जेरमहाल, फर्स्ट फ्लोअर, धोबीतलाव, मुंबई ४०० ००२

३] लिओनार्ड ट्रॅव्हल्स् प्रा लि , तेज हाऊस, ५ महात्मा गाधी रोड, पुणे ४११ ००१

* *



केरळ

# केरळ

केरळ म्हणजे हिरव्यागार सृष्टीसौंदर्यानं नटलेलं भारतातील एक लावण्यमय राज्य लक्षद्वीपला जाण्यासाठी केरळमधील कोचीनला जाव लागत मुबई व्ही टी हून रात्री सुटणाऱ्या २१३५ नेत्रावती सुपरफास्ट किंवा ६६५७ दादर-मगलोर/कोचीन या गाड्या तिसऱ्या दिवशी सकाळी ७.४० ला कोचीनला घेऊन जातात १०८१ कन्याकुमारी एक्सप्रेसने गेल्यास एर्नाकुलम्ला उतराव लागेल. एर्नाकुलम्-कोचीन अतर फक्त १२ किलोमीटर्स आहे

केरळचे अरबी समुद्रातील प्रवेशद्वार असलेल्या कोचीनची 'बॅक वॉटर टूर' ही प्रेक्षणीय स्थलदर्शनाची बोटीतून सहल, काहीशी वेगळी अशी. यातील प्रमुख म्हणजे मेट्टानचेरी

येथील डच पॅलेस याखेरीज वास्को-दि-गामाचे दफन केलेले सेंट फ्रान्सिस हे भारतातील सर्वांत जुने युरोपियन चर्च, ज्यूचे चर्च- सायनागॉग इत्यादी भेट देण्यासाठीची स्थळे सकाळ/दुपार चार तासाची ही बोट सहल निघते आरक्षण आणि अधिक माहितीसाठी सपर्क केरळ टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (के.टी डी सी ), टूरिस्ट रिसेप्शन सेंटर, शन्मुघम् रोड, एर्नाकुलम्, कोचीन ६८२ ०३१. कार्यालयीन वेळ ८ ते ६

केरळमधील व्हेनिस म्हणजे अलेप्पी पेरियार टायगर रिझर्व म्हणून आता नामकरण झालेली पेरियार वाईल्ड लाईफ सँक्चुरी हे केरळच आणखी एक आकर्षण ७७७ चौ कि.मी क्षेत्रफळात पसरलेल्या अभयारण्यातील सरोवरातून बोटीने फेरफटका मारताना जगलातील हत्ती, साबर, माकडे, जगली म्हशी, रानरेडे इत्यादी प्राण्याच दर्शन घडू शकत पेरियार अभयारण्याला भेट देण्यासाठी जाव लागेल थेक्कडी या गावाला कोचीन ( १९० कि.मी ), त्रिवेंद्रम ( २६५ कि मी ), कोट्टायम ( ११४ कि मी ) मदुराई येथून थेक्कडीला नियमित बससेवा आहे. एर्नाकुलम्/कोचीनहून के टी डी.सी.ची दोन दिवसाची टूरही शनिवारी सकाळी ७ वा निघते थेक्कडीहून बोटी मिळतात थेक्कडीसाठी जवळच स्टेशन म्हणजे कोट्टायम

के.टी डी सी तर्फे थेक्कडीत अरण्यनिवास, पेरियार हाऊस आणि लेक पॅलेस ही तीन हॉटेल्स चालवली जातात फॉरेस्ट डिपार्टमेंटचा इन्स्पेक्शन बगलाही तेथे असून त्याच्या आरक्षणासाठी वाईल्ड लाईफ प्रिझर्व्हेशन ऑफिसर, थेक्कडी याच्याशी सपर्क साधावा थेक्कडीहून तीन किलोमीटरवर असलेल्या कुमळी या गावी खासगी हॉटेल्सही आहेत

कोचीनपासून ४५ कि.मी.वरील कलाडी येथे शकराचार्यांचा मठ आहे 'गुरुवायुर' चे भगवान श्रीकृष्णाचे प्राचीन मदिर कोचीनपासून १०० किलोमीटरवर येते ( त्रिचूर ३० कि मी ) या मदिराचा वार्षिक उत्सव फेब्रुवारी/मार्चमध्ये येतो यात्रेकरूसाठी के टी.डी सी.ची निवास सुविधा असून अनेक खासगी हॉटेल्सही आहेत मल्याळी महिन्याच्या शेवटच्या दिवशी त्रिवेंद्रमहून गुरुवायूरची दोन दिवसाची सहल सकाळी ७ वा निघते

त्रिवेंद्रम ( आता तिरूअनतपुरम् ) ही केरळची राजधानी कोचीनपासून २२३ कि मी वर आहे १०८१ कन्याकुमारी एक्सप्रेसने ( मुबई १५ ३५, पुणे १९ ४७, त्रिवेंद्रम तिसऱ्या दिवशी १२ १५ ) त्रिवेंद्रमला थेट जाता येईल राजा रविवर्मा याची मूळची पेंटिंग्ज बघायला मिळणारी आर्ट गॅलरी, प्राणिसग्रहालय, पद्मनाभ मदिर ही त्रिवेंद्रमची प्रमुख प्रेक्षणीय स्थळे बोटिंग, पोहण, सूर्यस्नान यासारख्या सुविधा आणि निसर्गरम्य निवासस्थान असलेला नितळ पाण्याचा कोवालम् बीच त्रिवेंद्रमपासून फक्त १४ कि मी वर आहे 'पोनमुडी' हे केरळमधील नितात रमणीय वनश्रीतील थड हवेचे ठिकाण त्रिवेंद्रमपासून ६५ किलोमीटर्स अतरावर येते

कोवालम् बीच, त्रिवेंद्रम स्थानिक स्थलदर्शन, पोनमुडी, थेक्कडी वाईल्ड लाईफ सँक्चुरी इत्यादी बऱ्याच सहलींचे आयोजन के टी डी सी.तर्फे करण्यात येते अधिक माहिती आणि

आरक्षणासाठी सपर्क  टूरिस्ट रिसेप्शन सेंटर, के टी डी सी लि , स्टेशन रोड, थाम्पानूर, त्रिवेंद्रम ६९५००१

निसर्गरम्य पोनमुडीच्या के टी डी सी च्या निवासस्थानाच्या आरक्षणासाठी दि मॅनेजर, सेंट्रल रिझर्वेशन्स, के.टी डी सी लि , मॅस्कॉट स्क्वेअर, त्रिवेंद्रम ६९५०३३ याच्याशी सपर्क साधावा

केरळ पर्यटन महामडळातर्फे लहान-मोठे लक्झरी कोचेस, थेक्कडीला बोटीही भाड्याने देण्यात येतात  या सबधीची अधिक माहिती दि असिस्टट मॅनेजर (ट्रॅव्हल्स अँड टूर्स), ट्रान्सपोर्ट डिव्हिजन, मॅस्कॉट स्क्वेअर, त्रिवेंद्रम ६९५०३३ याच्याकडे मिळू शकेल

सबरीमलई हे भगवान अय्याप्पाचं दाट जगलातील डोंगरमाथ्यावरील मदिर कोचीनपासून २१० किलोमीटरवर आहे. सबरीमलईला जाण्याचे तीन मार्ग असून कोचीन-कोट्टायम (६९ कि मी )- इरुमाली (३५ कि मी )- चालक्कायम् (१०० कि मी )- पम्पा (५ कि मी ) पम्पाहून ४-५ तासाच्या गर्द जगलातील दगड-धोंडे, खाच खळग्याच्या रस्त्याच्या पायचालीनतर सबरीमलई येत  महाराष्ट्रातून जाणाऱ्यानी कोट्टायमला उतरून पम्पाची बस घ्यावी

दर वर्षी नोव्हेंबर (१४-१५) ते जानेवारीपर्यंत सबरीमलईची यात्रा असते  ही यात्रा मासिक पाळी येत असलेल्या म्हणजे सर्वसाधारणपणे १० ते ५० वयोगटाच्या स्त्रियाना करता येत नाही

सबरीमलईची यात्रा करू इच्छिणाऱ्याना शारीरिक आणि मानसिक शुद्धीसाठी ४१ दिवस कडक व्रत कराव लागत  या काळात स्नानाशिवाय अन्नग्रहण न करण, धार्मिक वाचन याबरोबर मासाहार, मद्य, स्त्रीशी शारीरिक सबध निषिद्ध असतात

पम्पा नदीत स्नान करून काळी/गडद निळी लुगी/धोतर, गळ्यात विशिष्ट माळ, डोक्यावर 'इरुमुडी' घेतलेले यात्रेकरू ३५०० फूट उचीच्या टेकडीकडे मार्गक्रमणा करू लागतात  इरूमुडी म्हणजे दोन कप्पे असलेल्या कापडात गुडाळलेल, साजूक तूप भरलेला नारळ आणि इतर पूजा साहित्याच गाठोड  विशिष्ट रगाचे कपडे नसले तरी चालू शकेल, पण डोक्यावर इरुमुडी नसेल तर अय्याप्पाच्या देवालयाच्या १८ पायऱ्या चढून मदिराच्या मुख्य दरवाजाने प्रवेश मिळत नाही  इतराना बाजूच्या दरवाजाने जाव लागत  नारळातील साजूक तुपाचा अभिषेक केला जातो

१४ जानेवारीची मकर पूजा या यात्रेचा मुख्य दिवस  त्यानतर आठवडाभर मदिर उघड असत  मल्याळी कॅलेंडरनुसार त्याच्या दर महिन्याच्या पहिल्या दिवशीही हे मदिर उघड असत

एके काळी फार कठीण असलेल्या सबरीमलईच्या यात्रेत वाटेतील दाट जगलामुळे

हत्ती, अस्वले दिसायची सध्या लाखोंच्या सख्येने भारताच्या विविध भागातून तसेच परदेशातून यात्रेकरू येत असतात परमेश्वर दर्शन हे कष्टसाध्य आहे, हे शिकविणारी सबरीमलईची यात्रा एकदा केली, की दर वर्षी पुन्हा जावस वाटत, अशी भाविकाची श्रद्धा आहे

* *




# ओणम् आणि बोट रेसेस्

पुण्याच्या गणेशोत्सवासारख्याच प्रसिद्ध आहेत केरळमधील बोट रेसेस ! देशोदेशींच्या पर्यटकाच आकर्षण असलेली अल्लेप्पीची 'नेहरू ट्रॉफी बोट रेस' ही यातील प्रमुख केरळातील 'व्हेनिस' म्हणून नावाजलेल्या अल्लेप्पी या गावी पडित जवाहरलाल नेहरू याच्या केरळ भेटीच्या सन्मानार्थ १९५२ मध्ये या बोटींच्या शर्यतींचे प्रथम आयोजन करण्यात आले आणि त्यानतर आजतागायत अल्लेप्पीला ऑगस्ट महिन्यात दुसऱ्या शनिवारी या बोट रेसेस होत असतात

६०-६५ मीटर लाबीच्या जेमतेम एक वल्हेकरी माणूस बसू शकेल एवढ्या निमुळत्या 'स्नेक बोटी' हे या रेसेसचे खास वैशिष्ट्य असे १००-१५० वल्हेकरी एका स्नेक बोटीत असतात आणि एक साथ सुरात सपासप वल्ही मारत १३७६ मीटर लाबीचा लँगून्सचा पाण्यातील मार्ग कापत शर्यतीत जोम, जोष भरत असतात केरळमधील कुट्टानदन भाग वगळता जगात इतरत्र अशा प्रकारच्या खास 'स्नेक बोटी' नसाव्यात

ऑगस्ट महिन्यातील दुसऱ्या शनिवारी परिसरातील सर्व स्नेक बोटी अल्लेप्पीच्या पुन्नामाडा सरोवरात दाखल होतात आणि लाखो प्रेक्षकाच्या जल्लोषात ही नेहरू ट्रॉफीसाठीची बोट शर्यत खेळली जाते

अल्लेप्पी ( सध्याचे Alappuzha) हे कोचीनच्या दक्षिणेकडील ६४ कि मी.वरील महामार्गावरील केरळच्या नितात निसर्गसौंदर्याने बहरलेले एक सुरेख गाव ( त्रिवेंद्रम १५४ कि मी ) रस्त्याने तास-दीड तासाच अतर. कोचीन आणि त्रिवेंद्रम या दोन्ही ठिकाणाहून अल्लेप्पीला जायला सतत बसेस मिळतात

नेहरू ट्रॉफी रेसेसच्या अधिक माहितीसाठी सपर्क १) दि रेव्हेन्यू डिव्हिजनल ऑफिसर

अँड सेक्रेटरी, नेहरू ट्रॉफी बोट रेस कमिटी, अल्लेप्पी २) दि डिस्ट्रिक्ट इन्फर्मेशन ऑफिसर अँड कन्व्हिनर, पब्लिसिटी कमिटी, नेहरू ट्रॉफी बोट रेस कमिटी, अल्लेप्पी ३) गव्हर्नमेंट ऑफ इडिया, टूरिस्ट ऑफिस, वेलिग्टन आयलड, कोचीन (आय टी डी सी.च्या कोचीन ऑफिसमध्ये या बोट रेसेसची तिकीट मिळतात )

रेसच्या जागी लवकर पोचायचं, रेसेस सुरू होईपर्यंत गच्च भरलेल्या लाखो प्रेक्षकाच्या गॅलरीत चार-पाच तास अस्वस्थ अवस्थेत थाबायच, वर पावसाचाही संभव हे तस जिकीरीच आणि शर्यतीतील आनंद कमी करणार. शिवाय स्थानिक लोक, त्याचे गट, ईर्ष्या याचा काहीच परिचय नसल्याने मौजमजेच्या उद्देशाने आलेल्या पर्यटकाना ही बोट रेस कटाळवाणी वाटण्याचीही शक्यता आहे यासाठी फक्त नेहरू ट्रॉफी बोट रेसेसच्या वेळी जाण्याऐवजी ओणम सणाच्या वेळी गेल्यास स्थानिक पातळीवरील या प्रकारच्या विविध लहान-मोठ्या स्नेक बोट रेसेस्ची झलक पाहायला मिळेल

ओणम्' हा केरळी लोकाचा सर्वांत मोठा सण येतो ऑगस्ट/सप्टेंबर महिन्यात साधारणत चार ते दहा दिवस चालणाऱ्या ओणमच्या उत्सवात सपूर्ण केरळमध्ये नाच-गाणी, विविध स्पर्धा, जत्रा याना नुसत उधाण आलेल असत.

शात सपन्न केरळच्या पुराणकालीन राजा महाबली आपल्या प्रजेच सुखस्वास्थ्य पाहण्यासाठी दर वर्षी या काळात येत असतो आणि घरोघरी भेट देत असतो, अशी तेथील लोकाची श्रद्धा असल्यान त्याच्या स्वागतासाठी प्रत्येक घर, सार्वजनिक ठिकाण फुलानी सुशोभित करण्यात येत

फुलांच्या रागोळ्या-पुकोल्लम् (पु-फुल, कोल्लम्-सजावट) हे ओनम् सणाच खास वैशिष्ट्य या रागोळीमध्ये एक समई आणि नैवेद्याला दुधाची वाटी असते शाळामधील वर्गावर्गातून पुकोल्लमच्या स्पर्धा होतात प्रत्येक वर्गाने एक तरी फुलाची रागोळी काढलीच पाहिजे, असा दंडक असल्यान मुल जीव ओतून रागोळ्या सजवतात यात भूमितीच्या ड्रॉईंगसारख्या रागोळ्याबरोबर मीराबाईसारखी व्यक्तिचित्रे सूर्योदय/सूर्यास्तासारखे देखावेही पाहायला मिळतात नुसती फुलच नाही, तर शेडिंगसाठी पान, गवताच्या - नारळाच्या काड्या, कइया याचा सुयोग्य वापर करून तिला सजवण्यात येत शाळाप्रमाणे बँकासुद्धा पुकोल्लम्च्या स्पर्धा आयोजित करतात

ओनम्च्या वेळी अगदी पचतारांकित हॉटेलमध्ये जेवायला गेलं तरी केळीच्या पानावर पारपारिक पद्धतीने जेवण देण्यात येत पायसम् हा आपल्या खिरीसारखा खास केरळी गोड पदार्थ या पायसम्च्याही स्पर्धा होतात 'ओनम् बाजार' ही या वेळी लागतात त्यात लहान-मोठ्या खास केरळी वस्तू स्वस्त मिळतात ओनम् काळातील कोचीन खरोखरच प्रेक्षणीय, कधीही न विसरता येणारं.

ओनम्‌मधील स्नेक बोट रेसेस मुख्यत: पाहायला मिळतात अरानूमुला, अल्लेप्पी, पायीपाड आणि कोट्टायम् या गावी नेहरू ट्रॉफी बोट रेसशिवाय प्रमुख रेसेसची माहिती खालीलप्रमाणे·

पायीपाड जलोत्सव : पायीपाड ( कोचीन ९४ कि मी , त्रिवेंद्रम १३० कि.मी ) येथील ओनम्‌नतर तीन दिवस हरिपाद सुब्रह्मण्याचे मंदिर प्रतिष्ठेसाठी संपन्न होणाऱ्या या धार्मिक जलोत्सवात पहिले दोन दिवस स्नेक बोटींची मिरवणूक काढण्यात येऊन तिसऱ्या दिवशी स्पर्धात्मक बोट रेसेस होतात ( सपर्क : सेक्रेटरी, पायीपाड जलोत्सव समिती, पायीपाड, पो ऑ हरिपाद, केरळ )

अरानूमुला बोट रेस अरानूमुला ( कोचीन १२२ कि मी , त्रिवेंद्रम १३० कि मी ) येथील पुरातन कृष्ण मंदिरातील मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या वार्षिक दिनानिमित्त आयोजित करण्यात येत असलेल्या बोट रेसेस ओनम्‌नतरच्या चार दिवसाच्या काळात ( कधी तिसऱ्या अगर पाचव्या दिवशी स्थानिक कॅलेंडरनुसार युथ्रिट्टथी या दिवशी ) होतो. ( सपर्क सेक्रेटरी, पाल्लियोडा सेवा सगम, अरानूमुला पो ऑ , केरळ )

कोचीन ट्रॉफी बोट रेस, कोचीन राज्य सरकारच्या साह्याने एर्नाकुलमच्या कलेक्टरमार्फत १९७९ पासून आयोजित करण्यात येत असलेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमधील या बोट रेसच्या निश्चित तारखेसाठी सपर्क दि डिस्ट्रिक्ट इन्फर्मेशन ऑफिसर कलेक्टोरेट, एर्नाकुलम किंवा गव्हर्नमेंट ऑफ इडिया, टूरिस्ट ऑफिस, कोचीन

वरील सर्व बोट रेसेस् पाहण्यासाठी प्रवेशशुल्क असते तिकिटाचे दरही दर वर्षी बदलत असतात वरील बोट रेसेसखेरीज इतरही अनेक बोटी रेसेसचे आयोजन ओनम्‌च्या काळात करण्यात येते त्याच्या अधिक माहितीसाठी भारत सरकारच्या कोचीनमधील पर्यटन कार्यालयाशी सपर्क साधावा

* *




# ऊटी

केरळला जोडून उटी-म्हैसूर-बगलोरची सहल करायची असल्यास याव लागेल त्रिवेंद्रम / एर्नाकुलम् अगर या भागातील शेवटच्या मुक्कामाहून तमिळनाडूतील कोइम्बतूरला दिवसाची गाडी घेतल्यास केरळच पाचूच्या रगाच मोहक सृष्टिसौंदर्य पाहता येईल

कोइम्बतूरहून उधगमगलम् म्हणजेच उटकमड किंवा उटीला थेट रस्त्याने जाता येईल ( अतर १०५ कि मी ) रमणीय निसर्गवनातून चढत जाणाऱ्या छोट्या रेल्वेची मजा चाखायची असेल, तर रेल्वे/बसने कोइम्बतूरपासून ३५ कि.मी वरील मेट्टुपल्यम्ला जाव लागेल. मेट्टुपल्यमूहून सकाळी साडेसात वाजता उधगमगलम्ची पर्वतीय रेलगाडी असून, ती उटीला सुमारे दोन तासानी पोहोचते सीझनमध्ये जादा गाडीही सोडण्यात येते उटी हे निलगिरी पर्वतातील तमिळनाडूमधील अतिशय निसर्गरम्य, नितातसुदर हवा खाण्याच ठिकाण ३६ चौ कि मी क्षेत्रफळात पसरलेल असल्याने पर्यटकाची अमाप गर्दी असूनही खूपच चागल राहिलेल उटीचा अधिकृत सीझन एप्रिल ते जून आणि सप्टेंबर-ऑक्टोबर असला, तरी सवड असेल तेव्हा, वर्षभरात केव्हाही गेल तरी चालू शकेल, अस हे 'हिल स्टेशन' उलट 'ऑफ सीझन'ला गेल्यास बरीच स्वस्तात उटीची सहल सहज होऊ शकेल

तमिळनाडू टूरिझमच्या देखरेखीखाली असलेल्या उटकमडच्या यूथ हॉस्टेलमध्ये अल्प दरात राहता येतं संपर्क : दि मॅनेजर, यूथ हॉस्टेल

उटीची सहल बगलोर ( ३०० कि मी ), म्हैसूर ( १६० कि मी )हून करायची झाल्यास थेट बससेवा आहे. अनेक प्रवासी कपन्या म्हैसूरहून उटीच्या एकदिवसीय कडक्टेड टूर्स नेतात

वाटेतील बदिपूरला राहायचं असल्यास त्याच आगाऊ आरक्षण म्हैसूरला कराव लागतं ( सपर्क दि असिस्टट कॉन्झर्व्हेटर ऑफ वाइल्ड लाइफ डिस्ट्रिक्ट ऑफिसर, दिवाण रोड, म्हैसूर ) प्रोजेक्ट टायगर बदिपूरचे 'व्हिजिटींग अवर्स' आहेत सकाळी ६ ते ९ आणि दुपारी ४ ते ६ या वेळात आत एका तासाची फेरी मारता येते वाइल्ड लाइफवरील फिल्म-शो दाखविण्यात येतो सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान




# ऊटी

केरळला जोडून उटी-म्हैसूर-बंगलोरची सहल करायची असल्यास यावं लागेल त्रिवेंद्रम / एर्नाकुलम् अगर या भागातील शेवटच्या मुक्कामाहून तमिळनाडूतील कोइम्बतूरला दिवसाची गाडी घेतल्यास केरळच पाचूच्या रंगाचं मोहक सृष्टिसौंदर्य पाहता येईल

कोइम्बतूरहून उधगमंगलम् म्हणजेच उटकमंड किंवा उटीला थेट रस्त्याने जाता येईल ( अंतर १०५ कि मी ) रमणीय निसर्गवनातून चढत जाणाऱ्या छोट्या रेल्वेची मजा चाखायची असेल, तर रेल्वे/बसने कोइम्बतूरपासून ३५ कि मी वरील मेट्टुपल्यम्ला जावं लागेल मेट्टुपल्यम्हून सकाळी साडेसात वाजता उधगमंगलम्ची पर्वतीय रेलगाडी असून, ती उटीला सुमारे दोन तासांनी पोहोचते सीझनमध्ये जादा गाडीही सोडण्यात येते उटी हे निलगिरी पर्वतातील तमिळनाडूमधील अतिशय निसर्गरम्य, नितांतसुंदर हवा खाण्याचं ठिकाण ३६ चौ कि मी क्षेत्रफळात पसरलेलं असल्याने पर्यटकांची अमाप गर्दी असूनही खूपच चांगलं राहिलेलं उटीचा अधिकृत सीझन एप्रिल ते जून आणि सप्टेंबर-ऑक्टोबर असला, तरी सवड असेल तेव्हा, वर्षभरात केव्हाही गेलं तरी चालू शकेल, असं हे ‘ हिल स्टेशन ’ उलट ‘ ऑफ सीझन ’ला गेल्यास बरीच स्वस्तात उटीची सहल सहज होऊ शकेल

तमिळनाडू टूरिझमच्या देखरेखीखाली असलेल्या उटकमंडच्या यूथ हॉस्टेलमध्ये अल्प दरात राहता येतं संपर्क . दि मॅनेजर, यूथ हॉस्टेल

उटीची सहल बंगलोर ( ३०० कि मी ), म्हैसूर ( १६० कि.मी )हून करायची झाल्यास थेट बससेवा आहे अनेक प्रवासी कंपन्या म्हैसूरहून उटीच्या एकदिवसीय कंडक्टेड टूर्स नेतात

वाटेतील बंदिपूरला राहायचं असल्यास त्याचं आगाऊ आरक्षण म्हैसूरला करावं लागतं ( संपर्क दि असिस्टंट कॉन्झर्व्हेटर ऑफ वाइल्ड लाइफ डिस्ट्रिक्ट ऑफिसर, दिवाण रोड, म्हैसूर ) प्रोजेक्ट टायगर बंदिपूरचे ‘ व्हिजिटींग अवर्स ’ आहेत सकाळी ६ ते ९ आणि दुपारी ४ ते ६ या वेळात आत एका तासाची फेरी मारता येते वाइल्ड लाइफवरील फिल्म-शो दाखविण्यात येतो सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान

मुख्यत्वे सागाच जगल आणि बाबूच्या वनामुळे बदिपूरपेक्षा घनदाट झालेल्या ३२१ चौ. किलोमीटर क्षेत्रफळात पसरलेल्या तमिळनाडूमधील मदुमलई अभयारण्याला भेट देण्याची वेळ आहे सकाळी साडेसहा ते आठ आणि दुपारी चार ते पाच हत्तीपूजा सायकाळी सहा वाजता होते, तर वाइल्ड लाइफवरील फिल्म-शो दाखविला जातो सायकाळी साडेसहा वाजता उटीपासून ६७ कि मी वर असलेल्या कर्नाटक आणि केरळ राज्यानी वेढलेल्या मदुमलई अभयारण्यात जगल खात्याच्या जीपने जाता येते हत्तीवरूनही फेरफटका मारता येतो आपले वाहन असल्यास दहा रुपये नाममात्र दरात गाइड देण्यात येतो वाहनाने २५-३० किलोमीटर हिंडता येते मदुमलई अभयारण्यातील निवास आणि हत्ती-राइडच्या आरक्षणासाठी सपर्क: दि वाइल्ड लाइफ वॉर्डन अँट महालिगम् अँड क , कुन्नूर रोड, उटी मदुमलई अभयारण्यातील मसणगुडी येथील काही खासगी हॉटेलमधील वास्तव्यातही जगलात राहायची झलक चाखता येते

हिल स्टेशन्सची राणी सबोधण्यात येणाऱ्या २२४० मीटर्स उचीवरील उटीची शान म्हणजे सन १८४७ मध्ये निर्मिण्यात आलेल तेथील बोटॅनिकल गार्डन उटीच बोटॅनिकल गार्डन म्हणजे मौजमजेचा नुसता भेळ-पुरीचा स्पॉट नाही, तर वनस्पतिशास्त्राच्या विद्यार्थ्यांची ती अभ्यासिका आहे. विविध वृक्ष-वेलींच जणू समेलन भरलेल, विस्तीर्ण तुक्तुकीत हिरवळीच, स्वच्छ, लोभस अस हे उद्यान सकाळी आठ ते सायकाळी साडेसहापर्यंत उघड असत (प्रवेश फी. प्रत्येकी एक रु , कॅमेरा फी पाच रुपये) यातील नर्सरीच्या वेळा आहेत नऊ ते एक आणि दोन ते साडेचार. उटीच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये दर वर्षी अॅग्रो-हॉर्टिकल्चर डिपार्टमेटतर्फे 'फ्लॉवर शो' आणि साऊथ इडिया केनेल क्लबच्या वतीने 'डॉग शो'चे आयोजनही करण्यात येते

हिल स्टेशन म्हटल की बहुधा लेक आणि त्यात बोटिंग हे असतच उटीच कृत्रिम लेक १८२४ मध्ये मि सुलिव्हान यानी निर्मिल यातील बोट हाऊसची देखभाल तमिळनाडू टूरिझमतर्फे करण्यात येत असल्याने प्रत्येकी फक्त ५० पैशात जलविहाराचा आनद लुटता येतो (वेळ . स ९ ते ५, सीझनमध्ये ८ ते ६, कॅमेरा फी - ३ रुपये ) शेजारीच टॉय ट्रेन आणि व्हिडिओ गेम्सही आहेत लेकबाहेर घोड्यावरून रपेट मारण्यासाठी पर्यटकाची झुंबड उडालेली असते मात्र छोट्या 'पोनी राइड' साठी कमीत कमी दहा रुपये मोजावे लागतात

दोडाबेट्टा हे २६२३ मीटर उचीच निलगिरीतील सर्वोच्च शिखर उटीपासून अवघ्या दहा किलोमीटरवर आहे. दुतर्फा उच, गर्द झाडीच्या रस्त्यातून जाणाऱ्या, अनेकदा धुक्याच्या दुलईत लपेटलेल्या दोडाबेट्टाला उटीच्या बस-स्टॅंडवरून सकाळी साडेदहा ते अडीचच्या दरम्यान दर तासाने सुटणाऱ्या एस.टी बसने प्रत्येकी दीड रुपये भाड्यात जाता येते

दोडाबेट्टावरून दिसणारं आसमंताचं विलोभनीय दृश्य निसर्गलहरीनुसार सतत बदलत असतं. या दृश्याचं जवळून नयनसुख घेण्यासाठी तेथे एक टेलिस्कोपही उभारण्यात आला आहे

निसर्गरम्य परिसरातील हिंदुस्थान फोटो फिल्मचा कारखाना उटीपासून आठ किलोमीटर्सवर असून आगाऊ परवानगीने त्याची उत्पादन-प्रक्रिया पाहता येते

उटीपेक्षा थोड्या कमी उंचीची, पण शहरीकरणामुळे होणाऱ्या पर्यटकांच्या गजबजाटापासून थोडी दूर म्हणून जास्त शांत, रम्य अशी कुन्नूर ( १८ कि मी ) आणि कोटागिरी ( २८ कि मी ) ही ठिकाणं काहींना जास्त पसंत पडतात. कुन्नूरचं वनस्पती उद्यान- सिम्स पार्क हे विशेष प्रेक्षणीय येथे दर वर्षी फळांच्या प्रदर्शनाचं आयोजन केलं जातं डॉल्फिन्स नोझ, लॅम्ब्ज रॉक, गोल्फ कोर्ट हे येथील आणखी काही स्पॉट्स कुन्नूरला मद्रास रेजिमेंटचं मुख्यालय असून, तेथील एका स्मृतिस्तंभावर विविध युद्ध-मोहिमांच्या वेळी या रेजिमेंटच्या धारातीर्थी पडलेल्या सैनिकांची नावं ब्रास प्लेटवर कोरण्यात आलेली आहेत

पूर्व व पश्चिम घाटांना जोडणारी निलगिरी पर्वतराजी प्रसिद्ध आहे ती चहा-कॉफीच्या मळ्यासाठी. सिंकोना फूडप्रॉडक्ट्स, युकॅलिप्टस् ऑईल, जिरॅनिऑल, सुगंधी फेनॉल्स यांचं उत्पादनही येथे होतं ऑरेंज-पिकोसारख्या चहाचे विविध प्रकार, मसाल्याचे पदार्थ, निलगिरी, आयुर्वेदिक तेलं यांची खरेदी उटीच्या व्यापारपेठेत करता येईल जास्त भावतात ते उटीच्या परिसरातील जाता-येताना नयन तृप्त करणारे चहाच्या मळ्यांनी तुकतुकीत, तजेलदार, हिरवेगार झालेले डोंगर-उतार चहाची ' ताजगी ' उटीतील थंड वास्तव्य देऊन जाते

* *




तामिळनाडू

## दक्षिणटोक कन्याकुमारी

एखाद्या मूर्तरूप देवदर्शनासाठीच्या रांगेत तासन्तास ताटकळत उभं राहून मिनिटभर देवदर्शन घेण्यापेक्षा निसर्गातील पंचमहाभूतांच्या रूपाने दिसणारे अगाध परमेश्वरी अविष्कार निवांतपणे पाहावेसे वाटतात मानवनिर्मित स्पृहणीय कार्यातून उभे राहिलेले विशाल प्रकल्प आणि त्यांच्या निर्मितीमागे असलेली आपापल्या क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वं माझ्यासारख्यांना नेहमी नतमस्तक करतात ईश्वरी साक्षात्काराचं प्रतिकच जणू त्यांच्यात गवसतं

'सर्व देव नमस्कार. केशव प्रतिगच्छति' घरबसल्या मनापासून केलेला नमस्कार पाहिजे त्या देवापर्यंत पोहोचतो परंतु निसर्गातील देव, मानवी कार्यातून प्रतित होणार देवत्व बघण्यासाठी मात्र त्या त्या ठिकाणीच जायला हव निसर्ग आणि मानव या दोघाच्या निर्मितीचा सुरेख सगम दिसतो कन्याकुमारीच्या विवेकानद्पुरमूला.

विवेकानदपुरम् हे विवेकानन्द केंद्राच मुख्यालय पर्यटकाची निवासाची सोयही इथे होते प्रसन्न, शात वातावरण, रम्य परिसर, सागराच सान्निध्य ही येथील वैशिष्ट्ये दर अत्यत माफक शिवाय उत्तर-दक्षिण भारतीय पदार्थ मिळणारे उपाहारगृह, डाकघर, बँक, दवाखाना, वाचनालय हेही आहे

नोव्हेंबर ते फेब्रुवारी हे महिने कन्याकुमारीसह दक्षिण भारताच्या प्रवासाला सर्वोत्तम म्हणावेत असे मुबई-पुण्याहून दररोज असणारी कन्याकुमारी एक्सप्रेस (मुबई १५ ३५, पुणे १९ ४५, सोलापूर १ २५) ४६ तासानी भारताच्या या दक्षिण टोकाला घेऊन जाते. (नागपूरकराना जम्मू-कन्याकुमारी ६०१८ हिमसागर एक्सप्रेस) (नागपूर सोम ९ ३५, कन्या. बुध १ ००) तसेच दिल्ली-त्रिवेंद्रम (नागपूर. बुध-शनि. ४ ५०, त्रिवेंद्रम गुरु-रवि १६ ४५) ने जाता येईल). त्रिवेंद्रम- कन्याकुमारी अतर ८८ कि.मी असून तेथून कन्याकुमारीपर्यंत रेल्वे अगर बसने जाव लागेल बसने गेल्यास कन्याकुमारी बसस्थानकाच्या अलीकडे दोन-एक किलोमीटरवर विवेकानदपुरम्चा थाबा असून तेथे विनतीवरून बस थाबते रूळ गाडीने गेल्यास रेल्वेस्थानकावरच्या विवेकानदकेंद्राच्या कक्षात मोफत बसची चौकशी करावी, ती आपल्याला थेट विवेकानदपुरमूला घेऊन जाईल

आयत्यावेळी जाऊन तेथे जागा मिळेल की नाही ते सागता यायच नाही यासाठी विशेषकरून सीझनमध्ये आधी आरक्षण केलेल चागल सपर्क इन्चार्ज, विवेकानदपुरम्, कन्याकुमारी ६२९ ७०२

या केंद्रातर्फे कन्याकुमारीच्या आसपास तसेच भारतात इतरत्रही साक्षरता वर्ग, स्त्रियासाठी भजने, मुफ्त औषध-दवाखाने यासारखे अनेक सामाजिक उपक्रम चालतात

आजच्या कन्याकुमारीची प्रमुख ओढ म्हणजे स्वामी विवेकानदांनी ध्यानधारणा केलेल्या भरसमुद्रातील खडकावरील 'विवेकानद शिलास्मारक' एकनाथजी रानडे आणि त्याच्या नि:स्पृह सहकारी कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून साकारलेल विवेकानदाच हे चिरतन स्मारक स्तिमित करत

विवेकानद केंद्रातर्फे चालविण्यात येणाऱ्या बोटीने या शिलास्मारकावर जाता येत तीन समुद्राच्या अथाग पाण्यातील विवेकानदाच्या स्पर्शाने पवित्र झालेल्या त्या खडकावर पाऊल टाकताच एक वेगळीच अनुभूती येते सर्वत्र स्वच्छता, प्रसन्न शांतता ना भिकाऱ्याचा ससेमिरा, ना पड्याच हात पसरण या शुचिर्भूत वातावरणात ध्यान करावस वाटल्यास

एक स्वतंत्र ध्यानधारणा खोलीही आहे पॉलीश्ड ग्रॅनाईटच्या लक्षणीय कोरीव खांबानी सुशोभित अशा विवेकानंद मंडपातील, चार फूटी ग्रॅनाइटच्या कोरीव चौथऱ्यावर उभा असलेला विवेकानंदाचा सात फूट उंचीचा ब्राँझचा पुतळा दिव्यत्वाची प्रचिती देणारा आहे

विवेकानंद शिला स्मारकाखेरीज कन्याकुमारीचं मंदिर ( या किंवा दक्षिण भारतातील बऱ्याच मंदिरातून पुरुषांना फक्त लुंगी किंवा धोतर नेसूनच आत जाता येतं मग प्रसंगी ही लुंगी पँटवर नेसली तरीही चालते ) गांधी मंडप, दीपगृह, दहा किलो मीटरवरील सुचिंद्रम मंदिर ही येथील इतर काही भेट देण्यायोग्य स्थळे अप्रतिम, लाजबाब असे शब्द नकळत बाहेर पडतील असा कन्याकुमारीचा अवर्णनीय सूर्योदय, सूर्यास्त चुकवून चालायचा नाही त्यावेळी मुद्दाम जायला हवं

कन्याकुमारी दक्षिणेतील सर्व प्रमुख गावांशी बसने जोडलेली आहे कन्याकुमारीहून परतीसाठीच्या रूळगाड्या (१) १०८२ कन्याकुमारी - मुंबई एक्सप्रेस ( दररोज ) ५ ०० (२) त्रिवेंद्रम - अहमदाबाद ( सोम ) १४ ३० (३) कन्याकुमारी - जम्मू ६०१७ हिमसागर ( शुक्र. ) ११ ३५. (४) त्रिवेंद्रम - दिल्ली ( सोम शुक्र ) १३ ००

कन्याकुमारीला शहरी बडबड, गोंधळापासून दूर अशा विवेकानंदपुरमच्या आश्रमात राहण्यात आगळा आनंद आहे तमिळनाडू टूरिझमचे अगदी समुद्र किनाऱ्यावर, संलग्न जेवणघरासहितचे हॉटेल सुरेख आहे ( कन्याकुमारी ६२१ ७०२ )

लांबच्या सहलीत कन्याकुमारीसारख्या फक्त एकाच ठिकाणी सहसा कोणाला जायला नको असतं. या सहलीत मद्रास ( हवं असल्यास त्याआधी तिरूपती ) पाँडेचरी, रामेश्वरम्, मदुराई, कोडाईकॅनाल, त्रिवेंद्रम, सहजरित्या करता येतील रेल्वेचं आरक्षण जाताना फक्त मद्रासपर्यंत व येताना त्रिवेंद्रमपासून केलं तरी मधली सर्व ठिकाणं बसने आरामात पाहता येतील नव्यानेच प्रवास करणाऱ्यांना एवढं सगळं स्वत ला जमेल की नाही याची शंका असते अशांना तमिळनाडू पर्यटन महामंडळातर्फे आयोजित करण्यात येत असलेल्या १४ पॅकेज टूर्सपैकी एखादी घेता येईल यासाठी सुद्धा मद्रासपर्यंत जाण्या-येण्याचं रेल्वे आरक्षण आपल्यालाच करावे लागेल

तमिळनाडू टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ( मुख्य ऑफिस २५, राधाकृष्णन् सलाई, मायलापोरे, मद्रास ६०० ००४ सेल्सकाऊंटर १४३, अन्नासलाई, व्ही एस टी मोटर्स बिल्डिंग, मद्रास ६०० ००२ ) च्या विविध सहलींपैकी मद्रासहून दर शनिवारी सकाळी सात वाजता निघून त्या पुढील शनिवारी रात्री ९ च्या सुमारास परतणारी आठ दिवसांची तमिळनाडू टूर या राज्याची चांगली झलक दाखवेल या सहलीत पाँडेचरी, मद्रास, चिदंबरम, तंजावर, रामेश्वर, कन्याकुमारी, सुचिंद्रम, त्रिवेंद्रम, मदुराई, कोडाईकॅनॉल, त्रिची, इत्यादी ठिकाणे दाखविली जातात यासाठीचे एकाला स्वतंत्र खोलीसाठी आणि एका खोलीत

दोघासाठी वेगवेगळे दर आकारण्यात येतात या पैशात प्रवास, निवास, गाईडची फी आणि प्रेक्षणीय स्थळदर्शन याचा समावेश असतो. जेवणा-खाण्याचा खर्च आपल्यालाच करावा लागला तरी त्यासाठीची चागली सोय त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी असते विद्यार्थ्यांचे गट, बँक कर्मचारी, सरकारी, खासगी, औद्योगिक सस्था ( किमान दहा लोक असल्यास ) याना भाड्यात १०% सवलत मिळते मात्र ही सवलत तिरुमलाच्या स्पेशल दर्शनाच्या फीसाठी लागू नाही लिव्ह ट्रॅव्हल कन्सेशन घेणाऱ्यांसाठी सहल पूर्ण झाल्यावर लागणारे योग्य ते सर्टिफिकेट देण्यात येते

तमिळनाडू टूरिझम कॉर्पोरेशनच्या सर्व सहलींचे आगाऊ आरक्षण खालील ठिकाणी होऊ शकते

[१] टी टी डी सी सेल्स काउटर, १४३, अन्नासलाई, मद्रास ६०० ००२ (२४ तास चालू) [२] टी टी. डी सी सेल्स काउंटर एक्सप्रेस बसस्टँड, हायकोर्ट कपाउडमागे, मद्रास ६०० ००१ (स ९.४५ ते साय ५ ४५). [३] तमिळनाडू टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर, सेंट्रल रेल्वे स्टेशन, गेट न २, मद्रास ६०० ००३ (स ६ ते रा ८) [४] टी टी डी सी यूथ हॉस्टेल, इ व्ही आर. रोड, पार्क टाऊन, मद्रास ३ ( सेंट्रल रेल्वेस्टेशनसमोर ) (स. ६ ते रा ९ ) [५] तामिळनाडू टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर, मद्रास इग्मोर रेल्वे स्टेशन

याशिवाय मद्रासमधील सर्व अग्रगण्य हॉटेल्स आणि ट्रॅव्हल एजटसकडे या सहलींच आरक्षण करता येत सपूर्ण पैसे भरल्यावरच फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड तत्त्वानुसार जागा राखून ठेवण्यात येते बाहेरगावचे लोक हे पैसे मनिऑर्डर किंवा कुठल्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमाड ड्राफ्टने पाठवू शकतात हा डिमाड ड्राफ्ट तमिळनाडू टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि याच्या नावावर काढून तो पुरेसा आधी पाठवावा काही कारणानी सहल रद्द करावी लागल्यास त्याना ४८ तास आधी कळविल्यास २५%, १२ ते ४८ तासापर्यंत ५०%, पैसे कापून उरलेली रक्कम परत मिळते

ज्यांना कडक्टेड टूर नको, फक्त राहण्याची सोय हवी अशासाठी सपूर्ण राज्यभरच्या विविध प्रेक्षणीय स्थळी तमिळनाडू टूरिझमची सुसज्ज, स्वच्छ आणि किफायतशीर दरातील निवासस्थाने आहेत या निवासस्थानाचे आरक्षण आणि अधिक माहितीसाठी त्याच्या १४३, अण्णासलाई, मद्रास- २. कार्यालयाशी सपर्क साधावा

* *




# अंदमान–निकोबार

'अदमान' म्हटल की आजही अग शहारत ते 'काळ्या पाण्या'च्या कटू आठवणींनी भारताच्या स्वातन्त्र्यसग्रामातील क्रातिकारकाच्या लढ्याच्या इतिहासातील काळेकुट्ट पर्व पाहिलेली ही अदमानची भूमी, अथाग निळ्याशार पाण्यातील हिरव्यागर्द सृष्टिसौंदर्याने बहरलेली असेल, यावर चटकन विश्वासच बसत नाही किंबहुना हा लावण्यमय तुकडा आपल्या भारतभूमीचाच एक भाग आहे याबद्दलही असलेल कित्येकाच अज्ञान "अदमानला जायला पासपोर्ट लागेल का ?" विचारताना उघडं पडत

जगल, सागरसपत्तीच्या समृद्ध निसर्गवैभवाचा अदमान-निकोबार बेटांवर पसरलेला अमाप खजिना पाहून भान हरवून जातं मानववशशास्त्राच्या अभ्यासकाना ही बेटं म्हणजे जणू उत्कृष्ट ग्रंथालयच ! अदमानच्या लोकसख्येपैकी एक पचमाश आदिवासी असून, त्याची मुख्यत्वे निग्रो वशीय व मगोल वशीय प्रकारात विभागणी होते येथील काही आदिवासी अगदी अल्पसख्य असून, आत दूर जगलात ते अजूनही अश्मयुगकालीन आयुष्य जगतात सुधारलेल्या जगाशी त्याचा विशेष सपर्क नसल्याने काही दिवस गेलेल्या पर्यटकाना अशाच जवळून दर्शन घडण मुष्किलच !

अदमान-निकोबार हा तीनशेच्या वर निसर्गवेधक बेटाचा समूह बंगालच्या उपसागराच्या निळ्या दुलईत सुमारे ७०० कि मी लाबीत दक्षिणोत्तर विखुरलेला आहे. मद्रास व कलकत्यापासून सुमारे १२०० कि मी वर असलेल पोर्टब्लेअर ही या द्वीपसमूहाची राजधानी या दोन्ही ठिकाणाहून पोर्टब्लेअरला विमान अगर बोटीने जाता येते तीन महिन्यातून एकदा वैझागहूनही बोट आहे.

पोर्टब्लेअरसाठी आठवड्यातून चार वेळा सकाळी ५ ४० वाजता कलकत्ता ( सोम , मगळ , गुरू , शनि ) आणि मद्रास ( मगळ , बुध , शुक्र , रवि ) येथून बोईंग विमानसेवा उपलब्ध असून, दोन तासाच्या या विमान प्रवासाच सध्याच भाड आहे प्रत्येकी २८०० रुपये कलकत्याहून निघणार सोमवारच विमान कार निकोबारपर्यंत ( पोहोचण्याची वेळ स ८.५० ) जात आणि या प्रवासाच सध्याच माणशी भाड आहे ३४०० रुपये गेलेलच

विमान त्याच दिवशी सकाळी ८.२० वाजता ( सोमवारी सकाळी १० ३० ) पोर्टब्लेअरहून मद्रास/कलकत्त्याकडे प्रयाण करत

मुख्य भूमी आणि पोर्ट ब्लेअरच्या दरम्यान सध्या एम व्ही हर्षवर्धन, एम व्ही अकबर, एम् व्ही. निकोबार आणि एस व्ही नानकौरीसारख्या बोटी असून, बोट प्रवासाला लहरी हवामानानुसार तीन ते चार दिवस लागतात बोट पोर्टब्लेअरला बहुदा तीन दिवस थाबते सर्वसाधारणपणष महिन्यातून तीन ते चार वेळा मद्रास अगर कलकत्ता येथून पोर्टब्लेअरला जाणारी किंवा पोर्टब्लेअरहून या दोन बदराकडे येणारी बोट मिळू शकते बोट जायच्या/यायच्या तारखा, बोट प्रवासाच आरक्षण, इत्यादीच्या अधिक माहितीसाठी शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडियाच्या खालील ऑफिसेसशी सपर्क साधावा बोट प्रवासासाठी विहित नमुन्यातील अर्जावर दोन पासपोर्ट साइझ फोटोप्रतींसह, बोट निघायच्या तारखेआधी कमीत कमी चार दिवस अर्ज करण आवश्यक असत

१] दि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडिया लिमिटेड, शिपिंग हाऊस, १३ स्ट्रँड रोड, कलकत्ता ७०० ००१

२]दि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडिया लिमिटेड, जवाहर बिल्डिग, राजाजी सलाई, मद्रास ६०० ००१

मद्रास पोर्टब्लेअर ते कलकत्ता/ मद्रास/ वैझागच्या बुकिंगसाठी सपर्क दि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडिया लिमिटेड, ॲबर्डीन बझार, पोर्टब्लेअर, अदमान ७४४ १०१

बोटींची भाडी, प्रवासी वर्गानुसार प्रत्येकी २०० रु (वातानुकूलित बक क्लास) ते १४०० रु (दोन बर्थची डिलक्स केबिन सलग्न स्वच्छतागृहासह) च्या दरम्यान असून, जेवणाचे पैसे वेगळे द्यावे लागतात

भारतीय विद्यार्थ्यांनी त्याच्या शैक्षणिक सस्था प्रमुखाचे सस्थेच्या लेटरहेडवर सही-शिक्क्यानिशी सर्टिफिकेट आणल्यास त्याना बोटीच्या भाड्यात ५० टक्के सवलत मिळू शकते ३ ते १० वर्षांच्या मुलानाही भाड्यात ५० टक्के सूट मिळते मात्र त्याना मग स्टुडट कन्सेशन मिळत नाही १० वर्षाखालील मुलाना पूर्ण तिकीट पडते बरोबरच्या ३ वर्षाखालील एका मुलाला मुफ्त प्रवास करता येतो, इतराना भाड्यात ७५ टक्के सवलत मिळते

बोट सुटायच्या वेळेआधी एक दिवसापर्यंत तिकीट रद्द करता येते आणि त्यासाठी १० टक्के कॅन्सलेशन चार्जेस् आकारले जातात. आपली बोट सुटायच्या दिवशी किंवा ती बोट सुटल्यानतर कुठलाही 'रिफड' मिळत नाही बोट प्रवासाविषयक माहिती शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इडियाच्या मुबई ऑफिसमध्ये ( २४५, मादाम कामा रोड, मुबई ४०० ०२१ ) मिळू शकेल

अदमान-निकोबार बेटांना भेट देण्याचा सर्वांत चागला मोसम म्हणजे नोव्हेंबर ते

फेब्रुवारी/मार्च या काळात तेथील हवामान विशेष तापदायक नसते एरवी तीव्र उन्हाळा, आणि पाऊस तर जवळजवळ रोजचाच.

अदमानला जाण्यासाठी भारतीय नागरिकाना वेगळा परवाना लागत नाही. मात्र कार निकोबार किंवा इतर निकोबार बेटावर जायच झाल्यास परमिटची आवश्यकता असते हे परमिट पोर्टब्लेअर किंवा कार निकोबार येथील डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये मिळू शकत

पोर्टब्लेअरला महाराष्ट्र मडळ असून, त्यात डॉमेंटरी धर्तीवर दहा लोकाची निवास व्यवस्था होऊ शकते यासाठी त्याच्या अध्यक्षाशी संपर्क साधावा

अदमानला राहण्याच्या जागेच्या आरक्षणासाठी पर्यटकानी दि डायरेक्टर ( टूरिझम ), ए अँड एन अॅडमिनिस्ट्रेशन, पोर्टब्लेअर, ७४४ १०१ याच्याशी सपर्क साधावा याशिवाय यासबधी खालील ठिकाणीही चौकशी करता येईल -

१] डेप्युटी रेसिडेंट कमिशनर ऑफ ए अँड एन अॅडमिनिस्ट्रेशन अॅट न्यू दिल्ली, एफ १०५, कर्झन रोड हॉस्टेल, कस्तुरबा गाधी मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

२] डेप्युटी रेसिडेंट कमिशनर ऑफ ए अँड एन अॅडमिनिस्ट्रेशन अॅट कलकत्ता, ३ ए, आऊकलड प्लेस, कलकत्ता ७०० ०१७

३] असिस्टट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट अॅट मद्रास

पोर्टब्लेअरमध्ये आता कमी-अधिक दराची खूप हॉटेल्स असून सर्किट हाऊस, टूरिस्ट हाऊस, गेस्ट हाऊस, मरिन हिल गेस्ट हाऊस, निकोबार हट, मेगॅपोड नेस्टसारखी सरकारी निवासस्थाने, आणि यूथ हॉस्टेलही आहे. सरकारी निवासस्थान तुलनेने स्वस्त व मस्त त्यामुळे त्यात ऐनवेळी जागा मिळणही मुष्किलच ! त्याच्या रिझर्वेशनसाठी दि डेप्युटी डायरेक्टर ( टूरिझम ), ए अँड एन अॅडमिनिस्ट्रेशन, पोर्टब्लेअर याच्याशी पत्रव्यवहार करावा

भारताच्या प्रखर स्वातत्र्यलढ्यातील स्वातत्र्यवीर सावरकर आणि इतर हजारो क्रातिकारकाच्या श्रमाच्या घामाने अंदमानला मुक्तितीर्थाच पावित्र्य प्राप्त झालेली ' सेल्यूलर जेल ' हे पोर्टब्लेअरच प्रमुख दर्शनीय स्थल ( वेळ ९ ते १२, २ ते ५ )

सेल्युलर जेलच्या सात विंगपैकी चार आता नष्ट झाल्या असून, उरलेल्या तीनपैकी दोन विंग राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करण्यात आलेल्या आहेत क्रातिकारकाना भोगाव्या लागणाऱ्या जीवघेण्या शिक्षाच्या, त्याच्या कष्टप्रद जीवनाच्या, कोलू-तेलघाणी, फटक्याचा स्टँड, गोणपाटाचे कपडे, लोखडाची भाडी, यासारख्या विविध प्रतिकृती येथील म्युझियममध्ये माडून ठेवण्यात आल्या आहेत तसे येथे शिक्षा भोगलेल्या क्रांतिकारकांचे फोटोही कालानुक्रमाने, त्याच्या आदोलनाबद्दलच्या थोडक्यात माहितीनिशी नीटसपणे लावलेले आहेत सेल्युलर जेलमधून हिंडताना क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातत्र्यासाठी जिवावर उदार

होऊन भोगलेल्या यातनाच्या जाणिवेन नतमस्तक होत आणि ' पाचव्या धाम ' यात्रेच पुण्य मिळाल्याचे समाधान लाभत.

पोर्टब्लेअरमध्ये भेट द्याव अस आणखी एक सग्रहालय म्हणजे या द्वीपसमूहातील अदिवासी जमातींच्या जीवनावरील अँथ्रोपॉलॉजिकल म्युझियम ( वेळ ९ ते १२, १ ते ४ ) येथील मरिन म्युझियममध्ये ३५० च्यावर सागरी जीवनसृष्टीचे नमुने बघायला मिळतात. ( वेळ ८ ३० ते ४, रविवार ८ ३० ते १२ ) याखेरीज पोर्टब्लेअरमधील स्थानिक हस्तकला वस्तूचे कॉटेज इडस्ट्रीज एम्पोरियमही भेट देण्याजोगे ( वेळ ९ ते १, १ ३० ते ५, सोमवार, शुक्रवार बद )

पोर्टब्लेअरच्या बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इडियामध्ये या बेटावर सापडणाऱ्या वनस्पतींचे समृद्ध संग्रहालय असून, ते ८ ३० ते ४ ३० या वेळात पाहता येईल

याखेरीज पोर्टब्लेअरमध्ये ' चॅथम सॉ मिल ' ही आशिया खडातील एक मोठी लाकूड कापायची गिरणी, एक छोटं प्राणीसग्रहालय असून ' कार्बिन्स कोव्ह ' हा पोहण्याचा उत्तम बीच पोर्टब्लेअरपासून ७ कि मी वर आहे. या निसर्गरम्य बीचवर सरकारी, उच्च प्रतीची खासगी निवासस्थानेही आहेत येथील ' हर्बर क्रुझ 'ची सहल वेगळी, आकर्षक वाटेल.

हिरव्या जगल-वृक्षवेलींनी रमणीय झालेल्या अदमानच्या सृष्टिवैभवाचा जवळून आस्वाद घेण्यासाठी वेगवेगळ्या बेटांवर जायला हव रॉस आयलंड, वायपर आयलड, नॉर्थ बे आयलड ही पोर्टब्लेअरजवळील बेट जॉलीबॉय, ग्रॅब, रेडस्किनसारख्या निसर्गसौंदर्याने मढलेल्या बेटावर पाण्याखालील सागरी जीवसृष्टीचे घडणारे दर्शन भान हरपून टाकेल

पोर्टब्लेअरजवळील चिडिया टापू ( ३० कि मी ) पक्षिनिरीक्षक प्रेमींना भुरळ पाडेल सिपीघाट फार्म ( १४ कि मी ) येथे मसाल्याच्या पदार्थांची लागवड पाहता येईल वडूर बीच ( ३० कि मी ) हा आणखी एक निसर्गरम्य पोहण्या-डायव्हिंगसाठी उत्कृष्ट असा सागर किनारा. जसा वेळ असेल तस पोर्टब्लेअरच्या अवतीभोवतीच्या सृष्टीच विलोभनीय रूप पाहता येईल बऱ्याच ठिकाणी पर्यटन खात्याच्या कडक्टेड टूरही जातात त्याच्या अधिक माहितीसाठी सपर्क [१] टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर, टूरिस्ट होम बिल्डिंग, हॅडो, पोर्टब्लेअर. [२] आयलड ट्रॅव्हल्स, ॲबर्डीन बझार, पोर्टब्लेअर

फक्त अदमानातील पोर्टब्लेअरचा आसमत पाहण्यासाठी कमीत कमी आठ दिवस हवेत निकोबार बेटाना- कार निकोबारपर्यंत जायच असल्यास अजून तेवढेच दिवस लागतील कारण नंतरचा प्रवास मुख्यत्वे बोटींवरच अवलबून असतो सध्या पोर्टब्लेअर आणि इतर बेटाच्या दरम्यान टी एस एस येरवा, एम् व्ही रामानुजम्, एस व्ही सेंटीनेल आणि एम व्ही चौरा या बोटी उपलब्ध आहेत त्याच्या निघण्याचे वेळापत्रक, आरक्षण, इत्यादीसंबधी दि डायरेक्टर, शिपिंग सर्व्हिसेस, अदमान अँड निकोबार आयलडस्, पोर्टब्लेअर

फेब्रुवारी/मार्च या काळात तेथील हवामान विशेष तापदायक नसते एरवी तीव्र उन्हाळा, आणि पाऊस तर जवळजवळ रोजचाच

अदमानला जाण्यासाठी भारतीय नागरिकाना वेगळा परवाना लागत नाही मात्र कार निकोबार किंवा इतर निकोबार बेटावर जायचं झाल्यास परमिटची आवश्यकता असते हे परमिट पोर्टब्लेअर किंवा कार निकोबार येथील डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये मिळू शकत

पोर्टब्लेअरला महाराष्ट्र मडळ असून, त्यात डॉमेंटरी धर्तीवर दहा लोकाची निवास व्यवस्था होऊ शकते यासाठी त्यांच्या अध्यक्षाशी संपर्क साधावा

अदमानला राहण्याच्या जागेच्या आरक्षणासाठी पर्यटकानी दि डायरेक्टर ( टूरिझम ), ए अँड एन ॲडमिनिस्ट्रेशन, पोर्टब्लेअर, ७४४ १०१ याच्याशी सपर्क साधावा याशिवाय यासबंधी खालील ठिकाणीही चौकशी करता येईल -

१] डेप्युटी रेसिडेंट कमिशनर ऑफ ए अँड एन ॲडमिनिस्ट्रेशन ॲट न्यू दिल्ली, एफ १०५, कर्झन रोड हॉस्टेल, कस्तुरबा गाधी मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

२] डेप्युटी रेसिडेंट कमिशनर ऑफ ए अँड एन ॲडमिनिस्ट्रेशन ॲट कलकत्ता, ३ ए, आऊकलड प्लेस, कलकत्ता ७०० ०१७

३] असिस्टट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट ॲट मद्रास

पोर्टब्लेअरमध्ये आता कमी-अधिक दराची खूप हॉटेल्स असून सर्किट हाऊस, टूरिस्ट हाऊस, गेस्ट हाऊस, मरिन हिल गेस्ट हाऊस, निकोबार हट, मेगॅपोड नेस्टसारखी सरकारी निवासस्थाने, आणि यूथ हॉस्टेलही आहे. सरकारी निवासस्थान तुलनेने स्वस्त व मस्त त्यामुळे त्यात ऐनवेळी जागा मिळणही मुष्किलच ! त्याच्या रिझर्वेशनसाठी दि डेप्युटी डायरेक्टर ( टूरिझम ), ए अँड एन ॲडमिनिस्ट्रेशन, पोर्टब्लेअर याच्याशी पत्रव्यवहार करावा

भारताच्या प्रखर स्वातत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर आणि इतर हजारो क्रातिकारकाच्या श्रमाच्या घामाने अदमानला मुक्तितीर्थाच पावित्र्य प्राप्त झालेली ' सेल्यूलर जेल ' हे पोर्टब्लेअरच प्रमुख दर्शनीय स्थल ( वेळ ९ ते १२, २ ते ५ )

सेल्युलर जेलच्या सात विंगजपैकी चार आता नष्ट झाल्या असून, उरलेल्या तीनपैकी दोन विंग्ज राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करण्यात आलेल्या आहेत क्रातिकारकाना भोगाव्या लागणाऱ्या जीवघेण्या शिक्षाच्या, त्याच्या कष्टप्रद जीवनाच्या, कोलू-तेलघाणी, फटक्याचा स्टँड, गोणपाटाचे कपडे, लोखडाची भाडी, यासारख्या विविध प्रतिकृती येथील म्युझियममध्ये माडून ठेवण्यात आल्या आहेत तसे येथे शिक्षा भोगलेल्या क्रातिकारकाचे फोटोही कालानुक्रमाने, त्याच्या आदोलनाबद्दलच्या थोडक्यात माहितीनिशी नीटसपणे लावलेले आहेत सेल्युलर जेलमधून हिंडताना क्रातिकारकानी देशाच्या स्वातत्र्यासाठी जिवावर उदार

होऊन भोगलेल्या यातनाच्या जाणिवेन नतमस्तक होत आणि पाचव्या धाम ' यात्रेच पुण्य मिळाल्याचे समाधान लाभत

पोर्टब्लेअरमध्ये भेट द्याव अस आणखी एक सग्रहालय म्हणजे या द्वीपसमूहातील अदिवासी जमातींच्या जीवनावरील अँथ्रोपॉलॉजिकल म्युझियम ( वेळ ९ ते १२, १ ते ४ ) येथील मरिन म्युझियममध्ये ३५० च्यावर सागरी जीवनसृष्टीचे नमुने बघायला मिळतात ( वेळ ८ ३० ते ४, रविवार ८.३० ते १२ ) याखेरीज पोर्टब्लेअरमधील स्थानिक हस्तकला वस्तूचे कॉटेज इडस्ट्रीज एम्पोरियमही भेट देण्याजोगे ( वेळ ९ ते १, १ ३० ते ५, सोमवार, शुक्रवार बद )

पोर्टब्लेअरच्या बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियामध्ये या बेटावर सापडणाऱ्या वनस्पतींचे समृद्ध सग्रहालय असून, ते ८ ३० ते ४ ३० या वेळात पाहता येईल

याखेरीज पोर्टब्लेअरमध्ये 'चॅथम सॉ मिल' ही आशिया खडातील एक मोठी लाकूड कापायची गिरणी, एक छोटं प्राणीसंग्रहालय असून 'कार्बिन्स कोव्ह' हा पोहण्याचा उत्तम बीच पोर्टब्लेअरपासून ७ कि मी वर आहे. या निसर्गरम्य बीचवर सरकारी, उच्च प्रतीची खासगी निवासस्थानेही आहेत येथील 'हर्बर क्रुझ'ची सहल वेगळी, आकर्षक वाटेल

हिरव्या जगल-वृक्षवेलींनी रमणीय झालेल्या अदमानच्या सृष्टिवैभवाचा जवळून आस्वाद घेण्यासाठी वेगवेगळ्या बेटावर जायला हव रॉस आयलड, वायपर आयलड, नॉर्थ बे आयलड ही पोर्टब्लेअरजवळील बेट जॉलीबॉय, ग्रॅब, रेडस्किनसारख्या निसर्गसौंदर्याने मढलेल्या बेटावर पाण्याखालील सागरी जीवसृष्टीचे घडणारे दर्शन भान हरपून टाकेल

पोर्टब्लेअरजवळील चिडिया टापू ( ३० कि मी ) पक्षिनिरीक्षक प्रेमींना भुरळ पाडेल सिपीघाट फार्म ( १४ कि मी ) येथे मसाल्याच्या पदार्थांची लागवड पाहता येईल वडूर बीच ( ३० कि मी ) हा आणखी एक निसर्गरम्य पोहण्या-डायव्हिंगसाठी उत्कृष्ट असा सागर किनारा. जसा वेळ असेल तस पोर्टब्लेअरच्या अवतीभोवतीच्या सृष्टीच विलोभनीय रूप पाहता येईल. बऱ्याच ठिकाणी पर्यटन खात्याच्या कडक्टेड टूरही जातात त्याच्या अधिक माहितीसाठी सपर्क [१] टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर, टूरिस्ट होम बिल्डिंग, हॅडो, पोर्टब्लेअर. [२] आयलड ट्रॅव्हल्स, ॲबर्डीन बझार, पोर्टब्लेअर

फक्त अदमानातील पोर्टब्लेअरचा आसमत पाहण्यासाठी कमीत कमी आठ दिवस हवेत निकोबार बेटाना- कार निकोबारपर्यंत जायच असल्यास अजून तेवढेच दिवस लागतील कारण नतरचा प्रवास मुख्यत्वे बोटींवरच अवलबून असतो सध्या पोर्टब्लेअर आणि इतर बेटाच्या दरम्यान टी एस एस येरवा, एम्. व्ही रामानुजम्, एस व्ही सेंटीनेल आणि एम व्ही. चौरा या बोटी उपलब्ध आहेत त्याच्या निघण्याचे वेळापत्रक, आरक्षण, इत्यादीसबधी दि डायरेक्टर, शिपिंग सर्व्हिसेस, अदमान अँड निकोबार आयलंडस्, पोर्टब्लेअर

याच्याकडे विचारणा करावी

अदमान-निकोबार बेटावर बाहेरील लोकाचा सपर्क जसजसा वाढू लागला तसतसे तेथील मूळचे आदिवासी जगलाच्या जास्त जास्त आत जाऊन वास्तव्य करू लागले पर्यटकाच्या वाढत्या आक्रमणाच्या प्रदूषणामुळे येथील अस्सल निसर्गाचीही तशीच अवस्था होऊ लागली आहे म्हणूनच दूरच्या अतरामुळे थोडे अधिक पैसे खर्च झाले तरी अंदमानच्या मूळच्या निसर्गदत्त सौंदर्याच जास्तीत जास्त चांगल्या रूपात दर्शन घेण्यासाठी तेथे जाण लवकर जमवायला हव

* *




# अत्युत्कृष्ट शिल्पकलाविष्कार – ओरिसा

उत्कृष्ट कलागुणाचा जीता जागता आविष्कार पाहायला मिळतो उत्कल प्रात म्हणजे आजच्या ओरिसा राज्यात कलिग धर्तीच्या चित्तवेधक शिल्पकलेच दर्शन येथे घडत

ओरिसाची राजधानी असलेल्या भुवनेश्वरला मुंबईहून रात्री निघणाऱ्या २११० मीनार एक्सप्रेसने, जी सिकदराबादच्या पुढे २१२० कोनार्क एक्स्प्रेस होते, सोयीस्करपणे जाता येत भुवनेश्वर म्हणजे देवळाच गाव एके काळी हजारोंच्या सख्येने देवालये असलेल्या भुवनेश्वरमध्ये आजही कलिग शिल्पशास्त्रकलेचे वैभवशाली नमुने म्हणावेत अशी पाचशेच्यावर लहान-मोठी मदिरे आहेत यातील सर्वांत मोठ आणि अप्रतिम कारागिरीचे समृद्ध म्हणजे ४५ मीटर्स उचीच लिगराज मदिर

याखेरीज भुवनेश्वरमधील लक्षणीय कोरीव कारागिरीची मंदिरे म्हणजे मुक्तेश्वर, परशुरामेश्वर, सिद्धेश्वर आणि केदार गौरी, ब्रह्मेश्वर, भास्करेश्वर, इंद्रेश्वर नेत्रदीपक कोरीव कामाच अकराव्या शतकातील राजाराणी मदिर हे विशेष उल्लेखनीय सहाव्या शतकातील लक्ष्मणेश्वर, शत्रुघ्नेश्वर, भरतेश्वर मदिरापासून ते १३ व्या शतकातील अनत वासुदेव मदिरापर्यंतच्या मदिरशिल्पशास्त्र इतिहासाच इतक सलग आणि विस्तृत अस भारावणार दर्शन इतरत्र होत नसाव

ओरिसा स्टेट म्युझियम, ट्रायबल रिसर्च म्युझियम आणि सेक्रेटारिएट रोडवरील हँडिक्राफ्ट म्युझियम ही भुवनेश्वरमधील भेट देण्याजोगी सग्रहालये

भुवनेश्वरला खेटून उभ्या असलेल्या उदयगिरी आणि खडगिरी या जुळ्या टेकड्यावरील जैन धर्मीयाच्या गुफात दुसऱ्या शतकातील दगडावरील कारागिरीचे वेधक नमुने पाहायला मिळतात

भुवनेश्वरजवळील ( ८ कि मी ) 'धौली' टेकडीच्या परिसरात सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी घनघोर कलिंग युद्ध झाले रक्ताचे पाट वाहिलेल्या या भीषण लढाईनतरच सम्राट अशोकाने शाततेची शिकवण देणारा बौद्ध धर्माचा स्वीकार केला या कलाटणी देणाऱ्या घटनेच्या स्मृतिनिमित्ताने जपानी बौद्ध सघाने धौली टेकडीवर एक भव्य शुभ्र शातिस्तूप उभारून दिला आहे. येथील एका खडकावर अशोकाच्या आज्ञाचा शिलालेखही खोदलेला आहे वरून गावाचा सुरेख देखावा दिसतो

'नदनकानन' म्हणजे 'देवाची बाग' भुवनेश्वरहून १२ कि मी वर असलेल नदनकानन हे १०० एकरमध्ये पसरलेल वनस्पती उद्यान आणि प्राणिसग्रहालय विस्तीर्ण पिंजऱ्यातील पाढरे वाघ, मगरींचे पैदास केंद्र, लायन सफारी पार्क, ही निवासाची सुविधा असलेल्या या अभयारण्याची वैशिष्ट्ये

चार धाम यात्रेतील एक प्रमुख तीर्थस्थान जगन्नाथपुरी भुवनेश्वरपासून ६० कि मी वर येत पूर्वसागर किनारीच्या पुरीच्या जगन्नाथ मदिराच्या आवारात अनेक लहान-मोठ्या देवळाचा समूह आहे जगन्नाथाच्या मुख्य मदिराचा उंचच उच भव्य कळस, उत्युत्कृष्ट कोरीव कामाने समृद्ध असून दर वर्षी जून/जुलैमधील रथयात्रेसाठी भारताच्या कानाकोपऱ्यातून लाखावर भक्तगण येथे येत असतात या मदिराचा मुदपाकखाना जगात मोठा असल्याच म्हटल जात महाप्रसादाचा लाभ दररोज हजारो भाविक घेतात

समुद्रस्नान, पोहण यासाठी उत्तम असा पुरीचा समुद्रकिनारा या रमणीय सागरतटी ओरिसा पर्यटन महामडळाच सर्व सोयींनी पूर्ण अस सुरेख निवासस्थानही आहे जगन्नाथपुरीतील आणखी एक धार्मिक स्थान म्हणजे शंकराचार्यांचा मठ

ओरिसातील शिल्पांचा मेरुमणी असलेल कोनार्कच विश्वविख्यात सूर्यमदिर येत पुरीपासून ८५ कि मी वर. कोनार्कच्या समुद्रकिनाऱ्यापासून ३ कि मी वर असलेल सूर्यरथाच्या आकाराच हे अभूतपूर्व मदिराच शिल्प पाहताक्षणीच भारावून टाकत अस म्हणतात की तेराव्या शतकात बाधलेल हे स्तिमित करणार शिल्प साकारण्यासाठी १२०० कारागीर १६ वर्षे मेहनत करत होते

ओरिसातील इतर देवालयाप्रमाणेच याचेही मुख्य मंदिर किंवा विमान, त्यापुढे सभामडप किंवा जगमोहन आणि सर्वांत पुढे नृत्य मडप किंवा भोग मडप अशी तीन भागात विभागणी झालेली असली तरी येथील नृत्यमडप इतर दोन भागाच्या समाईक व्यासपीठावर नसून त्याला छतही नाही मात्र हे तिन्ही भाग आणि नृत्यमडपाचे तीन दरवाजे असे काही अचूक

बांधलेले आहेत, की कोणत्याही दरवाजातून पाहिल तरी समोरच्या देवळाचा दरवाजा बरोबर मधोमध दिसावा आणि कोणत्याही ऋतूत सूर्यकिरण बरोबर त्यामधून आत पडावेत.

नृत्यमंडपाच्या बाह्य भिंतीवरील विविध भावमुद्रा, सालंकृत पेहरावातील नृत्यांगनांच्या अगणित कोरीव मूर्ती बघताना भान हरपून जात. अनेक प्रसंग बारकाव्यासकट इतके हुबेहूब चितारलेले आहेत, की सर्व शिल्पच जिवंत वाटत ज्या नर्तिकाच्या चेहऱ्यावर सूर्यकिरण पडलेले असतात, त्या स्मित करत आहेत असं भासतं कलाकाराची केवढी अजब किमया!

रथाच्या आकाराच्या मुख्य मंदिराला आठवड्याचे सात दिवस किंवा सूर्यकिरणातील सप्तरंग प्रतित करणारे सात घोडे, आणि दिवसाचे २४ तास किंवा वर्षातील २४ पंधरवडे दर्शविणारी प्रत्येक बाजूला १२ अशी २४ चाके आहेत प्रत्येक चाकाला अष्टौप्रहरदर्शक आठ आऱ्या असून, संपूर्ण चाक हे एक सौर घड्याळ म्हणून निर्मिण्यात आलं आहे आरीच्या पडलेल्या सावलीवरून दिवसाची वेळ कळते ही संपूर्ण चाकं लता-वेली, प्राणी, देवता यांच्या अप्रतिम, अनुपम कोरीव कारागिरीने संपन्न आहेत

बघणाऱ्याला तृप्त करणाऱ्या कोनार्कच्या या अभूतपूर्व, अवर्णनीय अशा सूर्यमंदिर शिल्पाचा रसास्वाद सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंत घेता येतो. रात्री हे मंदिर प्रकाशझोतांनी उजळून निघत

सूर्यमंदिराच्या प्रांगणाबाहेर एक नवग्रह मंदिर असून जवळच्या वस्तुसंग्रहालयात येथील कारागिरीच्या अत्युत्कृष्ट, दुर्मिळ नमुन्यांच जतन करण्यात आलं आहे.

भुवनेश्वर- कोनार्क- पुरी हा पर्यटकासाठी जणू एक सुवर्ण त्रिकोणच! स्वत च वाहन असेल तर भुवनेश्वरहून पुरी, कोनार्क एक दिवसात सहजगत्या करता येईल हस्तकलाकुसरीसाठीचं प्रसिद्ध गाव 'पिपली' याच मार्गावर लागत

कटक ही ओरिसाची पूर्वीची राजधानी भुवनेश्वरहून ३५ कि मी वर असून कटक विशेष ख्यातनाम आहे ते चांदीवरील अतिनाजूक कोरीव कामाच्या वस्तूसाठी येथून ६५ कि मी वर असलेल्या रत्नागिरी, ललितगिरी आणि उदयगिरी टेकड्यावर सातव्या शतकातील बौद्ध धर्माचे अवशेष बघायला मिळतात

निसर्ग, पक्षिप्रेमींसाठी भुवनेश्वरजवळील (११० कि मी ) विशेष आकर्षण म्हणजे ११०० चौ कि.मी क्षेत्रफळात पसरलेलं चिल्का सरोवर. हिवाळ्यात येथे दूरदूरहून देशोदेशीचे स्थलांतरित पक्षी येतात चिल्का लेकमध्ये रम्य वनश्रीने बहरलेली बरीच छोटी सहलयोग्य बेटे असून, तेथे छोट्या बोटींनी जाता येत चिल्का सरोवराकाठच्या 'राभा' आणि 'बरकुल' येथे सुसज्ज टूरिस्ट बंगलेही आहेत

ओरिसातील सर्वच महत्त्वाच्या ठिकाणी राज्य पर्यटन महामंडळाचे 'पथ निवास' असून, त्यात किफायतशीर दरात राहण्या-जेवण्याची सोय होऊ शकते ओरिसा राज्य पर्यटन

महामडळातर्फे भुवनेश्वर तसेच इतरही अनेक प्रेक्षणीय स्थलदर्शन सहलींच आयोजन करण्यात येत टॅक्सी, बसेसही भाड्याने मिळतात ओरिसामध्ये प्रवासासाठी योग्य कालावधी - ऑक्टोबर, नोव्हेंबर ते फेब्रुवारी अधिक माहितीसाठी सपर्क ओरिसा टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि (ओ टी डी सी), ९, सत्यनगर, भुवनेश्वर ७५१ ००७

* *




# विलोभनीय दार्जिलिंग

चमकत्या उत्तुग काचनगगेच्या धवल सौंदर्यकुशीतील पाचूच्या रगमय सृष्टिवैभवाने बहरलेल विलोभनीय दार्जिलिग गेली काही वर्षे 'गुरखा लँड'च्या आदोलनामुळे अस्वस्थ, अशात होत म्हणूनच हिल स्टेशन्सची सम्राज्ञी म्हणाव अस पश्चिम बगालमधल हे लोभस ठिकाण पर्यटकाच्या नकाशावरून थोड बाजूला पडल होत परतु आता दार्जिलिग परत त्याच्या निसर्गदत्त प्रसन्न, वेधक प्रकृतीकडे येत आहे तेथील पर्यटन खातच नव्हे तर स्थानिक जनही परत एकदा मनोरम दार्जिलिग पर्यटकानी बहरून जाव म्हणून खास प्रयत्न करीत आहेत

तिबेटी भाषेत दार्जिलिग म्हणजे बहुमोल रत्नाची भूमी या भागाला भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे मार्च ते जून मध्य आणि सप्टेंबर ते डिसेंबर मध्य मात्र दार्जिलिगकडे आपल्याकडून जाणारा बहुताशी मार्ग उष्ण प्रदेशातून जात असल्याने उन्हाळ्यात तेथील थडाव्यापर्यंत पोहोचण तस तापदायकच! दार्जिलिगसाठी उतराव लागेल सिलिगुरी (७७ कि मी) अगर न्यूजलपैगुरी (८८ कि मी) ला ही दोन्ही गावे कलकत्ता, दिल्ली, गुवाहाटी, वाराणसी, मुबई आणि भारतातील इतरही बऱ्याच गावाशी रेल्वेने थेट जोडलेली आहेत कलकत्त्याच्या हावराहून सुटणाऱ्या कामरूप एक्सप्रेस (१४ तास), काचनगगा एक्सप्रेस (११ तास) आणि सिआल्दाहून सुटणारी दार्जिलिग मेल (१२ तास) या न्यूजलपैगुरीसाठीच्या गाड्या बॉम्बे-गुवाहाटी एक्सप्रेस ५२ तासात न्यूजलपैगुरीला नेते तेथून पुढे १० तासाच्या अतरावर गुवाहाटी आहे

न्यूजलपैगुरीहून सिलीगुरीला बस/सायकल/रिक्षा/टॅक्सीने येऊन तेथून रस्त्याने ८०

कि मी वर असलेल्या दार्जिलिंगला बसने पोचायला साडेतीन-चार तास लागतात टॅक्सी लवकर जाते दार्जिलिंगच्या अलीकडे ३० कि.मी वर कुर्सिआँग हे निसर्गरमणीय गाव लागतं.

कलकत्ता ते सिलिगुरी दरम्यान थेट बससेवाही उपलब्ध आहे त्याच रिझर्वेशन कलकत्त्याच्या एस्प्लेनेड आणि अल्टाडागा बस टर्मिनसवर होत सिलिगुरी, दार्जिलिंगप्रमाणे मिरीक, कॅलिपाँग, गंगटोक ( सिक्किम ) आणि फुंटसोलिंग ( भूतान ) येथेही बसेस जातात

न्यूजलपैगुरी आणि सिलिगुरी या दोन्हीला दार्जिलिंग छोट्या रेल्वेने जोडल असून अत्यत रमणीय अशा जंगल वनातून, रस्त्याला बाकदार वळणाच्या वेलाट्या काढत, छेदत जाणारी वाफेच्या इजिनाची ही झुकझुक गाडी दार्जिलिंगला पोचायला साडेसात तास घेते वेळ असल्यास एकवेळचा हा रेल्वे प्रवास फार रोमाचकारी आहे

बागडोग्रा हा दार्जिलिंगसाठीच्या विमानतळ रस्त्याने सुमारे तीन तासाच्या अतरावर ( ९० कि मी. ) असून तेथून इडियन एअर लाईन्सची कलकत्ता, दिल्ली, गुवाहाटी आणि ईशान्य भारतातील इतर काही ठिकाणासाठी नियमित विमान सेवा आहे ( स्थानिक इडियन एअर लाईन्स ऑफिस चौरस्ता, दार्जिलिंग ) दार्जिलिंगला जाण्या/येण्यासाठी लहान-मोठ्या बसेसबरोबर न्यूजलपैगुरी, सिलिगुरी आणि बागडोग्रा येथून खासगी टॅक्सी/जीप्सही मिळतात

काचनगंगेची चमचमती चंदेरी शिखरे हवा स्वच्छ असल्यास पर्यटकाच दार्जिलिंगमध्ये स्वागत करतानाच मोहून टाकतात त्याचं वेड लावणार दर्शन तस दार्जिलिंगमधून कुठूनही होत असल तरी 'माल' भागातील चौरस्त्यावरील वेधशाळेच्या टेकडीवरून होणार त्याच दर्शन फारच सुरेख! अनेक ठिकाणाचे सूर्यास्त पाहिले असले तरी दार्जिलिंगच्या २५८५ मीटर्स उचीच्या टायगर हिल ( ११ कि मी ) वरून दिसणाऱ्या अवर्णनीय सूर्योदयाची भान हरपवणारी सर इतरत्र नसावी नि स्तब्ध हिमशिखरावर भल्या पहाटे कोवळ्या किरणाच्या लालीचा रक्तीमा पसरवत होणाऱ्या अरुणोदयाचे दृश्य केवळ अनुपमेय म्हणावे असे दार्जिलिंगच्या व्याघ्र टेकडीवरील हा अप्रतिम सूर्योदय पाहण्यासाठी साडेतीन-चारच्या रामप्रहरी निघाव लागत. मात्र इतर हिमालयप्रमाणे दार्जिलिंगच हवामान फार लहरी त्यामुळेच कितीही थकल असल तरी चागली हवा असेल तर गेल्या गेल्या सूर्योदय पाहून घेण इष्ट

टायगर हिलहून परतताना पाहता येईल गावापासून ८ कि मी वरील मैत्रेयी बुद्धाची मूर्ती असलेली घूम येथील बुद्ध मोनास्ट्री धुमजवळील उचवट्यावर 'बटासिया लूप' येथे दार्जिलिंगची छोटी आगीन गाडी वळताना 'घरगळणार तर नाही ना ?' अस श्वास रोखून धरणार वर्तुळाकार वळण घेते सीझनमध्ये रेल्वे खात्यातर्फे दार्जिलिंग ते बटासिया, घूम आणि परत अशी मजेची 'टॉय ट्रेन' सफरही आयोजित करण्यात येते.

बटासिया लूपजवळ अर्ध्या तासाचा वेळ आसमतात दिसणाऱ्या नानाविध विलोभनीय

देखाव्याचा आस्वाद घेण्यासाठी देण्यात येतो

माउंट एव्हरेस्ट प्रथम पादाक्रांत करणारे शेरपा तेनसिंग यांचं वास्तव्य दार्जिलिंगलाच असे एव्हरेस्ट विजयाप्रीत्यर्थ १९५४ मध्ये दार्जिलिंगला हिमालय माउंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात येऊन तेनसिंगची पहिले फिल्ड ट्रेनिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक करण्यात आली या सस्थेतर्फे बेसिक आणि ॲडव्हान्स गिर्यारोहणाच्या प्रशिक्षण वर्गाचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते. येथील सग्रहालयात गिर्यारोहणात वापरलेली विविध साधनसामग्री, एव्हरेस्टवरील चढायाचा रोमाचकारी इतिहास, त्यात वापरलेल्या वस्तू, गोळा केलेले नमुने, लक्षवेधी छायाचित्रे, इत्यादी बघायला मिळते (वेळ ९ ते ५. थडीत ९ ते ४, दु. १ ते २ जेवणाची सुट्टी) गावापासून २ कि मी वरील हिमालय माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटला लागून असलेल्या पद्मजा नायडू झुलॉजिकल पार्कमध्ये सैबेरियन टायगर्स, पाडा, काळी हिमालयन अस्वल आणि तऱ्हेतऱ्हेचे पक्षी यासारखे उच्च प्रदेशात आढळणारे पशु-पक्षी पाहायला मिळतात

जगप्रसिद्ध अशा दार्जिलिंग चहाला 'पूर्वेकडील शॅंपेन' म्हणूनही सबोधण्यात येते ही 'चहा' करण्याची प्रक्रिया शहराजवळील ( ३ कि मी ) सत्तराचे वर चहाचे मळे असलेल्या 'हॅपी व्हॅली टी इस्टेट' मध्ये बघता येते (वेळ ८ ते १२, १ ते ४ ३० रविवार दुपार व सोमवारी बंद ) तजेलदार हिरव्या चहाच्या मळ्याचा गालीचा पसरलेले डोंगरउतार पाहताना वाटत, नयनसुख म्हणतात ते आणखी काय असाव ?

गावाच्या उत्तरेस असलेल्या ( ३ कि मी ) 'दार्जिलिंग रगीत व्हॅली पॅसेंजर रोपवे' तून चहाच्या मळ्याखेरीज रगीत नदीकाठच्या संत्र्यासारख्या टवटवीत फळबागाच मनोहारी विहगम दृश्य दिसतं या रोमाचकारी रोपवे सफरीच सीझनमध्ये गर्दी असल्याने आगाऊ रिझर्वेशन केलेल उत्तम ( सपर्क ऑफिसर इनचार्ज, दार्जिलिंग रोपवे स्टेशन, नॉर्थ पॉईंट ) मार्केटमधील मोटार स्टॅंडपासून रोपवे स्टेशनपर्यंत 'शेअरिंग' पद्धतीवर नियमित टॅक्सीसेवाही उपलब्ध आहे या रोपवेमधून 'सिंगला बाझार' ( ८ कि मी )ला जाता येत रगीत नदीकिनारी सुमारे २४४ मीटर्स उचीचा 'सिंगला' हा एक रमणीय पिकनिक स्पॉट 'रिव्हर राफ्टिंग' हा साहसी खेळाचा प्रकार येथे नुकताच सुरू करण्यात आलेला आहे दार्जिलिंगचा ( ८ कि मी ) लेबॉंग रेसकोर्स हा जगातील सर्वाधिक उचीवरील ( १८०९ मीटर्स ) सर्वात लहान ( ४८० यार्डस् ) रेसकोर्स मानण्यात येतो दलाई लामाच्या भारतातील आगमनानतर आलेल्या तिबेटी लोकाच पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने १ ऑक्टोबर १९५९ रोजी 'तिबेटियन रेफ्युजी सेल्फ हेल्प सेंटर'ची निर्मिती करण्यात आली या सेंटरमध्ये तयार होणारे सुदर गालिचे, लोकर, लाकूड, चामडे याच्या हस्तकला वस्तूचे उत्पादन प्रत्यक्ष पाहता येते ( रविवारी बद )

प्रत्येकाच्या आवडी, अभिरुचीला आकर्षित करणारी अनेक ठिकाणे दार्जिलिगमध्ये आहेत टायगर हिलच्या पायथ्याच गोल्फ व पिकनिकसाठीच सेंचाल लेक ( १० कि मी ), रगील नदीकाठचा पिकनिक स्पॉट माजीतार ( २१ कि मी ), व्हिक्टोरिया धबधबा ( १ कि.मी ), वनस्पती अभ्यासक, प्रेमींसाठी मार्केट स्क्वेअरजवळील लॉईड बोटॅनिकल गार्डन, राजभवनामागील जवाहर परबात 'वरील ' दि श्रुबेरी गार्डन ', हिमालयातील वनस्पती, प्राणी, कीटक-पक्षाचे दुर्मिळ नमुने असलेल ' दि माल 'पासून चालत काही मिनिटाच्या अतरावरील ' नॅचरल हिस्टरी म्युझियम ', देशभक्त चित्तरजन दास याच्या अखेरच्या काळातील वास्तव्याने पुनीत झालेले चौरस्त्याखालील कुटीर- ' स्टेप असाईड ' कलारसिकाना गावापासून २ कि मी वरील घूम रस्त्यावरील श्रीमती आव्हा देवी याच्या ललित कलाकौशल्य, एम्ब्रॉयडरीचे उत्कृष्ट नमुने असलेली ' आव्हा आर्ट गॅलरी ' पाहता येईल ( वेळ ८ ते १२, १२ ३० ते ६ )

धार्मिक प्रवृत्तीच्या लोकासाठी भगवान शकराच वास्तव्य असल्याच मानण्यात येणारी ' ऑब्झर्वेटरी हिल ' ( येथे बौद्ध गुफाही आहे. ), नेपाळमधील काठमाडूच्या पशुपतीनाथ मदिराच्या धर्तीवर बाधण्यात आलेल ' धीरधाम मदिर, ' तसेच घूम येथील बुद्ध मोनास्ट्रीखेरीज भूतीया बस्ती मोनास्ट्री आहेत दार्जिलिगच्या दऱ्या-खोऱ्याचा डोंगराळ परिसर म्हणजे पदभ्रमणप्रेमींच्या दृष्टीने दृष्टीने जणू नदनवनच दाट जगलातील या पायचालीत वनस्पती, पुष्पाचे नानाविध प्रकार, विशेष करून जास्त उचीवर आढळणारा आणि म्हणूनच आपल्याकडे विशेष दिसणारा पुष्पसम्राट ' ऱ्होडोडेंड्रॉन ' पहायला मिळतात सँडक्फू ( ५६ कि मी ), फालुत ( ७९ कि मी ) ही दार्जिलिगजवळील पदभ्रमण-निसर्गप्रेमींची आवडती ठिकाणे. डिपार्टमेंट ऑफ टूरिझम, दार्जिलिग गुरखा हिल कौन्सिलने या भागातील साहसी पर्यटन, पदभ्रमण याना अधिक चालना देण्यासाठी बऱ्याच योजना आखल्या आहेत पदभ्रमणाच्या वेगवेगळ्या मार्गावर छोट्या कुटीराची- ट्रेकर्स हट्स- उभारणी करण्यात आलेली असून ट्रेकिंगसाठी लागणारी साधनसामग्री भाड्याने मिळू शकते दार्जिलिगमधील अनेक खासगी एजन्सीतर्फेही पदभ्रमणाच्या सहलींचे आयोजन केले जाते या भागात यासाठीचा उत्तम मोसम म्हणजे एप्रिल-मे आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर दार्जिलिगपासून ५० कि.मी वरील दार्जिलिग-सिलिगुरी या १०० कि मी च्या दुसऱ्या रस्त्यावर मध्यात १ २५ कि मी लाबीच बोटिंगची सुविधा असलेल ' मिरिक लेक ' हे निसर्गाची जवळीक साधणार वनविहारासाठीच एक आकर्षक ठिकाण येथे निवासाची सोयही आहे

* *

# चित्तवेधक कॅलिंपाँग

उचच्या उच पाईन्ससारख्या जातीच्या वृक्षाची गर्द झाडी डोंगर उतरणीवरील तुकतुकीत हिरवेगार चहाचे मळे, निसर्गरम्य शेतीवाडीतून अवचित दिसणार टुमदार घरकुल, पाचूच्या रगाची उधळण असलेल्या डोंगरखाईत दिसणारा रगीत-तिस्ता नद्यांचा मनोहारी सगम यासारख्या एकाहून एक विलोभनीय अशा सृष्टिसौंदर्याची उधळण दाखवत नेणारा शांत, प्रसन्न रस्ता ५१ कि मी वरील निसर्गरम्य कॅलिपाँगला कधी घेऊन येतो हे कळतही नाही कांचनगगेच्या शिखराचा अधिक जवळून, सुरेख, समग्र देखावा दिसणारा दरबिंदारा पॉईंट, तिबेटियन् मोनास्ट्री, भूतानीज् मोनास्ट्री, ऑर्किड, कॅक्टस आणि विदेशी वनस्पतींच्या नर्सरीज, कॅलिपाँग आर्टस् अँड क्राफ्ट्स् सेंटर (रविवारी बद) या कॅलिपाँगमधील काही भेटी देण्यासाठीच्या जागा लोकरीच्या विणकामाचे कपडे, गालीचे, टखा, मुखवटे, कृत्रिम खड्याच काम केलेल्या धातूच्या वस्तू, कुकरी यासारखी खरेदी या भागात इच्छुकाना करता येईल. दार्जिलिग-कॅलिंपाँगमधील काही जत्रोत्सव, लेपचा आणि भूतीया जमातींचा नववर्ष दिन-मकर सक्रांत, तिस्ता नदीकाठचा मेळा (जानेवारी मध्य), तिबेटी नववर्षदिन (फेब्रुवारी मध्य), बुद्ध पौर्णिमा (मे), शहीद दिवस (२७ जुलै), दसरा-दिवाळीनिमित्त मुखवट्याची नृत्ये (सप्टेंबर/ऑक्टोबर)

सिलिगुरी, दार्जिलिंग, कर्सिआँग, कॅलिपाँग आणि मिरिक येथे टूरिस्ट लॉजेस असून त्याचे रिझर्वेशन वेस्ट बगाल टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडे करता येईल.

पश्चिम बगाल पर्यटन विभागाच्या देखभालीखालील डॉ झाकीर हुसेन मार्गावरील दार्जिलिगच्या यूथ हॉस्टेलमध्ये रोज प्रत्येकी १५-२५ रुपये दरात राहता येत या यूथ हॉस्टेलच रिझर्वेशन यूथ सर्व्हिसेस, ३२/१ बी डी डी बाग, कलकत्ता ७०० ००१ येथेही होऊ शकेल

निरनिराळ्या कमी-जास्त दराची अनेक खासगी हॉटेल्स दार्जिलिग व कॅलिपाँगला मिळू शकतात अधिक माहितीसाठी सपर्क [१] टूरिस्ट ब्युरो, गव्हर्नमेंट ऑफ वेस्ट बंगाल, ३/२, बी डी डी बाग, कलकत्ता ७०० ००१

[२] नेहरू मार्ग, दार्जिलिग

[३] हिल कोर्ट रोड, सिलिगुरी

* *

# प्रफुल्लित गंगटोक

दार्जिलिंगपासून कॅलिंपाँगमार्गे ९० कि मी वर काचनगंगेच्या धवल नजाकतीच्या जवळिकेन अधिकच झळाळलेली सिकीमची निसर्गसंपन्न राजधानी गगटोक येते

( गगटोक - सिलीगुरी थेट रस्ता ११५ कि मी )

कॅलिपाँगहून तिस्तेची लयबद्ध साथसगम सुरू होते एका अगाला गर्द झाडीने भरलेले डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खळखळत वाहणारी तिस्ता ! वळणा-वळणाच्या या मनोरम प्रवासात सृष्टी वैभवाच नवनवीन दालन सतत समोर येत राहत

रँमपॉंग हे सिक्कीमच्या सीमेवरील गाव प बगालमधून सिक्कीममध्ये प्रवेश केल्यावर जाणवणारा ठळक फरक म्हणजे येथील लोक फक्त दारूच पितात की काय वाटायला लावणारी फुटाफुटाच्या अतरावर दिसणारी मोठमोठी 'वाईन शॉप्स'. विविध स्वादाची आणि तऱ्हेतऱ्हेच्या आकाराच्या लहान-मोठ्या आकर्षक बाटल्यामधून मिळणारी सिक्कीम वाईन देशभर प्रसिद्ध आहे, तसेच येथील परफ्युमसही

गगटोकच्या दिशेने बस हळूहळू वर चढू लागते रस्त्याने चढ एवढे कठीण की चुकून काही गफलत झाली तर घरगळत खाली जाण्याची भीती. पण कुशल ड्रायव्हर्स या खड्या चढणी लीलया पार करत सपूर्ण डोंगरउतरणीवर वसलेल्या गंगटोकच्या बस स्टँडवर सुखरूप आणून उतरवतात तेव्हा हायस वाटत अतिशय चित्तथरारक असा हा प्रवासानुभव !

सपूर्ण वेगळ अस सिक्कीमच वातावरण, लोकजीवन, पर्यटकाना हव्याशा वाटणाऱ्या खऱ्याखुऱ्या बदलाची अनुभूती देत गगटोक-सिक्कीमला भव्य-दिव्य अशी मानवनिर्मित प्रेक्षणीय स्थळ नाहीत तेथे जायच ते निसर्गदत्त लेण्याच सौंदर्य भरभरुन घेण्यासाठीच गगटोकपासून ९ कि मी वरील 'ताशी व्ह्यू पॉईंट' वरून काचनगगेच्या उत्तुंग धवल लावण्यमय शिखराच अगदी जवळून दर्शन होतं, अर्थात् खराब हवामानामुळे ढगानी त्यांच्या भोवती गर्दी केली नसेल तरच !

सिक्कीमच्या भूतपूर्व महाराजाच्या गगटोकमधील राजवाड्याच्या परिसरात असलेल्या तस्क-ला-खांग मोनास्ट्रीमधील भव्यता, रगीत कोरीव काम, सुबक मूर्ती पाहून डोळे दिपून जातात शाही लग्न व इतर समारभ ( पूर्वी राज्यरोहण ) येथेच होतात

गगटोकच्या कॉटेज इडस्ट्रीज् इन्स्टिट्यूटमधे विक्रीस असलेल्या पारंपरिक सिक्किमी डिझाइनचे हातवीणीचे लोकरीचे गालीचे, शाली, बॅग्ज, सहज पॅकिंग होणार घडीच खास सिक्किमी टेबल, टखा, चामड्याच्या वस्तू, बाहुल्या, फॅशनेबल जॅकेटस् यासारख्या कितीतरी गोष्टी पर्यटकाच लक्ष वेधून घेतात

नामग्याल इन्स्टिट्यूट ऑफ तिब्बेटॉलॉजी ही तिब्बेटी बौद्ध धर्म, सस्कृतीचा विद्याभ्यास, सशोधन करणारी सस्था. येथील ग्रथालय व सग्रहालयात बौद्ध वाङ्मयातील अनेक दुर्मिळ पुरातन ग्रथ, ठका, इत्यादी वस्तू पाहायला मिळतात

या तिब्बेटॉलॉजी इन्स्टिट्यूटखाली असलेल्या ऑर्कीड सँक्चुरीत विविध प्रकारचे ऑर्कीडस्, विशेषकरून सीझनमध्ये बघायला मिळतात

गगटोकपासून २४ कि मी. वरील 'रूमटेक' येथील मोनास्ट्रीही प्रसिद्ध आहे पदभ्रमणाची आवड असणाऱ्याना सिक्कीमचा हा पर्यटकाच्या गदारोळानी न भरलेला असा निवांत, शात प्रफुल्लित प्रदेश पाहाण नक्कीच आवडाव.

गगटोकमध्ये राहण्यासाठी मध्यमवर्गीय पर्यटकाना परवडू शकणारी अनेक हॉटेल्स असून याचे दर मात्र सीझन आणि मागणीनुसार कमी-जास्त होत असतात खाण्या-पिण्याचे हाल होत नाहीत हॉटेलमध्ये सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ मिळतात सिक्कीमच्या पर्यटनासबधीची अधिक माहिती टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर, गव्हर्नमेंट ऑफ सिक्कीम, गगटोक बझार याच्याकडे मिळू शकेल

* *



आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश नागालँड, मिझोराम मणिपूर त्रिपुरा

# ईशान्येकडील सप्तभगिनी

भारताच्या इतर भागापेक्षा सपूर्ण वेगळा प्रदेश, वेगळी माणस, निराळी संस्कृती बघायची असेल तर ईशान्य भारतासारखा दुसरा प्रदेश नाही

आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम, मणिपूर आणि त्रिपुरा ही सात राज्ये 'सेव्हन सिस्टर्स ऑफ नॉर्थ ईस्ट', ईशान्येकडील सप्तभगिनी म्हणून ओळखली जातात भारताच्या मुख्य भूमीपासून दूर असलेला हा भाग सुलभ दळणवळण, भाषा सपर्काअभावी आणि कधी नागा, कधी मिझो, कधी बोडो यासारख्याच्या सतत चालू असलेल्या आततायी कारवायामुळे पर्यटकाना तसा अपरिचित राहिला आहे

नानाविध हिरव्या रगछटांनी बहरलेली ही सर्व राज्ये अतिशय आकर्षक आणि वेगळ्या वातावरणाचा बदल घडविणारी असली, तरी त्यांचा प्रवास तसा जिकीरीचाच. प्रदेश डोंगराळ त्यामुळे एका राज्यातून दुसऱ्यात रस्त्याने जायच झाल्यास दहा-बारा किंवा अधिकही तास लागतात विमानाने हाच प्रवास फक्त अर्ध्या-पाऊण तासात होतो ईशान्य भारताच्या प्रवासात असलेली आणखी एक अडचण म्हणजे त्यातील अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम या राज्यात प्रवेशासाठी भारतीय नागरिकानाही लागणारे इनरलाईन परमिट हे परमिट काढण्याची पद्धतही मोठी त्रासाची फॉर्म भरावा लागतो, मुलाखत होते आणि मुख्य म्हणजे

आपली ओळख पटवावी लागते त्या भागात आपल्याला ओळखणारं कोणी नसेल, तर आठवणीने बरोबर स्वतःच ओळखपत्र घ्यायला हव

आवड, उपलब्ध वेळ, पैसा यानुसार किती राज्य बघायची आणि कसकसा प्रवास मार्ग आखायचा हे ठरवता येईल. जास्तीत जास्त विमान प्रवास केला तर थोड्या दिवसात बराच प्रदेश बघता येईल.

गुवाहाटी हे ईशान्येकडील राज्याचे प्रवेशद्वार आणि आसामची राजधानी ५६४५ दादर-गुवाहाटी ही सध्या दर शनिवारी आणि बुधवारी पहाटे निघणारी थेट गाडी गुवाहाटीला तिसरे दिवशी सकाळी साडेनऊला पोहोचते एवढा सलग प्रवास नको असेल, तर जाता-येता पाटणा/कलकत्ता येथे मुक्काम करून आसपासची ठिकाणे पाहता येतील विशेष त्रास न घेता आसाम, मेघालय आणि एखादा विमान प्रवास केल्यास, मणिपूर ही राज्ये सहज पाहता येतील या तिन्ही राज्यात पर्यटकासाठी सुविधाही खूप आहेत

* *

## आसाम

ब्रह्मपुत्रा नदी हे आसामच आकर्षण दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे हाहाकार माजवणारी, तारक तशी मारक असलेली ब्रह्मपुत्रा ओलाडणे हा एक आगळाच अनुभव. गुवाहाटीत हिच्या मध्यावर असलेल्या पिकॉक बेटावर उमानद हे शकराच मदिर आहे. निलाचल टेकडीवरील कामाख्या मदिर, चित्राचल टेकडीवरील नवग्रह मंदिर, शुक्रेश्वर टेकडीवरील सस्कृत शिक्षणाचे केंद्र असलेले शुक्रेश्वर मदिर, तेथून २२ कि मी. वरील हिंदू, मुस्लिम, बौद्ध धर्मियाचे हाजो, ही गुवाहाटीतील काही श्रद्धास्थाने या खेरीज येथील १२ कि मी वरील वसिष्ठाश्रम आणि प्राणिसग्रहालयही ( दर शुक्रवारी बद ) भेट देण्याजोगे

काझिरगा हे गुवाहाटीपासून २१७ कि मी वर असलेले मुख्यत एकशिगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेल अभयारण्य ४३० चौ कि मी क्षेत्रफळात पसरलेल्या या अभयारण्यात हजारपेक्षा जास्त सख्येने गेंडे असल्याने ते हमखास दिसतातच गुवाहाटीहून आसाम राज्य पर्यटन खात्यातर्फे काझिरंगा सहलीचे आयोजन करण्यात येत ( सपर्क टूरिस्ट इन्फर्मेशन ऑफिसर, स्टेशन रोड, गुवाहाटी ७८१ ००१ )

काझिरगासारखच भूतानच्या सीमेला लागून असलेल 'मानस' हे २८३७ चौ कि मी क्षेत्रफळात पसरलेल आसाममधील आणखी एक अभयारण्य ( गुवाहाटी १७६ कि मी. )

काझिरगा परिसरात प्रसिद्ध आसाम चहाचे मळे पाहता येतील काझिरगापासून ९६ कि मी वर येत जोरहाट हे आसाममधील एक प्रमुख गाव तेथून जवळच येत 'शिवसागर'

हे आसामवर सहाशे वर्षांहून अधिक काळ राज्य करणाऱ्या 'अहोम्' राजवंशीयाच्या राजधानीचं ठिकाण शिवसागरचा सर्व परिसर अनेक प्राचीन, ऐतिहासिक अवशेषानी समृद्ध आहे याच भागात तेल विहीरी, कोळसा आणि इतर खनिजाच्या खाणी आहेत

बंगाली भाषिकाचे प्राबल्य असलेल सिल्चर हे आसामातील आणखी एक प्रमुख व्यापारी गाव आणि मिझोराम व त्रिपुरा राज्यांचे प्रवेशद्वार

* *

## मेघालय

गारो, खाशी, जैतिया या टेकड्याच्या डोंगराळ भागाची राजधानी शिलाँग पूर्वेकडील स्कॉटलंड म्हणून ओळखल जाणार हे बारामाही थड हवेच ठिकाण गुवाहाटी- शिलाँग (१०३ कि मी ) या अतिशय नयनरम्य रस्त्यावर मुबई-पुणेसारख्या टॅक्सी सतत धावत असतात वाटेत शिलाँगच्या अलीकडे १६ कि मी वर 'बडा पानी लेक' हा अत्यत सुदर निसर्गरम्य पिकनिक स्पॉट लागतो शिलाँगच खास आकर्षण म्हणजे त्याच्या आठ कि मी परिसरात असलेले मागरीट, ईगल, बिशप, बीडॉन, एलिफट, स्वीट, क्रिनोलिन यासारखे एकाहून एक सुदर धबधबे. याशिवाय ८ कि.मी वरील 'शिलाँग पीक' हे आणखी एक सुरेख ठिकाण जगात सर्वात जास्त पाऊस पडणारे चेरापुजी शिलाँगपासून ५८ कि.मी.वर आहे येथीलही लहान मोठे धबधबे विशेषकरून मौसमाई धबधबा फारच प्रेक्षणीय आहे. मेघालयाच्या सहलीच्या अधिक माहितीसाठी सपर्क मेघालय टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, टूरिस्ट कॉम्प्लेक्स, पोलो ग्राऊड, शिलाँग ७९३ ००१

* *

## अरुणाचल प्रदेश

राजधानी हिरव्यागार डोंगरामधून नवीन वसवलेल इटानगर स्वत च्या विमानतळ नाही इटानगरपासून रस्त्याने अडीच तासांच्या अतरावर असलेला आसाममधील नॉर्थ लखिमपूर येथील लीलाबारी हा जवळचा विमानतळ इटानगरला नुकतीच हेलिकॉप्टर सेवा सुरू झाल्याच वाचनात आल इटानगरच्या अलीकडे १० कि मी वर असलेल नहरलगन ही अरुणाचलची पूर्वीची राजधानी गुवाहाटी- नहरलगन/ इटानगर बसेस इनरलाईन परमिट दि जॉईंट सेक्रेटरी (पोलिटिकल), गव्हर्नमेंट ऑफ अरुणाचल प्रदेश, इटानगर ७९१ १११ याचेकडून किंवा अरुणाचल प्रदेश राज्य सरकारच्या नवी दिल्ली, कलकत्ता, गुवाहाटी, लिलाबारी, मोहनबारी, तेझपूर येथील लिएझॉन ऑफिसर्समार्फत दिले जाते पर्यटकासाठी तवाग बुद्ध विहाराचा मार्ग आता खुला करण्यात आला आहे. तेझपूर- बोमडीला- तवाग ही सहल करू

इच्छिणाऱ्यासाठी संपर्क दि असिस्टंट डायरेक्टर ( टूरिझम ), गव्हर्नमेंट ऑफ अरुणाचल प्रदेश, नहरलगन ७९१ ११०

* *

# नागालँड

दिमापूर या आसाम- नागालँड सीमेवरील गावी इनरलाईन परमिट मिळू शकते नागालँडमध्ये न उतरता जोरहाटहून थेट मणिपूरला बसने जायचं झाल्यास हे परमिट काढलं नाही तरी चालतं डोंगर उतारावरील कोहिमा ही स्वच्छ, सुरेख राजधानी दुसऱ्या महायुद्धात कामी आलेल्या सैनिकांची वॉर सेमिटरी ( युद्ध दफनभूमी स्थळ ) आणि आदिवासी म्युझियम ही कोहिमातील पाहण्याजोगी ठिकाणे

* *

# मिझोराम

आसाममधील सिल्चर गावी इनरलाईन परमिट मिळते त्यासाठी फोटोग्राफही आवश्यक असतो

सिल्चरपासून १८० कि मी वर असलेल्या ऐजॉल या राजधानीच्या गावी बसने जाता येते कलकत्ता, अगरताळा येथून रोज विमानसेवाही आहे

* *

# मणिपूर

राजधानी इंफाळ, रेल्वे नसली तरी सिल्चर, गुवाहाटी, कलकत्ता इत्यादींशी विमानाने जोडलेली आहे दुसऱ्या महायुद्धात सुभाषचंद्र बोसांनी स्वतंत्र भारताचा पहिला तिरंगा फडकवलेले मोइरांग इंफाळपासून ४५ कि मी वरील लोकटाक या २५ कि मी क्षेत्रफळात विस्तारलेल्या ईशान्य भारतातील सर्वांत मोठ्या गोड्या पाण्याच्या सरोवराकाठी आहे. आझाद हिंद सेनेने तिरंगा फडकवलेल्या जागी नेताजी ग्रंथालय आणि इंडियन नॅशनल आर्मीने सिंगापूरमध्ये उभारलेल्या स्मारकाची प्रतिकृती आहे इंफाळ- मोइरांग रस्त्यावरील बिशनपूर ( २७ कि मी ) हे गाव ऐतिहासिक विष्णू मंदिर आणि दगडाच्या भांड्यासाठी प्रसिद्ध आहे फिश फार्म- माशाची शेती हे मणिपूरचे खास वैशिष्ट्य दुसऱ्या महायुद्धात प्राणाहुती दिलेल्यांची 'वॉर सेमिटरी', देशाच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरूद्ध लढताना बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थचा शहीद मीनार, श्री गोविंदजी वैष्णव मंदिर, ऑर्कीड गार्डन, ही इंफाळमधील भेट देण्याची काही ठिकाणे मणिपुरी साड्या विशेषकरून लोकरी

शाली खरेदी करण्याजोग्या सहलीसाठी सपर्क डायरेक्टर ऑफ टूरिझम, गव्हर्नमेंट ऑफ मणिपूर, इफाळ ७९५ ००१

* *

# त्रिपुरा

राजधानी अगरतळा- कलकत्ता विमानाने बागला देशावरून फक्त पाऊण तासात जाता येत (भाड प्र ७५० रु) हाच प्रवास रस्त्याने करायचा झाल्यास, सर्व बागला देशाला वळसा घालून यायचं म्हटल तर किती दिवस लागतील ते सागण अवघड. यामुळे रोजच्या दोन-तीन फ्लाईटस् असूनही त्या बऱ्याचदा भरलेल्या असतात.

खुद्द अगरताळ्यात प्रेक्षणीय म्हणजे सध्या विधान भवन असलेला पूर्वीच्या त्रिपुराच्या महाराजाचा राजवाडा, पाढरा शुभ्र भव्य 'उज्जयता पॅलेस' याखेरीज नीरमहाल हा रुद्रसागर तलावातील राजवाडा (५५ कि मी), त्रिपुरासुदरी हे उदयपूर या कल्याणसागर तलावाकाठच्या टेकडीवरील काली मदिर (४५ कि मी), उनाकोटीतीर्थ हे दगडावरील म्युरल्ससाठीचे प्रसिद्ध तीर्थस्थान (११० कि.मी.)

अगरताळ्यापासून दीड-दोन तासाच्या अतरावर असलेल कमलासागर तलावाकाठचे कसबा-कालीबारी हे ६०० वर्षांचे जुने शाक्ताचे मदिर या ठिकाणी भारत-बागला देशामधील एकमेकात मोकळेपणानी गुतलेली सीमारेषा पाहायला मिळते

आगरताळ्याहून बसने तासाभराच्या अतरावर असलेला सिपाहीजला हा ३४२ ४२ हेक्टर्समध्ये पसरलेला बायोलॉजिकल कॉम्प्लेक्सही भेट देण्याजोगा आहे

बाबूच्या अतिसुरेख वस्तूसाठी, अगदी नाजूक दागिन्यापासून ते मोठमोठाल्या पोट्रेटस्पर्यंत, त्रिपुरा प्रसिद्ध असून, त्याची खरेदी करता येईल.

ईशान्येकडील राज्यात प्रवास करताना जाणवणारी प्रमुख अडचण म्हणजे सुलभ भाषा सपर्क प्रत्येक राज्याची भाषा वेगळी आणि एकेका भाषेच्या पचवीस-तीस बोली भाषा त्यामुळे आपल्यापासून थोड्या फटकून असलेल्या येथील लोकाशी जास्त जवळीक साधता येण अवघड होत तरीही निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या दूरच्या राज्यात जायला हव

* *




# वैभवशाली स्मृतिस्थळांचं : बिहार

सध्या सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेलं असल्याने, की काय पण पर्यटकानीही थोडं बाजूला टाकलेलं बिहार हे राज्य परंतु एकेकाळी याच भूमीने गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, आर्य चाणक्य, दहावे शीख गुरु गोविंदसिंग यासारखे अग्रणी निर्माण केले चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, विक्रमादित्य इत्यादींच्या काळात पुढारलेल्या या भागाने भारतवर्षाला सोन्याचे दिवस दाखवले वैभवशाली गतइतिहासाची अनेक स्मृतिस्थळे या राज्यात आहेत

प्राचीन काळच पाटलीपुत्र म्हणजे आजच्या बिहारची राजधानी पाटणा आसाम किंवा ईशान्य भारतात जाते/येते वेळी कमीत कमी पाटणा आणि त्याजवळील नालंदा, राजगीर, पावापुरी यासारख्या प्रमुख स्थळाना भेट देता येईल भागलपुर/मुझफ्फरपूर एक्सप्रेसने मुंबईहून थेट पाटण्याला जाता येईल

इ स पू. ६०० ते इ स १६०० काळातील पुरातन पाटलीपुत्र गावाचे उत्खननात सापडलेले अवशेष पाटण्यातील ' कुम्हरार ' येथे सोमवारखेरीज सकाळी ९ ते ५ ३० चे दरम्यान बघायला मिळतात

इ स १७८६ मध्ये बांधलं गेलेल पाटण्यातील २७ मीटर्स उंचीचे मधमाशाच्या पोवळ्याच्या आकाराचे धान्याचे कोठार आजही उपयोगात आणल जात वरून गावाचा, संथ वाहणाऱ्या गंगेचा विहंगम देखावा दिसतो

गुरु गोविंदसिंग यांचा जन्म झालेल पाटण्यातील हरमंदिर गुरुद्वार, शीख धर्मीयाना अमृतसरच्या सुवर्णमंदिराखालोखाल पवित्र आहे

बिहारमधील प्रमुख अशा पाटण्यातील म्युझियममध्ये अनेक दुर्मिळ नमुन्याबरोबरच आपले पहिले राष्ट्रपती डॉ राजेंद्रप्रसाद याच्या वैयक्तिक वस्तूंच्या मनोज्ञ संग्रहाचे प्रदर्शनही पाहायला मिळते

कै जयप्रकाश नारायण याच्या कदमकुआँ भागातील निवासस्थानीही जयप्रकाशजी आणि त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवी यांच्या वैयक्तिक वस्तू, पत्र, फोटो, हस्तलिखिते इत्यादींचे नीटस संग्रहालय पाहता येते

बौद्ध, जैन आणि हिंदू या तिन्ही धर्मीयाना सारखच पवित्र स्थान म्हणजे पाटण्यापासून १०२ कि मी वरील पाच हिरव्यागार टेकड्यामधील राजगीर.

रामायणानुसार ब्रह्मदेवाचा चौथा पुत्र 'वसू' याने राजगीर वसवल महाभारतातील जरासध राजा येथलाच भगवान बुद्धानी धर्मप्रसारानिमित्त बराच काळ येथे व्यतीत केला भगवान महावीरानीही चौदा पावसाळे याच भागात वास्तव्य केल

राजगीरमध्ये गरम पाण्याचे झरे/कुड असून त्या पाण्यात रोगनिवारक गुण असल्याच मानल जात

राजगीरचा आसमत इतक्या पौराणिक, ऐतिहासिक घटनानी समृद्ध आहे, की त्याच नीट दर्शन घेण्यासाठी बरोबर मार्गदर्शक असण इष्ट जुन्या राजगीर ( राजगृह ) गावाभोवतालचा मैलोन् मैल लाबीचा तट, सर्पपुजा होत असलेल मणिनागाच पवित्र स्थान, जरासध व भीम याच्यात द्वद्वयुद्ध झालेली रणभूमी, जैन तीर्थकाराची भित्तीचित्रं असलेल्या सोनभडार गुफा, म बुद्धाचे आवडत निवासस्थान ग्रृधकुट माथा, भगवान बुद्धाच्या महानिर्वाणानतर पहिली धर्मपरिषद भरलेली सप्तपर्णी गुहा, बिंबिसार रस्ता, बिंबिसारचा तुरुग, राजवैद्यक जीवक याच आम्रवन, इत्यादी एक ना दोन कितीतरी पौराणिक, ऐतिहासिक स्थळे येथे आहेत

राजगीरच्या १२ कि मी उत्तरेकडे आणि पाटण्यापासून ९० कि मी वर इ स पाचव्या शतकात स्थापन झालेल्या जागतिक कीर्तिच्या नालदा विद्यापीठाचे मत्रमुग्ध करणारे अवशेष पाहायला मिळतात नालदा येथील निवासी विद्यापीठात देशोदेशीचे सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत प्रचड उत्खनन केलेल्या या परिसराच्या विहारातील काही खोल्या एका विद्यार्थ्यासाठी, तर काही दोघाना समाईक असलेल्या दिसतात प्रत्येक विहारासमोर एक मंदिर असून सर्व विहाराची रचना, बाधकाम एकसारखे परिपूर्ण असल्याच दिसत बऱ्याच जागी एकावर एक असे ५ व्या, ६ व्या आणि ७ व्या शतकातील बाधकाम आढळत अर्थात् हे समजत बरोबर गाईड असेल तरच ! उत्खनन केलेल्या जागेजवळ एका पुरातत्त्व सग्रहालय असून त्यात नालदा आणि राजगीर परिसरातील उत्खननात सापडलेल्या अनेक दुर्मिळ, मौल्यवान वस्तू जतन करून ठेवलेल्या आहेत

पावापुरी हे जैन धर्मियाचे यात्रास्थान पाटण्यापासून ८० कि मी वर येत गया हे हिंदूच अत्यत पवित्र असलेल तीर्थक्षेत्र पाटण्याहून सुमारे पावणेदोनशे किलोमीटर्सवर येत गयेपासून १५ कि मी वर गौतमबुद्धाना साक्षात्कार झालेल बोधगया हे बौद्ध धर्मीयांच महत्त्वाच पवित्रस्थान आहे

सर्व महत्त्वाच्या ठिकाणासाठी पाटण्याहून बसेस असून बिहार राज्य पर्यटन महामडळ, इडियन टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन तसेच खासगी सस्थामार्फतही प्रेक्षणीय स्थलदर्शनाच्या

सहलींच आयोजन केल जात इच्छुकाना अधिक माहिती डायरेक्टर ऑफ टूरिझम, गव्हर्नमेंट ऑफ बिहार, पाटणा ८०० ०१५ याच्याकडून मिळू शकेल प्रवासासाठी योग्य कालावधी नोव्हेंबर ते फेब्रुवारी

* *




# औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ

"तुमच्या महाराष्ट्रात अगदी पहायलाच पाहिजे अस काय आहे?" असा प्रश्न कोणी विचारल्यास झोपेतसुद्धा नाव येईल ते अजिंठा-वेरुळ लेण्याच भारतातील हे जगविख्यात प्राचीन शिल्प सोयीस्करपणे बघण्यासाठी प्रथम जाव लागेल औरंगाबादला

आपला दख्खनचा विजय साजरा करण्यासाठी मोगल सम्राट औरंगजेबान हे शहर रुढार्थान वसवून आपली दक्षिणेकडील राजधानी केली औरंगाबादच जुन नाव 'खडकी' म्हणजे खडकावरील छोट खेड दक्षिण भारतावर नजर ठेवण्यासाठी त्याचा खिडकीसारखा उपयोग होत असल्याने त्याला 'खिडकी' असेही संबोधण्यात येत असे गावकोसाच्या तटबंदीशिवाय १७ व्या शतकातील अनेक स्मृतिस्थळे आजही औरंगाबादमध्ये पाहायला मिळतात औरंगजेबाची एक राणी रबिया दुराणी हिची आग्रा येथील ताजमहालाच्या धर्तीवर बांधलेली उद्यानातील कबर (बिबि का मकबरा) हुबेहूब ताजमहालची आठवण करून देते

जुन्या इंजिनीअर्सनी केलेली औरंगाबादची पाणीपुरवठा योजना अद्वितीय अशी म्हणता येईल त्या वेळची पाणचक्की आजही येथे सुस्थितीत अस्तित्वात आहे

औरंगाबाद शहराच्या थोड्या बाहेरील डोंगरावर लेण्या आहेत सहाव्या शतकाच्या सुरवातीस या औरंगाबाद लेण्याचा शोध लागला असावा जुन्या पितळखोरा गुफा औरंगाबादपासून ७८ कि मी वर आहेत

भारतातील अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे बौद्ध शिल्प सातवाहनाच्या कारकीर्दीत निर्माण झाले भारतीय संस्कृतीच्या पहिल्या दोन हजार वर्षांत निर्माण झालेल्या चित्रकृतींचा आणि शिल्पकृतींचा परमोच्च बिंदू म्हणजे अजंठा-वेरूळ

औरंगाबादपासून सुमारे १०० कि मी वर असलेल्या अजिंठा ( जळगाव ६० कि मी ) लेण्यातील शिल्पाची निर्मिती इ स पू. २०० ते ६०० पर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडात झाली असावी १९ व्या शतकाच्या आरंभी ब्रिटिश ऑफिसरच्या एका तुकडीला डोंगरात दडलेल्या या लेण्याचा शोध योगायोगानेच लागला

घोड्याच्या नालाच्या आकारात विखुरलेल्या अजिंठ्याच्या तीस लेण्यात स्थापत्य, शिल्प आणि चित्रकला याचा मनोहारी सगम पाहायला मिळतो काही लेण्यात नैसर्गिक रित्या प्रकाशकिरणे यावीत अशी योजना केलेली असली तरी बॅटरी घेऊन गेलेल चांगल सात्त्विक सौंदर्य आणि भव्य भित्तीचित्र यासाठी नावाजलेल्या येथील लेण्यात बुद्धाच्या जीवनातील अनेक प्रसग चितारलेले आहेत याखेरीज स्त्रियाच्या वेषभूषा, सौंदर्यालकारासह मोहक आकृत्याही काही लेण्यात पाहायला मिळतात अजिंठ्याच्या १६ ते १७ क्रमाकाच्या गुफात सर्वोत्कृष्ट चित्रे असून गुफा क्र २, ४, ६ ते १०, १९, २७ ते २९ यामध्येही प्रेक्षणीय भित्तीचित्रे आणि शिल्पाकृती आहेत

वेरूळ किंवा एलोरा येथील लेण्या औरंगाबादहून सुमारे ३० कि मी वर येतात ५ ते ८ शतकाच्या दरम्यान खोदल्या गेलेल्या येथील एकूण ३४ लेण्यात बौद्ध, हिंदू आणि जैन याच्या प्राचीन शिल्पकलेच्या तिन्ही शैली आढळतात वेरूळच्या लेण्यांपैकी १२ बुद्ध गुफा, १३ हिंदू देवदेवताच्या व ५ जैन शैलीच्या आहेत तीन विभिन्न धर्मियाच्या एकाच ठिकाणी शेजारी, शेजारी उभ्या असलेल्या शिल्प-संपत्तीच प्रत्येक लेणच पाहाव अस, आपापल्या परीन वैशिष्ट्यपूर्ण असल, तरी वेळ कमी असल्यास त्यातील १०, १२, १६, २१, २९ आणि ३२ क्रमाकाची लेणी आधी पाहावीत ! कुठे वेलबुट्टीच नक्षीकाम, कुठे कौशल्यपूर्ण खोदकाम, कुठे सुदर चित्रे तर आणखी कुठे विशाल वेधक मूर्ती

वेरूळच्या लेण्यातील मेरुमणी म्हणजे एकसध दगडात कोरलेल १६ व्या क्रमाकाच अद्वितीय असं कैलास लेण भोवतालचा खडक फोडून कळसापासून पायाकडे अशा पद्धतीन मधोमध कोरून तयार केलेल, कलात्मक रीत कारागिरीच, १६४ फूट लाब, १०९ फूट रूद आणि ९६ फूट उचीच अद्भुत अस हे सर्वोत्कृष्ट कैलास लेण पाहणाऱ्याला विस्मित करत आणि त्याच्या निर्मात्याविषयीच्या आदरान नतमस्तक होत

अजिंठा-वेरूळची लेणी पाहताना बरोबर गाईड हा हवाच तरच त्याच्या शिल्पसौंदर्यातील बारकाव्याचा जास्त चागल्या प्रकारे आस्वाद घेता येईल

ज्याच दर्शन घेतल्याशिवाय ज्योतिर्लिंगाची यात्रा सफल होत नाही, अस घृष्णेश्वर हे बारावं ज्योतिर्लिंग वेरूळ येथेच आहे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर याच्या प्रेरणेन बाधण्यात आलेल्या दक्षिणात्य धर्तीच्या घृष्णेश्वर मदिरात दर महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते सोमवार, प्रदोष या वेळीही भाविकाची गर्दी असते

औरंगाबादपासून १३ कि मी.वर वेरूळच्या वाटेवर लहरी सुलतान महंमद तघलकाची एके काळची राजधानी दौलताबाद ( पूर्वीचे देवगिरी ) येते महमद तुघलकाने सुरक्षिततेच्या कारणावरून आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला हलविल्याने अल्पकाळ का होईना पण दौलताबादला भारताची राजधानी होण्याच भाग्य लाभल

चहू बाजूनी खोल खदक असलेला, अभेद्य असा सुमारे १८३ मीटर्स उचीचा दौलताबादचा मूळचा किल्ला यादव वशीय राजा भिल्लम याने बाधला तेराव्या शतकापासून दिल्लीच्या अनेक सुलतानानी त्यावर ताबा मिळविला आणि त्याच्या अधिक सुरक्षिततेसाठी सात भिंती बाधल्या चौफेर नजर ठेवणारा ३० मीटर उचीचा चादमिनार किंवा जयस्तभ या किल्ल्यातच आहे. दौलताबादच्या किल्ल्यात शत्रूला भुलविणाऱ्या, त्याच्या हल्ल्यापासून बचाव करणाऱ्या अनेक क्लृप्त्या, भुयारी मार्ग, ऐतिहासिक स्मृतिस्थळे असून तज्ज्ञ मार्गदर्शकाशिवाय आत जाण म्हणजे नीट काहीही न पाहता नुसत भटकून यायची शक्यता असते

दौलताबादपासून १३ कि मी वर वेरूळच्या अलीकडे १३ कि.मी वर खुलदाबाद येथे औरगजेबाची कबर आहे औरगजेबच्या इच्छेनुसार सुरवातीला त्याने कापडाच्या टोप्या शिवून मिळविलेल्या पैशातून एखाद्या गरीब माणसाच्या थडग्याप्रमाणे अत्यत साधेपणान बाधण्यात आलेली, या श्रीमत बादशाहची कबर अजूनही साधीच आहे.

गोदातीरीचे पैठण क्षेत्र औरगाबादजवळ ५६ कि मी वर आहे सत एकनाथाचे म्हणून आपल्याला परिचित असलेले पैठण पूर्वी सातवाहनाची राजधानी होते त्याच्या राजप्रासादाच्या खुणा आजही तेथे दिसतात दक्षिण काशी म्हणून पैठणला परपरा लाभलेली असल्याने ज्ञानेश्वर भावडाना शुद्धीपत्र घेण्यासाठी आळदीच्या ब्राह्मणानी पाठवल, कारण पैठण हे धर्मपीठ म्हणून त्या काळी नावाजलेल होत. एकनाथ महाराजाची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणून १६ व्या शतकात त्याला नवीन महत्त्व प्राप्त झालं. महानुभाव सप्रदायाचे सस्थापक श्री चक्रधरस्वामी काही काळ पैठणलाच येऊन राहिले होते तेथेच त्यानी सन्यासदीक्षा घेतली

समस्त स्त्री वर्गाच्या आवडत्या जरीबुट्टीच्या गभीरशमी पैठणी साड्याही येथेच तयार होतात अस्सल पैठणी तयार करण्यासाठी कुशल कारागिराचे अनेक दिवसाचे कष्ट लागत असल्याने त्याच्या किंमती मात्र सामान्य मध्यमवर्गीयाच्या आवाक्याबाहेर जात आहेत

निसर्गप्रेमींना पैठणजवळील जायकवाडी धरणाच्या जलाशयातील विविध प्रकारचे स्थानिक आणि स्थलातरित पक्षी पाहता येतील म्हैसूरच्या स्वर्गासम वृदावन गार्डनची आठवण करून देणाऱ्या येथील रम्य ज्ञानेश्वर उद्यानासाठी काही वेळ राखून ठेवायला हवा

औरगाबाद हे मुक्कामाच मध्यवर्ती ठिकाण करून अजिठा, वेरूळ ( दौलताबाद ), पैठणला

भेट देता येईल या भागात उन्हाळा तीव्र असल्यान तो सोडून गेलेल चागल मुबईहून रस्त्यानें ३८८ कि मी वर असलेल्या ऐतिहासिक औरगाबादला तेथून विमानानही जाता येईल दक्षिण-मध्य रेल्वेच्या मनमाड जक्शनपासून ११४ कि मी वर औरगाबाद आहे ( जळगाव रेल्वे स्थानकापासून रस्त्याने अजिंठा ६० कि मी ) महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख गावातून औरगाबादसाठी एस टी सेवा आहे. औरगाबाद व जळगावहून अजिठ्यासाठी एस टी बसेस सुटतात

औरगाबादला राहण्यासाठी अनेक खासगी हॉटेल तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामडळाच्या ( म. प वि म ) निवास सुविधा आहेत. त्याची आरक्षण अजिठा औरगाबाद आणि फर्दापूर येथे होऊ शकतात ( मुक्काम समाप्तीची वेळ दुपारी १२ )

अजिठा आणि त्याजवळील फर्दापूर येथेही म प वि म ची निवासस्थान असून त्याची आरक्षण मुबई व औरगाबाद येथे होऊ शकतात ( मुक्काम समाप्तीची वेळ स ८ वा ) म. प वि म च्या आराम बससेवा औरगाबादहून मुबई, वेरूळ स्थळदर्शन, अजठा, पैठण स्थळदर्शन ( १ला व ३रा शुक्रवार, २रा व ४था शनिवार ) आहेत याशिवाय पर्यटकाच्या गटासाठी सहल-व्यवस्था करण्यात येते अधिक माहितीसाठी सपर्क १) औरगाबाद विभागीय कार्यालय महाराष्ट्र पर्यटन विकास महामडळ, हॉलिडे रेझॉर्ट, स्टेशन रोड, औरगाबाद ४३१ ००१ २) पर्यटन माहिती केंद्र, विमानतळ, औरगाबाद ३) सहल विभाग व आरक्षण कार्यालय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामडल, 'योगक्षेम 'समोर, सी डी ओ हटमेंटस, मादाम कामा रोड, मुबई ४०० ०२०.

* *




# अलिबाग, मुरूड – जंजिरा

सुट्टी म्हटली की दोन-चार दिवस का होईना पण जवळपास कुठेतरी जावस वाटत महाबळेश्वर, माथेरान नेहमीचच म्हणून नको असत निसर्गरम्य कोकणातील गणपती-पुळे, चिपळूण- परशुराम, आणि जाता- जाता कोल्हापूर- पन्हाळाही बरेचदा झालल असत मग आता जवळपास कुठे जाव विचार करता शात रम्य निसर्गाच्या सान्निध्यातील कोकणातील

अलिबाग, मुरूड- जंजिरा पटकन नजरेसमोर येतात भूगोलशास्त्राचे चमत्कृतिपूर्ण प्रात्यक्षिक दाखविणार, श्रीवर्धन जवळील नितांत सुंदर देवस्थान हरिहरेश्वरही याच सहलीत करता येईल

मुंबई- पुणे महामार्गावरील खोपोलीपासून ७० कि मी (पेण ३५ कि मी ) वर असलेल्या निसर्गरम्य अलिबागला जातेवेळी वाटेत थोडी वाट वाकडी करून अष्टविनायकांपैकी पालीच्या बल्लाळेश्वरच दर्शन घेता येईल उन्हेरे येथील गरम पाण्याचे झरे बघता येतील पेण- पनवेल जवळील कर्नाळा अभयारण्याला पक्षी प्रेमींना भेट देता येईल पनवेलच्या एस. टी स्टँडजवळील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटीमधील कर्नाळा अभयारण्याच्या कचेरीमध्ये तेथील कॉटेजचे आरक्षण होऊ शकते

अली नावाच्या व्यापाऱ्याने आपल्या बागा कमी करून शहराच्या विस्ताराला वाव करून दिला म्हणून त्या शहराचे नाव अलिबाग पडले त्याआधी त्याला श्रीबाग म्हणून ओळखले जाई समुद्रकिनाऱ्यावरील नारळी, पोफळीच्या हिरव्या 'वाड्या'मुळे रमणीय झालेल्या अलिबागच झपाट्यान औद्योगिकरण होत आहे याच मुख्य कारण म्हणजे 'थळ' येथील खत प्रकल्प निसर्ग शांतीच्या शोधात असलेल्या वाढत्या पर्यटकामुळे एकेकाळच्या निवांत अलिबागमध्ये अलिशान हॉटेल्सचे इमले उठू लागले असून बऱ्याच जणानी आपली 'वाडी'तील घरे पर्यटक निवासात रूपांतरीत केली आहेत येथे राहण्याचा अनुभव काही वेगळाच

अलिबागच्या समुद्रातील किल्ला - कुलाबा फोर्ट हा शिवाजी महाराजाच्या अनेक सागरी किल्ल्यांपैकी एक परंतु त्याला जास्त महत्त्व प्राप्त झाल ते मराठ्याच आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे याच्या कारकिर्दीत पुळणीपासून सुमारे २०० मीटर्स दूर असलेला या किल्ल्यात फक्त ओहोटी असतानाच चालत जाता येते भरतीच्या वेळी चोहोबाजूनी हा किल्ला पाण्याने वेढून जातो, आणि या सुंदर बेटावरील किल्ल्यात आपण चालत जाऊ शकतो यावर चटकन विश्वासच बसत नाही इतर अनेक ऐतिहासिक वास्तूप्रमाणे आपल्या गत वैभवाची साक्ष देत अलिबागचा हा सागरी किल्ला जीर्णावस्थेत मूकपणे खडा आहे कमानीच्या मुख्य दरवाजातून आत गेल्यावर अनेक पडलेल्या, मोडकळीस आलेल्या वास्तू दृष्टीस पडतात. त्याचा इतिहास सांगणारे फलक किंवा मार्गदर्शक आढळत नाहीत किल्ल्याच्या मध्यावर छत कोसळलेल्या, पडझड झालेल्या अवस्थेत वाडा दिसतो तो कान्होजी आंग्रे याचा असावा जवळच शेवाळ वाढलेल्या अवस्थेतील गोड्या पाण्याच तळही आहे किल्ल्यात भवानी महिषासुरी, वेताळ, गणपती याची देवळेही आहेत किल्ल्याची स्थिती दु खद करणारी असली तरी त्याच्या मोडकळीस आलेल्या चिरेबंदीवरून भोवतालच्या अथांग सागराच चित्तवेधक दृश्य दिसत

कुलाबा फोर्टच्या अलिकडे एक नुसताच आकर्षक बुरूज वजा तटबदीचा किल्ला आहे मुख्य किल्ल्याचे सरक्षण करण्यासाठी तो बाधला गेला असावा

अलिबागजवळील नौगाव ( ६ कि मी ) आणि किहीम ( १२ कि मी ) हे सुदर बीचेस आहेत पैकी किहीम येथे तबूत राहण्याची सोय आहे मात्र ही सुविधा पावसाळ्यात बद असते कुठलाही बीच हा ओहोटीच्या वेळी तेवढा आकर्षक वाटत नाही म्हणून नुसतच जायच, समुद्र-स्नान करायच असल्यास भरतीची वेळ पाहून गेलेल चागल.

अलिबागजवळील सिद्धेश्वर, सागरगड, तसेच रेवदड्याच्या वाटेवरील कणकेश्वर मदिर, चौलचा किल्ला प्रेक्षणीय आहेत. अलिबागला मुक्काम करून ही स्थळे पाहता येतील

अत्यत सुरेख असा हा रेवदड्याचा बीच आहे रेवदंड्यापर्यंतचा रस्ताही कोकणच खर-खुर रूपदर्शन घडवणारा दोन्ही बाजूना असणाऱ्या नारळी- पोफळीच्या गर्द वाड्याच्या सावलीतून निवात जाणारा कॉंक्रीटचा रस्ता, कोकणची साधी-भोळी माणस, रगी-बेरगी साडी- चोळीतील आकर्षक रगमय फुल माळलेल्या कोकणी स्त्रिया ना शहरी धावपळ, ना चढाओढ

रेवदड्याच्या खाडीवरील पूल ओलाडून मुरूडकडे वळल्यावर दोन्ही कडाच्या गर्द बागा सपल्या तरी एका बाजूला साथ देणाऱ्या सागराच वेधक रूप दिसतच राहत निळ्याशार समुद्राच्या लाटाच किनाऱ्याशी चाललेल लडीवाळ पदरव भान हरपवून टाकत निसर्गाची उधळण वाटेत कुठेही थाबून मुक्तपणे बघत राहावी इतकी स्वच्छ, प्रदूषणमुक्त, शात किनारपट्टी कुठलीही जागा रम्य पिकनिक स्पॉट होऊ शकेल एवढी सुरेख या मार्गावर कोरलाईचा किल्लाही लागतो

अलिबागपासून ५१ कि मी वर असलेल मुरूड जवळ येऊ लागताच लाबून एक सागरी किल्ला दिसू लागतो मुरूड म्हटल की जजिऱ्याच्या नावाच समीकरण डोक्यात इतक पक्क बसलेल असत, की तो जजिराच वाटतो पण तो असतो 'कासं'चा किल्ला मुरूडहून जजिरा दृष्टीक्षेपात येत नाही त्यासाठी जाव लागत एक छोटी डोंगरघाटी ओलाडून ५ कि मी वरील राजापुरीला राजापुरी हे सिद्दी जोहरच्या राजधानीच नाव बहुतेक वस्ती मुस्लीम राजापुरीहून जजिऱ्याला जाण्यासाठी शिडाच्या नावा मिळतात कमीत कमी दहा लोक असतील तर नाव निघते थाबाव लागत किंवा दहा जणाचे पैसे भरून स्वतत्र बोट करावी लागते भरती असेल तर दहा मिनिटाच्या आत भक्कम तटबदीचा दिमाखदार अभेद्य जजिरा येतो ओहोटी असल्यास किती वेळ लागेल हे वाऱ्यावर अवलबून

जजिऱ्याची भव्यता नजरेत मावणारी नाही हेलकावणाऱ्या नावेतून उतरून आत जाताच बावीस एकरापेक्षा जास्तीचा परिसर ओझरता का होईना पाहण्यासाठी मार्गदर्शक हा हवाच ! पडझड झालेले भग्न अवशेष, मार्गदर्शक पाट्या नाहीत त्यामुळे गाईड नसेल तर नुसतीच पायपीट पडायची शक्यता अधिक वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना असलेल्या ३००

वर्षांच्या जजिऱ्याच भक्कम दगडी बाधकाम, सरक्षणासाठीच्या अजस्त्र तोफा, गुफासारख तळघर, चोर दरवाजा इत्यादी पाहून हा शेवटपर्यंत अजिक्य कसा राहिला असावा याची थोडीफार प्रचिती येते किल्ल्यातील नबाबाचा पडक्या अवस्थेतील राजवाडा, भिंतीतून वाढलेली झाडे, पिण्याच्या पाण्याच्या तळ्यात साठलेली शेवाळ ! इतिहासाच्या या अनमोल ठेव्याचा वेगाने होत असलेला ऱ्हास मन विषण्ण करणारा वाटतो 'आत येण्यास सक्त मनाई' करणारा मोठा फलक असलेला सिद्दीचा मुरूड गावाच्या सुरवातीचा राजप्रासाद बाहेरून तरी भव्य दिसतो

ताडाच्या झाडीचा विस्तीर्ण सागरकिनारा लाभलेल्या मुरूडपासून काही अतरावर आहेत पर्यटकाची विशेष वर्दळ नसणारे काशीद आणि नादगाव येथील रम्य समुद्रकिनारे. मुरूडला मुबई ( १६५ कि मी ) आणि पुणे ( २३० कि मी महाडमार्गे ) राज्य परिवहनाची नियमित बससेवा असून महाराष्ट्र राज्य पर्यटन महामडळाची निवास सुविधाही आहे ( आरक्षण मुबई, मुरूड, जि रायगड ४०२४०१, मुक्काम समाप्तीची वेळ सकाळी ८ )

* *




# निसर्गरम्य हरिहरेश्वर

निसर्गरम्य कोकण म्हणजे महाराष्ट्राला लाभलेल वरदानच या नितातसुदर कोकण पट्टीच्या कोंदणात वसल आहे बाळाजी विश्वनाथाच जन्मगाव, पेशव्याच मूळ गाव श्रीवर्धन प्रदूषणमुक्त शात समुद्र किनारा, तांबड्या मातीच्या रस्त्यांच्या कडेच्या नारळी-पोफळींच्या हिरव्या शीतल वाड्या यानी रमणीय झालेल्या श्रीवर्धनपासून रस्त्याने सुमारे वीस किलोमीटर्सवर आहे पेशवे, लो टिळक यासारख्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्याच कुलदैवत 'हरिहरेश्वर'

शहरी गजबजाटापासून दूर अशा चित्तवृत्ती प्रसन्न करणाऱ्या विलोभनीय परिसरातील मनोहारी समुद्रातटीचे हरिहरेश्वर 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल जात हरिहरेश्वरच्या मुख्य देवालयात गणपती व नदी याच्या मूर्ती असून ब्रह्मा, विष्णू, महेश व आदिमाया पार्वती हे लिगरूपाने आहेत या देवळासमोर कालभैरव व योगेश्वरी देवी अशी मदिरे असून मागे मारुतीचे देऊळ आहे शतघ्न दैत्याचा वध करण्यासाठी अवतार झाल्याचे मानण्यात येणाऱ्या

कालभैरवला रोज चदनाचा भोग चढविण्यात येतो हरिहरेश्वरच्या कालभैरवाच्या दर्शनाने भूत पिशाच्च बाधा, ग्रहपीडा दूर होते, अशी भाविकाची श्रद्धा आहे.

अत्यत जागृत देवस्थान म्हणून हरिहरेश्वर ख्यातनाम असल तरी माझ्या दृष्टीने जास्त महत्वाच म्हणजे पचमहाभूताच्या रूपाने दिसणाऱ्या परमेश्वराच तेथे घडणार अजोड दर्शन म्हणूनच कोणत्याही जाती- धर्माच्या आस्तिक- नास्तिकानाही मुद्दाम जाव अस हरिहरेश्वर हे अतिव सुदर स्थान !

भूगोलशास्त्राचा थक्क करणारा आविष्कार हरिहरेश्वरला बघायला मिळतो मात्र त्यासाठी नुसत मूर्तरूप देवदर्शन घेऊन परत येण्यात काही गम्य नाही, तर आवर्जून प्रदक्षिणा घालायला हवी हरिहरेश्वरची प्रदक्षिणा देवळाभोवताली नसून डोंगराच्या कडेने आहे, कारण ब्रह्मा, विष्णू, महेश व पार्वती डोंगर रूपाने येते वास्तव्य करून असल्याच मानल जात मात्र ही डोंगर प्रदक्षिणा फक्त ओहोटीच्या वेळेसच घालता येते. त्यासाठी ओहोटीची वेळ पाहून जायला हव

समुद्राच्या लाटा, वारा यामुळे सागर किनाऱ्यावरील डोंगरकड्याची झीज होऊन त्यावर मधमाशाच्या पोवळ्यासारख लक्षणीय कोरीव नक्षीकाम चितारल गेल आहे डोंगरामध्ये माणस आरामात बसू शकतील अशा गुहा निर्माण झाल्या आहेत खाऱ्या पाण्याशेजारी असलेल्या डोंगर कपारीतील गायत्रीतीर्थ, भगीरथतीर्थ येथील पाणी मात्र गोड आहे

समुद्र किनाऱ्यावरील जमिनीच्या खडकाचीही लाटामुळे अशीच झीज होऊन त्यावर नानाविध आकार निर्माण झालेले आहेत निसर्गदेवाने भक्तगणाच्या स्वागतासाठी घातलेली रंगावलीच जणू काही ! समुद्रालगतच्या खडकावर कालव्याची धारदार कडक कवचाची घर असल्याने तो भाग धोकादायक झाला आहे. चुकून पाऊल घसरल तर शरीर कापूनच निघायच !

भूगोलशास्त्राची विविध रूपे आख्यायिकेतून अशी काही रजकतेने गुफलेली दिसतात की अभ्यासताना रटाळ वाटणारा भूगोल हरिहरेश्वरच्या प्रदक्षिणेत सहजतेने शिकला जातो

मुख्य देवालयाजवळील डोंगरमाथ्यावर गेल्यावर, त्याच्या समुद्राकडील पायऱ्या उतरल्यानतर किनाऱ्यावरील डोंगरामध्ये मुख्य शुक्लतीर्थ लागते त्याच्या पूर्वेस जवळच विष्णूपद असून त्यासमोर गायत्रीतीर्थ आहे. उत्तरेस चक्रतीर्थ व सूर्यतीर्थ आहेत शुक्ल तीर्थाच्या स्नानाने पिशाच्चाना मुक्ती मिळते आणि मनुष्यमात्राच्या पापाचा नाश होतो अस श्रद्धावान मानतात

येथून काही अतरावर पाडवतीर्थ व भगीरथतीर्थ असून पाडवतीर्थावर श्राद्धकर्म केल्याने मोक्षप्राप्ती होत असल्याच म्हटल जात अगाध निसर्गाच विराट सुदर रूप दुखऱ्या मनावर हळुवार फुकर घालत असाव

हरिहरेश्वरच्या देवस्थानाभोवती लहान-मोठी १०८ तीर्थस्थाने असल्याच सांगितल जात या ठिकाणाच्या कथातून निसर्गरूपी परमेश्वराच्या विविध आविष्कारांचं दर्शन घडत

श्रीरामानी बाण मारून पाणी काढले ती बाणगगा नदी आपल्यासमोर समुद्रात विलीन होताना दिसते

एकीकडे डोंगरकड्याशी कठोर झुंजणाऱ्या सागर लाटा दुसऱ्या बाजूला मऊशार वाळूशी लडिवाळपणे पदन्यास करताना दिसतात निसर्गराजाची नानाविधरूपे तासन् तास न्याहाळत बसाव इतका रम्य असा हा हरिहरेश्वरचा समुद्र किनारा !

हरिहरेश्वरचा सूर्यास्त तर अवर्णनीय म्हणावा असा लाल रगाच्या विविध मुलायम छटानी लहरणाऱ्या सागरात लुप्त होणाऱ्या त्या लालबुंद गोळ्याच दृश्य भान हरपवून टाकत

निसर्गदेवतेन आपल्या अप्रतिम रूपाच लेण मानवी आक्रमणापासून अजूनही खूपस जपून ठेवल्याने हरिहरेश्वरची भेट कोणालाही निखळ आनद देईल महाराष्ट्र पर्यटन मडळाने तेथे आता तबूतील निवासाची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे

* *

REFBK-0027714

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवेश ७७३
दा. क. ३००७४
१५।०२।८६
ग्रंथ शाखा